מועדים

THE

THREE GREAT JEWISH FESTIVALS

इस्राएलांचे त्रिपर्वोत्साह

ह्मणजे

सुक्कोथ, पेसाह व शाबूओथ.

किंमत १ रुपया १२ आणे.

Yours Sincerely
Joseph Ezekiel

מועדים

THE PRAYERS OF THE THREE GREAT JEWISH FESTIVALS.

TRANSLATED

(With explanatory Notes.)

BY

JOSEPH EZEKIEL,

FOR FORTY YEARS HEAD MASTER OF THE DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION, FELLOW AND HEBREW EXAMINER OF THE UNIVERSITY OF BOMBAY

AND

JUSTICE OF THE PEACE.

Bombay.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGAR" PRESS.

Registered under Act XXV of 1867.

1901—5661.

Price 1 Rupee 12 Annas.

מועדים

इस्राएलांचे त्रिपर्वोत्साह

ह्मणजे

सुक्कोथ, पेसाह व शाबूओथ.

या ग्रंथाचें

इंग्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोनच्या शाळेचे चाळीस वर्षेपर्यंत मुख्य गुरु,

मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो, व इंग्री परीक्षक

व

जस्टिस आफ धी पीस

यांनीं सटीक भाषांतर केलें.

तें

मुंबईमध्यें

निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८६७ च्या आक्ट २५ प्रमाणें नोंदिलें असे.

सन १९०१—इस्राएली ५६६१.

किंमत १ रुपया १२ आणे.

TO

The Beloved Memory

OF

MY DEAR UNCLE

SAMUEL JOSEPH RAJPURKAR

TEACHER AND HAZZAN OF THE "BETH EL" SYNAGOGUE OF REWDANDA, WHO WAS LOVED AND REVERED BY A LARGE CIRCLE OF RELATIONS AND ACQUAINTANCES AND WHO ENTERED THE ABODE OF THE BLESSED AT THE AGE OF 81 YEARS ON MONDAY 15TH FEBRUARY 1892

AND

Also to the Beloved Memory

OF

MY DEAR COUSIN

MOSES ELIJAH RAJPURKAR,

WARDEN OF THE "SHAAR HARAHAMIM" SYNOGOGUE, AND SUPERINTENDENT OF THE EXECUTION DEPARTMENT OF THE BOMBAY COURT OF SMALL CAUSES, WHO IN SEVERAL WAYS RENDERED HELP TO THE POOR AND HELPLESS AND ENTERED THE ABODE OF THE BLESSED AT THE AGE OF 55 YEARS ON FRIDAY 28TH JULY 1899.

In acknowledgment of the great and many acts of love received at the hands of both of them, as a token of veneration to their departed worth.

BY

JOSEPH EZEKIEL.

माझे प्रिय स्वर्गवासी चुलते

शेमूएल योसेफ राजपुरकर

इब्री व मराठी शिक्षक

व

रेवदंडा एथील "बेथएल" प्रार्थनामंदिराचे हाज्जान, जे आपल्या सर्व आप्त व परिचित जनांस अति प्रिय व सन्माननीय होते, व जे आपल्या आयुष्याच्या ८१ व्या वर्षी ता. १५ फेब्रुआरी सन १८९२ सोमवार रोजीं

एदेनांत विश्रांति पावले ते,

व

माझे प्रिय स्वर्गवासी चुलतबंधु

मोशे एलीया राजपुरकर

मुंबई एथील "शाआर हाराहामीम" प्रार्थनामंदिराचे मानकरी, व स्मालकाज कोर्टांतील एक्सिक्युशन खात्याचे सुपरिन्टेंडेन्ट; ज्यांनीं गरिब व निराश्रित लोकांस अनेक प्रकारें साह्य केलें व जे आपल्या आयुष्याच्या ५५ व्या वर्षीं

एदेनांत विश्रांति पावले ते,

हे दोघेही सर्वदा मजशीं मोठ्या प्रेमानें वागत असत

ह्मणून

त्यांच्या सन्मानार्थ हा ग्रंथ मीं मोठ्या आदरानें समर्पिला असे.

योसेफ येहेजकेल राजपुरकर.

प्रस्तावना.

सर्वसमर्थ जो जगत्कर्ता यानें आपल्या सेवेकरितां इस्राएल लोकांस निवडून घेऊन, व त्यांस पवित्रलोक, याजकांचें राज्य इत्यादि थोर नांवें देवून त्यांजकरितां अनेक चमत्कार केले. त्यांतील जे मोठाले चमत्कार त्यांची इस्राएल लोकांस सदा आठवण राहून पिढोपिढीं त्यांनीं त्याचें गौरव करावें ह्मणून त्यानें त्यांस, ज्या त्रिपर्वोत्साहांच्या प्रार्थनांचें भाषांतर मीं या ग्रंथीं केलें आहे, ते लावून दिले आहेत. मिसरामध्यें दास असतां व त्यांचा समूळ नाश होण्याचें भय असतां, त्यांच्या पीडकांवर अनेक पीडा पाठवून त्यांस त्या दास्यत्वांतून सोडविलें, याच्या आठवणीकरितां पेसाह; त्यांस दैहिक व आत्मिक सुख व्हावें ह्मणून त्यांच्या आचरणाकरितां जें उत्तम नियमांचें शास्त्र दिलें, या देणगीच्या आठवणीकरितां शाबूओथ, आणि मिसरांतून निघाल्यावर चाळीस वर्षें रानांत निराश्रित असतां, त्यांजवर आपल्या दयेचा मंडप विस्तारून अनेक व मोठाल्या संकटांतून त्यांस रक्षिलें याच्या आठवणीकरितां सुक्कोथ, असे पर्व त्यानें त्यांस लावून दिले आहेत. याशिवाय या सणाचीं आणखीहि कारणें आहेत. आपल्या पेरलेले शेतास चांगल्या कणइया येऊं लागल्यास देवाचे आभार मानण्याकरितां पेसाह; त्या पिकाची कापणी करितांना त्याचे आभार मानण्याकरितां शाबूओथ, ज्यास कापणीचा सण असेंहि ह्मणतात तो; आणि तें पीक साठवितांना त्याचे आभार मानण्याकरितां सुक्कोथ, त्यास सांठविण्याचा सण असेंहि ह्मणतात तो. हे तीन सण व त्यांतील विधि पाळण्याविषयीं शास्त्रांत अनेक वेळां व बजावून सांगितलें आहे ह्मणून, आपणास ज्येष्ठ पुत्र मानणाऱ्या दयाळू बापाशीं आपण कृतघ्नपणें वागतों, असा दोष आपणास लागूं नये ह्मणून आपण इस्राएल ह्मणविणारांस, हे अगत्य पाळलेच पाहिजेत. तर या दिवसांचें पूर्ण माहात्म्य काय व ते कसे पाळावे व या दिवशीं आपण जी ईश्वरस्तुति व प्रार्थना करितों तिचा अर्थ काय हें सर्वांस समजलें ह्मणजे मोठ्या भक्तिभावें ते आपल्या दयाळू बापापुढें ती प्रार्थना वाहतील, व तोहि ती मान्य करील या आशेनें मी हें भाषांतर त्यांस सादर करितों. ही माझी आशा पूर्ण झाल्यास माझ्या श्रमाचें व आकारल्यापेक्षां मला अधिक झालेल्या खर्चाचें सार्थक झालें असें मी समजेन.

या ग्रंथीं पृष्ठ ११३ एथें मस्साचा तुकडा मारोरमध्यें गुंडाळून कशांतहि न बुडवितां तो खावा असें जें लिहिलें आहे, त्यास आधार आहे व कोणी बांधव तसें करितात; तरी ते पदार्थ शिऱ्यांत बुडवून खाण्याची वहिवाट आहे ती पालटूं नये, कारण तसेंहि कोणी करितात.

शुद्धिपत्र.

पृष्ठ	८	ओळ	२६	तू धन्य आहेस	एथें	तूं धन्य आहेस आमेन.	असें	वाचावें.
,,	१४	,,	१०	זכר אל	,,	זכר אל	,,	,,
,,	,,	,,	२२	מזמור שיר	,,	מזמור שיר	,,	,,
,,	२८	,,	८	या पुढील	,,	हा पुढील	,,	,,
,,	,,	,,	१९	जग तें	,,	जगतें	,,	,,
,,	३७	,,	२८	मन्त्रे	,,	मन्त्रे	,,	,,
,,	५७	,,	६	येथें	,,	एथें	,,	,,
,,	६३	,,	२३	भक्षसमग्रीच्या.	,,	चांगल्या भक्षसामग्रीच्या	,,	,,
,,	७३	,,	२८	पेथ अर्पण.	,,	पेय अर्पण	,,	,,
,,	७८	,,	८-९	ओढण्यास.	,,	ओरडण्यास	,,	,,

מועדים

इस्राएलांचे त्रिपर्वोत्साह

म्हणजे

सुक्कोथ, पेसाह व शाबूओथ.

ईश्वर साहाय्य असो.

सणाच्या आदल्या दिवसाचा विधि.

जर बृहस्पतवारीं किंवा शुक्रवारीं सण असला, तर त्याच्या आदल्या दिवशीं हाज्जानानें एक भाकर व शिजलेल्या पदार्थांतून कांहीं मास, मच्छ किंवा अंडें घेऊन ज्या कोणीं विसर पडल्यामुळें किंवा अडचणीमुळें עירוב[1] एरूब ठेविलें नसेल, त्याकरितां ठेवावें; आणि म्हणावें कीं या शहरांतील ज्या गृहस्थांनीं सणाच्या दिवशीं शाब्बाथ दिवसाकरितां रांधायास मोकळीक असावी म्हणून एरूब केलें नसेल त्यांकरितां मी या एरूबाचा उपयोग करितों. मग हाज्जानानें तें एरूब हातांत घेऊन हा पुढील धन्यवाद करावा व तो धन्यवाद करितांना शेवटीं (आह्मांस व या शहरांतील सर्व इस्राएल लोकांसही मोकळीक असो) असेंही म्हणावें.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा. आह्मांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, आणि आह्मांस एरुबाची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

בדין עירובא या एरूबाकडून आह्मांस (आणि या शहरांतील सर्व इस्राएलांस) सणाच्या दिवशीं शाब्बाथाकरितां भाकर भाजायास, रांधायास, जेवण झांकून ठेवायास, दिवे तयार करायास, पेटवायास व दुसऱ्या सर्व अगत्याच्या गोष्टी करावयास मोकळीक असो.

---

१. टीका १.

(ज्या कोणीं आपले घरीं एरूव ठेविलें नसेल त्यानें जाऊन ठेवावें, अशी सूचना हाज्जानाकडून तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत होण्याची चाल आहे. आणि सणाच्या दुसऱ्या रात्रीं קדיש תתקבל नंतर हाज्जानानें असें कळवावें कीं, जेवण रांधायास मोकळीक असावी, ह्मणून ज्या कोणी जाणून, अडचणीमुळें किंवा न जाणून एरूव ठेविलें नसेल, त्यानें माझ्या एरूवावर आधार धरावा.)

प्रार्थनामंदिरीं जातांना नमन करून हें ह्मणावें.

מה טובו हे याकोबा, तुझे डेरे; हे इस्राएला, तुझ्या वस्त्या किती सुंदर आहेत. आणि मी तुझ्या परम कृपेनें तुझ्या घरांत येईन आणि तुझें भय धरून तुझ्या पवित्र मंदिराकडे मी नमन करीन.

प्रत्येक हाज्जानानें प्रार्थनेपूर्वीं स्वतांकरितां करायाची प्रार्थना.

יהי רצון हे परमेश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, ज्या वेळीं आज मी (संध्याकाळची) (पाहांटेची) (अधिक करायाची) (तिसऱ्या प्रहरची) प्रार्थना करायास उभा असतों, तेव्हां तुझी प्रसन्नता होऊन माझे विचार गोंधळूं नयेत ह्मणून सर्व प्रकारचे इतर विचार व सर्व प्रकारचें भय मजपासून दूर कर, आणि प्रार्थना करायास मला दृढ शक्ति व शुद्ध अंतःकरण दे. आणि माझा घसा न बसो, माझें पूजन पवित्र मानिलें जावो, माझा हिरमोड न होवो, मजवर सद्विचाराचा अम्मल असून दुर्विचाराचा अम्मल मजवर नसो. आणि तुजपुढें तुझी सेवा करायास व तुझे नामाचें गायन व कीर्तन करायास माझ्या मनीं तुझी प्रीति व तुझें भय दे; आणि माझा भक्तिभाव पूर्णमनानें ईश्वरी नामाकडे असो. आणि माझी प्रार्थना याजकांच्या हातून वाहिल्या गेलेल्या अर्पणाप्रमाणें मान्य कर. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

हें पुढील वाक्य दहा वेळ ह्मणावें.

ונח מצא חן नोव्हा तर परमेश्वराच्या दृष्टींत कृपा पावला.

तीन सणांची संध्याकाळची प्रार्थना.

जर शुक्रवार संध्याकाळीं सणास आरंभ झाला तर इतर शुक्रवार संध्याकाळप्रमाणें आरंभ करून השכיבנו च्या शेवटपर्यंत वाचीत जातात; परंतु मध्येंच יי מלך नंतर प्रत्येक सणाचें नेमिलेलें गीत ह्मणजे सुक्कोथमध्यें למנצח משכיל לבני קרח गीत ४१ व ४२, शेमीनी आसेरेथ मध्यें למנצח על השמינית व שפטני אלהים गीत १२, पेसाहमध्यें הודו ליי כי טוב गीत १०७ व शावूओथमध्यें למנצח לדוד מזמור שיר गीत ६८ याप्रमाणें ह्मटलें पाहिजे. कोणी במה מדליקין हा भाग सोडीत असतात. इतर दिवशीं सणास आरंभ झाला, तर त्या सणाच्या नेमिलेल्या गीतापासून आरंभ करून השכיבנו च्या शेवटपर्यंत वाचून शाब्बाथ असल्यास ושמרו בני ישראל हीं दोन वाक्यें ह्मणावीं व सणाकारणें हें पुढील वाक्य ह्मणावें.

אלה מועדי יי परमेश्वराचे पर्वकाळ पवित्र मेळे जे तुह्मी यथाकाळीं प्रगट करावे ते हे.

קדיש לעילא

मग हें पुढील उभें राहून एक चित्तानें व मोठ्या भक्तिभावानें वाचावें.

אדני שפתי תפתח हे प्रभु, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांचा धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेंकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस. तूं राजा, सहायकर्त्ता, तारक व आह्मांवर ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

אתה גבור हे प्रभु, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस; मेलेल्यांस जीवंत करणारा, तारायास समर्थ, दहिंवर पाडणारा, (**सेमीनी आसेरेथच्या अधिक प्रार्थनेपासून पेसाहच्या पहिले दिवसाच्या पाहांटेच्या प्रार्थनेपर्यंत**—वारा वाहविणारा व पाऊस पाडणारा,) कृपेनें प्राणीमात्रांचें

पोषण करणारा, बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण! आणि हे राजा, मारणाऱ्या, जीवंत करणाऱ्या व तारण उगीवणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल ! आणि मेलेल्यास जीवंत करणारा तूं सत्य आहेस. **हे परमेश्वरा,** मेलेल्यास जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पाहांटेच्या व तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत मोठ्यानें वाचतांना हे पुढीलहि वाचतात.

נקדיש जसी पवित्र सेराफीमांची[१] मंडळी, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकांला मोठ्यानें बोलत ह्मणाले "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे;" याप्रमाणें तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्यासमोर जे असतात ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनामध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे; तुह्मी परमेश्वराला स्तवा.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात; (कारण तूंच महान् राजा व पवित्र देव आहेस,) हे परमेश्वरा, पवित्र देवा, तूं धन्य आहेस.

אתה בחרתנו त्वां आह्मांस सर्व लोकांतून निवडून घेतलें, आह्मांवर प्रीति करून व आह्मांस प्रसन्न होऊन सर्व जातींपेक्षां[२] आह्मांस उंचावलें; आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र केलें; हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घेतलें; आणि तूं आपलें मोठें व पवित्र नाम आह्मांस दिल्हें आहेस.

---

१. सेराफीम हे एक प्रकारचे देवदूत आहेत. २. इ भाषांपेक्षां.

सणाच्या रात्रीं शनवार संध्याकाळ असल्यास हें आणखी ह्मणतात.

ותודיענו हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आपले यथार्थ न्याय आह्मांस समजविले; तुझ्या इच्छेच्या नियमाप्रमाणें वर्तायास आह्मांस शिकविलें; प्रीतीनें त्वां आपले सरळ न्याय, सत्य शास्त्र व चांगले नियम व आज्ञा आह्मांस दिल्या; त्वां आह्मांस नेमिलेले हर्षयुक्त वेळ, पवित्र सण व स्वसंतोषाच्या पर्वणी यांचें वतन दिलें; शाब्बाथाची पवित्रता, सणाचें महात्म व पर्वणीचा समारंभ यांचें आह्मांस वारस केलें; आणि त्वां शाब्बाथाच्या पवित्रतेमध्यें व सणाच्या पवित्रतेमध्यें भेद केला; काम करायाच्या साहा दिवसांपासून सातव्या दिवसास पवित्र करून भेद राखिला, आणि आपल्या पवित्रतेकडून आपले लोक इस्राएल यांसहि पवित्र केलें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं प्रीतिभावेंकरून आह्मांस.—

शाब्बाथ असल्यास—विश्रांतिकरितां शाब्बाथ व.

सण असल्यास—हर्ष करण्याकरितां सण, व उल्लास करण्याकरितां पर्वणी व नेमिलेले वेळ-ह्मणजे.

शाब्बाथ असल्यास—हा शाब्बाथ दिवस व.

सुक्कोथच्या सणांत—हा मंडपाच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन[१], हा आमच्या आनंदाचा वेळ.

शेमीनी आसेरेथच्या सणांत—हा आठव्या दिवसाच्या सणाची सभा मिळण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आमच्या आनंदाचा वेळ.

पेसाहच्या सणांत—हा न फुगलेल्या भाकरीच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आमच्या मुक्ततेचा वेळ.

शावूओथच्या सणांत—हा सप्तकांच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आह्मांस शास्त्र देण्याचा वेळ,

---

१. सणाच्या मधल्या दिवसांत जेथें "सुदिन" असें ह्मणायाचें तेथें "दिवस" असें ह्मणावें.

जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो आह्मांस दिला आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या येरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणें यांची आठवण—

शाब्बाथ असल्यास—या शाब्बाथ दिवशीं व.

सुक्कोथच्या सणांत—या मंडपाच्या सणाच्या दिवशीं.

शेमीनी आसेरेथच्या सणांत—या आठव्या दिवसाच्या सणाची सभा मिळण्याच्या दिवशीं.

पेसाहच्या सणांत—या न फुगलेल्या भाकरीच्या सणाच्या दिवशीं.

शाबूओथच्या सणांत—या सप्तकांच्या सणाच्या दिवशीं.

या पवित्र मेळा मिळण्याचा सुदिनीं, यशस्वी तारणाकरितां कृपेनें दयेनें व ममतेनें तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली व आठविली जावो. आह्मांवर दया करण्यास व आमचें तारण करण्यास, हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आह्मांवर आशीर्वाद होण्याकरितां आह्मांस दर्शन दे; आह्मांस चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनानें आह्मांस तार; आह्मांवर कृपा कर व आमची करुणा येऊंदे; आह्मांवर दया कर व आमची काकळूत येऊंदे आणि आह्मांस तार; कारण तूंच दयाळू व कृपाळू राजा आहेस; ह्मणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

והשיאנו יי אלהינו आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मांवर कृपा करून, हर्षयुक्त व शांतीकारक जीवनाकरितां तूं प्रसन्न होऊन आशीर्वाद देण्याविषयीं ह्मटल्याप्रमाणें आह्मांस तुझ्या सणांचा आशीर्वाद दे. सेलाह. तूं आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र कर; तुझें शास्त्र आमचा वंत होऊं दे; आपल्या चांगुलपणाकडून आह्मांस तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्यानें करायास आमचीं मनें शुद्ध कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा,

शाब्बाथ असल्यास—शाब्बाथ हें प्रिय, आवडतें व.

पवित्र सण तुझे आनंदाचें व हर्षाचें वतन आह्मांस करून दे; असे कीं, तुझें नाम पवित्र मानणाऱ्या, सर्व इस्राएलांनीं तुजमध्यें हर्ष करावा. हे परमेश्वरा,—

शाब्बाथ असल्यास—शाब्बाथास व.

इस्राएलास व नेमिलेल्या वेळांस पवित्र करणाऱ्या तूं धन्य आहेस.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो, त्यांची प्रार्थना मनांवर घे, आपल्या घराच्या प्रसाद-स्थानीं पूजन पुनः चालू कर, इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर प्रीतीनें व आवडीनें मान्य कर. आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला सर्वदा आवडो.

ואתה ברחמיך הרבים तूं आपल्या बहुत दयेनें आह्मांविषयीं संतोषित होऊन आह्मांस प्रसन्न हो; मग आमचे डोळे तुला कृपेनें सीयो-नेकडे फिरतांना पाहतील. हे परमेश्वरा. आपला शेखीना[1] सीयोनेंमध्यें पुनः स्थापना करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך सदा[2] सर्वकाल आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आह्मीं स्तवितों[3]. तूं आमचा व आमच्या जी-वाचा खडकरूप आश्रय व आमचे तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझे स्वाधीन आहे, तुझे चमत्कार आह्मांमध्यें नित्य केले जातात, आणि तुझीं आश्चर्यकृत्यें व तुझा चांगुलपणा आह्मी सर्वदा संध्याकाळीं सकाळीं व दोन प्रहरीं अनुभवितों. त्याकरितां आह्मी पिढोपिढीं तुझें कीर्त्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया आह्मांवरून नाहींसी होत नाहीं; तूं कृपाळू, कारण सर्वकाळ आह्मी तुजवर आशा ठेवितों, ह्मणून तुझी कृपा आह्मांवरून सरत नाहीं.

---

१ साक्षात्कार. २ हा भाग दिवसाच्या प्रार्थनेंत हाज्जान मोठ्यानें ह्मणत असतां मं-डळीनें מודים דרבנן नि. प्रा. पृष्ट २१८ हें ह्मणावें. ३ स्तवितों याच्या इब्रीशब्दाचा अर्थ कोणी अधिकार मान्य करितों असाहि करितात.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व दयेवरून तुझें नाम अखंडीत व सर्वकाळ धन्य ह्मटलें, उंचावलें व वर्णिलें जावो; आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह.

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेनें स्तवितील व धन्य ह्मणतील, कारण तें चांगलें आहे. सेलाह. हे परमेश्वरा तूं धन्य आहेस, तुझें नाम चांगलें आणि स्तवन तुलाच शोभतें.

पाहांटेच्या, अधिक व तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत मोठ्यानें वाचतांना हें पुढील वाचतात.

אוא ברכנו בברכה हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, जो तिप्पट आशीर्वाद तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो आहारोन व त्याचे पुत्र उच्चारीत असत कीं, "परमेश्वरानें तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वरानें आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वरानें आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यांनीं माझें नाम इस्राएलाच्या संतानांवर लावावें, ह्मणजे मी त्यास आशीर्वाद देईन;" तो आशीर्वाद तूं आह्मांस दे.

שים שלום हे परमेश्वरा, आह्मांवर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर कल्याण, जीवन, दया, कृपा, यथार्थता, आशीर्वाद व ममता असूं दे; आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मां सर्वांस एक मेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मांस शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा आशीर्वाद व शांति दिली आहेस. आणि आह्मांस व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा वळकट व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें आहेच. हे परमेश्वरा आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया व माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझे हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

אלהי נצור हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझे ओंठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात त्यांविषयीं तूं मौन्य धर, आणि माझा जीव सर्वांपुढें धुळी-प्रमाणें (नम्र) होवो. माझ्या जीवानें तुझ्या आज्ञांप्रमाणें चालावें, ह्मणून माझें मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव.) आणि जे कोणी माझ्या वाईटावर उठतात त्यांचे विचार लवकर मोडून त्यांच्या कुकल्याणाचा नाश कर. असें तूं आपल्या नामाकरितां, आपल्या पराक्रमाकरितां आपल्या शास्त्रांकरितां, आपल्या पवित्रतेकरितां कर. तुझे प्रिय मुक्त व्हावे ह्मणून तूं आपल्या उजव्या हातानें मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या हृद-यांतलें ध्यान मान्य होवो.

עושה שלום जो उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेनें आह्मांस व आपल्या सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

यानंतर पेसाहचा पहिला दिवस शाब्बाथ दिवशीं असला तर नित्याची प्रार्थना पृष्ठ २८९—२९२ एथें लिहिल्याप्रमाणें הלל ह्मणजे स्तवन पूर्ण वाचितात. इतर सणाचे दिवस शाब्बाथ दिवशीं असल्यास יום הששי ויכלו השמים व त्या नंतरचा מגן אבות चा धन्यवाद אלהינו च्या शेवटपर्यंत वाचून קדיש תתקבל हाज्जान वाचितो. पेसाहच्या पहिल्या दिवशीं हे भाग वाचूं नयेत. मग शाब्बाथ असल्यास מזמור לדוד יי רעי गीत २३ (नि. प्रा. पृष्ठ. १५१) आणि मंडपाच्या, शेमीनी आसेरेथच्या व शावूओथच्या सणांत, שיר המעלות לדוד שמחתי गीत १२२ (नि. प्रा. पृष्ठ. १९२) आणि पेसाहचे सणांत בצאת ישראל गीत ११४ (नि. प्रा. पृष्ठ २८९) अशीं गीतें मंडळी गाते. व त्यानंतर קדיש יהא שלמא. ברכו. על כן נקוה לך व עלינו לשבח वाचिल्यावर व मंडळीनें יגדל אלהים हें गीत गाईल्यावर प्रार्थना समाप्त होते.

मग प्रत्येक जन सुखानें घरीं जाऊन मंडपांत जेवणाची तयारी करितो, परंतु द्रा-क्षारसावर धन्यवाद होईपर्यंत मंडपांत कोणी बसूं नये.

---

१. इ. त्यांचे विचार गोंधळीव. २. इ. उजव्या हाताकरितां.

तीन सणांचें पवित्रीकरण.

शाब्बाथ असल्यास हें पुढीलहि ह्मणतात.

יום הששי साहावा दिवस (पूर्ण झाला) तेव्हां आकाश व पृथ्वी व त्यांतील सर्व समुदाय हीं समाप्त झालीं. मग देवानें आपलें जें काम केलें तें, सातव्या दिवशीं संपविलें; आणि आपलें सर्व जें काम केलें त्यापासून सातव्या दिवशीं तो स्वस्थ राहिला. आणि देवानें सातव्या दिवसाला आशीर्वाद दिला आणि त्याला पवित्र केलें. कारण कीं त्यांत तो आपलें जें उत्पत्तीचें काम त्यापासून स्वस्थ राहिला.

व्यवहारिक दिवस असल्यास एथून आरंभ करितात.

סברי מרנן आमच्या गुरूजनांच्या मताप्रमाणें.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, द्राक्षफळें उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्यानें लोकांमधून आह्मांस निवडून घेतलें, सर्व जातींपेक्षां आह्मांस उंचावलें आणि आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र केलें, तो तूं धन्य आहेस. ותתן לנו आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा तूं प्रीतीभावेंकरून आह्मांस.

शाब्बाथ असल्यास—विश्रांतिकरितां शाब्बाथ, व

सण असल्यास—हर्ष करण्याकरितां सण व उल्लास करण्याकरितां पर्वणी व नेमिलेले वेळ—ह्मणजे--

शाब्बाथ असल्यास—हा शाब्बाथ दिवस व.

सुक्कोथच्या सणांत—हा मंडपाच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आमच्या आनंदाचा वेळ.

शेमीनी आसेरेथच्या सणांत—हा आठव्या दिवसाच्या सणाची सभा मिळण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आमच्या आनंदाचा वेळ.

---

१. टीका. २ २. भाषांपेक्षां.

पेसाहच्या सणांत—हा न फुगलेल्या भाकरीचे सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आमच्या मुक्ततेचा वेळ.

शावूओथच्या सणांत—हा सप्तकांच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, हा आह्मांस शास्त्र देण्याचा वेळ.

जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो आह्मांस दिला आहेस; कारण तूं आह्मांस निवडून व आह्मांस (दुसऱ्या) लोकांपेक्षां अधिक पवित्र करून.

शाब्बाथ असल्यास—शाब्बाथ हे प्रिय व आवडते व तुझे पवित्र सण हें आनंदाचें व हर्षाचें वतन आह्मांस करून दिलेंस. हे परमेश्वरा,

शाब्बाथ असल्यास—शाब्बाथास व इस्राएलांस व नेमिलेले वेळांस पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मंडपाचे सणांत हे पुढील धन्यवादहि करितात.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा आह्मांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, आणि आह्मांस मंडपांत वस्ति करण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस हा वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मग धन्यवाद केलेल्या द्राक्षरसाचा प्याल्यांतून सुमारें चौथा भाग पिऊन तो भों-वतालच्या लोकांस प्यावयास द्यावा.

शनिवार संध्याकाळ असल्यास שהחיינו चा धन्यवाद करण्यापूर्वी हें ह्मणावें.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, अग्नीच्या ज्योति उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, पवित्र व अपवित्रं, उजेड व कालोख, इस्राएल व (दुसरे) लोक, सातवा दिवस व व्यवहाराचे साहा दिवस यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. त्वां शाब्बाथाच्या पवित्रतेमध्यें व सुदीनाच्या पवित्रतेमध्यें भेद केला, व्यवहाराच्या सहा दिवसांपेक्षां सातव्या दिवसास पवित्र करून त्यांमध्यें

भेद केला, आणि त्वां आपल्या पवित्रतेकडून आपल्या इस्राएल लोकांस पवित्र केलें आहे. हे परमेश्वरा, (एक) पवित्र (गोष्टीमध्यें व दुसऱ्या) पवित्र (गोष्टींमध्यें) भेद करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

यानंतर वर लिहिल्याप्रमाणें שהחיינו चा व मंडपांत वस्ति करण्याविषयींचा धन्यवाद करावा.

मंडपाच्या सणाच्या दुसऱ्या रात्रीं पवित्रीकरणांत सर्वदा שהחיינו चा धन्यवाद पहिल्यानें करून मग मंडपांत वस्ति करण्याविषयींचा धन्यवाद करावा. जेवणानंतरचा धन्यवाद हा पेसाहच्या हाग्गाद्यामध्यें सांपडेल.

रिब्बी शेलोमो याचें मंडपाच्या सणाकरितां गीत.

שדי אל सर्व समर्थ देव किती भयंकर आहे! तो तुह्मांस इस्राएलाच्या दास्यत्वांतून सीयोनेकडे गायनाच्या स्वरानें लवकर एकवटील.

למען जो "थोडें पाणी आणूं द्या" असें (दूतास) ह्मणाला त्याक[१]रितां, आणि ज्या मुलाची सुंता पहिल्यानेंच आठव्या दिवशीं झाली[२] त्याकरितां, आणि सरळ जो इस्राएल[३] त्याच्या पुण्याईकरितां; तुझ्या वस्तीचें नगर तूं बांध.

מלכנו आपला राजा शुभवर्तमानाकडून संकटसमयीं आपणांस उत्तर देईल; ह्मणून अहो इस्राएल! तुह्मी शास्त्र आपले मुखांतून जावूं देवूं नका.

השיבנו जगताचा स्वामी आपणांस आपल्या मंदिराकडे व प्रसादस्थानाकडे परतवील, आणि सर्वांस सीयोनेकडे चढून नेईल, आणि आपणाकरितां उद्धारणाराचा वेळ जवळ आणील.

חי जीवंत (देव) तुमची प्रार्थना ऐकेल, तुमच्या तारणाकरितां त्वरा करील, तुमच्या उद्धाराचा वेळ जवळ आणील, आणि मीखाएल दूतास पाठवील.

גבולנו देव इस्राएलाच्या शेषाकरितां आमची शीमा बांधील, आणि वाडा व स्थंडिल यांचा पाया देव घालील व त्याविषयीं तो संकल्प करील?

१. आब्राहाम उत्पत्ति. अ० १८ ओ० ४. २. इसहाक. उत्पत्ति. अ० २१ ओ० ४. ३. याकोब.

קדושנו आमचा पवित्र (देव) आह्मांस जीवंत राखील, आमचा माशीयाह आह्मांस दाखवील, आणि आह्मांस मिबसाम[1] आणि मेगदीएल[2] यांपासून लवकर सोडवील.

שלום तेव्हां माझें व तुमचेंहि कल्याण होईल; आणि तो तुह्मांस सर्व शत्रूंपासून सोडवील, आणि कल्याणाचें शुभवर्तमान तुह्मांस कळवील, मग देवाची प्रसन्नता पाहावयास तुह्मी योग्य व्हाल.

रिब्बी एलीएजेर याचें गीत.

זה אלי זה אלי हा माझा देव, हा माझा देव, हा माझा देव, ह्मणून मी त्याचें गौरव करीन.

אלהים עד מאד देव अति पवित्र आहे; गोष्टीच्या आरंभींच तिचा शेवट तो कळवितो; त्याचा प्रकाश पावसाच्या पहिल्या व मागल्या वृष्टीवर आणि ढगांवर आज्ञा चालवितो.

לפניו נצבו אורים ज्यापुढें ज्योति आपल्या पाहाऱ्यावर तिरासारख्या उभ्या आहेत; आणि ज्या त्यास पिढोपिढी नमन करितात; तसा तो आपल्या पवित्र लोकांस शिकवितो.

ערבות שם आकाश हें त्यानें आपला रथ असा करून ठेविला आहे; आणि त्याच्या छायेखालीं राहणारे हाय्योथ दूत त्याच्या थोरपणाचें, त्याच्या गौरवाचें व त्याच्या वैभवाचें महत्व वर्णितात.

זמן אין לו त्यास काळगति नाहीं व त्यास अग्रभाग नाहीं, त्यास घरें नाहींत व वाडे नाहींत; त्यास पुढा नाहीं व पाठ नाहीं; सर्व त्यानें आपल्या महत्वाकरितां केलें आहे.

רביד חן तो आपल्या ओळखणारांच्या गळ्यांत दयेची कंठी व गौरवाची माळा घालितो; परंतु आकाशांतील धगधगीत मंडल व तेजस्वि तारे हें सर्व त्याचें आहे.

---

१. मिबसाम जो इस्माएलाचा पुत्र याच्या संतानांपासून. २. मगदीएल जो एक एदोमी नायक याच्या संतानांपासून.

אלהים נאמן ज्यानें इब्री राष्ट्रास निवडिलें, व त्याजबरोबर करार केला, तो देव करारांत विश्वासू आहे; त्यास आदि नाहीं व अंतहि नाहीं.

לאברהם בראש आब्राहामास पूर्वी त्यानें दर्शन देऊन त्याच्या पुत्राचा होम करून वाहण्यास सांगितलें; तेव्हां त्यानेंच परम दयेनें त्यास हाक मारून त्याच्या एकुलत्यास वांचविलें.

עלי יעקב ळूज जें बेथएल एथें तो (देव) याकोबासंगातें होता, आणि पेनूएलांत तो त्यासीं सामर्थ्यानें प्रगटला आणि त्यास इस्राएल नांव देवून आपलें महत्व त्यास दाखविलें.

זכר אל हे देवा, ज्यानें योसेफाचें मुख पाहण्याची आवड धरिली त्याची आठवण कर, त्याच्या विखरलेल्या फांद्या एकवट आणि त्याच्या मंडळीचें पोषण कर.

רננות שרו जेव्हां नम्र (मोशे) याच्या हातून तूं त्यांस दर्शन दिलेंस, आणि जेव्हां समुद्र फारोवर व त्याच्या सैन्यावर जाऊन आपल्या पूर्व ठिकाणीं गेला, तेव्हां त्याच्या पुत्रांनीं गीतें गाईलीं.

तीन सणांची पाहांटेची प्रार्थना.

या प्रार्थनेसंबंधी जे धन्यवाद, जीं गीतें, जें कीर्त्तन व जी प्रार्थना आहे त्यांतील बहुतेक भागांचें भाषांतर केलेल्या नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथीं शाब्बाथ या सदराखालीं भाषांतर झालेलेंच आहे. जें कांहीं अधिक उणें आहे तेवढें मात्र एथें दर्शविलें आहे, तें येणेंप्रमाणें.

מזמור שירו ליי हें गीत वाचण्यापूर्वी आरंभीं सांगितल्याप्रमाणें प्रत्येक सणाचें नेमिलेलें गीत वाचावें पुढें מזמור שיר ליום השבת हें गीत वाचितांना शाब्बाथ असल्यास हे चार शब्दहि वाचितात, नसल्यास ते शब्द सोडतात. पेसाहच्या सातव्या दिवशीं או ישיר משה हें गीत ותקח מרים याच्या शेवटपर्यंत नि. प्रा. पृष्ठ. २०३–२०४ एथें लिहिल्याप्रमाणें वाचतात.

मग हाज्जान तेबावर उभा राहून प्रार्थनेस आरंभ करितांना अगोदर हें पुढील गीत गातो.

שפל רוח नम्र आत्म्याचा होऊन व आपले गुडघे व आपल्या देहाचा बांधा लववून भयानें व भीतीनें मी तुजपुढें येतों. तुजपुढें मी आपल्या दृष्टींत आपणांस भूमीवरील लहान किडा असें मानितों. ज्याच्या महत्वास अंत नाहीं, असा जो विश्वंभर, त्या तुझी स्तुति मजसारखा करूं शकेल काय? व ती कशानें करील? तुझ्या गौरवाचें वर्णन उंचावरील देवदूत करूं शकत नाहींत, तर मी तो काय व किती! तूं सर्वांशीं चांगला असून पुष्कळ दया करितोस ह्मणून सर्व प्राणिमात्र तुला थोर मानून स्तवितील.

मग נשמת כל חי पासून מלך אל חי העולמים אמן पर्यंत वाचल्यावर हें पुढील गीत गातो.

קול מהלל स्तवनाची वाणी आज उंचावेल, आणि माझें तोंड सदा नवें गीत गाईल. आणि गोटांत तुझें नाम अखंडित उंचाविलें व पवित्र मानिलें जाईल. माझें मन व माझे डोळेहि तुझा शोध करितांना थकले, तरी माझ्या जीवाची सर्व आवड तुझ्या आठवणीकडे आहे. मी आपलें तोंड तुझ्या मंदिराकडे, आणि माझा थोर मानिलेला पवित्र डोंगर होरेव जो सीनाय त्याकडे लावितों. आणि तुझें सीयोन नगराविषयीं, सुंदर बुरजाविषयीं, आणि उकरून टाकलेल्या शेताविषयीं माझें वचन निघतें. तुझें पूर्ण गौरव वर्णायास सर्व मनुष्यें थकतात, कारण तें फार मोठें आहे; तुझा पाहारेकरी व पवित्र जनहि. जरी कोणी केरूबाकडे पाहील व तार्शीश दूताच्या आकाराकडे दृष्टि लावायास उभा राहील तरी तो तुझ्या तेजाच्या गौरवाशिवाय कांहीं पाहूं शकणार नाहीं; आणि पवित्र स्थानीं व झुडपांतल्या अग्नीमध्यें कोणी येऊं शकणार नाहीं.

यानंतर קדיש לעילא व יוצר ज्या मधील לאל אשר שבת हा भाग शाब्बाथ असल्यास वाचतात व नसल्यास सोडतात, तो גאל ישראל पर्यंत सरळ वाचून संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें "שפתי" पहिल्यानें हळू व नंतर मोठ्यानें वाचावा.

मंडपाचे सणांत मागील प्रार्थना पुनः मोठ्यानें बोलल्यानंतर लूलाब हातीं घ्यावा, परंतु पहिल्यानें हा पुढील धन्यवाद करावा. आणि पहिल्या दिवशीं שהחיינו हा धन्यवादहि करावा.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, आणि लुलाब हातीं घेण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस या वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, स्तवन पूर्ण करण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पेसाहच्या मधील दिवसांत व मागील दोन दिवसांत स्तवन संक्षिप्त वाचतांना לקרא את ההלל स्तवन वाचायाची आज्ञा देणाऱ्या, असें ह्मणून धन्यवाद करितात. हें स्तवन नि० प्रा० पृष्ठ २८९–२९२ एथें सांपडतें. मग קדיש תתקבל ह्मणतात.

यामागून शास्त्र काढते वेळीं जें ह्मणायाचें, व शास्त्र वाचायास बोलावलेल्या गृहस्थांनीं जे धन्यवाद ह्मणायाचे ते नि. प्रा. पृष्ठ २२१–२२४ एथें लिहिले आहेत. सणाच्या दिवसांत शास्त्राच्या दोन प्रति काढतात. मंडपाच्या सणांत पहिल्या दोन दिवशीं व पेसाहच्या दुसऱ्या दिवशीं शास्त्रांतून लेवी अ. २२ ओ. २६ पासून अ. २३ ओ. ४४ पर्यंत पांच मनुष्यें वाचतात, परंतु शाब्बाथ असल्यास तोच भाग सात मनुष्यें वाचतात. शेवटला वाचणारा קדיש לעילא ह्मणतो. दुसऱ्या प्रतींत या दिवसाच्या आठवणीकरितां मफतीरवर गणना अ २९ ओ. १२—१६ पर्यंत वाचून हा वाचणाराहि קדיש לעילא ह्मणतो. हाफतारा ह्मणजे भविष्य कथनांतील जो भाग वाचायाचा त्यापूर्वी जे धन्यवाद ते येणेंप्रमाणें:—

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा (आपणाकरितां) चांगले भविष्यवादि निवडून घेऊन त्यांनीं सत्यानें ह्मटलेल्या गोष्टींस प्रसन्न असणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! शास्त्र, आपला सेवक मोशे, आपले लोक इस्राएल, आणि सत्य व यथार्थ भविष्यवादि यांस निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मंडपाचे पहिल्या दिवशीं जेरवार्या अ० १४ पहिल्यापासून शेवटपर्यंत हा हाफतारा वाचितात.

दुसऱ्या दिवशीं १ राजे अ० ८ ओ० २ पासून ओ० २१ पर्यंत हा हाफतारा वाचितात.

हाफतारा वाचल्यानंतर हे पुढील धन्यवाद करितात.

גאלנו आमचा उद्धारणार कोण? तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, सर्व जगताच्या खडकरूप आश्रया, सर्व पिढ्यांत न्यायी असणाऱ्या, ज्याचे शब्द सत्य व न्यायी अशा विश्वसनीय देवा, ह्मणणाऱ्या व त्याप्रमाणें करणाऱ्या, बोलणाऱ्या व तें सिद्ध करणाऱ्या, व सत्य जो, तूं धन्य आहेस. परमेश्वर जो आमचा विश्वसनीय देव, तो तूंच; तुझीं वचनेंहि विश्वसनीय; तुझ्या वचनांतून एकहि शब्द माघारें रिकामा परतत नाहीं; कारण तूं विश्वसनीय देव राजा आहेस. हे परमेश्वरा, आपल्या सर्व वचनांत विश्वसनीय असणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רחם על ציון सीयोनेवर दया कर, कारण तें आमचें जीवनाचें घर आहे; आणि लवकर आमच्या दिवसांत खिन्न झालेल्या जीवांस तूं तार. हे परमेश्वरा, सीयोनेस तिच्या लेंकरांत हर्षित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמחנו יי אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझा सेवक येलीया भविष्यवादि याचें आणि तुझा अभिषिक्त दावीद याच्या घराण्याचें राज्याचें येणें होऊन आह्मांस आनंदित व आमच्या मनास हर्षित कर. त्याच्या आसनावर दुसऱ्यानें बसूं नये, आणि परक्यानें त्याच्या गौरवाचें वतन पावूं नये; कारण कीं, तूं त्याचा दिवा सदासर्वकाळ विझविणार नाहींस, असी तूं त्याजवळ आपल्या पवित्र नामानें शपथ वाहिली आहेस. हे परमेश्वरा! दावीदाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

על התורה शास्त्र, भक्ति, भविष्यवाद

शाब्बाथ असल्यास—हा शाब्बाथ दिवस व

सुक्कोथच्या सणांत—हा मंडपाच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन,

शेमीनी आसेरेथचे सणांत—हा आठव्या दिवसाच्या सणाची सभा मिळण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन,

पेसाहचे सणांत—हा न फुगलेल्या भाकरीच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन,

शाबूओथच्या सणांत—हा सप्तकांच्या सणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन,

जो हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आह्मांस (**शाब्बाथ असल्यास**-पवित्रतेकरितां विश्रांतिकरितां व) गौरवाकरितां व महत्वाकरितां दिला आहेस, त्यावरून आणि सर्व गोष्टींवरून आह्मी तुला स्तवितों, आणि धन्य ह्मणतों. सर्व प्राण्यांच्या मुखाकडून नित्य व सदासर्वकाळ तुझें नाम सुवंदित असो. हे परमेश्वरा,

शाब्बाथ असल्यास—शाब्बाथास व
इस्राएलास व नेमिलेल्या वेळांस पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

यानंतर हाज्जानानें नि. प्रा. पृ० २२४–२२५ एथें लिहिल्याप्रमाणें राणीस व मंडळीस आशीर्वाद दिल्यावर नि. प्रा. पृ० २२७ एथील יְהִי חַסְדְּךָ व " בָּרוּךְ " हे भाग वाचतात; परंतु शाब्बाथ असल्यासच " בָּרוּךְ " हा भाग आरंभापासून वाचतात, नसल्यास पहिलें वाक्य सोडून " יְהִי " पासून वाचतात, मग नि. प्रा. पृ० २२९–२३० एथें लिहिल्याप्रमाणें शास्त्राच्या प्रति परत हेखालांत नेऊन ठेवितात व नंतर हाज्जान קַדִּישׁ לְעֵילָּא ह्मणतो. एथें शेमीनी आसेरेथच्या दिवशीं पावसा साठीं करायाची प्रार्थना व पेसाहच्या पहिल्या दिवशीं दंहिवरासाठीं करायाची प्रार्थना हेखाल उघडें असतां יְהַלְלוּ ह्मणण्या अगोदर करतात. ती येणेंप्रमाणें:—

शेमीनी आसेरेथच्या दिवशीं करायाची पावसासाठीं प्रार्थना.

שִׁפְעַת רְבִיבִים वनस्पतीच्या बीजानें सजीव व्हावें, आणि पुष्कळ फल द्यावें ह्मणून (ईश्वर) आपल्या वस्तींतून विपुल वृष्टि करो. सर्व फलझाडांनीं व त्यांच्या पानांनीं टवटवीत व्हावें व माजावें

ह्मणून पहिला व मागला पाऊस यथयथ पाडो. आणि छाया निघून गेल्या अगोदर त्यास तरुण हरिणासारखा त्वरा करून पाठीव. वन लावणाराची,[1] मजकरितां आठवण कर; बंद पडलेला बाग, डाळिंबाचा व त्याच्या रोपांचा मळा, दावीदाच्या राहण्याचें नगर आणि त्याच्या सैन्याचा बळकट किल्ला उभार. पूर्ण गौरवानें भरलेली, हत्यारखान्यासारखी बांधलेली, जिजकडे सर्व राष्ट्रें धांव घेतात, आणि जिजवर एक हजार ढाली टांगलेल्या आहेत, त्या हस्तीदंतासारख्या मानेकडे[3] तूं फीर.

מכסה שמים हे आकाशे ढगांनीं झांकणाऱ्या व आच्छादणाऱ्या आणि स्थापित नियमानें ऋतु पालटणाऱ्या ! **आतां तूं आपलें चांगलें भांडार उघडून सर्व श्वासोच्छ्वास घेणारांस जीवंत राखण्याकरितां वारा वाहूं दे आणि पाऊस पडूं दे.**

पृथ्वीच्या एका शेवटापासून दुसऱ्या शेवटापर्यंत प्रत्येक मनुष्य, पशु व पृथ्वीवरील घडलेला पदार्थ तुझीच आशा करितो, ह्मणून नेमलेल्या वेळीं वारा वाहूं दे, आणि भूमीच्या पाठीवर पाणी येऊं दे.

अवर्षण, शोष व उन्हाचा ताप नाहींसा कर, त्यांनीं टवटवीत बागांसारखें व्हावें ह्मणून तूं आपला आत्मा पाठीव. नाहींतर मनुष्याच्या व पशूच्या सुखाची हानि होईल; तूं आपला हात उघड ह्मणजे (सर्व प्रकारच्या) चांगल्या गोष्टीविषयीं त्यांची तृप्ति होईल.

ओसाड रान, ज्यांत कांहींच हिरवळ, गवत व रोप नाहींत त्यास फुलांनीं टवटवीत कर, बहुरंगानें सुशोभित कर,[4] आणि पृथ्वीची पाठ नवी कर.

हे दयाळू बापा, विपरीतमनाचे दोषाची क्षमा करणाऱ्या, तूं आपल्या कपोताचा जीव जुलुमगाराच्या हातांतून सोडीव, आणि जरी आह्मांमध्यें शुद्धीवर येऊन सुधारणारा कोणी नसला, तरी "मी यथा काळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मागली वृष्टि पाडीन," हें तुझें वचन पूर्ण होऊं दे.

---

१. आब्राहाम, ज्यानें उत्पत्ति अ. २१ ओ. ३३ एथें लिहिल्याप्रमाणें वन लाविलें होतें त्याची. २. शेलोमोचें गीत अ. ४ ओ. १२ वरून हें घेतलें आहे, तेथें असें पवित्र मंदिरास अनुलक्षून लिहिलें आहे. ३ शेलोमोचें गीत अ. ७ ओ. ५ वरून हें घेतलें आहे, तेथें असें पवित्र मंदिरास अनुलक्षून लिहिलें आहे. ४ इ. वेलबुट्टीचीं वस्त्रें नेशीव.

לשוני בוננת हे माझ्या देवा, माझें भाषण तूं समजतोस व तें तूं स्विकारितोस; कारण माझ्या मुखीं जें गीत तूं दिलें आहेस, तें धनापेक्षांहि उत्तम आहे. पूर्वींपासून तूं आपणापुढें माझीं पाउलें निटावलीं आहेस, आणि ज्याअर्थी तूं मला घसा दिला आहेस, त्याअर्थी तुला हाक मारितांना तो बसूं देऊं नको. माझे मनोविकार तूं पांढऱ्या लोंकरीपेक्षां शुद्ध करितोस, यास्तव तूं माझें मन मजमध्यें तळमळूं देत नाहींस. जसा पूर्वीं तसा यापुढेंहि[1] तूं मला आश्रय हो; कारण तूं माझी ढाल आहेस, हे माझ्या देवा, उशीर करूं नको.

ישבעון ידידיך आकाशांतील भांडारांकडून तुझे प्रियकर तृप्त होवोत; आणि पाण्यानें न घालेल्या भूमीस तूं तृप्त कर; (प्रति दिवशीं) दोन वेळ तुला नमन करणारांस मुक्ति पाठीव. दोन दिवसांनंतर तो आह्मांस पुनः सजीव केरीलच[2].

אל חי יפתח जीवंत देव आकाशांतील भांडारें उघडील; **तो आपला वारा चालवील, तेव्हां जलें गळून वाहतील.**

जी मंडळी फासांत सांपडलेल्या पक्षाप्रमाणें दुःखानें गांजलेली आहे, तिजला ज्या राष्ट्राच्या बापानें[3] (दूतांकरितां) जेवणाची तयारी करून "थोडें पाणी आणूं द्या"[4] असें ह्मणाला, त्याच्या पुण्याईकरितां प्रसन्नतेच्या वृष्टीकडून मंडळीस आशीर्वाद दे.

हे महान् कृत्यें करणाऱ्या! जो मोरीया डोंगरावर बांधला गेला[5], आणि ज्यानें परत जाऊन पुनः पाण्याच्या विहिरी खणिल्या[6], त्याच्या पुण्याईकरितां वरील आकाशांतून कोरड्या भूमीवर उदारपणाची वृष्टि होऊं दे.

ज्या सरळ मनुष्यानें[7] सोललेल्या काठ्या (कळपांपुढें) पाण्याच्या पऱ्हळांत व कुंड्यांत ठेवल्यां[8] त्याच्या पुण्याईकरितां तुझ्या लोकांस नाशापासून सोडीव व राख, आणि तूं आपला पवित्र आत्मा त्यावर वाहूं दे.

जो दरिद्री लोक उल्लंघनाच्या फासांत गुंतल्यामुळें त्याचें तारण मागें राहिलें आहे, तो ओरडत असतां जो नम्र मनुष्य[9] फारोपुढून पळाला

१. इ. जसा कालच्या दिवशीं तसा उद्यांच्या दिवशीं. २. टीका. ४. ३. आब्राहाम. ४. उत्पत्ति अ. १८ पाहा. ५. इसहाक. ६. उत्पत्ति अ. २६ ओ. १७-३३ पाहा. ७. याकोब. ८. उत्पत्ति अ. ३० ओ. ३८. ९. मोशे.

आणि पाण्याच्या विहिरीवर जाऊन बसला,[१] त्याच्या पुण्याईकरितां त्याजवर आपलें मुख प्रकाशित कर.

जो साक्षात्पणाच्या राहोटीच्या आंतील अति पवित्र ठिकाणीं जात असे, आणि ज्यास पाण्याचें पेय अर्पण करण्याची आज्ञा झाली होती, त्यांच्या[२] पुण्याईकरितां तूं आपल्या वस्तीच्या आकाशांतून जोरानें पाऊस पडूं दे; ह्मणजे या वर्षाचें उत्पन्न पुष्ट होईल.

हे ज्योति घडणाऱ्या ! मधुर गीतें रचणारा राजा,[३] जो "मला पाणी कोण पाजील" असें ह्मणाला, त्याच्या पुण्याईकरितां, तूं आपली दया आटीव आणि ढगें येण्यास आज्ञा कर, ह्मणजे भाजीपाला टवटवीत होईल.

ज्यानें[५] नव्या वाटींत (मीठ) घेऊन पाणी निरोगी केलें.[६] त्याच्या पुण्याईकरितां पाण्याचा संचय सुक्या भूमीवर वाहूं दे, आणि माध्याचा धोंडा बाहेर आण.

ज्यानें गारेच्या खडकांतून पाण्याचे झरे काढिले,[७] त्याच्या पुण्याईकरितां भूमींतून वसंतऋतूची पालवी फुटूं दे, आणि तेणेंकरून माझी इच्छा पूर्ण, दृढ व स्थापित कर.

אלֹהינו ואלֹהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा.

सुंदर	वृष्टीनें	भूमीला	प्रकाशित कर.
आशीर्वादाच्या	वृष्टीनें	भूमीला	आशीर्वाद दे.
हर्षाच्या	वृष्टीनें	भूमीला	हर्षित कर.
आनंदाच्या	वृष्टीनें	भूमीला	पुष्ट कर.
गौरवाच्या	वृष्टीनें	भूमीला	सुशोभित कर.
चांगल्या नेमिलेल्या	वृष्टीनें	भूमीला	दर्शन दे.
उत्पन्नाच्या	वृष्टीनें	भूमीला	गावयास लाव.
जीवनाच्या	वृष्टीनें	भूमीस	सजीव कर.
चांगल्या	वृष्टीनें	भूमीचें	कल्याण कर.
तारणाच्या	वृष्टीनें	भूमीचें	तारण कर.
पोषणाच्या	वृष्टीनें	भूमीचें	पोषण कर.

१. निर्गम अ. २. ओ. १५. २. आहारोन. ३. दाविद. ४. २ शेमूएल अ. २३ ओ. १५. ५. एलीशां. ६. २ राजे अ. २ ओ. १९–२२. ७. जेरवार्या अ. ४ ओ. ७. ८. मोशे.

कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तारायास समर्थ आणि आह्मांवर आशीर्वाद व्हावा ह्मणून वारा वाहविणारा आणि पाऊस पाडणारा तूंच आहेस.

אנא הורידם (आह्मी तुजपुढें) विनंती करितों कीं, प्रकाशित करण्याकरितां, आशीर्वादरूप होण्याकरितां, हर्षित करण्याकरितां, आनंदित करण्याकरितां, गौरवण्याकरितां, चांगल्या नेमाकरितां, उत्पन्नाकरितां, चांगल्या जीवनाकरितां, कल्याणाकरितां, तारणाकरितां, पोषणाकरितां व अन्नसामग्रीकरितां, तो पडूं दे. कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तारायास समर्थ, आणि आह्मांवर आशीर्वाद व्हावा ह्मणून वारा वाहविणारा, आणि पाऊस पाडणारा तूंच आहेस.

पेसाहच्या पहिल्या दिवशीं करायाची दंहिवरासाठीं प्रार्थना.

שׁוּפַת שׁמשׁ हे देवा, दुःखानें लादलेल्यांस प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, सूर्याच्या उन्हानें काळवंडलेलीस[1] आणि पथरूसीमें लोकांकडून गांजलेलीस ठिबकणाऱ्या दंहिवरानें हर्षित कर; कारण जे तुजवर भरंवसा ठेवितात, त्यांची तूं ढाल आहेस. आमचा देह सजीव करण्याकरितां तूं आपला उदार आत्मा पाठीव, आमचें सुंदर वतन पहिल्यासारखें वसीव; सर्वांस तुजकडून बरें प्राप्त होतें, त्याप्रमाणें आमचा उद्धार होऊं दे. तूं आह्मांस पुनः सजीव करणार नाहींस काय ?

מִבְטַח כֹּל הַיְצוּר सर्व घडलेल्या पदार्थांच्या आशापात्रा, सामर्थ्या व आश्रया, आणि सर्वांस त्यांचा भक्ष व त्यांचें अन्न देणाऱ्या, आमचें वर्ष सुखावह होऊं दे,[3] आणि मागल्या वृष्टीच्या ढगांनीं तें पूर्ण कर, **आणि आकाशांतून त्याचें दहिंवर पडूं दे.**

पाहा आणि जित्रवांनीं खावयास भाकर आणि औषधोपचार पुरवावे ह्मणून त्यास आशीर्वादाच्या बिंदूनें भर; आणि जे तुझ्या नेमिलेल्या शास्त्राचें ध्यान करितात, त्यांस ताऱ्यासारखे चमकीव.

रानांतील कुरणावर दंहिवर पडो, डोंगर उल्लास करण्याकरितां

१ हें शेलोमोचें गीत अ. १ ओ. ६ एथें इस्राएल लोकांस अनुलक्षून लिहिलें आहे. २. मिसरी. ३. सुशोभित कर.

कंबर बांधोत, आणि उमललेलीं फुलें हर्षाच्या झग्यानें आच्छादलीं जावोत; मग तीं तुझ्या मोठ्या दयेविषयीं आपल्या उद्गारानें एकत्र गायन करतील.

द्राक्षाचीं सुवासिक फुलें व खिसमीसाचा वेल त्यांच्या वस्त्रांनीं झांकलीं जाण्याकरितां, आशा करणारा जीव त्यांच्या उत्तम फळांनीं तृप्त होण्याकरितां, आणि भुकेल्यांस व क्षुधितांस मिष्टान्नानें भरण्याकरितां दहिंवर पडो.

खिंडींतील व डोंगरावरील परमेश्वराचीं झाडें रसानें भरोत, खळे धान्यानें भरोत. आणि द्राक्षरसानें व तेलानें कुंडें कांठांवरून वाहत अशीं भरोत; ह्मणजे घरठाणावर बांधलेल्या खेडेगांवांतील राहणारे उल्लास करतील.

לשוני בוננת हे माझ्या देवा, माझें भाषण तूं समजतोस व तें तूं स्वीकारितोस; कारण माझ्या मुखीं जें गीत तूं दिलें आहेस, तें धनापेक्षांहि उत्तम आहे. पूर्वीपासून तूं आपणापुढें माझीं पाऊलें निटावलीं आहेस; आणि ज्याअर्थी तूं मला घसा दिला आहेस, त्याअर्थी तुला हाक मारितांना तो बसूं देऊं नको. माझे विचार तूं पांढऱ्या लोंकरीपेक्षां शुद्ध करितोस, यास्तव तूं माझें मन मजमध्यें तळमळूं देत नाहींस. जसा या पूर्वी तसा या पुढेंहि[1] तूं मला आश्रय हो; कारण तूं माझी ढाल आहेस, हे माझ्या देवा, उशीर करूं नको.

לך לשלום हे पावसाळ्या, सुखरूप जा; आणि हे देहिंवरा, सुखरूप ये; कारण परमेश्वर तारायास समर्थ व दहिंवर पाडणारा आहे. मी आपल्या तारणाच्या खडकरूप आश्रयास गीत गाईन, काव्य रचीन आणि आपले ओंठ सबळ करीन; असें कीं, जेव्हां मी वदेन, तेव्हां दहिंवर पाझरेल; कारण परमेश्वर तारण्यास समर्थ व दहिंवर पाडणारा आहे. हे देवा, तुझ्या गौरवाचें नाम तुझ्या लोकांत वास करितें; तर हे देवा, मीखाएल दूतास उभा कर,[2] आणि तूं त्यांचा उद्धारक हो; "आणि मी इस्राएलास दहिंवरासारखा होईन" हें तुझें वचन[3] पूर्ण कर; कारण, तूं तारायास समर्थ व दहिंवर पाडणारा आहेस.

१. इ. जसा कालच्या दिवशीं तसा उद्यांच्या दिवशीं. २ हें दानीएल अ. १२ ओ. १ वरून लिहिलें आहे. ३ हें वचन होशेया अ. १४ ओ. ६ एथें सांपडतें.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा.

सुंदर	दहिंवरानें	भूमीला	प्रकाशित कर.
आशीर्वादाच्या	दहिंवरानें	भूमीला	आशीर्वाद दे.
हर्षाच्या	दहिंवरानें	भूमीला	हर्षित कर.
आनंदाच्या	दहिंवरानें	भूमीला	पुष्ट कर.
गौरवाच्या	दहिंवरानें	भूमीला	सुशोभीत कर.
चांगल्या नेमिलेल्या	दहिंवरानें	भूमीला	दर्शन दे.
उत्पन्नाच्या	दहिंवरानें	भूमीला	गावयास लाव.
जीवनाच्या	दहिंवरानें	भूमीस	सजीव कर.
चांगल्या	दहिंवरानें	भूमीचें	कल्याण कर.
तारणाच्या	दहिंवरानें	भूमीचें	तारण कर.
पोषणाच्या	दहिंवरानें	भूमीचें	पोषण कर.

कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तारायास समर्थ, आणि आह्मांवर आशीर्वाद व्हावा ह्मणून दहिंवर पाडणारा, तूंच आहेस.

אנא הורידהו (आह्मी तुजपुढें) विनंती करितों कीं, प्रकाशित करण्याकरितां, आशीर्वादरूप होण्याकरितां, हर्षित करण्याकरितां, आनंदित करण्याकरितां, गौरवण्याकरितां, चांगल्या नेमाकरितां, उत्पन्नाकरितां, चांगल्या जीवनाकरितां, कल्याणाकरितां, तारणाकरितां, पोषणाकरितां व अन्न सामग्रीकरितां तें पडूं दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तारायास समर्थ आणि आह्मांवर आशीर्वाद व्हावा ह्मणून दहिंवर पाडणारा तूं समर्थ आहेस.

तीन सणांची अधिक प्रार्थना.

या प्रार्थनेंत संध्याकाळ प्रमाणें אדני שפתי हळू व एक चित्तानें מחיה המתים च्या शेवट पर्यंत वाचतात. पुनः मोठ्यानें वाचतांना हें पुढील वाचतात.

כתר יתנו हे परमेश्वरा, आमच्या देवा, दूतांचीं वरील सैन्यें, खालीं एकवट झालेल्या तुझ्या इस्राएल लोकांसहीत तुला मुगुट देतात तुझा

राज्याधिकार मान्य करितात. आणि तुझ्या भविष्यवाद्याकडून ह्मटलेलें जें वाक्य आहे कीं, "ते एकमेकांला मोठ्यानें बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे;" त्याप्रमाणें ते सर्व एकदांच तीन वेळ तुझी पवित्रता गाजवितात. त्याच्या गौरवाकडून सर्व जग भरलें आहे. (आणि त्याचा सन्मान करावा ह्मणून त्याची सेवा करणारे दूत त्याजविषयीं विचारतात कीं, त्याच्या गौरवाचें ठिकाण कोठें आहे?) त्यांच्या समोर जे असतात ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, "त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो." (त्याचे लोक त्याचें एकत्व मानून जे प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं असे दोन वेळां प्रीतीनें ह्मणतात कीं, "हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे; त्यांकडे तो आपल्या स्थानांतून दयेनें वळेल. तोच आमचा देव; तोच आमचा बाप; तोच आमचा राजा; तोच आमचा तारणारा; तोच आह्मांस तारील आणि दुसऱ्या वेळीं आह्मांस सोडवील; आणि सर्व प्राण्यांच्या दृष्टीपुढें दयेनें असें ऐकवील, कीं, पाहा मी परमेश्वर तुमचा देव तुह्मांस देव असा व्हावा, ह्मणून पहिल्याप्रमाणें शेवटीं तुह्मांस सोडविलें आहे.) आणि तुझ्या पवित्र शास्त्रांतही लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

यानंतर אתה קדוש पासून ותתן לנו च्या शेवटपर्यंत वाचल्यावर हें पुढील वाचावें.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या पापांमुळें आह्मी आपल्या देशांतून पाडाव होऊन गेलों, आणि आमच्या भूमीवरून दूर झालों आहों; यामुळें जें घर तूं आपणाकरितां निवडून घेतलेंस, त्या तुझ्या गौरवाच्या वसतिस्थानाकडे ह्मणजे जें थोर व पवित्र मंदिर तुझ्या नांवानें ह्मटलेलें आहे, तेथें तुजपुढें चढून येण्यास, दर्शन घेण्यास व नमन करण्यास आह्मांस सामर्थ्य नाहीं; कारण तुझ्या पवित्र मंदिरावर (शत्रूचा भारी) हात उभारलेला आहे. हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा, तुजपुढें असी

१ सणाच्या मधल्या व्यवहारिक दिवसांत हा भाग संक्षिपांत वाचून कौंसांतला भाग सोडतात.

प्रसन्नता होवो कीं, तूं फिरून आह्मांवर आणि आपल्या अत्यंत दयेनें आपल्या पवित्र मंदिरावर दया कर; आणि तें लवकर बांधून त्याचें वैभव वाढीव. हे आमच्या बापा, राजा व देवा, आह्मांवर तूं आपल्या राज्याचें गौरव लवकर प्रगट कर; सर्व प्राण्यांच्या देखतां आह्मांवर प्रकाशित होऊन थोर मानिला जा; आमच्या विखरलेल्यांस राष्ट्रांमधून जवळ घे आणि आमच्या परागंदा झालेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून एकवट कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझें नगर सीयोन एथें आह्मांस गायन करीत, आणि तुझें पवित्र नगर येरूशालेम एथें सर्वकाळच्या आनंदानें ने. हे परमेश्वरा, मग तेथें नेमिलेलीं नित्याचीं अर्पणें त्यांच्या रीतीप्रमाणें, आणि अधिक अर्पणें त्यांच्या पद्धतीप्रमाणें आह्मी करूं; ह्मणजे.

शाब्बाथ असल्यास—या शाब्बाथ दिवसाचें व.

सुक्कोथच्या सणांत—या मंडपाच्या सणाच्या दिवसाचें.

शेमीनी आसेरेथच्या सणांत—या आठव्या दिवसाच्या सणाची सभा मिळण्याच्या दिवसाचें.

पेसाहचे सणांत—या न फुगलेल्या भाकरीच्या सणाच्या दिवसाचें.

शाबूओथच्या सणांत—या सप्तकाच्या सणाच्या दिवसाचें.

या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदीनाचें.[१]

मधल्या व्यवहारिक दिवसांत—या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवसाचें अधिक अर्पण (**शाब्बाथ असल्यास**—हीं अधिक अर्पणें) आह्मी तुजपुढें प्रीतीनें तुझ्या इच्छेच्या आज्ञांप्रमाणें जसें तुझा सेवक मोशे याच्या हाताकडून आह्मांकरितां तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे, त्याप्रमाणें आह्मी करूं व अर्पूं.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा आह्मांवर दया कर, हे चांगल्या व चांगलें करणाऱ्या, आमचा समाचार घे. आपल्या पुष्कळ दयेनें आह्मांकडे फीर; ज्या आमच्या पूर्वजांनीं तुझी इच्छा पूर्ण केली, त्यांकरितां पहिल्याप्रमाणें आपलें घर बांध. आपलें पवित्र मंदीर त्याच्या ठिकाणीं स्थापन कर, त्याचें बांधणें आह्मांस दाखीव, त्याच्या रचनेनें आह्मांस हर्षित कर, तुझा साक्षात्कार

१ सणाच्या मधल्या दिवसांत जेथें "सुदीनाचें" असें ह्मणायाचें तेथें "दिवसाचें" असें ह्मणावें.

त्याजमध्यें पुनः ठेव, याजकांनीं आपलें पूजन करावें व लेव्यांनीं आपलें गायन व कीर्तन करावें ह्मणून त्यांस पुनः नेम; आणि इस्राएलांस त्यांच्या वसतिस्थानीं पुनः वसीव. मग आह्मी प्रतिवर्षीं तीन पर्वणींच्या वेळीं तिकडे चढून जाऊं, दर्शन घेऊं व तुजपुढें नमन करूं; जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, न फुगलेल्या भाकरीचा सण, व सप्तकांचा सण व मंडपाचा सण यांत, असें वर्षांत तीन वेळां तुझ्या सर्व पुरुषांनीं तुझा देव परमेश्वर यासमोर, ह्मणजे जें ठिकाण तो निवडून घेईल तेथें दर्शनास यावें. तुझा देव परमेश्वर यानें तुला आशीर्वाद दिला असेल, तसें प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें घेऊन यावें.

यानंतर והשיאנו पासून עושה שלום पर्यंत सरळ वाचतात.

होशानाची रीति.

मुसाफची प्रार्थना पुनः मोठ्यानें ह्मटल्यावर होशानोथ ह्मणतात. परंतु तें ह्मणण्याअगोदर शास्त्राची एक प्रत काढून रीतीप्रमाणें तिजभोंवतें प्रदक्षिणा करण्याकरितां तेबावर आणून ठेवितात.

पहिल्या दिवसाचा होशाना.

הושענא (हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

למענך तुझ्याकरितां, हे आमच्या देवा !

तुझ्याकरितां, हे आमच्या उत्पन्नकर्त्या !

तुझ्याकरितां, हे आमच्या उद्धारका !

तुझ्याकरितां, हे आमचा समाचार घेणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे अति पराक्रमी देवा !

तुझ्याकरितां, हे वायु उत्पन्न करणाऱ्या व पर्वत घडणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे संकल्पांत मोठ्या आणि पाडणाऱ्या व उठविणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे न्याय बोलणाऱ्या व यथार्थ गोष्टी कळविणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे गुप्तस्थानीं लपणाऱ्या मनुष्यास जाणणाऱ्या व प्रत्यक्ष पाहणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे संकल्पांत एकच असणाऱ्या व कोणाच्या शब्दांनीं न फिरणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे पवित्र, प्रांजल व शुद्धांत अति शुद्ध असणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे लपविलेल्या गोष्टी शोधणाऱ्या व सर्व गुप्त स्थानें पारखणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे आपल्या उजव्या हातानें आकाश विस्तारणाऱ्या व ज्योति घडणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे पृथ्वीचा पाया घालणाऱ्या व खडक फोडून त्यामधून नद्या सोडणाऱ्या !

तुझ्याकरितां, हे बलानें समर्थ व तेजानें गौरविलेल्या !

तुझ्याकरितां, हे पिढोपिढीं आपलीं वर्षें न संपविणाऱ्या !

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे)

या पुढील भाग वाचतांना प्रति दिवशीं शास्त्रासभोंवतें एक प्रदक्षिणा घालतात.

אנא אל אחד आह्मी विनंती करितों कीं, हे एकच व एकच नांवाच्या, कोणांस न अटपणाऱ्या व संकल्पांत एकच असणाऱ्या देवा, आकाश व पृथ्वी यांस हाक मारितांच तीं एकदांच उभीं करणाऱ्या, **आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, जो बाप[1] तूं देऊं केलेल्या देशाचें वतन पावायास योग्य असा एकटाच होता, ज्यानें बंडखोरांसे[2] एकच मनाचें करून एकच मार्गास लाविलें असें कीं, त्या सर्वांनीं परमेश्वराच्या नामानें हाक मारितांना एक चित्तानें त्याची सेवा केली, त्याची आठवण करून **आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, जो आपल्या बापाचा एकुलता एक पुत्र[3], जो बापासंगातें एकचित्तानें परिक्षेकरितां[4] गेला, आणि ज्याबद्दल अर्पिला जाण्यास तूं एक एडका दिलास, त्याची आठवण करून **आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्या बापानें[5] आपले प्रिय पुत्रास[6] एक अधिक वांटा दिला[7], ज्यानें आपल्या दोन टोळ्यांतून एक टोळी वांचावी असी आज्ञा केली[8], आणि आपल्या पुत्रांनीं एक मत्तानें ईश्वराचा राज्याधिकार आपणांवर मान्य करावा ह्मणून त्यांस आपणाजवळ एकत्र बोलावलें[9], त्याची आठवण करून **आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, हे देवा, गर्जनांतून व विजांतून दोन आज्ञा एकांतच ऐकविणाऱ्या[10] आणि आह्मांस एकच शास्त्र व एकच न्याय वतन करून देणाऱ्या, **आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

---

१ आब्राहाम. २ टीका ५. ३ इसहाक. ४ अर्पिला जाण्याकरितां. ५ याकोब. ६ योसेफास. ७ उत्पत्ति अ. ४८ ओ. २२ पाहा. ८ टीका ६. ९ टीका ७. १० टीका ८.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אֵל יִשְׁעֵךְ צְמֵאתִי हे देवा! तुझ्या तारणाकरितां मी तान्हेला आहें ह्मणून मी तुजपुढें प्रार्थना करितों[1] तर तूं आपल्या सेवकाच्या जिवास हर्षित कर. तूं समर्थ व गौरववान आहेस, तूं आमचें तारण हो; ज्या दिवसांत त्वां आह्मांस पीडिलें, ज्या वर्षांत आह्मीं कष्ट अनुभवले, त्याप्रमाणें आह्मांस हर्षित कर. हाकून लावलेल्या व एकांत वासांत राहणाऱ्या लोकांस तारणाचा कोट व मोरचा करून ठेव, ह्मणजे तुझ्या न्यायाविषयीं सीयोन डोंगर हर्षेल व येहूदाच्या कन्या उल्लासतील. आरीएलाच्या नियमाचें[2] वतन पावलेल्यास त्वरा करून पुनः सहाय कर; मग याकोब उल्लासेल व इस्राएल हर्षेल. याकोबाचे लोक जे तुझ्या तारणाची आशा करितात, त्यांचें तारण होण्याची आज्ञा कर; मग नीतिमान हर्षतील, देवापुढें उल्लासतील व हर्षून आनंद करतील. तुझ्या वतनाच्या वांट्याप्रमाणें मानिलेल्या लोकांस[3] तार, ह्मणजे ते तुझें न्यायीपण शिकतील; जे सर्व तुझा आश्रय धरितात, ते हर्षतील व सदा आनंदतील. जे तुझ्या नामानें हाक मारितात त्यांस विश्रांतीचे मंदिराकडे[4] परतीव ह्मणजे ते आनंद व हर्ष पावतील आणि शोक व कन्हणें पळून जातील. ते तुझ्या तारणामुळें आनंदतील आणि मुक्तीचें गीत त्यांचे मुखीं राहील. इस्राएल आपल्या उत्पादकाविषयीं हर्षेल, सीयोनेचीं लेंकरें आपल्या राजाविषयीं उल्लासतील. जो तारायास समर्थ तो त्यांचा वाद करो व त्यांस पिडणारांस पिडो, मग नीतिमान सूड घेणें पाहून हर्षेल मग ते जाणतील कीं, तुझें तारण जाणावयास हें तुझ्या हातून घडलें आहे; कारण कीं, हे परमेश्वरा, त्वां आपल्या कार्येंकडून मला हर्षित केलें आहे, ह्मणून मीहि तुझ्या हातांच्या कामाविषयीं उत्सव करीन. उद्धरले जाणारांस तारायाकरितां तुझें वचन पूर्ण कर; ह्मणजे याकोबासाठीं हर्षानें गायन करा व राष्ट्रांतल्या मुख्यामध्यें गजर करा हें वचनहि पूर्ण होईल.

कशियाचीं वस्त्रें पांघरणारे सर्व जोरानें उल्लास करतील आणि ह्मणतील कीं, अहो नीतिमान्, परमेश्वराविषयीं हर्ष व उल्लास करा. जे नम्र

---

१ इ. रचितों. २ पवित्रशास्त्राचें. ३ इस्राएलांस. ४ हें नांव १ काळवृत्तांत अ.२८ ओ. २. एथें दाविदानें पवित्र मंदिरास दिल्हें आहे.

ते पाहातील आणि माझ्या दरिद्री लोकांस तूं तारिशील, तेव्हां ते हर्षतील; जे परमेश्वराला शोधितात त्यांचें मन हर्षेल. हा पवित्र मेळा गाजविणारे तारणाकरितां मोठ्यानें ओरडतात; कारण तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे, तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत. हे खडकरूप आश्रया तुझे लोक या पहिल्या दिवशीं जेव्हां आपला सण करून जो दिवस परमेश्वराने नेमला आहे तो हाच आहे असें ह्मणतात, तेव्हां तार.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंती करितों, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא אל אחרון आह्मी विनंती करितों कीं, हे शेवटल्या व पहिल्या देवा, डोल्याच्या पुतळीप्रमाणें रक्षिलेले लोक जे विनवून व ओरडून आतां आज पहिल्या दिवशीं आह्मांस तार असें ह्मणतात त्यांस सबल कर. आह्मी विनंती करितों कीं, दीशोनाच्या[1] लेंकरांस छेद आणि तुझें एकत्व मोठ्या आवेशानें गाजविणारांस उद्धर, आणि पीशोन नदीच्या[2] पाण्याच्या आहोलाप्रमाणें त्यांजवर शांति विस्तार आणि आज या पहिल्या दिवशीं आह्मांस तार.

אני והו हे अनाद्यंता[3], आतां आह्मांस तार! (दो. वे.)

כהושעת ירויי היאור ज्याप्रमाणें त्वां आपल्या गौरवाच्या सामर्थ्यानें नदींत टाकलेल्यांस[4] तारिलें आणि निबिड काळोखांत असणारांस प्रकाश दिला[5] त्याप्रमाणें आतांहि हे आकाशीं वास करणाऱ्या देवा, आपल्या लोकांच्या उद्धाराची सिद्धता कर. आणि त्याप्रमाणें आतां या पहिल्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असत आह्मांस तार. ज्याप्रमाणें त्वां आपल्या संपत्तिरूप लोकांस रानांत झेंड्यासमोर झेंडे उभारून डेरे देत असतां तारिलें; आणि आबीब महिन्यांत[6] सोडविलेले आणि प्रिय लोक असें विशेष नाम पावलेले

---

१ दीशोन हा एसावाचा एक वंशज होता. २ उत्पत्ति अ.२ ओ. ११ एथें सांगितलेली एदेन बागेंतून निघालेली पहिली नदी. ३ टीका ९. ४ निर्गम अ. १ ओ. २२. ५ निर्गम अ. १२ ओ. २३. ६ आबीव महिना हा चैत्र; यास नीसान असेंहि ह्मणतात.

लोक जे शास्त्राभोवतें प्रदक्षिणा घालितात[1] त्यांस सणांमधील पहिला पर्वकाळ[2] लावून देऊन तृप्त केलें, त्याप्रमाणें आतां या पहिल्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.

מושיע חוסים हे तुजवर भरंवसा ठेवणारांस तारणाऱ्या! माझे-विश्वासू लोक जे तुझ्या शास्त्राचा शोध करितात, आणि जे माझ्या पराक्रमी जनाचें[3] संतान यांस तार; **त्यांकरितां या वेळीं मी परमेश्वराची स्तुति करितों.** त्यांच्या अरोळींस प्रसन्न हो; त्यांची प्रार्थना या पहिल्या वेळीं मान्य कर; आणि ज्या लोकांस तूं त्यांच्या उल्लंघनापासून प्रायश्चित्ताच्या दिवसीं सोडविलेंस, आणि परमेश्वरासारिखा पवित्र दुसरा कोणी नाहीं असें ह्मणून स्तुति करितात, त्यांस या पहिल्या वेळीं तूं आशापात्र हो; **त्यांकरितां या वेळीं मी परमेश्वराची स्तुति करितों.**

כהושעת מאז עדתך ज्याप्रमाणें पूर्वी तूं आपल्या मंडळीस तारिलेंस; त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार, आणि आपलें वतन मानून घेतलेल्यांस आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें आतां या पहिल्या दिवसीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

मग शास्त्राची प्रत परत नेऊन ठेवितांना हें पुढील ह्मणतात.

ככתוב הושיעה जसें लिहिलें आहे कीं, तूं आपल्या लोकांस तार आणि आपल्या वतनास आशीर्वाद दे; त्याचें पालन कर व सदा सर्वकाळ त्यांस उंचाव. आणि असें ह्मटलें आहे कीं, ज्या शब्दांकडून म्यां परमेश्वरापुढें विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याच्या जवळ व्हावे; ह्मणजे त्यानें आपल्या सेवकाचा न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय दिवसा दिवसाच्या प्रसंगाप्रमाणें करावा; या साठीं कीं, पृथ्वीच्या सर्व लोकांनीं जाणावें कीं, परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव नाहीं. त्या शास्त्राच्या लेखानें तुझें तोंड न सोडावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्या सर्वांप्रमाणें त्वां सांभाळून चालावें; कारण कीं तशानें तूं आपला मार्ग सफळ करशील; आणि तेव्हां सुज्ञ-

---

१ मंडपाच्या सणांत शास्त्राची एक प्रत तेबावर ठेवून त्यास प्रदक्षिणा घालितात त्या संबंधानें हें ह्मटलेलें आहे. २ मिसरांतून निघतांना जो पहिला पर्वकाळ लावून दिला तो पेसाहचा सण. ३ आब्राहाम, इसहाक व याकोब यांचें संतान.

पणानें वागसील. म्यां तुला आज्ञा दिली कीं नाहीं ? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको; आणि भिऊं नको; कारण कीं, जेथें कोठें तूं जासील तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूल होईल.

शास्त्राची प्रत हेखालांत ठेवतांना हें पुढील ह्मणतात.

שובה למענך हे देवा, तूं आपल्या वस्तिस्थानाकडे फीर, आणि इष्ट मंदिरांत राहणें कर; कारण कीं सर्व तोंडें व सर्व जिभा तुझें गौरव करितील आणि तुझ्या राज्याचें महत्वहि करितील. आणि कोश उतरते वेळेस तो ह्मणे, हे परमेश्वरा, इस्राएलांच्या हजारांच्या अयुत्यांकडे फीर. हे परमेश्वरा ! आह्मांला तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

मग हाज्जान हेखाल उघडें असतां קריש תתקבל ह्मणतो आणि त्यानंतर כל ישראל नि. प्रा. पृ २३७ इत्यादि ह्मणून प्रार्थना पूर्ण करितो.

दुसऱ्या दिवसाचा होशाना

सुक्कोथच्या पहिल्या दिवसाप्रमाणें प्रतिदिवशीं पहिल्यानें दो. वे. הושענא मग למענך आणि पुन: הושענא दो. वे. बोलून प्रति दिवसाचा भाग वाचते वेळीं शास्त्रासभोवतें प्रदक्षिणा घालतांनां हें पुढील ह्मणतात.

אנא אל אחד आह्मी विनंती करितों कीं, हे एकच देवा, आणि दोन आहेत असें ह्मणणारांस विस्मित करणाऱ्या आपल्या अर्ध्या नामाच्या दोन अक्षरांनीं जग तें उत्पन्न करणाऱ्या, आणि मनुष्य व त्याची सहायकारी[2] या दोन (प्राण्यां) करितां सर्व पदार्थ घडणाऱ्या, **आह्मी हा दोन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं ज्या बापानें[3] बेथएलांत दोन वेद्या बांधिल्यां, जो आपल्या परिक्षेच्या वेळीं अपणाबरोबर दोन मुलगे घेऊन गेला, आणि ज्यास तूं दोन वेळां आकाशांतून हाक मारिली[6], त्याची आठवण करून **आह्मी हा दोन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं ज्या पुत्रानें[7] दोन भाषणानें आपल्या बापाच्या दयेला द्रव आणिला, ज्यापासून दोन राष्ट्रें[8] व दोन प्रकारचे लोक उत्पन्न होण्याची दया केलीस[9], आणि

---

१ टीका १०. २ आदाम व हाव्वा. ३ आब्राहामानें. ४ उत्पत्ति अ. १२ ओ. ८ व अ. १३ ओ. ४. ५ उत्पत्ति अ. २२ ओ. ३. ६ उत्पत्ति अ. २२ ओ. १५. ७ इसहाकानें. ८ टीका ११. ९ उत्पत्ति अ. २५ ओ. २३.

ज्यांतून एकास त्यानें, तूं आपल्या भावांचा धनी हो, असें दोन वेळ ह्मणून आशीर्वाद दिला[1], त्याची आठवण करून **आह्मी हा दोन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, जो लहान भाऊ असतां त्यास दुप्पट विभाग मिळाला[3], ज्यानें आपल्या बापाकरितां दोन करडांचें रुचिकर अन्न तयार केलें[4], आणि आपली काठी घेऊन यार्देन उतरल्यावर ज्याच्या दोन टोळ्या झाल्या[5], त्याची आठवण करून **आह्मी हा दोन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों, कीं (हे देवा,) दोन पालकांच्या हातून[6] शास्त्र ऐकविणाऱ्या, दोन पाट्यांवर आह्मांस दहा आज्ञा देणाऱ्या, आणि आह्मांविषयीं दोन साक्ष्यांसँ ऐकविणाऱ्या, व उभें करविणाऱ्या, **आह्मी हा दोन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אלהים אלי אתה हे ईश्वरा ! तूंच माझा देव आहेस, मी आपल्या पाडावपणाच्या व विखरण्याच्या देशांतून तुला लवकर शोधीन; ज्या डोंगरांकडून माझें सहाय येतें, त्यांकडे मी आपली दृष्टी लावीन. मी आपल्या पूर्ण मनानें तुला शोधितों, ह्मणून तूंहि माझ्या संकटीं माझा समाचार घे; कारण परमेश्वर जो आकाश व पृथ्वी यांचा कर्ता, त्याकडूनच माझें सहाय येतें. जे नाडलेले आपल्या पीडकांच्या हाताखालीं कण्हत आहेत, त्यांकरितां तूं आपलें सामर्थ्य (आतां) जागृत कर, आणि आह्मीं संकटांतून निघावें ह्मणून आह्मांस सहाय कर; कां तर मनुष्याकडील सहाय व्यर्थ आहे. तूं आपल्या सेवकावर उपकार कर ह्मणजे मी जगेन, माझ्या घायाळ जीवास पट्टी बांध; हे परमेश्वरा, मला मुक्त करायास मान्य हो, हे परमेश्वरा, माझ्या सहायाकरितां त्वरा कर. जे तुजविरुद्ध उठतात त्यांच्या भयामुळें आमचा जीव धुळीशीं चिकटला आहे; तर आतां तूं आमच्या सहायासाठीं ऊठ व आपल्या दयेकरितां आह्मांस उद्धर. हे माझ्या तारणाच्या व माझ्या उद्धाराच्या खडकरूप आश्रया! याप्रमाणें जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां तूं सांपड. हे परमेश्वरा, माझें ऐक, व मजवर कृपा

१ टीका १२. २ याकोब. ३ टीका १३. ४ उत्पत्ति अ० २७ ओ० ८–२५. ५ उत्पत्ति अ० ३२ ओ० ११. ६ मोशे व आहारोन. गीत ७७ ओ० २१. ७ आकाश व पृथ्वी. ८ अनुवाद अ० ३२ ओ० १.

कर; हे परमेश्वरा, मला सहाय हो. मग हे माझ्या सहायकारी देवा! तुझ्या सामर्थ्यानें मी आपल्या निंदकास प्रत्युत्तर करीन; कां तर पोरक्यांचा सहायकारी तूंच आहेस. जरी आह्मी पृथ्वीच्या शेवटापर्यंत विखरलेले आहों, आणि तुझ्या मंदिराच्या प्रसादस्थानाकरितां शोक करीत आहों; तरी आमचा जीव परमेश्वराची वाट पाहतो, तो आमचें सहाय व आमची ढाल आहे. पृथ्वीच्या शेवटाकडे आह्मी थरथर कांपत आहों, आणि ओरडून आमचा घसा बसला आहे; आतां माझें सहाय व माझा निभाव करणारा तूंच आहेस; हे माझ्या देवा, उशीर करूं नको. तूं गुर्दकमळें व आपल्या हस्तकर्माचीं कृत्यें जाणतोस व पारखतोस; कारण गरीबास आणि ज्या दरिद्रयास कांहींच सहाय नसतें, त्यास तूं त्याजवर जुलूम करणाराच्या हातांतून सोडवितोस. माझे डोळे तुझी वाट पाहातां थकले, तर आतां माझी आरोळी मान्य कर; हे माझ्या तारणाच्या देवा, माझ्या सहायासाठीं त्वरा कर. मी तुझा आहें; हे माझ्या आश्रया व माझें डोकें उभारणाऱ्या! मला तार; पाहा देव माझा सहायकर्त्ता आहे, प्रभु माझ्या जीवास आधार देणारा आहे. येहूदाच्या शेवाचा समाचार घे ह्मणजे आह्मी तुझ्या पंखांच्या छायेखालीं जीव धरूं; त्याचे हात त्याला पुरोत, आणि त्याच्या शत्रूंवर तूं त्याला सहाय हो.[1] मग ही मंडळी खरोखर टवटवेल आणि आपली वाणी काढून आपल्या जीवनांत हर्षेल; कारण सर्व काळापासून तूं आमच्या पूर्वजांचा सहायकारी आहेस.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंती करितों,

आतां आह्मांस तार!—(दो. वे.)

אנא יוצרי मी विनंति करितों कीं, हे माझ्या घडणाऱ्या, आज या दुसऱ्या दिवशीं तूं मला शत्रूंपासून परत मार्ग,[2] पूर्वीच्या दिवसांप्रमाणें मला मुक्त कर, तुझ्या गौरवाचें प्रावरण मला पांघरीव, आणि आतां आह्मांस तार. मी विनंति करितों कीं, आज या दुसऱ्या दिवशीं तूं मला वेष्ट व मला शांति दे, मला खोल पाण्यांतून ओढून काढ, मजकडे फीर व मला विस्मित करूं नको, आणि आतां आह्मांस तार.

---

१ याप्रमाणें मोशेनें येहूदास आशीर्वाद देतांना ह्मटलें आहे. अनुवाद अ० ३३ ओ० ७. २ हें येहेजकेल अ० ३४ ओ० १० यावरून लिहिलें आहे.

(हे देवा,) आह्मी विनंति करितों, आतां आह्मांस तार!

אני והו हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

כהושעת יגיעי נשם ज्याप्रमाणें त्वां थकलेले आत्म्यास व पीडलेल्या देहांस व जीवांस सोडविलें, आणि मला क्लेश देण्याची आवड धरणाराचा अगदीं नाश केला; त्याप्रमाणें जे तुझी शिस्त प्रार्थना व स्तुति करितात आणि योग्य शब्देंकरून तुला गौरवितात, **त्यांस आतां या दुसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां तार.** ज्याप्रमाणें त्वां खुणा व चमत्कार यांकडून मिसरांतून निवणारांस तारिलें, आणि मला कबजांत राखणारा फारो याचा नाश केला, त्याप्रमाणें तुझ्या मंडळीचा शेष जो तुझ्या नेमशास्त्राभोवतें प्रदक्षिणा घालितो, आणि उंच स्वरानें तुझें शास्त्र वाचितो, त्यांस **आतां या दुसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां तार.**

חלתה פני ארוניה अत्यंत भयानें गांजलेले लोक आपल्या प्रभूपुढें विनंति करितात, एक मनानें आपल्या देवाच्या घरांत दोन वेळ प्रदक्षिणा घालितात, **आणि एकापेक्षां दोघे चांगले असें सिद्ध करून दाखवितात.** हे उपकार करणाऱ्या, आह्मांकडील प्रार्थना स्वीकार, तुझ्या हातानें आह्मांस सबल कर, आणि ज्यापुढून कोणतीच गोष्ट लपली जात नाहीं अशा देवा, दोन दिवसांत आह्मांस सजीव कर, आणि तिसऱ्या दिवशीं आह्मांस उठीव.

כהושעת מאז ערתך ज्याप्रमाणें पूर्वी त्वां आपल्या मंडळीस तारिलें, त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार आणि आपलें वतन मानून घेतलेल्यांस आशीर्वाद दे, आणि त्याप्रमाणें **आतां या दुसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

यापुढें पहिल्या दिवसाप्रमाणें כהושעת इत्यादि ह्मणून प्रार्थना पूर्ण करावी.

तीन सणांची तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना नि. प्रा. पृ. २४५ प्रमाणें शाब्बाथाच्या तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेसारखीच बहुधा असते. आणि शाब्बाथ असल्यास शास्त्र काढून पुढील सप्तकाच्या भागांतून कनिष्ठ दहा ओव्या वाचायास तीन मनुष्यांस बोलावितात. आणि शास्त्र वाचल्या-

वर तेथें लिहिल्याप्रमाणें शास्त्र परत नेऊन ठेवितात. परंतु אַרנִי שְׂפָתַי सणाच्या संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें पहिल्यानें हळू व नंतर मोठ्यानें वाचून आणि קדיש תתקבל नंतर प्रत्येक सणाचें नेमिलेलें गीत वाचून तेथें लिहिल्याप्रमाणें समाप्त करितात.

सणामधील पाळायाचे दिवस समाप्त होण्याच्या वेळीं करायाची प्रार्थना.

या प्रार्थनेस प्रत्येक सणाचें नेमिलेलें गीत वाचून आरंभ होतो, आणि पुढें नि. प्रा. पृ. १२७ एथें सांगितल्याप्रमाणें त्या प्रार्थनेच्या शेवटपर्यंत वाचितात. परंतु सणाच्या दिवसामध्यें व इतर व्यवहारिक दिवसामध्यें भेद दाखविण्याकरितां אַרנִי שְׂפָתַי मधील אתה חונן या धन्यवादाच्या मध्यें नि. प्रा. पृ. २७३ एथें लिहिल्याप्रमाणें אתה חוננתנו हा भाग व सणाकारणें तेथें लिहिलेला אלא יעלה ויבא हा भाग अधिक वाचून प्रार्थना समाप्त झाल्यावर नि. प्रा. पृ. २७८ एथें लिहिल्याप्रमाणें द्राक्षरसाच्या प्याल्यावर धन्यवाद करितात. परंतु त्यामध्यें लिहिलेले सुगंधावरील व ज्योतीवरील धन्यवाद, हे शाब्बाथ समाप्त होण्याची वेळ असल्यास मात्र करितात.

सणाच्या मधल्या व्यवहारिक दिवसाची पाहांटेची प्रार्थना.

या प्रार्थनेस नित्याच्या व्यवहारिक दिवसाप्रमाणें आरंभ करून אַרנִי שְׂפָתַי पर्यंत सरळ वाचावें, आणि सणाकारणें אַרנִי שְׂפָתַי मध्यें लिहिल्याप्रमाणें אלא יעלה ויבא हेंहि वाचावें. אַרנִי שְׂפָתַי पुनः मोठ्यानें वाचल्यावर लूलावाचा व הלל म्हणजे स्तवनाचा हे दोन धन्यवाद करावे. पेसाहच्या पहिल्या दोन दिवसांनंतर हें स्तवन संक्षिप्त वाचावें लागतें ह्मणून त्याप्रमाणें नि. प्रा. पृ. २८९ एथें सांगितल्याप्रमाणें धन्यवाद करावा. स्तवनानंतर קדיש תתקבל वाचून नि. प्रा. पृ. २९२ एथें सांगितल्याप्रमाणें शास्त्र काढावें. सुक्कोथमध्यें शास्त्राचे जे भाग प्रतिदिवशीं चार मनुष्यें वाचितात ते येणेंप्रमाणें. तिसऱ्या दिवशीं गणना अ. २९ ओ. १७ पासून २२ पर्यंत सहा ओव्या वाचितात त्या अशा. पहिला वाचणारा ह्यांतील पहिल्या तीन ओव्या, दुसरा वाचणारा दुसऱ्या तीन ओव्या, तिसरा वाचणारा पुनः दुसऱ्या तीन ओव्या आणि चौथा वाचणारा सर्व सहा ओव्या वाचितो. असा क्रम सातव्या दिवसापर्यंत चालतो. चौथ्या दिवशीं अ २९ ओ. २० पासून २५ पर्यंत; पांचव्या दिवशीं ओ. २३ पासून २८ पर्यंत; सहाव्या दिवशीं ओ. २६ पासून ३१ पर्यंत; आणि सातव्या दिवशीं ओ. २९ पासूल ३४ पर्यंत आणि प्रत्येक दिवशीं शेवटला वाचणारा קדיש לעילא ह्मणतो यानंतर नि. प्रा. पृ. ९२ एथें लिहिल्याप्रमाणें אשרי יושבי

ובא לציון आणि ברוך אלהינו वाचून नि. प्रा. पृ ९५ एथें सांगितल्याप्रमाणें शास्त्र परत नेऊन ठेवितात. मग हज्जानानें קריש לעילא ह्मटल्यावर मूसाफ ह्मणजे अधिक प्रार्थना मागें पृष्ठ २४ एथें सूचना केल्याप्रमाणें वाचितात, परंतु त्यामध्यें जेथें "सुदीन" असें लिहिलें आहे तेथें "दिवस" असें वाचावें. आणि हा मूसाफ मोठ्यानें वाचतांना כתר हा भाग संक्षेपांत आहे तो वाचावा. हें मोठ्यानें वाचन झाल्यावर मंडपाचे सणांत शास्त्राची एक प्रत तेबावर आणून הושענא वाचितात, मग קריש תתקבל, सणाचें नेमिलेलें गीत, קריש יהא שלמא, קוה אל יי इत्यादि वाचून पाहांटेची प्रार्थना समाप्त करितात.

तिसऱ्या दिवसाचा होशाना.

पहिल्या दिवसाप्रमाणें होशानास आरंभ करून प्रदक्षिणा घालतांना हें पुढील ह्मणतात.

אנא האל הנקדש आह्मी विनंती करितों, कीं हे पवित्र, पवित्र, पवित्र असें तीन वेळ ह्मटल्यानें पवित्र मानिलेल्या देवा, उत्पत्तीच्या कामीं प्रतिदिवशीं तीन पदार्थ[1] आणि सहाव्या व सातव्या दिवशीं तीन तीन पदार्थ[2] उत्पन्न करणाऱ्या, **आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों, कीं ज्या बापानें[3] तीन देवदूत पाहिले,[4] त्यांस आधार करण्याकरितां ज्यानें तीन मापें सपीठ घेतलें[5], आणि ज्याबरोबर तिघे करारी[6] जात असत, त्याची आठवण करून **आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों, कीं जो पुत्रॅ[7] तीन दिवसांनीं अर्पिला जाण्यास सिद्ध झाला[8], ज्यानें राजा, त्याचा मित्र व त्याचा सेनापति या तिघांबरोबर करार केला[9], आणि ज्याच्या पुण्याईकरितां त्याच्या लेंकरांस तीन मुगुटांचें[10] वतन मिळालें, त्याची आठवण करून **आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं ज्या बापानें[11] शिडीवरून तीन दूत चढतां व उतरतां पाहिले[12], ज्यानें पन्हळांत तीन प्रकारच्या काठ्या सोलल्यॉं[13], आणि ज्यानें तीन वेळॅं[14] आपल्या पुत्रांस सोआनांसॅ[15] पाठ-

---

१ टीका १४. २ टीका १५. ३ आब्राहामानें. ४ उत्पत्ति अ० १८ ओ० २. ५ उत्पत्ति अ० १८ ओ० ६. ६ आनेर, एश्कोल व मम्रे उत्पत्ति अ० १४ ओ० १३. ७ इसहाक. ८ उत्पत्ति अ० २२. ९ उत्पत्ति अ० २६ ओ० २६. १० टीका १६. ११ याकोबानें. १२ उत्पत्ति अ० २८ ओ० १२. १३ उत्पत्ति अ० ३० ओ० ३७ व ३८. १४ टीका १७. १५ मिसर देशास.

विलें, त्याची आठवण करून **आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों, कीं हे आह्मांस तिघे भावंडांच्या हातांकडून उद्धरणाऱ्या, आह्मांमध्यें कोहेन, लेवी व इस्राएल अशा तीन पदव्या लावून देणाऱ्या, आणि शास्त्र, भविष्य कथनें व पवित्रलेख या तीन लेखांचें आह्मांस वतन देणाऱ्या, **आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אמצני אלהי हे माझ्या देवा, या माझ्या सणांत व माझ्या पर्वणींत मला सशक्त कर; हे परमेश्वरा, माझ्या वाक्याकडे कान दे, माझें चिंतन ध्यानांत आण. तुला शोधायास मी तुजपुढें भिक्षा मागणाऱ्या भिकाऱ्याप्रमाणें जेव्हां उभा आहें, जेव्हां मी तुला अरोळी करितों आणि तुझ्या गाभाऱ्याकडे मी आपले हात उभारितों; तेव्हां हे संकल्पांत मोठ्या व कर्मांत समर्था ! तुझ्या नियमाचें व न्यायाचें वतन पावणारांचें रक्षण कर. तुझ्या प्रसन्नतेची आशा करणारांकरितां, तुला शोधणारांच्या वंशाकरितां व तुझे मुखाचा शोध करणारांकरितां तूं आपलें वचन स्थापन कर. तुला हाक मारणारांचा समुदाय तुला शोधायास पहांटेस उठला आहे; हे प्रभु कान दे, उशीर करूं नको. त्यांच्या मुखांतून तुझ्या नांवाचें एकत्व मानणें बंद होत नाहीं, ह्मणून तूंहि आपली दया बंद करूं नको. ज्या वचनावर तूं आम्हांस आशा ठेवूं दिली, तें तूं आपल्या सेवकासाठीं स्मर; आह्मांबरोबर केलेला करारहि तूं स्मर, तो मोडूं नको. जे तुजपुढें आपले हात पसरितात त्यांजवर कृपा कर; कारण हे परमेश्वरा, तूं दयाळू व कृपाळू आणि मंदक्रोध आहेस. जे तुझ्या चांगुलपणाची आशा करितात, त्यांजवर तें लवकर येऊं दे, कारण जे परमेश्वराची वाट पाहतात, जो जीव त्याला शोधितो, त्यांस तो चांगला आहे. माझे दीन व दरिद्री तुजमध्यें हर्ष व आनंद मानितील; परमेश्वर थोर आहे असें ते सर्वदा ह्मणतील. जे संपत्तिरूप लोक तूं आपणाकरितां राखून ठेविले आहेस, त्यांस स्थापन कर; कारण त्यांचें शोभिवंत सामर्थ्य तूंच आहेस. तुझ्या लोकांचे शत्रु जे सर्वदा त्यांचा नाश करितात, त्यांस छेद, आणि दीनांस त्यांपेक्षां बलवानापासून राख.

---

१ मोशे, आहारोन व मिर्याम.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

(हे देवा,) आह्मी विनंति करितों, आतां आह्मांस तार! (दो.वे.)

אנא יסד יסוד मी विनंति करितों कीं आज या तिसऱ्या दिवशीं माझ्या होमाचा सुवास तुला आवडावा ह्मणून माझ्या पवित्र मंदिराचा पाया घाल, आणि माझ्या सूर्याचा प्रकाश तेजस्वी कर आणि आतां आह्मांस तार. मी विनंति करितों, कीं आज या तिसऱ्या दिवशीं मला फांसांत पाडणारांस उपटून टाक, माझें पवित्र वस्तिस्थान पुनः बांध, आणि मुखानें माझा जीव उद्धर, आणि आतां आह्मांस तार.

(हे देवा,) आह्मी विनंती करितों, आतां आह्मांस तार!

אני והו हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

כהושעת ידידים ज्याप्रमाणें मी तुजकडे प्रार्थना करीत असतां त्वां आपल्या प्रियकरांस त्यांस दास्यत्वांत राखणारांच्या हातांतून तारिलें, आणि ल्हदीम लोकांस घायाळ केलें; त्याप्रमाणें जे तुझे संपत्तिरूप व सुखी ह्मटलेले लोक तुजवर भरंवसा ठेवितात, आणि मोठ्यानें काकळूत करितात, **त्यांस आतां या तिसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां तार.** ज्याप्रमाणें त्वां सुंदर डोंगरासें तोफाच्या बंदांतून सोडविलें, आणि मी मुक्त होऊन निघेपर्यंत त्वां आपल्या रागानें त्यांस वारंवार पिडिलें, त्याप्रमाणें तुझ्या कळपाचा शेष, जो तुझ्या गौरवांत आपणांस समर्थ मानितो, आणि जो तुझें गौरव व वैभव करितो, **त्यास आतां या तिसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां तार.**

מיחדים שם האל हे देवा, आह्मी आज नेमिलेल्या गायनानें तुझे नामाचें एकत्व गाजवितों; तर देवासारिखा कोणी नाहीं असें आह्मां गाणारांस उद्धारणाराच्या येण्यापर्यंत आरोग्यता दे; ज्या लोकांस राज्याधिकार शोभतो, **त्या इस्राएल लोकांस तिसरा आशीर्वाद होवो.** तुझ्याप्रमाणें नेमा सभोंवते प्रदक्षिणा घालणाऱ्या लोकांचा अंधार प्रकाशित कर आणि तूं आपल्या मंदिरीं त्यांच्या विनंतीकडे कान लाव; जेव्हां

---

१ मिसरी लोकांस. २ गीत ४८ ओ० ३ एथें हे नांव सीयोन डोंगरास दिलेलें आहे. ३ मिसराच्या. ४ हें येशाया अ० १९ ओ० २४ व २५ वरून लिहिलें आहे.

न्याय करायास बसतोस, तेव्हां त्यांचें पाप घालीव, आणि जसें पूर्वी सैन्यासमोर सैन्य असे, तसें त्यांस वसीव.

כהושעת מאז עדתך ज्याप्रमाणें पूर्वी त्वां आपल्या मंडळींस तारिलें त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार आणि आपलें वतन मानून घेतलेल्यांस आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें **आतां या तिसऱ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

यानंतर पहिल्या दिवसाप्रमाणें ככתוב व שובה למעונך ह्मणून शास्त्र परत नेऊन ठेवावें आणि קריש תתקבל, מזמור כאיל תערג गीत ४२ व ४३ व קריש יהא שלמא आणि यानंतर नित्याच्या प्रार्थनेंतील קוה אל יי इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात.

चौथ्या दिवसाचा होशाना.

पहिल्या दिवसाप्रमाणें होशानास आरंभ करून प्रदक्षिणा घालतांना हें पुढील ह्मणतात.

אנא הבורא עולמו आह्मी विनंति करितों कीं, हे आपल्या जगास चार तत्वांकडून[1] उत्पन्न करणाऱ्या! आपलें सिंहासन उचलायास चार प्राणी लावणाऱ्यों[2], आणि चार दिशा[3] व चार ऋतु[4] स्थापणाऱ्या, **आह्मी हा चार दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, जो बापें[5] पूर्वेकडून चौथ्या दिवसाच्या[6] सूर्यासारखा प्रकाशला; ज्यानें चार राजांच्या[7] पाठीस लागून आपल्या सैन्याच्या टोळ्या केल्या; आणि त्याचें संतान चार पिढ्यांनंतर[8] बंदांतून परतेल असें शुभवर्त्तमान ज्यास मिळालें, त्याची आठवण करून **आह्मी हा चार दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, ज्या पुत्रास[9] चार कोनी वेदीवर बांधायास नेलें ज्यानें पेलेशेथ देशांत चार विहिरी[10] खणिल्या, आणि शेवटीं जो हेब्रोन ज्यास चौघांचें नगर असेंहि[11] ह्मणत तेथें जाऊन राहिला, त्याची आठवण करून **आह्मी हा चार दिवस सण करीत असतां**

---

१ अग्नी, पाणी वायु व माती. २ येहेजकेल अध्याय १ एथें लिहिल्याप्रमाणें मनुष्य, सिंह, बैल व गरुड. ३ पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण. ४ वसंत ऋतु, हिंवाळा, उन्हाळा व पावसाळा. ५ आब्राहाम. ६ उत्पत्तीच्या चौथ्या दिवसासारखा. ७ उत्पत्ति अ० १४ पाहा. ८ उत्पत्ति अ १५ पाहा. ९ इसहाकास. १० उत्पत्ति अ० २६. ११ टीका १८.

आह्मांस तार. आह्मी विनंति करितों कीं, ज्या सरळ मनुष्यास[1] चार आई[2] सहायकारी होत्या, ज्यानें चार प्रकारच्या शिक्षांपासून[3] सुटण्याकरितां विनवणी केली, आणि ज्याच्या प्रार्थनेमुळें त्याच्या लेंकरांस चार गोष्टी[4] पुरविल्या गेल्या, त्याची आठवण करून **आह्मी हा चार दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, हे रानांत आह्मांस चार झेंड्यांच्या मध्यें चौलविणाऱ्या, उरपटामध्यें रत्नांच्या चार पंक्ति बसविण्यास आज्ञा देणाऱ्या, आणि आह्मांस या सणामध्यें चार प्रकारच्या पदार्थांकडून स्तवन करण्याची आज्ञा देणाऱ्यां, **आह्मी हा चार दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

ירון אל פתחך हे देवा, हरवलेलें शेरड़ूं[5] तुझ्या पादासनाच्या दारापुढें गजर करून ह्मणतें कीं, हे परमेश्वरा आमच्या प्रभू, तुझें नाम किती थोर आहे ! रानांत व पटांगणांत मोठ्या वाणीनें तें घोष करितें कीं, हे परमेश्वरा, त्वां आपल्या प्रसादानें माझा डोंगर स्थिर स्थापला आहे. हे इस्राएलाच्या उद्धारका व त्याच्या पवित्रा! जो तुझ्या तारणाकरितां तान्हेला आहे, आणि जो तुझ्या मागल्या पावसाकरितां[6] आपलें तोंड पसरितो त्याची ताहान शमीव. हे परमेश्वरा, न्याय बोलणाऱ्या, व जें यथार्थ तेंच दाखविणाऱ्या ! तूं बोललास व पृथ्वी झाली, तो तूं आपल्या बंदिवानांस बंदांतून सोडीव. आह्मी तुझ्या कुरणांत पुष्ट व्हावें ह्मणून आह्मांवर शांतीचें वर्ष येऊं दे; हे परमेश्वरा, आपलें आकाश लववून उतर, आणि पर्वतांस स्पर्श कर ह्मणजे ते धुमतील. भाला काढ, आणि जे म्लान झालेल्यांच्या पाठीस लागतात त्यांचा विरोध कर; कारण तूं ह्मटलें आहेस कीं, मीच परमेश्वर, दुसरा कोणी नाहीं; मजवांचून कोणी देव नाहीं. त्यामध्यें मनुष्यबीज व पशुबीज तूं पेर[10] आणि आरिएलाच्या[11] पाडावास उद्धरायास त्वरा कर; पर-

१ याकोब हें नांव त्यास उत्पत्ति अ. २५ ओ. २७ एथें दिलेलें आहे. २ लेआ, राहेल, बिलहा व जिल्फा. ३ येहेजकेल अ. ५ एथें सांगितलेल्या तरवार, दुष्काळ, वनपशु व पटकी या कठोर शिक्षांपासून. ४ मान, लाव्हे, गौरवाचें ढग, व पाण्याचा झरा. ५. गणना अ. २ पाहा. ६. निर्गम अ. २८ ओ. १५-२१ पाहा. ७. लेवी अ. २३ ओ. ४० पाहा. ८. इस्राएल. ९. वचन दिलेल्या शेवटले दयेकरितां. १०. त्यास व त्याच्या पशूस वाढीव, येहेजकेल अ. ३१. ओ. २७ पाहा. ११. येरूशलेमेच्या.

मेश्वर आह्मांस स्मरला आहे, तो आह्मांस आशीर्वाद देईल, इस्राएलाच्या घराण्याला आशीर्वाद देईल.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंति करितों आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא יערב לך मी विनंति करितों कीं, आज या चौथ्या दिवशीं मी आपला द्रूलाब फिरवीत असतां माझी आरोळी तुला आवडो, आणि माझ्या तारणाचा वेळ आतां जवळ आण आणि आतां आह्मांस तार. मी विनंति करितों कीं, आज या चौथ्या दिवशीं मला विश्रांति दे, माझा मार्ग व माझें नांदणें बहाल कर, माझीं हस्तकर्मे संतोषानें मान्य कर; माझ्या विसाव्याच्या घरीं मला ने आणि आह्मांस तार.

(हे देवा,) आह्मी विनंती करितों आतां आह्मांस तार!

אני והו हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

כהושעת יקיר ज्याप्रमाणें त्वां प्रियकरास, ज्यानें कोट व नगर फोडण्याचें योजिलें होतें, त्याच्या हातांतून सोडवून, त्यानें माझ्या नाशामध्यें हर्ष मानिला होता, ह्मणून त्याजवर घाव करून त्याचा नाश केला; त्याप्रमाणें आतां जुलुम सोसणारांस जुलुम करणारांच्या हातांतून सोडीव आणि मूर्छित मनाच्यास हर्षित कर, **आणि आतां या चौथ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.** ज्याप्रमाणें त्वां द्राक्षवेलास फुसफुसणारा आणि दांत कडकडविणारा शत्रु, ज्यानें माझा बुडखा एकाएकीं खांडून टाकायाची योजना केली होती, त्याच्या हातांतून सोडविलें; आणि तुझ्या एक शब्दाप्रमाणें त्याचा लोक राहिला नाहीं, त्याप्रमाणें **आतां या चौथ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

ישעך אל הראה יה हे अनंता! तुझें तारण दाखीव; हे महाज्ञानी देवा, **तुझ्या शास्त्राभोवतें चार वेळ प्रदक्षिणा घालणारे** अनेक वेळां तारण पावलेले लोक यांच्या उद्धाराचा वेळ त्वरित आण. हे इस्राएलाच्या **खंडून** घेणाऱ्या, आतां तूं त्यांचा तारक हो, यासारख्या समयीं तूं त्यांचा रक्षक हो; आणि त्यांचा तारणाचा वेळ प्रगट कर, कारण तारण तुझ्याच हातीं आहे.

כהושעת מאז עדתך ज्याप्रमाणें पूर्वी त्वां आपल्या मंडळीस तारिलें; त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार आणि आपलें वतन मानून घेतलेल्यांस आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें **आतां या चौथ्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

या नंतर तिसऱ्या दिवसाप्रमाणें קריש תתקבל, שובה למעונך, ככתוב, מזמור כאיל תערג इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात.

पांचव्या दिवसाचा होशाना.

पहिल्या दिवसाप्रमाणें होशानास आरंभ करून प्रदक्षिणा घालतांना हें पुढील ह्मणतात.

אנא המיהר आह्मी विनंति करितों कीं, हे आपल्या गौरवास पांच नांवें[१] लावून घेणाऱ्या, आपल्या जगांत पांच वस्तु[२] आपलें वतन असें मानणाऱ्या, आणि आपल्या उत्पन्न केलेल्या पदार्थांमध्यें पांच प्राण्यांस सर्वांहून[३] बलवान् असें घडणाऱ्या, **आह्मीं हा पांच दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, ज्या बापाबरोबर[४] तूं पांच दुभागलेल्या प्राण्यांमध्यें करार केलासे[५], ज्यानें पांच राजांची नेलेली लूट परत आणून दिल्ही[६], आणि ज्यानें पांच नगरांच्या होणाऱ्या नाशाकरितां काकळूत केली[७] त्याची आठवण करून **आह्मी हा पांच दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, जो पांच द्वारांच्या मंदिराच्या[८] मोर डोंगरावर अर्पिला जाण्याकरितां बांधला गेलो[९], जो आपल्या बापापासून पांच आशीर्वाद पावलों[१०], आणि ज्यानें पांच नांवें पावलेल्या जीवाचे[११] सर्व धर्म पूर्ण केले, त्याची आठवण करून **आह्मीं हा पांच दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, ज्या सरळ मनुष्याकरितां[१२] पांच चमत्कार झाले[१३], ज्याच्या पुत्रांमधून पांच भाऊ फारोपुढें उभे[१४] केले गेले, आणि ज्याच्या

---

१ टीका १९. २ टीका २०. ३ टीका २१. ४ आब्राहामाबरोबर. ५ उत्पत्ति अ. १५ पाहा. ६ उत्पत्ति अ. १४ पाहा. ७. उत्पत्ति अ. १८ ओ. १७–३३ पाहा. ८. गेमारा मिद्दोथमध्यें असें सांगितलें आहे कीं, मोरीया डोंगरावरील पवित्र मंदिरास पांच द्वारें होतीं. ९ इसहाक. १० टीका २२. ११ टीका २३. १२ याकोबाकरितां. १३ टीका २४. १४ उत्पत्ति अ. ४७. ओ. २ पाहा.

पुत्रांतून जो वेगळा झाला[१], आणि ज्यानें आपल्या लहान भावास पांच पोशाकें[२] दिल्हे, त्यास अनेक संकटांतून सोडविलें[३] त्याची आठवण करून **आह्मीं ह्या पांच दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंति करितों कीं, हे आह्मांस शास्त्राच्या पांच पुस्तकांचें वतन देणाऱ्या, आणि प्रत्येक पाटीवर पांच पांच लिहिलेल्या आज्ञा पांच वाणीनें ऐकविणाऱ्यों, **आह्मीं ह्या पांच दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אמוניך מתחננים ज्याप्रमाणें पूर्वीं त्याप्रमाणें आतां तूं त्यांच्या घावांस पट्टी बांधावी ह्मणून तुझे विश्वासू लोक तुला विनवीत आहेत; हे माझ्या देवा, तूं अत्यंत थोर आहेस, ऐश्वर्यप्रतापानें तूं वेष्टिलेला आहेस. माझ्या तिघां पूर्वजांकरितां मला तुझ्या नियमांत चालीव; माझ्या शत्रूंकरितां आपल्या न्यायीपणांत मला संभाळून ने. तुजशीं वाद करणारे, आणि ज्यांच्या जुलमाखालीं तूं आह्मांस बंद करून ठेविलें आहेस, ते नाश पावोत. हे परमेश्वरा, तूं आपलें मुख आह्मांवर प्रकाशित कर. ज्याचा शोध लागत नाहीं, अशा अनंत देवा, आणि सर्वकाळच्या खडकरूप आश्रया, शुभवर्तमान कळविणारा पाठीव; परमेश्वर आपले लोकांस सामर्थ्य देईल, परमेश्वर आपल्या लोकांस कुशलाचा आशीर्वाद देईल. हे तुझ्या प्रत्येक शोधणारास सांपडणाऱ्या देवा, सैन्याच्या परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, माझ्या पाडावपणाकडे व माझ्या दुःखाकडे पाहा. हे दयाळू व कृपा करणाऱ्या, तुजपुढें दृढ होऊन कोणी निभावत नाहीं; हे देवा, तुझी दया सर्वकाळ आहे. हे माझ्या राजा व माझ्या उद्धारका ! माझी विनंति मान्य कर; म्यां तुला हाक मारिली आहे, मजसाठीं त्वरा कर.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंती करितों,

आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אנא יוצרי मी विनंती करितों कीं, हे माझ्या घडणाऱ्या व माझ्या पवित्रा, माझी गुप्तांतील प्रार्थना व माझ्या मनांतील उकळ्या मान्य

१ योसेफ. २ उत्पत्ति अ. ४५ ओ. २२ पाहा. ३ इ. खंड भरलास. ४ टीका २५.

कर, आणि आज या पांचव्या दिवशीं माझे अपराध पुसून टाक व दूर कर आणि आतां आह्मांस तार. मी विनंती करितों कीं, माझा फास उडवून टाक व माझा दंड आठवूं नको; आणि हे मजविषयीं चौकशी ठेवणाऱ्या, आज या पांचव्या दिवशीं मजकडे फीर आणि आतां आह्मांस तार.

हे देवा, आह्मी विनंति करितों, आतां आह्मांस तार!
ויהו אני हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

כהושעת יקושי ज्याप्रमाणें त्वां इटांच्या भट्टींत गुंतलेल्यांस[1] पेंढा तुडविण्यापासून व गवत गोळा करण्यापासून सोडविलें, आणि मला तुडविणारांस त्वां तुडविलें, आणि ज्या लोकांची दहाव्या वेळीं गणना होणें आहे,[2] त्या लोकांस बंदांतून सोडविलें, त्यांस सर्व प्रकारच्या न्यूनतेपासून सोडीव, आणि **या पांचव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.** ज्याप्रमाणें त्वां येशूरूनासें[3] त्याच्या पीडकांपासून सोडविलें, आणि त्यांनीं, हे मला उंचावणाऱ्या देवा, तुला आपलें तोंड उघडून गायनाच्या ओंठांनीं गाईलें, स्तविलें व विनविलें, **त्याप्रमाणें आतां आह्मी या पांचव्या दिवशीं तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

מרום שוכן עד हे थोर व सनातन कालांत वास करणाऱ्या व पवित्रतेनें सन्मानिलेल्या, तुझें थोर व उंचावलेलें नाम हे देवा, सदा सुवंदित असो; **तुझ्या शास्त्राभोंवते पांच वेळ प्रदक्षिणा घालणारे** नव्या **गीतानें गातात व स्तवितात.** हे आपल्या विश्वासू लोकांच्या रक्षका, दयाळू देवा! आपल्या लोकांच्या शेषास तार, तूं आपल्या पुरातन लोकांवर दया करण्यास त्वरा कर, आणि माध्याच्या दगडासें तारायाकरितां व त्यास विश्रांति देण्याकरितां आह्मांसीं व आमच्या लेंकरांच्या लेंकरांसीं आपला करार आठीव.

כהושעת מאז ערתך ज्याप्रमाणें पूर्वीं त्वा आपल्या मंडळीस तारिलें; त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार आणि आपलें वतन· मानून

---

१ मिसरांत इटा करण्याचे कामास लावलेल्या इस्राएलास. २. इस्राएलाची नऊ वेळां गणना झाली आहे; दाहावी गणना होशेया अ २ ओ १ एथें लिहिल्याप्रमाणें माशीयाहाचे वेळीं होणें आहे. ३ अनुवाद अ ३२ ओ १५ एथें व दुसऱ्या अनेक ठिकाणीं इस्राएलांस हें नांव दिलेलें आहे. ४ सर्व लोकांहून श्रेष्ठ मानिलेल्या इस्राएल लोकांस.

घेतलेल्यास आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें **आतां या पांचव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

यानंतर तिसऱ्या दिवसाप्रमाणें קריש תתקבל, שובה למעונך, בכתוב מזמור כאיל תערג इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात.

सहाव्या दिवसाचा होशाना.

(पहिल्या दिवसाप्रमाणें הושענא למענך, व पुन: הושענא बोलून प्रदक्षिणा घालतांना हें ह्मणावें.

אנא הבורא עולמו आह्मी विनंती करितों कीं, हे सहा दिवसांत आपलें जग उत्पन्न करणाऱ्या, सहा बाजूंच्या सहा दिशांमध्यें[१] तें रचणाऱ्या, सहा पंखांचे सेराफीम[२] दूत घडणाऱ्या, **आह्मी हा सहा दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्या बापानें[३] सहा गोष्टी[४] अव्हेरिल्या, ज्यास वृद्धपणीं सहा पुत्र[५] झाले, ज्यानें वन लाविलें[६] आणि सहा वर्षांच्या शेवटीं त्यास आशीर्वाद प्राप्त झाला[७], त्याची आठवण करून, **आह्मी हा सहा दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, जो[८] सहा थरांच्या वेदीवर[९] बांधला गेला, ज्यास त्वां सहा संकटांतून[१०] रक्षिलें व सोडविलें, आणि आपल्या संततीनें ज्या कुंडांच्या सहा प्रकारच्या नियमांविषयीं[११] शोध करावा ह्मणून ज्यानें कुंडें खणिलीं[१२] त्याची आठवण करून **आह्मी हा सहा दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्या सरळ मनुष्यास[१३] वडील बहिणीपासून[१४] सहा पुत्र[१५] जन्मले, ज्यानें आपल्या पुत्रांस योसेफाकरितां सहा प्रकारची भेट[१६] नेण्यास सांगितलें, आणि ज्या सहा जनांतील प्रत्येकास सहा आशीर्वाद प्राप्त झाले, त्यांच्या बापास[१७] ज्यानें थोरपणा दिला,

---

१ पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, वरील बाजू व खालील बाजू. २ यशाया अ. ६ ओ. २ पाहा. ३ आब्राहामानें. ४ नीती अ. ६ ओ. १६ एथें सांगितलेल्या ज्या सहा गोष्टींचा देव वीट मानितो त्या. ५ आब्राहामास केटूरेपासून झालेले सहा पुत्र, उत्पत्ती अ. २५ ओ. १–२ पाहा. ६ उत्पत्ति अ. २१ ओ. ३३. ७ टीका २६. ८ इसहाक. ९ टीका २७. १० टीका २८. ११ टीका २९. १२ उत्पत्ती अ. २६ पाहा. १३ याकोबास. १४ लेआपासून. १५ रेऊबेन, शिमओन, लेवी, येहुदा, इस्साखार व जेबूलुन. १६ उत्पत्ति अ. ४३ ओ. ११. १७ टीका ३०.

त्याची आठवण करून **आह्मी हा सहा दिवस सण करीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्यांनें एफोदाच्या खांद्यावर सहा सहा नांवें जोडिलीं[२], ज्यानें आश्रयाच्या सहा नगरांकडून प्राण[३] वांचविले, आणि ज्यानें सहा प्रकारच्या ज्ञोनाचें वतन लावून दिलें, त्याची आठवण करून **आह्मी हा सहा दिवस सण करीत असतां आह्मांस तार.**

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

לְמַעַן אָב אֵיתָן ज्या बापानें[५] राजाचें काम त्वरेचें होतें ह्मणून ईश्वरी नामाचें एकत्व मान्य करण्यास त्वरा केली, आणि "हे परमेश्वराच्या आशीर्वादिता, आंत ये, बाहेर कां उभा राहतोस[६]," असा सन्मान ज्याच्या चाकराचा झाला त्याकरितां. जो वधला जाणार[७] ह्मणून दुःखानें हंबारला, परंतु ईश्वरी वचन कल्याणाचें असतें ह्मणून मी आहें तोच आहें या नांवाच्या अनाद्यंत देवाकडून ज्यास मुक्ततेचें शुभवर्तमान मिळालें त्याकरितां. ज्या डेन्यांत राहाणाऱ्या सरळ[९] मनुष्याबरोबर तूं करार केलास व त्याविषयीं "आणि पाहा, परमेश्वर त्याजवळ उभा होता," असें ह्मटलें आहे[१०] त्याकरितां. ज्या शुद्ध मनुष्यास[११] दृश्य होऊन त्याजबरोबर "अहो परमेश्वराची आशा धरणारे हो, तुह्मी धीर धरा[१२], ह्मणजे तो तुमचें मन सबळ करील," असें शुभवर्तमान तूं माझ्या समुदायास पाठविलेंस त्याकरितां. जे पुरुष, ज्या स्त्रिया व जीं लेंकरें भुकेलीं व तान्हेलीं असतां, आणि त्यांचा जीव त्यांच्या ठायीं मूर्च्छित असतां दशमीस[१३] तुला हाक मारितात, त्यांकरितां व तूं आपल्या पवित्र नामाकरितां समुद्रांतील वादळ शांत कर, पृथ्वी फाड, तारण निघूं दे आणि यथार्थता उगीव.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אָנָּא הוֹשִׁיעָה נָּא (हे देवा, आह्मी विनंति करितों, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אָנָּא הַיָּשָׁר מַעַרְכֵי मी विनंति करितों कीं, माझ्या पवित्र पर्व-

---

१मोशे. २ टीका ३१. ३ टीका ३२. ४ टीका ३३. ५ आब्राहामानें. ६ उत्पत्ती अ. २४ ओ. ३१ पाहा. ७ इसहाक. ८ निर्गम अ. ३ ओ. १४. ९ याकोबाविषयीं. १० उत्पत्ति अ. २८ ओ. १३. ११ मोशेस. १२ अनुवाद अ. ३१ ओ. ६. १३ प्रायश्चित्ताच्या दिवशीं.

ताकडे जाण्याकरितां माझे संकल्प व माझीं पावलें नीटाव, आणि माझा मार्ग सिद्ध कर; दुःखानें धालेल्याची मुक्तता गाजीव, आणि आज या सहाव्या दिवशीं त्यांची प्रार्थना तुला शुद्ध बोळासारखी[1] आवडून आतां आह्मांस तार. मी विनंति करितों कीं, तुझ्या संपत्तिरूप लोकांचा अंगीकार कर; तुझ्या वतनाचा डोंगर जें माझें पवित्रस्थान, तेथें तुझ्या समाजाला एकवट कर, विश्रांतीच्या मंदिरीं विखरलेल्यास गोळा कर, आणि आज या साहव्या दिवशीं त्यास जरीबुट्टीचीं वस्त्रें पांघरवून आतां आह्मांस तार.

(हे देवा,) आह्मी विनंती करितों, आतां आह्मांस तार!

אני והו **हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार!** (दो. वे.)

כהושעת ילידי אהב ज्याप्रमाणें त्वां आपल्या प्रियकराच्या लेंकरेंस[2] जळत्या भट्टींतून सोडविलें, आणि माझ्या पवित्र लोकांचा नाश करूं इच्छिणाऱ्या राहाबासें[3] घायाळ करून डोहांत बुडविलें आणि तुझ्या खासगी लोकांनीं पार जावें ह्मणून डोहांतून त्याकरतां मार्ग उघडिलास, **त्याप्रमाणें आतां आह्मी या सहाव्या दिवशीं तुला स्तवित असतां आह्मांस तार.** ज्याप्रमाणें त्वां पारव्याच्या[4] वाणीची वाट पाहणारास कफतोरें[3] देशांतून सोडविलें आणि माझ्या पवित्र लोकांवर पाखर घालून न्याय पावलेल्या लोकांस सोडविण्याकरितां फूतच्या लोकांस गळवें व फोड्यांनीं पीडिलेंस **याप्रमाणें आतां आह्मी या सहाव्या दिवशीं तुला स्तवित असतां आह्मांस तार.**

שעה עליון हे परात्परा, पवित्रतेनें सन्मानिलेल्या देवा, मी नव्या गायनानें आज तुला शोधित असतां माझी प्रार्थना मान्य कर, माझ्या पीडणारास तूं पीड, **आणि या साहाव्या वेळीं तुझ्या शास्त्राभोंवते प्रदक्षिणा घालणारावरील दुःखाचे घाय बरे कर.** संकटांतून

---

१ पवित्र मंदिरीं जो सुगंध जाळला जात असे त्यांतील बोळासारखी. २ इस्राएलांस. ३ राहाब, कफतोर व फूत हीं मिसराचीं निरनिराळीं नावें आहेत. ४ शेलोमोचें गीत अ. २ ओ. १२ एथें पारव्याची वाणी ही उपमा तारणसंबंधी ईश्वरी वचनास दिल्ही आहे.

हाक मारणाऱ्या दरिद्र्यांची वाणी, आणि जे लोक सीयोनेंत परक्या लोकांच्या व शत्रूच्या अमलाखालीं असल्याकारणें ओरडतात, त्यांचें ओरडणें तूं आतां ऐक; पैक्यावांचून फुकट विकले गेलेले लोकांचें तारण व त्यांचा उद्धार करण्याकरितां त्वरा कर, आणि त्यांचा उद्धार पुनः लवकर व त्वरित होऊं दे.

כהושעת מאז ערתך ज्याप्रमाणें पूर्वी त्वां आपल्या मंडळीस तारिलें, त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतन मानून घेतलेल्यांस आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें आतां आह्मी या सहाव्या दिवशीं तुला स्तवीत असतां आह्मांस तार.

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार!

(यानंतर तिसऱ्या दिवसाप्रमाणें שובה למעונך, ככתוב, מזמור כאיל תערג, קדיש תתקבל इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात.)

सुक्कोथ व पेसाह यांच्या मधल्या दिवसांत येणाऱ्या शाब्बाथाची प्रार्थना.

या शाब्बाथ संध्याकाळची, पाहांटेची, तिसऱ्या प्रहरची, व शाब्बाथ समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना बहुत करून इतर शाब्बाथासारिखीच असते. संध्याकाळचे प्रार्थनेंत त्या सणाचें नेमिलेलें गीत आरंभीं लिहिल्याप्रमाणें वाचावें लागतें, आणि या चोहों वेळीं ארני שפתי मध्यें सणाकारणें जो יעלה ויבא बोलावा लागतो तो बोलतात. परंतु त्यांत जेथें "सुदिन" असें ह्मणायाचें तेथें "दिवस" असें ह्मणावें. सकाळीं कीर्तनामध्यें सणाचें नेमिलेलें गीत ह्मणत नाहींत. या दोन्ही सणांतील शाब्बाथ दिवशीं शास्त्रांतील जो भाग वाचायाचा तो एकच ह्मणजे निर्गम अ. ३३ ओ. १२ पासून अ. ३४ ओ. २६ पर्यंत व त्यानंतर קדיש לעילא. मफतीर हा सुक्कोथमध्यें तो शाब्बाथ सणाचा जितकावा दिवस असेल तितकाव्या दिवसाचा भाग पृष्ठ ३६ एथें लिहिल्याप्रमाणें व पुनः קדיש לעילא, हाफतारा येहेजकेल अ. ३८ ओ. १८ पासून अ. ३९ ओ. १६ पर्यंत. पेसाहमध्यें मफतीर गणना अ. २८ ओ. १९–२५ व पुनः קדיש לעילא, हाफतारा येहेजकेल अ. ३७ ओ. १–१४. यापुढील प्रार्थना इतर शाब्बाथासारखीच परंतु मुसाफांतील ארני שפתי हा सणाचा वाचितात; परंतु त्यामध्यें जेथें " सुदिन " असें ह्मटलें आहे, तेथें "दिवस" असें ह्मणावें. त्यानंतर (सुक्कोथमध्यें शास्त्राची प्रत आणून तेवावर न ठेवितां व प्रदक्षिणा न घालितां मात्र हेखाल उघडें ठेवून होशाना ह्मणून) इतर शाब्बाथाप्रमाणें प्रार्थना समाप्त करावी.

शाब्बाथाचा होशाना.

पहिल्या दिवसाप्रमाणें הושענא व למענך व पुन: הושענא ह्मणून पुढील ह्मणावें.

אום נצורה डोळ्याच्या पुतळीप्रमाणें संभाळलेला लोक[1] शाब्बाथाचे नियम शिकतो, पापापासून मन वळविणाऱ्या शास्त्राचा अभ्यास करितो; शाब्बाथ दिवशीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याच्या व कांहीं पदार्थ नेण्याच्या कायद्याचें स्पष्टीकरण शोधितो; शाब्बाथ दिवशीं चालण्याची सीमा दोन हजार हात एवढी ठरवितो; शाब्बाथ दिवशीं दोन भाकऱ्या घेऊन त्यांजवर धन्यवाद करितो; शाब्बाथ दिवशीं शाब्बाथ दिवस पवित्र पाळावा ह्मणून त्याची आठवण कर व त्यास जप या आज्ञा पूर्ण करितो; शाब्बाथाच्या नियमांचा अभ्यास करण्यांत विचार करितो व श्रम घेतो; शाब्बाथ दिवशीं तीन जेवणें जेवितो;[2] शाब्बाथ दिवसाकरितां सरळपणें सात धन्यवाद रचितो;[3] शाब्बाथ दिवशीं ईश्वरी नामाकरितां गीतें गातो, कीर्त्तन करितो व स्तुति करितो; शाब्बाथ दिवशीं तुझ्या नामाचें स्तवन करण्याची आवड धरितो; शाब्बाथ दिवशीं आपली स्वतांची इच्छा पूर्ण करण्याचें नाकारितो;[4] शाब्बाथ दिवस न विटाळण्याविषयीं नेहेमीं सूचना करीत असतो; शाब्बाथाकरितां मोठा जुलूम सोशितो;[5] शाब्बाथ दिवशीं शाब्बाथ दिवसासाठीं गायनार्थ जें गीत[6] तें गातो; शाब्बाथ पाळला जावा ह्मणून आपला हात उदारपणें उघडितो; शाब्बाथ दिवशीं शोक व रडणें दूर करितो; शाब्बाथ दिवशीं व्यापार करण्यापासून आपला हात आटोपून धरितो; शाब्बाथ दिवशीं लेखी शास्त्राचें व पाठशास्त्राचें मनन करितो; शाब्बाथास पवित्र मानण्यांत आनंद मानितो, तर ज्या जगीं सर्वदा शाब्बाथ असणार त्याचें वतन त्यास सर्वदा दे.

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אל נערץ हे पवित्रांच्या मंडळीमध्यें अति सन्मानिलेल्या देवा ! आह्मी तुजकरितां शाब्बाथ दिवसासाठीं गायनार्थ जें गीत तें गातों. तूं ओठांचे शब्द उत्पन्न करितोस व आपला प्रकाश गुप्त छत्राखालीं

---

१. इस्राएल, अनुवाद अ. ३२ ओ. १० एथें त्याविषयीं असें ह्मटलें आहे. २. टीका ३४. ३ टीका ३५. ४ टीका ३६. ५ इ. भारी जोकड वाहतो. ६ गीत ९२ व ९३.

लपवितोस ह्मणून हे परमेश्वरा, तुला स्तवणें व हे परात्परा, तुझ्या नामाला गाणें उत्तम आहे. हे थोर व परम स्तुत्य देवा, हे खडकरूप आश्रया व भयंकर कृत्यें करणाऱ्या, सकाळीं तुझी दया व रात्रीं तुझी सत्यता प्रगट करणेंहि (उत्तम आहे). हे यथार्थ वचनें बोलणाऱ्या व सरळ गोष्टी कळविणाऱ्या, तूं नीकानोराच्या दरवाज्यांमध्यें व दशतंत्र वाद्य व सतार व उंच स्वराचा वीणा वाजवितांना स्तवीला जात असस. हे परमेश्वरा, तुझा मार्ग मला शिकीव; ह्मणजे तुझी यथार्थता मी गाजवीन; त्वां आपल्या कार्यांकडून मला हर्षित केलें आहे, ह्मणून मी तुझ्या हाताच्या कामाविषयीं उत्सव करीन. हे परमेश्वरा, मी तुजकडे प्रार्थना करितों, कारण तुझीं गुह्यें फारच वाढलीं; हे परमेश्वरा, तुझीं कर्में किती थोर आहेत! आणि तुझे विचार फार खोल आहेत. हे परमेश्वरा, तूं आपली दया आठीव, कारण तुजवांचून आणखी कोणीच नाहीं; ऊठ आह्मांस सहाय हो, आणि तुझ्या दयेकरितां आह्मांस उद्धर. आह्मांवर कृपा कर, कारण शत्रूनें आह्मांस खाल्लें आहे; हे परमेश्वरा, तुझी दया आह्मांस दाखीव, आणि तुझें तारण आह्मांस दे. माझे विचार मला सांगतात कीं, परमेश्वर सर्वांस चांगला आहे. हे परमेश्वरा, माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या मनांतलें ध्यान तुजपुढें मान्य होवो.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

ביום שבת קדש पवित्र शाब्बाथ दिवशीं तुझ्या संपत्ति मानलेल्या लोकांस विश्रांतिस्थानाकडे व वतनाकडे परतीव. पवित्र शाब्बाथ दिवशीं, हे परमेश्वरा, तूं आपल्या विसाव्याच्या स्थलीं प्रतिष्ठित हो, तूं व तुझा प्रतापी कोशहि, हें तुझ्या भविष्यवाद्याचें ह्मणणें[१] स्थापित कर. पवित्र शाब्बाथ दिवशीं विखरलेल्या व हांकून लावलेल्या समाजास तूं उत्तर दे; परमेश्वर करो, तुह्मांस विश्रांति मिळो. पवित्र शाब्बाथ दिवशीं[२] तुझ्या लोकांस विश्रांति मिळूं दे; ह्मणजे ज्यांची शक्ति थकली आहे त्यांस (त्या दिवशीं) विसावा मिळेल. पवित्र शाब्बाथ दिवशीं शत्रूस व पाठलाग करणारास हाक मारून सांग कीं, हाच विसावा आहे, दमलेल्यांस

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका ४. २. गीत१३२ ओ. ८.

विसावा घेऊं द्या. पवित्र शाब्बाथ दिवशीं जो खडकरूप आश्रय, खंडून घेणारा व उद्धरणारा, यास मी धन्य ह्मणेन, ज्यानें आपल्या इस्राएल लोकांस विसावा दिला आहे, त्या परमेश्वराची स्तुति असो.

(हे देवा,) आतां आह्मांस तार!

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंति करितों

आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא חיש נא ישעי मी विनंती करितों कीं, या सातव्या दिवशीं माझें तारण त्वरित होऊं दे, आणि माझी प्रार्थना तव्यांतल्या अर्पणासारखी मान्य कर; आणि शाब्बाथ दिवसाची आठवण कर व त्यास जप, या आज्ञा पाळणारे जे शाब्बाथ दिवसासाठीं गायनार्थ जें गीत तें गातात, त्यांजवर दया करून आतां आह्मांस तार. मी विनंती करितों कीं, हे सातव्या दिवसास प्रत्येक सप्तकीं फेरीनें आणणाऱ्या, तुझा चांगुलपणा मजकडे वाहूं दे, आणि कधींच भंगणार नाहीं अशा नियमानें माझा प्याला (पूर्ण) भरलेला राख, आणि तुझा पवित्र विखरलेला लोक, जो तुजला या शाब्बाथ दिवशीं नृत्यानें थोर मानितो, त्यास अशुद्धांमधून काढून आतां आह्मांस तार.

(हे देवा,) आह्मी विनंति करितों आतां आह्मांस तार!

אני והו हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो.वे.)

כהושעת יוצאי פתרום ज्याप्रमाणें त्वां पथरोसांतून[1] निघणारांस तारिलें, आणि जे तुजला शुद्ध वचनाचीं गीतें गातात व कीर्त्तनें करितात, त्यांकरितां त्वां जुलुमगारास चेंचरलें व मोठ्या राजांचा समूळ नाश केला, त्याप्रमाणें **आतां आह्मी या शाब्बाथ दिवशीं तुजला स्तवीत असतां आह्मांस तार.** ज्याप्रमाणें त्वां मिसरांतून घालविलेल्यांस[2] तारिलें व त्यांस आपली संपत्ति असें मानिलें, आणि आपल्या प्रियकरांमध्यें (साक्षात्) वास करून त्यांस संभाळलें व डोळ्यांच्या बाहुलीप्रमाणें रक्षिलें, त्यांप्रमाणें जे आह्मी तुजपुढें प्रार्थना व विनवणी करितांना गीतें व मधुर गायनें गातों त्यांस, **आतां आह्मी या शाब्बाथ दिवशीं तुजला स्तवीत असतां आह्मांस तार.**

---

१ मिसरांतून. २ निर्गम अ० १२ ओ० ३३.

באנו ליחד שם האל आह्मी आज देवाच्या नामाचें एकत्व सुवंदनानें व स्तवनानें मान्य करायास आलों आहों, कारण आज आ-मच्यानें चार प्रकारच्या पदार्थांनीं[१] त्याची स्तुति करवत नाहीं. हे आमच्या खडकरूप आश्रया, खंडून घेणाऱ्या व उद्धारणाऱ्या आह्मांस काढून मुक्ततेंत ने; **ईश्वर करो आणि तुह्मांसहि विश्रांती मिळो.** हा पवित्र भयंकर व सर्व दिवसांपेक्षां सन्माननीय दिवस त्यानें आपल्या पवित्र लो-कांस वतनरूप दिला; अशाकरितां कीं, त्यांच्या लोकांस दोन्ही जगांचें[२] सुख प्राप्त व्हावें, आणि त्यानें ही पृथ्वी पाण्यावर विस्तारल्यानंतर या दि-वशीं तो आपल्या कामापासून स्वस्थ राहिला, अशासाठीं कीं त्याच्या लोकांस (या दिवशीं) हर्ष व त्यांच्या जीवास आनंद व्हावा.

כהושעת מאז ערתך ज्याप्रमाणें पूर्वीं त्वां आपल्या मंडळीस तारिलें त्याप्रमाणें आतां आपल्या लोकांस तार, आणि आपलें वतन मा-नून घेतलेल्यांस आशीर्वाद दे; आणि त्याप्रमाणें आतां आह्मी या शा-ब्बाथ दिवशीं तुजला स्तवीत असतां आह्मांस तार.

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार! (दो. वे.)

यानंतर בכתוב, קדיש תתקבל, כל ישראל इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात.

सुक्कोथ व पेसाह यांच्या मधल्या दिवसांत येणाऱ्या शाब्बाथाच्या तिसऱ्या प्रहराची व शाब्बाथ समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना इतर शाब्बाथासारख्याच असतात; ए-वढेंच मात्र कीं दोन्ही प्रार्थनांतील ארני שפתי मध्यें सणाकारणें जो יעלה ויבא ह्मणायाचा तो ह्मणतात. आणि शाब्बाथ समाप्त होण्याच्या वेळच्या प्रार्थनेस आरंभ करितांना त्या वेळचीं गीतें ह्मणतात व त्यांच्या शेवटीं त्या सणाचें नेमिलेलें गीत ह्मणतात, व שובה न ह्मणतां ארך ימים इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात आणि शाब्बाथामध्यें व व्यवहारारिक दिवसामध्यें भेद दाखविण्यास इतर शाब्बाथाप्रमाणें नि. प्रा. पृ. २७८. एथें लिहिल्याप्रमाणें द्राक्षरसाच्या प्याल्यावर धन्यवाद करितात.

होशाना रब्बा

ह्मणजे

मंडपाचे सणाचा सातवा दिवस.

या दिवसाची संध्याकाळची प्रार्थना इतर मधल्या दिवसाप्रमाणें करितात, आणि

---

१ खजुरीचा गाभा, मटली, वाळुंज व महाळुंग २. या जगाचें व पुढील जगाचें.

अवघी रात्र जागरण करून अनुवाद व गीतें हीं दोन पुस्तकें आरंभापासून शेवटपर्यंत वाचितात; आणि गीतांचें पुस्तक वाचितांना मध्यें मध्यें सात वेळ सेलीहोथपुढें पाहांटेच्या प्रार्थनेंत लिहिलेल्याप्रमाणें संक्षिप्त रीतीनें करितात. पाहांटेच्या सुमारास प्रार्थनामंदिरीं पुनः सेलीहोथ करितात तो येणेंप्रमाणें:—

गीत १०३,१०४. יְהִי חסדך व गीत १४५ वाचल्यावर हीं पुढील वाक्यें वाचतात.

תפלה לדוד दावीदाकडून प्रार्थना, हे परमेश्वरा, नीति ऐक, माझ्या रडण्याचें श्रवण कर; माझ्या प्रार्थनेकडे कान दे, कां तर ती कपटओठांतून नाहीं. दावीदाकडून प्रार्थना, हे परमेश्वरा, तूं आपला कान लावून माझें ऐक; कारण कीं मी दुःखित व दुबळा आहें. देवाचा माणूस मोशे याची प्रार्थना, हे प्रभु, तूं पिढोपिढीं आमचा आश्रय आहेस. दुःखितासाठीं, प्रार्थना, जेव्हां तो बुडतो आणि परमेश्वरापुढें आपलें हार्द्र ओतितो तेव्हांची. हबाक्कुक भविष्यवाद्याची शिगयोनोथेवर प्रार्थना. हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. हे परमेश्वरा, ऐक आणि मजवर दया कर; हे परमेश्वरा, मला सहाय हो. हे परमेश्वरा, मी हाक मारितों; तूं माझा शब्द ऐक, मजवर कृपा कर आणि मला उत्तर दे. हे परमेश्वरा, माझी विनंती ऐक; परमेश्वर, माझी प्रार्थना मान्य करील; हे माझ्या लोका, मी बोलतों; हे इस्राएला, मी तुजवर साक्ष देतों, ऐक; मी देव तुझा देव आहें. अहो माझे लोक, तुह्मी ऐका; मग मी तुह्मांला साक्ष देईन; हे इस्राएला, त्वां माझें ऐकावें. कां तर त्यानें दुःखिताच्या दुःखाचा धिक्कार केला नाहीं, कंटाळा केला नाहीं, आणि त्यानें आपलें तोंड त्याच्यापुढें लपविलें नाहीं; परंतु तो त्याजवळ ओरडला, तेव्हां त्यानें ऐकलें. कां तर परमेश्वर दुबळ्याचें ऐकतो, आणि आपल्या बंदिवानाची उपेक्षा करीत नाहीं. जेव्हां मी तुझ्या जवळ ओरडतों, जेव्हां मी आपले हात तुझ्या गाभाऱ्याकडे उभारितों, तेव्हां तूं माझ्या काकुळतीची वाणी ऐक. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या ओरडण्याकडे कान दे, माझ्या अश्रुपाताविषयीं उगाच राहूं नको, कां तर मी आपल्या सर्व वडिलांसारिखा तुझ्या जवळच विदेशी प्रवासांत आहें. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आपल्या सत्यतेनें माझ्या काकुळतीकडे कान लाव; आपल्या नीतीनें मला उत्तर दे.

मी परमेश्वराला हाक मारितों, तेव्हां तो ऐकतो. हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें; हे परमेश्वरा, तूं आपलें कार्य वर्षांच्या मध्यें स्थापन कर, वर्षांच्या मध्यें विज्ञापन कर; कोपाच्या समयीं दया स्मर. हे आमच्या राजा, तूं आपणापुढून आह्मांस रिकामें परतवूं नको, कारण तूं प्रार्थनेचा ऐकणारा आहेस. हे प्रार्थनेच्या ऐकणाऱ्या, सर्व मासमय तुजकडे येतील. हे विनंति ऐकणाऱ्या, सर्व प्राणी तुजकडे येतील. तुजकडे सर्व प्राणी व जीव येतील. प्राण हा तुझा, व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून तूं आपल्या हस्तकर्मावर दया कर. हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून हे परमेश्वरा, तूं आपल्या नामाकरितां कार्य कर. हे परमेश्वरा, आमच्या देवा तुझ्या नांवानें आह्मी ह्मटलों गेलों आणि तुझें नाम आह्मांमध्यें गाजविलें जातें ह्मणून हे परमेश्वरा, आमच्या देवा आह्मांस सोडूं नको. मी परमेश्वराला धन्य ह्मणेन; कां तर तो मला बोधितो, रात्रीं माझीं गुर्दकमळेंहि मला बोध करितात. त्वां माझ्या अंतःकरणाची परीक्षा केली, रात्रीं चौकशी केली, तूं मला गाळिलें तरी तुला कांहीं सांपडणार नाहीं. म्यां नेम केला आहे, माझ्या तोंडानें उल्लंघन होणार नाहीं. दिवसा परमेश्वर आपली दया प्रगट करील, आणि रात्रीं त्याचें गायन मजकडून होईल; माझ्या जीवाच्या देवाची प्रार्थना मजकडून होईल. सकाळीं तुझी दया व रात्रींच्या रात्रीं तुझी सत्यता प्रगट करणें (बरें आहे). माझा न्याय तुजपुढून प्रगट व्हावा; जीं नीट तीं तुझ्या डोळ्यानें पाहावीं. परंतु मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे, हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेनें आपल्या तारणाच्या सत्यतेनें मला उत्तर दे. हे प्रभु ऐक, हे प्रभु, क्षमा कर; हे प्रभु कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं, तुझ्या नगराला आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मांला तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

यानंतर सेलीहोथ करितात तो येणेंप्रमाणें—

שמע ישראל, ויעבור, רחמנא ארכר לן, ויעבור पासून מיוחד च्या शेवटपर्यंत.
(कोणी אחד אלהינו हा भाग בשמך לא קראו पर्यंत वाचितात कोणी वाचीत नाहींं.)

יי חננו, עננו אלהי אברהם, עננו אבינו, ויעבור, या भागांत וכתבנו या शब्दाबद्दल וחתמנו ह्मणजे आह्मांविषयीं मोहोर कर असें ह्मणावें. יי עשה למען שמך, אלהינו, לקדושת שמך, ויעבור, עשה למען אברהם, עשה למען שמך, ויעבור, אל ארך אפים, אבינו אב הרחמן, ויעבור, דעני לעניי, שבשמים, קדיש תתקבל, שומר ישראל,

हा वरील קריש वाचितांना त्यांतील תתקבל हा भाग वाचण्यापूर्वीं हें पुढील वाचितात.

תענו ותעתרו आकाशांतून (दयेनें) तुह्मांस उत्तर मिळो व तुमचें ऐकलें जावो, तुमचें ओरडणें मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेनें ऐकिली जावो, आणि तुमच्या विनंतीच्या वाणीचें उत्तर मिळो; आणि परमेश्वर आमचा देव आह्मांस व आमच्या सर्व इस्राएल बांधवांस, जेथें जेथें ते राहत असतील त्या त्या ठिकाणीं प्रकाशाचा, आशीर्वादाचा, आनंदाचा, हर्षाचा, गौरवाचा व महत्वाचा, चांगल्या मंडळीचा, कीर्त्तनाचा, चांगल्या जीवनाचा, चांगुलपणाचा, तारणाचा, अन्नाच्या पुरवठ्याचा, शास्त्राचा अभ्यास त्याच्या नामानें करण्याचा, उपजीवनाचा, शांतवनाचा, शास्त्राच्या रहस्याचा, खंडणीचा, न्यायत्वाचा, निर्भयपणाचा, पूर्ण आरोग्यतेचा, कल्याणाचा, शास्त्राचा, प्रार्थनेचा, तारणाचा व प्रायश्चित्ताचा दरवाजा उघडो. आणि तुह्मांमधून सर्वप्रकारचा हेवा, द्वेष व वाद तो दूर करो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, तुमच्या पूर्वजांचा देव, यानें तुह्मी जितके आहां, त्यापेक्षां हजार पट अधिक करावें; आणि जसें त्यानें तुह्मांस वचन दिलेंहें आहे, तसा तुह्मांस आशीर्वाद द्यावा'' हें तुह्मांमध्यें स्थापित होवो, आणि तुह्मांविषयीं तो चांगल्या जीवनांचा पुस्तकां मोहर करो. आणि अशी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु ह्मणूं.

गीत १२२ שיר המעלות לדוד שמחתי वाचल्यानंतर पूर्ण קריש תתקבל आणि קריש יהא שלמא ह्मटल्यावर हा सेलीहोथ समाप्त होतो.

होशाना रब्बाची पाहांटेची प्रार्थना.

ही प्रार्थना इतर मधल्या व्यावहारिक दिवसांच्या प्रार्थनेसारिखीच असते, परंतु प्रार्थनेस आरंभ करितांना יי מלך ह्मणण्यापूर्वीं יי הוא האלהים ह्मणतात. आणि हाज्जान उभा राहिल्यावर ישתבח שמך च्या अगोदर कोठें कोठें נשמת כל חי हा भाग वाचितात एवढेंच मात्र. परंतु या दिवसाच्या होशानाचा भाग मोठा आहे, ह्मणून या दिवसास (होशाना रब्बा) मोठा होशाना ह्मणतात.

होशानारब्बाचा होशाना.

आब्राहामाच्या नामाची पहिली प्रदक्षिणा.

ארחץ मी आपले हात निर्दोषतेंत धुईन, तेव्हां हे परमेश्वरा, तुझ्या वेदीभोंवता मी प्रदक्षिणा घालीन. स्तुतीच्या शब्दानें प्रसिद्ध करायास आणि तुझीं सर्व आश्चर्यकर्में सांगायास.

येथें पहिल्या दिवसाप्रमाणें הושענא למענך व पुन: הושענא बोलून प्रदक्षिणा घालतांना हें पुढील ह्मणावें.

אנא אל אחד पृष्ठ २८.

या वरील भागांत "आह्मी हा एक दिवस सण करीत असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही एक वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तर द्यावें.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

יה איום हे अनंता, भयंकर देवा, तूं आपल्या सात पूर्ण भक्तांबरोबर[1] केलेला करार आज आठीव; आमचा मूळ पुरुष[2], जो शास्त्रांतील नियमांच्या तुझ्या आज्ञांप्रमाणें वर्तला त्यासीं केलेला करार (आठीव); हे दयाळू बापा, तूं आपल्या दयेनें आमच्या उद्धाराचा वेळ जवळ आण; **हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

सर्व पदार्थ घडणाऱ्या व सर्व गोष्टी करूं शकणाऱ्या! तुझ्या शोधणाऱ्यांसी तूं प्रगट हो; तुझे दरवाजे ठोकणाऱ्या लोकांस ते आब्राहामाच्या पुण्याची व तुझ्या भक्तांच्या यथार्थपणाची आठवण देत असतां, तूं त्यांस सांपड व त्यांस प्रसन्न हो; जेव्हां ते आपल्या लुलाबासहित तुला शोधायास तुजकडे येतात, तेव्हां तूं त्यांचें वचन मान्य कर.

רחמנא אדכר לן हे दयावंता, प्रियकर आब्राहामाबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בריל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां.[3]

हे दयावंता, तुझा उजवा हात उभारून आपलें तारण उगीव.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

---

१ आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, पिनहास व दावीद. २ आब्राहाम. ३ हें उत्तर देतेवेळीं कोणी אמן तथास्तु असें ह्मणतात.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड.

हे दयावंता, आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामे परतवूं नको.

ויעבור, बहुत करून हें ह्मणत नाहीं.

תודיעני אורח חיים जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें आणि परमेश्वर राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, या आमच्या दीर्घ दासत्वांत तूं आमचा नाश करूं नको.

हे आमच्या आकाशांतील देवा, जे आमच्या वाईटावर उठतात, त्या सर्वांचा नाश कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו אלהי אברהם हे आब्राहामाच्या देवा, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו ײ हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आज आह्मांवर पडूं दे.

ײ עשה למען हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पूर्ण लोकांचा मूळपुरुष (आब्राहाम) याकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारिले गेले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

דעני לאברהם ज्यानें आब्राहामास मोरिया डोंगरावर उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

कोणी हें वाक्य ह्मणतात.

כי אמרתי कारण मी ह्मणालों, दया सर्वकाळ रचिली आहे, तूं आपली सत्यता आकाशांतच स्थापशील. תודיעני.

इसहाकाच्या नामाची दुसरी प्रदक्षिणा.

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אנא אל אחר पृष्ठ ३२.

या वरील भागांत "आह्मी हा दोन दिवस सण करित असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही दुसऱ्या वेळीं प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तरें द्यावें.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

ברית נפקד जो नेमिलेला (तुझा दास[1]) तुजपुढें अर्पिला जाण्यास बांधला गेला; आणि शेरडाप्रमाणें बांधला जाऊन तुझ्या दिसण्यांत जे वागले ते सोसण्यास मान्य झाला, त्याचा करार तूं आठीव. त्याच्या कोंबास प्रसन्न होऊन त्याचें संतान ज्या वेळीं तुजपुढें येतें, त्या वेळीं तूं त्याजवर दया कर. जरी त्याचें ऋण त्यांविरुद्ध साक्ष देत असलें तरी आह्मी विनंती करितों कीं, तूं आपल्या नामांकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.

ज्याचे पुण्यावरून आकाशांत सामर्थ्याच्या गुणाची मोहोर झाली आहे, त्या इसहाकाचें पुण्य, हे माझ्या देवा, माझ्या उद्धाराच्या खडकरूप आश्रया, जे लोक तुजकडून सहाय मागतात त्यांकरितां आठीव; त्याचें बांधलें जाणें व त्याचें पुण्य तुझ्या नामानें ह्मटले गेलेल्या लोकांवर विस्तार; हे सामर्थ्यानें वेष्टिलेल्या देवा, त्यांविषयीं उदारपणें कल्याणाची मोहोर कर; तुझ्या वतन मानिलेल्या व संपत्तिरूप लोकांवरून तुझी दया संपवूं देऊं नको.

רחמנא אדכר לן हे दयावंता, बंधन पावलेल्या इसहाकबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בריל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, लज्जित तोंडानें आह्मी तुला हाक मारायास आलों आहों; ह्मणून आह्मांवर दया कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

---

१. इसहाक.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थींच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्ष-सामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड.

हे दयावंता, आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामे परतवूं नको.

ויעבור

תוריעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या कराराची आठवण कर, आणि आह्मांस विसरूं नको.

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थींच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीव-नाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו ופחד יצחק हे इसहाकाच्या भयपात्रा, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו " हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, कृपा करून तारणाच्या दिवसाचें शुभवर्तमान आह्मांस ऐकीव.

עשה למען " हे परमेश्वरा, तूं आपल्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या खांबांशीं बांधला गेलेला इसहाक याकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारिले गेले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

רעני ליצחק ज्यानें इसहाकास स्थंडिलावर उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

कोणी हें वाक्यहि ह्मणतात.

לך זרוע तुला पराक्रमी भुज आहे, तुझा हात बळकट, तुझा उजवा हात उंच आहे. תודיעני.

याकोबाच्या नामाची तिसरी प्रदक्षिणा.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא האל הנקרש पृष्ठ ३७.

या वरील भागांत "आह्मी हा तीन दिवस सण करीत असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही तिसऱ्या वेळीं प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तर द्यावें.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

לְמוֹרָךְ ज्यास तूं इस्राएल (या नांवानें) ह्मटलेंस, तो तुझा शिष्य व प्रियकर, जो स्वप्नांत आकाशामध्यें शिडी पाहून भ्याला, आणि हे एकच देवा, तुजला भिऊन "ही जागा किती भयंकर" असें ह्मणाला, त्याचें पुण्य व त्याची प्रार्थना ज्या उरलेल्या व दूर केलेल्या शेषानें एवढीं वर्षें तुझें भय बाळगलें, त्याकरितां आठीव; **हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

जो भावाकडून गुंतला व त्रास पावला व ज्यावर गौरवाच्या गुणाची मोहोर झाली, त्याची आठवण कर. सत्याचा गुण हा खरोखर त्यास वतन व मुगुट असा होता, त्याचें गौरव व त्याचा सरळपणा हीं सदा त्यासीं जडलेलीं होतीं; त्याची प्रतिमा व त्याचा आकार हीं मुगुटावर कोरलेलीं आहेत; त्याच मनुष्यावर तुझ्या नामाची मोहोर होऊन त्यासच तूं आपल्या दयेच्या आसनावर ठेविलें आहेस.

רחמנא אדכר לן हे दयावंता, पूर्ण याकोबाबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בדיל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या तेरा गुणांकरितां.

हे दयावंता, तुझें सामर्थ्य आह्मांमध्यें प्रगट कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड.

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामें परतवूं नको.

---

१. याकोब.

ויעבור

תודיעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे, तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें, व परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगले निवाडे कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या राज्याचें वैभव आह्मांमध्यें लवकर प्रगट कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו אביר יעקב हे याकोबाच्या समर्थ देवा, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו '' हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पूर आह्मांवर येऊं दे.

עשה למען '' हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, आकाशांतून शिडीवरून उत्तर मिळालेल्या याकोबाकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारले गेले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

דעני ליעקב ज्यानें याकोबास बेथएलांत उत्तर दिलें तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढोपिढी झालेल्या सात्विकास व सरळांत उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

कोणी हें पुढील वाक्यहि ह्मणतात.

תתן אמת तूं याकोबासाठीं सत्यता व आब्राहामासाठीं करुणा साधशील, जीविषयीं तूं आमच्या पूर्वजांशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहिलीस ती. תוריענו.

मोशेचे नामाची चौथी प्रदक्षिणा.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא הבורא עולמו पृष्ठ ४०.

या वरील भागांत "आह्मी हा चार दिवस सण करीत असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही चौथ्या वेळीं प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तर द्यावें.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

זכות משה मोशे, ज्यावर यथार्थतेच्या गुणाची मोहोर झाली, त्याचें पुण्य विसरूं नको; त्याच्या पुण्यानें व नम्रतेनें आह्मी आपल्या शत्रूंस जिंकूं, आणि मोर डोंगरावर आह्मी गीतें व स्तोत्रें गाऊं. हे अना-

यंत देवा, तुला उंचावणाऱ्या लोकांवर सर्वकाळ दया कर. **हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

तो नम्र मनुष्य सीनाय डोंगरावर पूर्ण सुंदर शास्त्राचें वतन पावला, हें पवित्र व निर्दोष शास्त्र आकाशवस्तींतून मिळावें ह्मणून चाळीस दिवस तो, भयंकर जो परमेश्वर देव याजबरोबर राहिला; तेव्हां त्याच्या देवानें सत्य शास्त्र आपल्या सत्यवंत लोकांस वतन करून दिल्हें. तर आह्मी विनंती करितों कीं, त्याचा सात्विकपणा व त्याचें शास्त्र आपल्या आकाशांतून आठीव.

רחמנא ארכר לן हे दयावंता, मोशे भविष्यवाद्यांबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בריל ויעבור पारजातान कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, आमचें न्यायत्व प्रकाशांत आण.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेकरितां आकाश उघड.

हे दयावंता, आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामें परतवूं नको.

ויעבור.

תוריעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच देव आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे; परमेश्वरानें राज्य केलें, व परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी तुझा शोध करीत असतां आह्मांस सांपड.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांवर उठणाऱ्यांपासून आमच्या रक्ताची झडती घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माविषयीं सात्विकांच्या व यथार्थीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו העונה בעת רצון हे प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו ״ हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, कृपा करून तुझी दया आह्मांपुढें येऊं दे.

עשה למען ״ हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या सर्व घरांत जो विश्वासू मोशे त्याकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारले गेले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

רעני למשה ज्यानें मोशे व आमचे पूर्वज यांस सूफ समुद्राजवळ उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढापिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिल्हें, तो आह्मांस उत्तर देवो.

(कोणी हें पुढील वाक्यहि ह्मणतात.)

ארונינו " हे परमेश्वरा, आमच्या प्रभु, सर्व जगांत तुझें नाम केवढें थोर आहे? त्वां आपलें वैभव आकाशावरतीं ठेवलें आहे. תורייענו.

आहारोनाच्या नामाची पांचवी प्रदक्षिणा.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא המיהר पृष्ठ ४३.

या वरील भागांत "आह्मी हा पांच दिवस सण करित असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही पांचव्या वेळीं प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तर द्यावें.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

בזכות אהרן आहारोनाच्या पुण्यानें तुझे लोक होशाना ह्मणतांना आनंदानें गायन करितात; याजकपणाचा कारभार चालविण्याकरितां जो शोभायमान फेंटा तो बांधीत असे, त्यावरून त्याजवर सन्मानाची मोहोर झाली होती; तुझ्या नामाचें खऱ्या रीतीनें गौरव करण्याकरितां तो सुंदर वस्त्रें पांघरीत असे. हे उंच आकाशीं वास करणाऱ्या, त्याचें वैभव दुःखी लोकांस दाखीव; त्याच्या पुण्याकरितां व त्याच्या प्रार्थनेकरितां, तुझा राग सोसणाऱ्या लोकांस तार; हे **परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

तुझ्या अगदीं समक्ष पवित्र पूजन करण्याकरितां तो पवित्र वस्त्रें पांघरीत **असे,** आणि तीं पांघरून जेव्हां तो तेथें तुजपुढें पूजन करायास आंत जात **असे,** तेव्हां तो देवदूतासारिखा पवित्र असे. तो आपल्या **अर्पणांकडून व होमांकडून** माझ्या पापांचें प्रायश्चित्त करीत असे; त्याची

प्रार्थना व त्याची विनंती विश्वासू लोकांकरितां आज आठीव, आणि तुझ्या पादासनाच्या पवित्र मंदिरामध्यें त्यांस वसीव व विश्रांति दे.

רחמנא ארכר לן हे दयावंता, आहारोन याजकाबरोबर केलेले कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בריל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, तुझें गौरव आह्मांवर ठेव.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड.

हे दयावंता, आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामें परतवूं नको.

ויעבור.

תודיעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्त्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्व काळ राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, आज व प्रतिदिवशीं आमची विनंती मान्य कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו העונה בעת צרה हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

יי חננו हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करूल जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, आमच्या आरंभापेक्षां आमचा शेवट अधिक चांगला होऊं दे.

יי עשה למען हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या उरीम व थुम्मीमानें याजकपणा चालविणाऱ्या आहारोनाकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारले गेले व जळाले गेले त्यांकरितां असें कर.

דעני לאהרן ज्यानें आहारोनास धूप दाखवितांना उत्तर दिल्हें तो आह्मांस देवो.

ज्यानें पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिलें तो आह्मांस उत्तर देवो.

(कोणी हें पुढील वाक्यहि ह्मणतात.)

" צדיק " परमेश्वर आपल्या सर्व मार्गांत न्यायी व आपल्या सर्व कर्मांत दयाळू आहे. તોરીયાની

योसेफ व पिनहास यांच्या नांवांची सहावी प्रदक्षिणा.

रात्रीं जागरणांत गीतांचें पुस्तक वाचतांना जे सात सेलीहोथ करितात, ते आब्राहाम, इसहाक, याकोब, योसेफ, मोशे, आहारोन व दावीद अशा अनुक्रमानें व संक्षिप्तांत करितात.

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

אנא הבורא עולמו पृष्ठ ४६.

या वरील भागांत "आह्मी हा सहा दिवस सण करित असतां आह्मांस तार" असें उत्तर देण्याबद्दल "आह्मी ही सहाव्या वेळीं प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार" असें उत्तर द्यावें-

(हे देवा,) आतां आह्मांस तार! (दो. वे.)

זכות נשמר जो दुष्कर्मापासून रक्षिला गेला[१], आणि ज्यानें आपला करार[२] सांभाळला, त्याच्या पुण्यावर जगाच्या पायाच्या गुणाची मोहोर झाली आहे, त्याचें पुण्य (आह्मांकरितां आठीव). राज्यपदास चढण्याची व राज्यकारभार चालविण्याची योग्यता त्याच्या अंगीं होती, सर्व गुह्य गोष्टी त्याजला प्रगट होत्या; त्याच्या पुण्यावरून त्याच्या लोकांस मोहोर करून ठेवलेला वेळ प्रगट कर, दुष्टांचा पाठलाग कर, त्यांस उडवून टाक व हांकून लाव. हे आकाशाच्या पटांगणावर आरूढ होणाऱ्या, जे तुला आज उंचावितात त्यांकरितां त्याच्या पूर्वजांच्या पुण्याची आठवण कर; **हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

योसेफाच्या पुण्याकरितां तूं आपल्या वतन मानिलेल्या लोकांस आपल्या पवित्र मंदिरीं एकवट कर; हे जीवंत देवा, तूं आपल्या पवित्र मानिलेल्या लोकांच्या प्रार्थनेस माझ्या सुवासाच्या अर्पणाप्रमाणें प्रसन्न हो; त्याचा करार व त्याचें पुण्य तुझ्या हांकून लावलेल्या लोकांकरितां आठीव.

---

१. योसेफ. २. सुंतेचा करार.

त्यांजवर हर्षाची व आनंदाची मोहोर कर आणि त्यांस तुझ्या कुरणांत एकवट कर. आह्मी विनंती करितों कीं, तूं त्याच्या पुण्याकरितां आपल्या लोकांस तार व त्यांजवर दया कर.

(हें पुढील पिनहासावर रचलेलें गीतहि ह्मणतात.)

זכות פינחס सात्विकपणाच्या गुणाचे जे पृथ्वीच्या पायासारिखे देवभक्त यांच्या कुळांत जन्मलेल्या पिनहासाच्या पुण्याची (आह्मांकरितां आठवण कर;) त्यानें कराराचा आवेश धरून जगत्स्वामी जो सर्व गुह्य गोष्टी न्यायांत आणणारा, याजबरोबर जेव्हां न्याय त्यानें केला, तेव्हां शत्रूचें काम बंद पडलें; त्याची स्थापना वरील जगीं झाली आहे. तेथेंहि तो शांतीचा करार, सर्वकाळचें जीवन व परंपराचा याजकपणा अनुभवित आहे; त्याच्या पुण्याकरितां तुझ्या उजव्या हाताकडून तारण होण्याचा वेळ त्याच्या समाजासाठीं जवळ आण; हे **परमेश्वरा, तुझ्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

त्या आवेश धरणाराच्या पुण्याकरितां तुझ्या पवित्र लोकांच्या आरोळीस उत्तर दे, हे जीवंत देवा, माझ्या प्रार्थनारूप सुगंधास तुझ्या अग्नीनें करायाच्या माझ्या अन्नार्पणाबद्दल मान्य कर, मग विखरलेलीं शेरडें, जो भयास योग्य, त्यापुढें अर्पण आणितील. त्यांजवर हर्षाची व आनंदाची मोहर कर; आणि त्यांस तुझ्या कुरणांत एकवट कर. आह्मी विनंती करितों कीं, जो मळा तुझ्या उजव्या हातानें लाविला आहे, त्यास तार व त्याजवर दया कर.

רחמנא אדכר לן हे दयावंता, यथार्थ योसेफाच्या पुण्याची आह्मांसाठीं आठवण कर.

בריל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां. हे दयावंता, आवेशी पिनहासाबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

हे दयावंता, आमच्या दुष्ट कृत्यांप्रमाणें आमची फेड करूं नको.
हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.
हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

---

१. गणना अ. २५ ओ. ८ एथें सांगितलेली पटकी. २. पिनहास हाच एलीया भविष्यवादि जो अग्नीच्या रथांत बसून आकाशीं चढला त्यास, अनुलक्षून हें लिहिलें आहे.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्णलोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्ष-सामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड.

हे दयावंता, आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामे परतवूं नको.

ויעבור

תודיעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे, तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या आशेविषयीं आह्मांस लाजवूं नको.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी हाक मारितों, तूं आह्मांस उत्तर दे.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या वं भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

עננו העונה בעת צרה हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו ״ हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, आमच्या आरंभापेक्षां आमचा अंत अधिक चांगला होऊं दे.

हे परमेश्वरा, आह्मांविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे.

עשה למען ״ हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, ज्या योसेफानें बदात असतांहि तुझी आशा केली, त्याकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा शुद्ध आवेश धरणाऱ्या पिनहासाकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारले गेले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

דעני יוסף ज्यानें योसेफास बंदिशाळेंत उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें शित्तीमांत पिनहासास उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

कोणी हें पुढील वाक्यहि ह्मणतात.

כי לא לעולם कां तर मी सर्वकाळ विवाद करणार नाहीं, व सदां राग धरणार नाहीं; असें केलें तर आत्मा मजसमोरून थकून जाईल, आणि जे जीव म्यां उत्पन्न केले आहेत तेहि. תוריעני

दावीदाच्या नांवाची सातवी प्रदक्षिणा.

(हे देवा,) आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אנא המקרים आह्मी विनंती करितों कीं, जगापूर्वीं सात [1]गोष्टी करणाऱ्या, उत्पत्तीची रचना सात दिवसांत करणाऱ्या, सप्ताकाशें विस्तारणाऱ्या व सप्त पाताळें ताणणाऱ्या, **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालित असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्या बापासें[2] सात राष्ट्रांच्यों[3] देशाचें वतन देण्याविषयीं तूं भरंवसा दिलास, ज्यानें ज्ञानासाठीं घर बांधून त्याचे सात खांबें[4] आकारिले, आणि ज्यानें राजाबरोबर सात करडानें करार केलों[5], त्याची आठवण करून **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, ज्या एकुलत्याच्या [6]जन्माचें शुभवर्तमान सात परीक्षांनंतर[7] प्रगट झालें, जो सात डोंगरांमधील श्रेष्ठ डोंगरावर[8] अर्पिला गेला, आणि ज्यास पाणी सांपडल्यावरून आनंद होऊनें[9] त्यानें त्यास शिवआं[10] असें नांव दिल्हें, त्याची आठवण करून **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, जो सरळ मनुष्यें[11] आपल्या भावापुढें भूमीकडे सात वेळा नमला,[12] आणि न्यायी सात वेळ पडला तरी पुनः उठेल या लिहिण्याप्रमाणें[13] जो सात वेळा

१ टीका ३७. २ आब्राहामास. ३ अनुवाद अ. ७ ओ. १ पाहा. ४ टीका ३८. ५ उत्पत्ति अ २१ ओ २८–३१. ६. इसहाकाच्या जन्माचें. ७ आब्राहामाच्या दहा परीक्षांतील पहिल्या सात परीक्षांनंतर. वर्षप्रतिपदेची प्रार्थना टीका ८ पाहा. ८, टीका ३९. ९, उत्पत्ति अ २६. ओ ३२. १०, या इब्री शब्दाचा अर्थ सात. उत्पत्ति अ. २६ ओ. ३३ पाहा. ११ याकोब. १२ उत्पत्ति अ. ३३ ओ. ३. १३ नीति अ. २४ ओ. १६.

उठला, आणि सुकाळाच्या सात व दुष्काळाच्या सात वर्षांकडून ज्याची परीक्षा झाली,[1] त्याची आठवण करून **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, हे आह्मांस प्रत्येक सातव्या दिवशीं शाब्बाथाचे, प्रत्येक सातव्या वर्षी सुटकेच्या वर्षाचें,[2] वर्षांच्या सात सप्तकांनंतर योबेलाचें[3] वतन लावून देणाऱ्या, **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार.** आह्मी विनंती करितों कीं, हे आमची पूर्ण सुटका होण्याकरितां सात दिवस[4], प्रथम उत्पन्न अर्पायाच्या सणास सात सप्तकें[5], आणि ळूलाब, सण, मंडप व पेय अर्पण हे सात विधि[6] सात दिवस चालविण्याचा नेम लावून देणाऱ्या, **आह्मी हा सात दिवस सण करीत असतां व सात वेळ प्रदक्षिणा घालीत असतां आह्मांस तार.**

(कोठें कोठें समाजास हा पुढील आशीर्वाद देण्याची चाल आहे)

אנא האל הנראה आह्मी विनंती करितों कीं, दृष्टांतानें व दर्शनानें प्रगट होणारा देव, जो परात्पर देव, यानें जसा सर्व भविष्यवादि, सुज्ञजन व सिद्ध पुरुष यास आशीर्वाद दिला व इसहाकास[7] आशीर्वाद दिला, तसा तो या सर्व समाजास आशीर्वाद देवो. हे परमेश्वरा, माझी अरोळी तुजपुढें पोंचो; हे परमेश्वरा, तुजपुढें माझे तोंडांतील वचनें व माझ्या मनांतील ध्यान मान्य होवो.

זכור סגן ज्या राजानें तुजला दशतंत्र वाद्यावर व सतारेवर गाइलें, ज्या गीतांकडून व स्तोत्रांकडून सर्व जगीं तुला स्तवितात, जो तुजला अभिषिक्त झाला, तुजलाच नमला, आणि ज्यानें तुजकरितांच तुझ्या

---

१. योसेफाचे वेळीं मिसरांत झालेल्या सात सुकाळाच्या व सात दुष्काळाच्या वर्षांकडून. २, अनुवाद अ. १५ ओ. १–६ व लेवी अ. २७ ओ १–७. ३ लेवी अ. २५ ओ. ८–५५. ४ मिसरातून निघाल्यावर सात दिवसांनीं मिसरीलोक बुडाल्यावर इस्राएलांची पूर्ण सुटका झाली. ५ पेसाहच्या पहिल्या दिवसापासून शाबूओथपर्यंतचे सात सप्तक. ६. मंडपांच्या सणांतील सात विधि येणेंप्रमाणें खजूरी गाभा, मटली, वाळुज, माहाळुंग, मंडप, सण व पेय अर्पण. ७. इ. ज्याविषयीं "आह्मांस भेटायास शेतांतून येतो तो कोण?" असें ह्मटलें आहे, त्यास. उत्पत्ति अ. २४ ओ. ६५

शास्त्राचें जोकड व ओझें वाहिलें, त्याची आठवण करून तुझें वतन व तुझा वांटा असें ह्मटलेल्या घायाळ झालेल्या लोकांस उद्धर. आणि त्यांस तारण्याकरितां व त्यांस विश्रांति देण्याकरितां तूं आपल्या उंच वस्तीस्थानांतून प्रगट हो; **हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांवरील प्रसन्नतेनें आह्मांस स्मर.**

प्रिय पुरुष जो दावीद, ज्यावर तुझ्या राज्याच्या मुगुटाची मोहोर झाली, त्याच्या पुण्यानें तुझ्या वतन मानिलेल्या लोकांवर कृपा कर, व त्यांचें सांत्वन कर; त्याच्या पुण्याकरितां घायाळ झालेल्या लोकांस तुझ्या घराचें व मंदिराचें बांधलें जाणें दाखीव; आह्मी विनंती करितों कीं, तूं आकाशांतून आपल्या समाजाकरितां त्यांच्या पूर्वजांचें पुण्य आठीव; आणि तुझे सात पूर्ण भक्त यांच्या पुण्याकरितां त्यांस चालीव व त्यांस उंचाव.

हे आमच्या देवा, इश्शायचा पुत्र दावीद याचें पुण्य आह्मांकरितां आठीव; माझ्या हांकून लावलेल्यांस एकवटायास त्याच्या खुंटांतून अंकुर फुटण्याची आज्ञा कर; त्याच्या पुण्याकरितां त्यांचे विखरलेल्यांस व आमच्या बायकांस व लेंकरांस एकवट, ह्मणजे तुझ्या राज्यामध्यें तुझ्या आश्चर्यकारक गोष्टींवरून आह्मी आनंद करूं.

רחמנא אדכר לן हे दयावंता अभिषिक्त दावीद याबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

בדיל ויעבור पार जातांना कळविलेल्या तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, अभिषिक्त दावीदाबरोबर केलेल्या कराराची आह्मांसाठीं आठवण कर.

हे दयावंता, शेलोमो राजाच्या प्रार्थनेची आह्मांसाठीं आठवण कर.

हे दयावंता, आह्मांकरितां यथार्थता शोधून काढ.

हे दयावंता, तुझें वैभव आह्मांवर ओत.

हे दयावंता, आह्मांवर चांगलें योज.

हे दयावंता, आह्मांविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं दयेच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व चांगल्या भक्ष सामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर.

हे दयावंता, तुजपुढून आह्मांस रिकामे परतवूं नको.

ויעבור

תודיעני जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील, तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे, तुझ्या उजव्या हाताकडे आनंद सर्वकाळ आहेत.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दो. वे.)

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील.

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर. אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या जीवनांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सात्विकांच्या व यथार्थांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करण्याकरितां आह्मांस जवळ घे.

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे सर्व रोग बरे कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या कुटुंबाच्या संख्येप्रमाणें भाकर देत ऐस.

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची प्रार्थना तुजसमोर धुपासारिखी मानिली जावो.

עננו מגן דוד हे दावीदाच्या रक्षका, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे करूबाच्या रथावर बसणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आह्मांस उत्तर दे, आह्मांस उत्तर दे.

חננו יי हे परमेश्वरा, आह्मांवर दया करून आह्मांस स्थापित राख.

ובספר חיים आणि आह्मांविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.

हे परमेश्वरा, आज आह्मांस तूं आपल्या हृदयावर मोहोरीप्रमाणें करून ठेव.

हे परमेश्वरा, आमचा वाद व आमची लढाई तूं कर.

हे परमेश्वरा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे.

עשה למען יי हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां असें कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझीं मधुर गीतें गाणाऱ्या दावीदाकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां मंदीर बांधणाऱ्या शेलोमो राजाकरितां असें कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पवित्र नामाच्या एकत्वाकरितां जे मारले व जाळले गेले त्यांकरितां असें कर.

דעני לדוד ज्यानें दावीद व त्याचा पुत्र शेलोमा यांस यरूशालेमांत उत्तर दिल्हें, तो आह्मांस उत्तर देवो.

ज्यानें पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर दिलें, तो आह्मांस उत्तर देवो.

कोणी हें पुढीलवाक्यहि ह्मणतात.

לך יי הגדולה हे परमेश्वरा, महत्व व पराक्रम व प्रताप व जय व वैभव तुझें आहे, कां कीं आकाशांतलें व पृथ्वींतलें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य तुझें आणि तूंच सर्वांवर श्रेष्ठ असा उंचवलेला आहेस. תודיעני.

(हे देवा,) आतां आह्मांस तार !

אנא הושיעה נא (हे देवा,) आह्मी विनंती करितों आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

אנא ישר मी विनंती करितों कीं, जे लोक आज या मोठ्या होशानाच्या दिवशीं मोठ्या आवडीनें तुला स्तवायास येतात, त्यांस हे माझ्या तारणाच्या देवा, तूं नीट मार्गीं लाव, हे भयंकर व भयोत्पादक देवा, मी विनंती करितों कीं, आमच्या उद्धाराची त्वरा कर, ह्मणजे आह्मी आजच्या दिवसाप्रमाणें येरूशलेमांत सातव्या दिवशीं तुला स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

मी विनंती करितों कीं, आतां मूर्ति पुजणाऱ्या राज्याचा समूळ नाश कर, ह्मणजे या आनंदाच्या सणांत मी तुजला पोंव्यावर गाईन; माझ्या उद्धाराकडे पाहा व थोरच थोर हो, ह्मणजे पुढल्या वर्षीं येरूशलेमांत सातव्या दिवशीं तुला स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

मी विनंती करितों कीं, गायनाचें द्वार बांध, ह्मणजे तेथें आह्मी तुला गाऊं व तुजला अर्पणें आणूं; हे माझ्या विश्रांतीच्या देवा, दुरून जेव्हां तूं कण्हणाऱ्यांस एकवटशील व आपला मंडप उभारशील, तेव्हां आह्मी सातव्या दिवशीं तुला स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

मी विनंती करितों कीं, प्रसन्न होऊन ओस पडलेल्या डोंगरास उभार, तुझा बुरूज उंचाव, माझ्या तारणाचा वेळ प्रगट कर, आणि तुझ्या दुःखित लोकांस तुझा थोरपणा दाखीव, ह्मणजे ते तुजपुढें येऊन आह्मी सातव्या दिवशीं तुला स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

मी विनंती करितों कीं, (तुझ्या) प्रिय लोकांस तुझ्या चांगुलपणानें तृप्त कर, आणि त्यांजवर आपलें गौरव ठेव, ह्मणजे तुझ्या तारण पावलेल्या लोकांमध्यें मी तुझा चांगुलपणा वर्णीन; या लोकानें सीयोन भर ह्मणजे तेथें आह्मी तुला सातव्या दिवशीं विनवूं व स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

मी विनंती करितों कीं, तुझ्या सैन्यास तुझ्या (नगराच्या) भिंतींचें व कोटांचें वतन दे, त्याजवर उठणारांस भस्म कर, माझें तारण उगीव व माझी मंडळी स्थापित कर, ह्मणजे मी तुझा चांगुलपणा गाजवीन व तुझ्या नामानें गाईन; आणि आह्मी सातव्या दिवशीं तुला स्तवूं; तर आतां आह्मांस तार.

(हे देवा,) आह्मी विनंती करितों, आतां आह्मांस तार !

והו אני हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार ! (दो. वे.)

כהושעת ידידים ज्याप्रमाणें त्वां प्रियकरांस त्यांस दास करून ठेवणाऱ्यांच्या हातांतून सोडविलें, आणि मला नमविण्यास त्वरा करणाऱ्या छूदीम लोकांस घायाळ केलें; त्याप्रमाणें दुःखानें गांजलेले लोक, जे पूर्ण हृदयानें, हृदयाच्या आकाराचें माहाळुंग हातीं घेऊन तुला स्तवितात त्यांस सोडीव, **आणि या सातव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

ज्याप्रमाणें त्वां घायानें व्याकुळ झालेल्यास तारिलें व सहाय केलें, आणि मजशीं दुष्टाई करणाराचा न्याय करण्यासाठीं कमरें बांधिली, त्याप्रमाणें विखरलेला शेष, जो पाठीच्या कण्याच्या आकाराचा खजुरीचा गाभा हातीं घेऊन शास्त्राभोंवतें फिरतो, त्यास सहाय कर, **आणि या सातव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

ज्याप्रमाणें त्वां खोड्यांत पडलेल्यांस व दुःखानें कण्हणारांस तारिलें, आणि त्यांस धनानें लादलें व मला बुडवूं पाहणारास बुडविलें, त्याप्रमाणें जे लोक तूळ राशीच्या मासीं डोळ्याच्या आकाराची मटली हातीं घेऊन

१ मिसरी लोकांस. २ सरसावलास. ३ मिसरांतून निघतांना मिसरी लोकांपासून मागून घेतलेले धनानें, निर्गम अ. १२ ओ. ३५. ४ मिसरी लोकांस. ५ ज्या महिन्यांत मंडपाचा सण येतो त्या तिशरी महिन्यांत सूर्य तूळ राशींत असतो.

प्रार्थनामंदिरीं[1] शास्त्राभोंवते फिरतात त्यांस तार, **आणि या सातव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

ज्याप्रमाणें त्वां मुक्त झालेल्या लोकांस भविष्य पाहणाऱ्याच्या व रक्त शिंपडणाऱ्याच्या हातून सोडविलें, आणि मला बुडविण्याचा विचार करणारास लज्जित केलें, त्याप्रमाणें जे आपल्या मुखांचीं द्वारें उघडून ओंठाच्या आकाराचें वाळुंज हातीं घेऊन जसे केवळ झांजावरच तुझी स्तुति गातात त्यांस तार, **आणि या सातव्या दिवशीं आह्मी तुला स्तवीत असतां आह्मांस तार.**

हे अनाद्यंता, आतां आह्मांस तार!

אנא אל נא हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आतां आह्मांस तार व आतां आह्मांस सहाय हो! (दो. वे.)

אל נא אוצרך हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझ्या उत्तम धनाच्या सांठवणाचें भांडार उघड, ह्मणजे भूमि आपलें उत्पन्न देईल. **आतां आह्मांस तार व आतां आह्मांस सहाय हो.**

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझ्या उदार दंहिवराच्या थेंबानें गवत व हिरवळ यांस तृप्त कर, ह्मणजे मळणी द्राक्षांच्या तोडणीपर्यंत चालेल.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, पृथ्वीच्या उत्पन्नावर आशीर्वाद व्हावा ह्मणून आमची विनंती मान्य कर, ह्मणजे आह्मी खाऊन तृप्त झाल्यावर आणखी उरेल.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आजच्या दिवशीं तूं आपल्या शिक्यानें मोहोर करून गहूं, जव व कुरसेमे[3] यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, सुवृष्टीनें उत्तरेचा वारा वाहा-

---

१ इ. छावणींत. २ भविष्य पाहणारा ह्मणजे मोशे व रक्त शिंपडणारा ह्मणजे आहारोन. ३ हें एक प्रकारचें धान्य आहे; यास शास्त्राच्या मराठी भाषांतरांत "देव गोधूम" असें येहेजकेल अ. ४ ओ. ९ एथें ह्मटलें आहे.

वीव, आणि शिब्बोलेथ शूआलें[1] व शीफोनें[2] या धान्यास आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, प्रत्येक महिन्याचा पुरवठा तूं पुरीव, आणि तांदूळ, बाजरी, शेंगा व डाळ यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, हें वर्ष कांव्याकुव्यापासून मोकळें राख, आणि जाईत व तेलाचीं दुसरीं झाडें यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, रानांतील ओसाड पडलेलीं ठिकाणें पावसानें तृप्त कर, आणि द्राक्ष, अंजीर व डाळिंब यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझ्या मंडळीस उंचाव व लेंकरांस बाळंत्यांत वाढिव; आणि अक्रोड, खजूर व शिताफळ यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझा हात विस्तारून आकाशांतील ढगें वाढीव आणि पिस्ता, बदाम व अरमोनें[3] यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझा उदारपणा तुझ्या लोकावरून मना न होवो, हारूब, केरूसतेमाल व आफरसेकें[4] या फलांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, जी मंडळी तुझ्या सभोवतें लुलपते, तिला मुक्त कर; आणि सातूत, सार फलें व महाळुंग यांस आशीर्वाद दे.

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आकाशांतील वृष्टीनें सुकाळ गाजीव, आणि सर्व प्रकारच्या बीजास व हिरवळीस आशीर्वाद दे.

אנא אל נא हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आतां आह्मांस तार, व आतां आह्मांस सफल कर ! (दो. वे.)

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आजच्या दिवशीं तारणाच्या

---

१ या शब्दांचा अर्थ कोल्ह्याचा गेंद असा होतो, यावरून जसा कोल्ह्याचे शेपटास गेंद असतो, तसा या धान्याचा गेंद येत असावा असें अनुमान होतें. हें एक जवासारखें धान्य आहे. २ हेंहि जवासारखें धान्य आहे. ३ सफरदलासारखें आरमूत ह्मणून जें फल असतें तें हें असावें. ४ हारूब केरूसतेमाल व आफरसेक कांहीं प्रकारचीं सार फलें आहेत.

वेळेकडे तुझें पाऊल पडूं दे, आणि घाय करणाराच्या हातांतून घायाळास सोडीव आणि जी द्राक्षवेल[1] त्वां मिसरांतून[2] आणिली तीस सोडीव. **आतां आह्मांस तार व आतां आह्मांस सफल कर.**

हे देवा, तूं नोफाहूनें (त्या वेलीचा) कोंब चालविलास, तिच्या छाटलेल्या डाहाळ्या प्रफुल्लित केल्यास, आणि राष्ट्रांस घालवून ती लाविलीस.

हे देवा, तूं तिजवर कोंवळीं द्राक्षें जोरानें फुटविलींस, आपल्या सामर्थ्यानें सात राष्ट्रें हांकून तिजसाठीं त्याचा देश सिद्ध केलास, आणि तिनें आपलीं मुळें पसरून तो देश व्यापला.

हे देवा, तिच्या डाहाळ्यांवर तूंच फलें उमलविलींस, चांगुलपणें तिजला पुष्कळ शृंगारलेंस, आणि तिनें आपल्या फांद्या समुद्रापर्यंत लांबविल्या.

हे देवा, तूंच ती वेल लाविली व रक्षिली नाहीं काय? पूर्वीपासून तूंच तिला रक्षिलीस व सांभाळलीस; तर तूंच तिचीं कुंपणें कां मोडितोस?

हे देवा, पवित्रा व मोठ्या सामर्थ्याच्या, आह्मी विनंती करितों कीं, आकाशांतून लक्ष देऊन पाहा, आणि या द्राक्षवेलीचा समाचार घे.

हे देवा, उदरापासून वाहिलेल्यांस[3] तुझा चांगुलपणा आतां प्रगट कर, ह्मणजे दोन हजार वर्षें राखून ठेवलेले शास्त्राचें वतन पावणारे तुझ्या चांगुलपणानें तृप्त होतील, आणि तारणाच्या झऱ्यांतून ते पाणी काढतील.

אנא אל אנ हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आतां
आह्मांस तार व आतां आमचा उत्कर्ष होऊं दे;
कारण कीं तूं आमचा बाप आहेस! (दो. वे.)

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, ज्या आमच्या पूर्वजानें[4] पाण्याच्या प्रलयाविषयीं कुतर्क काढणाऱ्यांपुढें धैर्य धरिलें, त्वां आपल्या छायेखालीं त्यास रक्षून पाण्याच्या प्रलयांतून वांचविलें, आणि पुनः पाण्याचा प्रलय न आणण्याविषयीं त्याकरितां शपथ वाहिली, त्याक-

१ गीत ८० ओ. ९. २ मिसराहून. ३ इस्राएलांस; हें यशाया अ. ४६. ओ. ३. वरून लिहिलें आहे. ४ नोव्हानें.

रितां तूं पाणी अटकावूं नको. **आतां आह्मांस तार व आतां आमचा उत्कर्ष होऊं दे.**

हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, जो आमचा पूर्वज[1] “थोडें पाणी आणूं[2] द्या,” असें देवदूतांस ह्मणाला, हे ओंजळीत जलें मापणाऱ्या देवा, ज्यानें अविश्वासू लोकांस तुझ्या मागें ओढून आणिलें, आणि ज्यानें अग्नि व पाणी यांची पूजा करणाऱ्या परक्या लोकांचा नाश केला, त्याकरितां तूं पाणी अटकावूं नको.

हे देवा, अर्पिला जाण्याकरितां बांधला गेलेल्या ज्या पुत्रानें[3] पाण्याच्या विहिरी खणिल्या, जो गेरारांत प्रवासी असतां तेथील लोकांनीं पाण्यावरून त्यासीं वाद केला, आणि पाणी सांपडलें असें शुभवर्तमान ज्यास चाकरांकडून मिळालें, त्याकरितां तूं पाणी अटकावूं नको.

हे देवा, ज्या सरळ मनुष्यानें[4] पाण्याच्या विहिरीवरून दगड लोटला, आणि पाणी काढून लाबानाच्या शेरडांस पाजिलें, आणि ज्यानें सोललेल्या काठ्या (कळपापुढें पाण्याच्या) पन्हळांत ठेविल्या, त्याकरितां तूं पाणी अटकावूं नको.

हे देवा, जो प्रख्यात मनुष्य[5] पाण्यांतून काढलेला होता, ज्यानें तुझ्या वतन मानिलेल्या लोकांस पाण्याच्या पुरांमधून पार नेलें, ज्यानें खडक उघडिला तेव्हां त्यांतून पाणी वाहिलें, त्याकरितां तूं पाणी अटकावूं नको.

אנא אל נא רפא נא हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आतां आह्मांस निरोगी कर, क्षमा कर, तार आणि सहाय कर; कारण कीं, तूं आमचा बाप आहेस! (दो. वे.)

ज्या आमच्या पूर्वजास[6] नासलेल्या पिढीचा[7] नाश होतांना (तुझें) दर्शन झालें, ज्याची परीक्षा झाली व ज्याविषयीं “नोव्हा तर (परमेश्वराच्या) दृष्टींत कृपा पावला” असें ह्मटलें आहे, त्याकरितां जे तुजपुढें

---

१ आब्राहाम. २ उत्पत्ति अ. १८. ओ. ४. ३ इसहाकानें. ४ योकोबानें. ५ मोशे. ६ नोव्हास. ७ प्रलयाच्या वेळच्या पिढीचा. ८ उत्पत्ति अ. ६. ओ. ८.

प्रार्थना करितात[1], त्यांस स्तुति पाऊं[2] दे. **आतां आह्मांस तार आणि सहाय कर.**

ज्या विश्वासू भक्ताचा[3] दृढ विश्वास ढळला नाहीं, जो अनेक संकटांतून निभावला व ज्यानें वन लाविलें[4] त्याकरितां जे पूर्ण हाल्हेल (स्तवन) वाचून तुझी स्तुति करितात त्यांस आज सर्वसिद्ध कर.

ज्या एकुलत्यास[5] तूं आपल्या सेवेकरितां मागितलास[6], आणि हे मजला पाहणाऱ्या देवा, तूं त्यास "बेएर लाहाय रोई" एथें आशीर्वाद दिलास, त्याकरितां जे तुजपुढें ही अधिक प्रार्थना करितात, त्यांस तूं आज आवडते कर.

ज्या पृथ्वीच्या मध्यभागीं निजणारानें[7] झांकलेल्या गुह्य गोष्टीविषयीं स्वप्न पाहून त्याच्या स्वप्नांत, पाहा एक शिडी होती, त्याकरितां तुझ्या शास्त्राभोवतें सात वेळां प्रदक्षिणा घालणाऱ्या तुझ्या लोकांस आशीर्वाद दे.

ज्या पुण्यवंताच्या तोंडाचें कांतडें व डोळ्याचें तेज चमकलें, जो अतिनम्र मनुष्य मोशे, त्याकरितां जे "होशाना" असें ओरडतात, त्यांसाठीं या वर्षास आशीर्वाद दे.

ज्यानें दुष्टाई करणारांस मारिलें,[10] आणि ज्यांची फेड तूं शांतीच्या व सर्वकालच्या याजकपणाच्या करारानें[11] केलीस, त्याकरितां जुलूम करणाऱ्याचा गर्व कमी कर, आणि आह्मांस शुभवर्तमान ऐकीव.

הושיענו מושיענו हे आमच्या तारणाऱ्या, आह्मांस तार, कारण आमचे डोळे तुजकडे लागले आहेत व आमचें तारण तुजकडून होणार आहे! (दो. वे.)

हे अनादी काळापासून असणाऱ्या भयंकर व भयोत्पादक (देवा)! तुझ्या शास्त्रासभोवतें फिरणाऱ्यांस सबळ कर, आणि हें वर्ष सुखाचें

---

१ इ. सिद्ध करितात. २ इ. पांघरीव. ३ आब्राहामाचा. ४ उत्पत्ति अ. २१. ओ. ३३. ५ इसहाकास. ६ अर्पायास सांगितलास. ७ याकोबानें. ८ इ. चौथ्या भागास, हें गणना अ. २३ ओ. १० एथें याप्रमाणें ह्मटलें आहे. ९ निर्गम अ. ३४. ओ २९–३५. १० पिनहास गणना अ. २५ अ. ६–९ पाहा. ११ गणना अ. २५. ओ. १२–१३.

होऊं दे. **कारण आमचे डोळे तुजकडे लागले आहेत व आमचें तारण तुजकडून होणार आहे.**

आपला नम्र आत्मा वाहून जे तुला हाक मारितात, आणि आजच्या नेमिलेल्या दिवशीं तुझ्या शास्त्राभोंवते सात वेळ फिरतात, त्यांस उंचाव आणि हें वर्ष आशीर्वादाचें वर्ष होऊं दे.

हें वर्ष सर्व प्रकारच्या रोगांपासून राख, चांगलें उत्पन्न होई असा पर्जन्य व दंहिवर होऊं दे, आणि हें वर्ष आनंदाचें वर्ष होऊं दे.

तिरसांसारखे सुंदर लोक, जे वक्तृत्वाच्या विचारानें तुला विनवितात, त्यांकरितां तुझा दरवाजा विस्तीर्ण उघड, आणि हें वर्ष उल्लासाचें वर्ष होऊं दे.

האל למושעות हे तारणाच्या देवा, जे लोक अनेक वेळां तुजकडून तारले गेले, त्यांस आपल्या कृपेनें तार; हे परमेश्वरा ते तुझीच आशा करितात, कारण हे परमेश्वरा, तुझ्या तारणाची वाट आह्मी पाहातों; हे परमेश्वरा, मनुष्य व पशू तूंच सांभाळून राखतोस, कारण हे परमेश्वरा, तुझ्या तारणाची वाट आह्मी पाहतों. (दो. वे.)

पृथ्वी फुटो आणि ज्या लोकांस त्यांच्या प्रायश्चित्तावरून त्यांच्या उल्लंघनापासून तूं उद्धरिलेंस त्यांकरिता तारण उगवो;[२] कारण हे परमेश्वरा, तूं दीनांची इच्छा ऐकली आहेस. **कारण हे परमेश्वरा, तुझ्या तारणाची वाट आह्मी पाहतों.**

ज्या दिवशीं तूं आपल्या लोकांच्या तारणाकरितां निघालास, आणि ज्या दिवशीं "परमेश्वरानें इस्राएलास मिसऱ्यांच्या हातांतून (सोडविलें)" असें ह्मटलें गेलें, त्या दिवसाप्रमाणें भरलेल्या झऱ्यांतून तूं आपल्या लोकांस तृप्त कर.

हे खडकरूप आश्रया, संकटीं उत्तर देणाऱ्या! आतां तूं आमचें तारण हो, माझ्या उद्धाराचा (वेळ) जवळ आण, कारण तुझा हात आंखूड नाहीं. हे परमेश्वरा, पाहा, म्यां तुझ्या तारणाची उत्कंठा केली आहे.

---

१ टीका ४०. २ इ. फुलो.

बंदिशाळेंतून ओरडणाऱ्या बंदिवानांस तार, हे खडकरूप आश्रया! आश्चर्यकृत्यें करणाऱ्या! तो ओरडत असतां त्यास सांपड, भरलेला झरा उघड ह्मणजे परमेश्वराचीं झाडें रसभरित होतील.

आह्मी विनंती करितों कीं, आतां कान लावून ऐक व जे जीव फार वेळ प्रार्थना करून व ज्यांचे ओंठ "तारण परमेश्वराकडूनच होतें" असें उच्चारतांना थकले, त्यांस तार.

व्याकुळ झालेले, तुझ्या तारणाची आशा करणारे, आपलें अन्न मागणारे आणि (तुझ्या आज्ञेप्रमाणें) आज हातीं ढूलाब घेणारे, याच्या ओढण्यास प्रसन्न हो; पर्जन्य व दंहिवर तुझ्या वस्तीस्थानांतून गळूं दे, आणि परमेश्वराच्या उद्धरलेल्यास लवकर मोकळे होऊं दे.

קול מבשר **सुवार्त्तिकाची, सुवार्त्तिकाचीच वाणी ह्मणते.** (सात.वे.)

प्रमाणनेमाच्या दृष्टांतानें तो प्रदेश मी गौरवीन; मग सीयोन डोंगर हर्षेल व येहूदाच्या कन्या उल्लासतील. **सुवार्त्तिकाची इत्यादि.**

मी तुझे वासगृहाचे खांब उंचावीन आणि तुझी सीमा विस्तारीन; कारण परमेश्वर तुजला सर्वकाळचा प्रकाश होईल, आणि तुझ्या शोकाचे दिवस संपतील.

सीयोनेभोंवते फिरा, तिजभोंवते प्रदक्षिणा घाला, आणि तिचे बुरूज मोजा, जे कोणी तिजकरितां शोक करितात, त्यांनीं तिजबरोबर हर्ष करावाच करावा.

एदोमावर मी एकाएकीं जोडे फेंकीन, अहो यरूशलेमाच्या ओसाड स्थलांनो, एकत्र होऊन उत्सव करूं लागा.

माझा तारणाचा वेळ मी आपल्या आकाशांतील वस्तिस्थानांतून त्वरित आणीन, मी आपला न्याय जवळ आणिला आहे, तो दूर नाहीं.

पूर्वेकडून जागृत हो, आणि पश्चिमेकडून ये, कारण सीयोन डोंगराच्या उत्तरबाजूस महाराजाची वस्ती आहे.

सुवार्तिकाची, सुवार्तिकाचीच वाणी ह्मणते! (दो. वे.)

ככתוב מה נאוו जसें लिहिलें आहे कीं, जो सुवार्त्ता सांगतो, जो कल्याण वदतो, जो कुशळाची सुवार्त्ता सांगतो, जो तारण वदतो, जो सीयोनेला, तुझा देव राज्य करितो असें ह्मणतो, त्याचे पाय **पर्वतावर किती रमणीय आहेत.** **आणखी असें ह्मटलें आहे कीं, तुझे**

पाहरेकरी आपला शब्द उंचावतील, शब्दानें एकदांच उत्सव करतील; कारण परमेश्वर सीयोनेकडे फिरेल तेव्हां ते प्रत्यक्ष पाहतील. आणखी असें ह्मटलें आहे कीं, येरूशलेमेच्या ओसाड स्थलांनो, एकदांच उत्सव करीत सुटा; कां तर परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे; येरूशलेम त्यानें खंडून घेतली आहे. आणखी असें ह्मटलें आहे कीं, परमेश्वर सीयोनेचें शांतवन करील, आणि तिच्या सर्व ओसाड्यांचें शांतवन करील, आणि तिचें रान एदेनासारखें व तिचें जंगल परमेश्वराच्या बागासारखें करील; तिजमध्यें आनंद व हर्ष उपकार मानणें व गायनाचा शब्द हीं होतील. आणखी असें ह्मटलें आहे कीं, अहो आकाशांनो, उत्सव करा, अगे पृथ्वी, तूं उल्लास; पर्वतांनो, गायन करीत सुटा, कां कीं परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे, आणि आपल्या पीडलेल्यावर दया केली आहे. आणखी असें ह्मटलें आहे कीं, बहुत लोक जाऊन ह्मणतील, अहो या, आपण परमेश्वराच्या पर्वतांवर याकोबाच्या देवाच्या घरांत चढूं, ह्मणजे तो आपले मार्ग आह्मांस शिकवील, तेव्हां आह्मी त्याच्या वाटांत चालूं. कां कीं, सीयोनेंतून नेमशास्त्र व येरूशलेमेंतून परमेश्वराचें वचन निघेल. आणखी असें ह्मटलें आहे कीं, परमेश्वराचे उद्धरलेले उत्सवानें सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या माथ्यांवर अक्षय हर्ष होईल, ते आनंद व हर्ष पावतील, आणि शोक व कण्हणें पळून जातील. आणखी असें ह्मटलें आहे कीं, सर्व राष्ट्रांच्या देखतां परमेश्वरानें आपला पवित्र भुज उघडा केला आहे, आणि पृथ्वीच्या सर्व सीमांनीं आमच्या देवाचें तारण पाहिलें आहे. आणखी असें ह्मटलें आहे कीं, ज्या शब्दांकडून म्यां परमेश्वरापुढें विनंती केली ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याजवळ असावे, नित्याच्या गोष्टीप्रमाणें त्यानें आपल्या सेवकाचा न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय करावा ह्मणून. असें कीं परमेश्वर तोच देव दुसरा कोणी नाहीं, असें पृथ्वींतल्या सर्व लोकांनीं जाणावें.

यानंतर हाज़ान मंडळीस आशीर्वाद देऊन नवऱ्यांस आशीर्वाद देतो तो येणेंप्रमाणें:—

מי שברך ज्यानें आमचे पूर्वज आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, दावीद व शेलोमो यांस आशीर्वाद दिल्हा, तोच, कीर्ति-

मान् नवरा गौरवयुक्त, महत्ववान् व प्रतिष्ठित स्वामी (अमुक) (हाथानतोरा यास[1]) जो आमच्या देवाचे शास्त्राचें वाचन समाप्त करण्यास नेमिला आहे, (हाथान बेरेशीत यास) जो आमच्या देवाचें शास्त्राचें वाचन आरंभण्यास नेमिला आहे, यास राजांचा राजा रक्षो व जीवंत राखो आणि सर्व संकटें व उपद्रव यांपासून सोडवो, आणि देव त्याविषयीं चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत मोहोर करो, अशी त्याची प्रसन्नता होवो, आणि आपण तथास्तु ह्मणूं.

मग हाज्जान हें पुढील वाक्य उंच स्वरानें दोन वेळ ह्मणतो.

ימלך יי परमेश्वर सर्वकाळ राज्य करील, हे सीयोने, पिढ्यानपिढीं तुझा देव राज्य करील; तुह्मी परमेश्वराला स्तवा.

मग הבו לײ מזמור לדוד गीत २९ व שובה למעונך बोलून शास्त्र नेऊन ठेवितात, आणि होशाना रब्बाच्या पाहांटेचा जो सेलीहोथ त्याच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें קדיש תתקבל व त्यामध्यें תענו ותעתרו हा भागहि वाचितात आणि תענו पूर्वी תשרת תשת תרת याप्रमाणें शोफार वाजवितात. (ही शोफार वाजविण्याची चाल आलीकडे बंद पडली आहे.) यानंतर למנצח משכיל לבני קרח गीत, ४२ קדיש יהא שלמא ,קוה אל יי इत्यादि नित्याप्रमाणें वाचून प्रार्थना पूर्ण करितात.

शेमीनी आसेरेथ

ह्मणजे

आठव्या दिवसाचे सणाची सभा मिळण्याचा दिवस.

या दिवसाची संध्याकाळची प्रार्थना आरंभीं सुक्कोथच्या प्रार्थनेंत लिहिलेल्याप्रमाणें करितात. आणि सातव्या दिवसाच्या संशयामुळें या रात्रींहि मंडपांत जेवणें योग्य

---

१ सिमहाथतोरा या दिवशीं मोशेच्या शास्त्राचा शेवटला भाग, ह्मणजे अनुवाद अ. ३३ व ३४ वाचायास जो नेमिला जातो, व ज्यास हाथानतोरा ह्मणजे शास्त्राचा नवरा असें ह्मणतात त्यास. २ जो मोशेच्या शास्त्राचा पहिला भाग, ह्मणजे उत्पत्ति अ. १ पासून अ. २ ओ ३ च्या शेवटपर्यंत वाचायास नेमिला जातो व ज्यास हाथानबेरेशीथ ह्मणजे उत्पत्तीचा नवरा असें ह्मणतात त्यास. यावरून असें दिसून येतें कीं या दोन नवऱ्यांची नेमणूक सिमहाततोरा याच दिवशीं नव्हे, परंतु किप्पूरच्याहि अगोदर होत असते; कारण किप्पूरच्या संध्याकाळींहि या नवऱ्यांस यासारिखा आशीर्वाद दिला जातो.

आहे, परंतु मंडपांत לישב בסכה हा धन्यवाद करूं नये, आणि द्राक्षरसावर पवित्रीकरण करितांना त्या धन्यवादांत שהחיינו हा धन्यवादहि करावा, कारण हा निराळाच सण गणिला जातो.

पाहांटेची प्रार्थना.

या प्रार्थनेंत इतर सणाच्या दिवसांप्रमाणें कीर्तनाचा भाग वाचितात परंतु יושב בסתר वाचिल्यावर या दिवसाचें नेमिलेलें गीत למנצח על השמינית गीत १२ वाचितात. कीर्तन पूर्ण झाल्यावर प्रार्थनेस आरंभ करितांना נשמת अगोदर आव्राहाम बेन एज्रा यानें रचिलेलें हें गीत ह्मणतात.

צמאה נפשי माझा जीव ईश्वर जो जीवंत देव याकरितां तान्हेला आहे; माझें मन व माझा देह हीं जीवंत देवाला गातील. जीवंत देवानें मला उत्पन्न केलें आणि ह्मणाला कीं, माझी शपथ कीं, कोणताहि मनुष्य मला पाहून वांचत नाहीं. जें ज्ञान, जी बुद्धि व जें चातुर्य सर्व जीवंत प्राण्यांच्या दृष्टीपासून अगदीं गुप्त आहे, त्याकडून त्यानें सर्व उत्पन्न केलें. त्याचें गौरव सर्वांहून थोर आहे; सर्व मुखें त्याची स्तुति वर्णितात कीं, ज्याच्या हातीं सर्व जीवंत प्राण्यांचा जीव आहे, तो धन्य असो. जे नियम मनुष्यानें आचरावे व जगावें ते नियम शिकविण्यासाठीं त्यानें सरळांच्या[1] लेंकरांस निवडून घेतलें. धुळीच्या परमाणूच्या योग्यतेचा जो मनुष्य, यांतून सात्विक निघणार असा कोण? खरोखर तुजपुढें कोणताच जीवंत प्राणी सात्विक ठरूं शकत नाहीं. तूं घडलेल्या प्राण्यांतून श्रेष्ठ[2] याच्या मनीं जोगी सर्पाच्या विषासारखें वीष आहे. मग मुडदार मांस[3] कसें पालटेल? जर त्याची इच्छा असली तर जें घर[4] सर्व जीवंत प्राण्यांकरितां नेमिलें आहे, त्यांत निजण्याअगोदर त्यानें मागें हटून आपल्या मार्गापासून फिरावें. या सर्व गोष्टींवरून मी तुला स्तवीन, सर्व मुखें तुझें एकत्व वर्णितील, कारण तूंच आपला हात उघडून सर्व प्राण्यांची इच्छा पूर्ण करितोस. बहुत कालाची तुझी दया आठीव, गाढ झोंपेंत असणारास सजीव कर, आणि इश्शायाच्या पुत्राच्या[5] राज्याचे दिवस जवळ आण. पाहा, खऱ्या धनिणीस दासी ह्मणते कीं, तूं ह्मणतेस तें खरें नव्हे; मेलेला तो तुझा पुत्र व जीवंत तो माझा पुत्र [6]आहे. पूर्वींपासून (इस्राएल) हे

---

१ याकोबाच्या. २ मनुष्य. ३ इ. जीवंत मांस, हा संप्रदाय विपरीत लक्षणाचा आहे. ४ कबर. ५ माशीयाहाच्या. ६ टीका ४१.

तुझा वंश असे मानिलेले नव्हत काय? त्याच्या रक्ताच्या अंशांची झडती घे, आणि आपला राग जीवंत बोकडाच्या डोक्यावर ओतं. मी आपलें मुख נשמת כל חי सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य ह्मणतो, असें ह्मणून जेव्हां मी तुझी प्रार्थना करायास उभा राहातों, तेव्हां मी नमन करितों आणि तुजकडे आपले हात पसरितों.

यानंतर हाज्जान सुक्कोथच्या पाहांटेच्या प्रार्थनेंत लिहिलेल्याप्रमाणें נשמת כל חי पासून प्रार्थना चालवितो आणि הלל पूर्ण वाचून शास्त्राच्या दोन प्रति काढितो. त्यांतून एकीमध्यें अनुवाद अ. १५ ओ. १९ पासून अ. १६ ओ. १७ चे शेवटपर्यंत वाचायास पांच मनुष्यें बोलवितो. परंतु शाब्बाथ असल्यास अनुवाद अ. १४ ओ. २२ पासून अ. १६ ओ. १७ चे शेवटपर्यंत वाचायास सात मनुष्यें बोलवितो; आणि दुसऱ्या प्रतींत मफतीर गणना अ. २९ ओ. ३५ पासून अ. ३० ओ. १ च्या शेवटपर्यंत, आणि हाफतारा १ राजे अ. ८ ओ. ५४ पासून ६६ चे शेवटपर्यंत वाचितात. पुढें प्रार्थना चालून शास्त्राच्या प्रति परत नेऊन ठेवितांना सुक्कोथच्या प्रार्थनेंत पृष्ठ १८ एथें लिहिल्याप्रमाणें पावसासाठीं प्रार्थना करितात, आणि शास्त्र ठेवल्यानंतर मूसाफ करून प्रार्थना संपवितात.

शेमीनी आसेरेथची तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना सुक्कोथच्या प्रार्थनेंत सांगितल्याप्रमाणेंच करितात.

सिमहाथतोराची प्रार्थना.

या दिवसास प्रार्थनेमध्यें शेमीनी आसेरेथच ह्मणतात. परंतु पाहांटच्या प्रार्थनेमध्यें शास्त्राचा शेवटला भाग वाचून शास्त्राचें वाचन समाप्त होऊन पुनरपि त्याचे वाचनास आरंभ होतो, त्याप्रीत्यर्थ आनंद करितात, ह्मणून या दिवसास सिमहाथतोरा ह्मणजे शास्त्राचा आनंद असें ह्मणतात. ही प्रार्थना शेमीनी आसेरेथच्या संध्याकाळच्या प्रार्थनेसारिखीच असून द्राक्षरसावर שהחיינו हा धन्यवादहि करितात. प्रार्थना आटोपल्यावर शास्त्राच्या कांहीं प्रति काढून व एक तेबावर ठेऊन गायन करीत त्याभोवतें सात वेळ प्रदक्षिणा घालतात. आणि प्रत्येक प्रदक्षिणेनंतर एक एक יהי רצון ही प्रार्थना करितात. सिमहाथतोराची पाहांटेची प्रार्थना शेमीनी आसेरेथच्या प्रार्थनेसारखीच आहे, तरी शास्त्राच्या आनंदाकारणें प्रार्थनेमध्यें व शास्त्र काढतांना कांहीं गीतें गातात. या दिवशीं वाचायास शास्त्राच्या तीन प्रति काढतात. त्या काढितांना हीं पुढील गीतें ह्मणतात ह्मणजे, אתה הראת चीं दोन वाक्यें ह्मणून " יהי ह्मणण्यापूर्वींहि पुढील गीत ह्मणतात.

---

१ टीका ४२.

אל דם हे सर्व ओळखीच्या पदार्थांमध्यें थोर देवा; (परमेश्वर तोच देव आहे, त्याखेरीज दुसरा कोणी नाहीं,) असें तुह्मीं समजावें ह्मणून हें सर्व तुह्मांस दाखविलें आहे, हें वाक्य ह्मणतांना जेव्हां मी लक्ष लावून तुला हाक मारितों, तेव्हां माझी प्रार्थना ऐकली जावो. आमच्या देशीं परत जाण्याचें शुभवर्तमान आमच्या समाजास कळीव, आणि दयेनें आह्मांकडे फीर; परमेश्वर आमचा देव आह्मांबरोबर असो.

ויהי בנסוע पूर्वी हें गीत ह्मणतात.

יה השב हे अनंता, शारोनाच्या गुलाबास[1] दुर्गाकडे फिरीव, मग कोश निघतांना आहारोन गीत गाईल. येहूदाच्या अंकुरास[2] सांभाळ, त्याच्या तारणासाठीं त्वरा कर, विसरूं नको. आणि कोश निघतांना मोशे ह्मणत असे कीं, हे परमेश्वरा, ऊठ, त्या दिवसाप्रमाणें गाणारांचे पुढारी गातील. तूं आपल्या जवळच्या लोकांवर दया कर व त्यांची आठवण आपल्या मनीं राख, ह्मणजे तुझे प्रियकर उल्लासतील व तुझे शत्रु विखरले जातील; कोश निघतांना रागानें व क्रोधानें त्यांचा नाश कर. तुला लवकर कळवळा येऊं दे, आणि जे लोक तुझ्या नामाचें एकत्व मानितात, त्यांच्या तारणाची त्वरा कर, ह्मणजे कोश निघतांना त्यांची आठवण तुजपुढें चढेल.

קומה יי למנוחתך पूर्वी हें गीत ह्मणतात.

קומה יי למנוחתך हे परमेश्वरा, तूं आपल्या विसाव्याच्या स्थलीं प्रतिष्ठित हो, तूं व तुझें प्रतापी गौरवहि. जे लोक तुझे पाळायाचे सर्व विधि संभाळतात त्या सर्वांकरितां राजकीय झगा, शिरपेंच, मुगुट, विस्तारलेल्या नियमाचें अधिपत्य, गौरव व सौंदर्य हीं राखून ठेविलीं आहेत. जी मंडळी मिशमा व दूमा[3] यांच्या पाडावपणांत हांकून लाविलेली आहे, जी दारिद्र्यांत पडली आहे, व जिला तूं कडू दवणा पाजितोस[4], तिचें सामर्थ्य तुजमध्यें आहे, ह्मणून आकाश जें तुझें वस्तीस्थान तेथून तूं तिची वाणी ऐक. हे करार आठविणाऱ्या, नीचावलेल्या प्रजेस आठीव, मिसरीणीनें तिला नाडावी ह्मणून पाडावपणांत तिला लोटून नेलेली आहे,

---

१ शलोमोचें गीत अ. २ ओ १ एथें हें नाम इस्राएली समाजास दिलें आहे.
२ येहूदाचे शेषास. ३ हे इस्माएलाचे पुत्र. ४ शिक्षितोस.

तर याचे उपचार व्हावे आणि तुझ्या घरावर आशीर्वाद राहावा, ह्मणून साबणाप्रमाणें तिला शुद्ध कर.

यापुढें ויהי בנסוע הארן इत्यादि ह्मणून ज्या तीन प्रति काढितात, त्यांतील पहिल्या प्रतींत मोशेनें इस्राएलांस दिलेला आशीर्वाद ह्मणजे अनुवाद अ. ३३ वाचायास हाज्जान चार मनुष्यें बोलवितो, आणि पांचवा मनुष्य ज्यास हाथानतोरा ह्मणतात, तो पुनः हा ३३ वा अध्याय व ३४ वा अध्याय शेवटपर्यंत ह्मणजे अनुवादपुस्तकाच्या शेवटपर्यंत वाचितो, परंतु קריש לעילא ह्मणत नाहीं. दुसऱ्या प्रतींत ज्यास हाथान बेरेशीथ ह्मणतात तो, उत्पत्ति अ १ ओ १ पासून अ. २ ओ ३ च्या शेवटपर्यंत वाचितो मग हाज्जान קריש ह्मणतो. तिसऱ्या प्रतींत शेमीनी आसेरेथप्रमाणें मफतीर गणना अ. २९ ओ ३५ पासून अ. ३० ओ १ पर्यंत वाचितात; आणि हाफतारा येहोशुवा अ. १ ओ १—९ पर्यंत वाचितात. हाथानतोरा व हाथान बेरेशीत या प्रत्येकास बोलवितांना हें गीत ह्मणतात.

ישמח חתני माझा नवरा माझ्या सत्यशील मंडळीमध्यें आनंद करो; तो परमेश्वरापासून आशीर्वाद पावो. सर्वसमर्थ त्याच्या मनांतील इच्छा पूर्ण करो; तो त्याच्या सभोवतें ढाल व कवच असा असो, आणि परमेश्वराचे मार्ग पूर्ण करण्याकरितां तो त्यास प्रकाश देऊन त्याचा मार्ग सफल करो. तो त्याच्या मस्तकावर मोठाले आशीर्वाद होण्याची आज्ञा करो, आणि प्रत्येक वेळीं कल्याणाच्या नदीसारखा तो निघो, तो आपली पेंढी घेऊन उत्सवानें घरीं येवो, आणि त्याच्या अंगीं योग्यता येऊन तो परमेश्वराचें तारण पाहो.

ते प्रत्येक आपल्या जागीं जातांना हें ह्मणतात.

לך לשלום तूं आपल्या जागीं सुखरूप जा; देव तुझ्या कामास प्रसन्न असो; येतांना तूं आशीर्वादित आहेस, आणि जातांनाहि तूं आशीर्वादित आहेस.

यापुढें मंडळीस आशीर्वाद देऊन व יהי חסדך इत्यादि वाचून शास्त्र परत नेऊन ठेवितात; परंतु शेमीनी आसेरेथप्रमाणें पावसासाठीं प्रार्थना करीत नाहीं. मग मूसाफ ही प्रार्थना करून मागील रात्रीप्रमाणें शास्त्राच्या प्रति काढून व एक तेबावर ठेऊन गायन करीत त्याभोवतें प्रदक्षिणा घालितात. या दिवसाची तिसऱ्या प्रहरची व हा सण समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना सुक्कोथच्या प्रार्थनेंत सांगितल्याप्रमाणें करितात.

पेसाहाचा विधि.

नीसान ह्मणजे चैत्र महिन्याच्या चौदाव्या तारखेस आरंभ होणाऱ्या रात्रीं संध्याकाळच्या प्रार्थनेनंतर लागलेंच ह्मणजे कोणतेहि कामास आरंभ करण्याच्या जेवणाच्या किंवा शास्त्राभ्यास करण्याच्याहि अगोदर मेणवातीनें घराचें कोनाकोपऱ्यांतून व पेटीपेटाऱ्यांतून व जेथें जेथें फुगवन राहाण्याचा संभव असेल त्या त्या ठिकाणांतून फुगवन शोधून काढितात. तें शोधण्याअगोदर हा पुढील धन्यवाद करितात.

ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस आपल्या आज्ञाकडून पवित्र करणाऱ्या आणि आह्मांस फुगवन शोधून काढण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

फुगवन शोधून काढल्यावर तें निरुपयोगी ठरवून झांकून ठेवितांना हें ह्मणतात.

כל חמירא जें फुगवन माझ्या अधिकाराखालीं असतां मीं पाहिलें नसेल व काढून टाकिलें नसेल तेंहि निरुपयोगी होऊन भूमीवरील धुळीसारखें गणिलें जावो.

चौदाव्या तारखेस चार तास दिवसानंतर तें जाळून किंवा कुटून अगदीं निरुपयोगी करून हें ह्मणतात.

כל חמירא जें फुगवन माझे अधिकाराखालीं असून मीं पाहिलें असेल किंवा पाहिलें नसेल, काढून टाकिलें असेल किंवा काढून टाकिलें नसेल तेंहि निरुपयोगी होऊन भूमीवरील धुळीसारखें गणिलें जावो.

जेव्हां पेसाहास शनिवार दिवस जाऊन संध्याकाळीं आरंभ होतो, तेव्हां शाब्बाथमुळें बृहस्पतवार दिवस जाऊन संध्याकाळीं फुगवन शोधून काढितात व शाब्बाथअगोदर तें काढून टाकावें, आणि शाब्बाथाकरितां मात्र दोन जेवणांची सिद्धता करून तें एकांत ठिकाणीं ठेवावें. आणि शाब्बाथ सकाळचें जेवण आटोपल्यावर ज्या चादरेवर जेवण होतें, ती बाहेर झाडावी आणि पात्रें बोटांनीं निपटून जेथें दुसरीं फुगवनाचीं भांडीं ठेविलीं असतील तेथें तीं दृष्टीपुढून एकीकडे ठेवावीं. जेवणानंतर जर कांहीं फुगवन राहिलें, तर तें निरुपयोगी करून त्याजवर एकादें भांडें उपडें घालून पाळायाचे पहिले दोन दिवस समाप्त होतपर्यंत ठेऊन मग काढून टाकावें; परंतु राजरस्त्यावर टाकण्याकरितां कोणा अन्यजातीच्या मनुष्यापाशीं देवूं नये. पेसाहाच्या सणांत जर घरांत फुगवन सांपडलें आणि तो सणामधील व्यावहारिक दिवस असला, तर तें लागलेंच काढून टाकावें. परंतु जर तो पाळायाचा दिवस असला, तर त्याजवर एकादें भांडें उपडें घालून तें संध्याकाळपर्यंत झांकून ठेवावें व रात्रीं नंतर

काढून टाकावें. जे बापाचे किंवा आईचे ज्येष्ठ पुत्र असतील त्यांनीं तारीख १४ रोजीं उपास करावा. जर ही १४ वी तारीख शाब्बाथ दिवशीं असली तर हा उपास तारीख १२ बृहस्पतवार रोजीं करावा. आणि उपास करणाऱ्या ज्येष्ठ पुत्रानें तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत हळू व एकचित्तानें ह्मणायाच्या भागामध्यें उपासाकारणें עננו אבינו जो भाग ह्मणावा लागतो त्याबद्दल हा पुढील भाग ह्मणावा.

עננו אבינו हे आमच्या बापा, आह्मांस उत्तर दे. आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत या वेळीं जेव्हां इस्राएल, जो देश त्याचा नव्हे त्यांत ह्मणजे मिसर देश ज्यास सोआनाचें शेत (असेंहि ह्मणतात) त्यांत राहात होते, तेव्हां जीं अद्भुत कर्में, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस, त्यांकरितां या उपास करून दुःख करण्याच्या दिवशीं आह्मांस उत्तर दे. कारण असें झालें कीं फारो आह्मांस जाऊं देण्याविषयीं कठोर होता, तेव्हां परमेश्वरानें मिसर देशांतील अवघे ज्येष्ठ पुत्र, मानसांचे ज्येष्ठ आणि पशूंचेहि प्रथम जीवें मारिले, तेव्हां परमेश्वरानें आपल्या पीडा पाठवितांना नावडतीच्या[१] ज्येष्ठ पुत्रामध्यें व आवडतीच्या[२] ज्येष्ठ पुत्रामध्यें भेद राखिला आणि परमेश्वराचे ज्येष्ठ पुत्र ठरलेल्यांतून खरोखर एकहि मेला नाहीं; याकरितां या उपास करून दुःख करण्याच्या दिवशीं आह्मी आपलें मांदें व आपलें रक्त अर्पितों. तर तूं आपल्या बहुत दयेनें आह्मांविषयीं संतोषित होऊन आमच्या जीवास दुःख होणाऱ्या या उपासामुळें जेव्हां आमचे गुडघे गळून पडतात व आमच्या मासावरील चरबी खुटते, तेव्हां तूं आह्मांस प्रसन्न हो. आणि याकरितां आमचे जीवास टपणारे गळून पडोत व नाश पावोत. आणि नावडतीच्या ज्येष्ठ पुत्रास सामोरा होऊन त्यास नमीव, त्याच्या कर्माचें फल त्याच्या शिरीं येवो व त्याचा बलात्कार त्याच्याच टाळूवर उतरो. आणि ज्या तुझ्या वतनाच्या लोकांस तूं आपल्या थोरपणानें उद्धरिलेंस व मिसरांतून आपल्या प्रतापी हातानें काढिलेंस, त्यांचा तूं नाश करूं नको; कारण आमचा जीव धुळीस मिळाला आहे, व आमचें पोट भूमीस चिकटलें आहे. तर हे परमेश्वरा असें कोठपर्यंत? कारण अन्य लोक ह्मणतात कीं, त्यांची आशा मोडली. तर हे परमेश्वरा, फीर, माझा जीव सो-

---

१ मिसरी लोकांच्या. २ इस्राएलांच्या.

डीव. तुझ्या दयेकरितां मला तार. आणि याकोबाचा समाज जो तुझा ज्येष्ठ पुत्र त्यास पाहा व त्याची भेट घे. आणि आमच्या मिसरांतून निघण्याच्या दिवसांप्रमाणें आह्मांस चमत्कार दाखीव. मी विनंती करितों कीं, हे परमेश्वरा, तुझ्या सामर्थ्याविषयीं राजा हर्षेल आणि तो तुझ्या तारणाविषयीं फार उल्लासेल असें कर. तूं आपल्या गौरवाच्या मुखांतून जसा आह्मांस भरंवसा दिला आहेस, त्याप्रमाणें तूं आपला मान व महत्त्व त्यास पुरीव. जसें ह्मटलें आहे कीं, "मीहि त्यास ज्येष्ठ व पृथ्वींतल्या राष्ट्रांवर परात्पर करीन." आणि त्यांनीं हाक मारिल्यापूर्वी मी उत्तर देईन, ते बोलतांच मी ऐकेन, असें ह्मटल्याप्रमाणें आह्मी तुजकडे ओरडल्याअगोदर आह्मांस उत्तर दे; आह्मी बोलल्याअगोदर तूं ऐक. कारण उद्धरणारा, सोडविणारा, आणि सर्व संकटांच्या व दुःखाच्या समयीं उत्तर देणारा व दया करणारा तूंच परमेश्वर आहेस. हे प्रार्थना ऐकणाऱ्या परमेश्वरा, तूं धन्य आहेस.

संध्याकाळीं प्रार्थनामंदिरीं जाण्याअगोदर शक्तीप्रमाणें उत्तम प्रकारें मेज तयार करून त्याजवर एका ताटांत जे पदार्थ ठेवितात ते येणेंप्रमाणें—



लिंबाच्या रसाचा प्याला ताटाबाहेर ठेवावा.

---

१ या कांहीं प्रकारच्या भाज्या आहेत.

संध्याकाळची प्रार्थना.

प्रार्थनामंदिरीं गेल्यावर एकचित्तानें व मोठ्या भक्तिभावानें आरंभीं सांगितल्या प्रमाणें प्रार्थना करावी. शाब्बाथ असल्यास आरंभीं सांगितल्याप्रमाणें לכו נרננה ליי पासून מזמור לדוד הבו ליי च्या शेवटपर्यंत वाचून या सणाकरितां नेमिलेलें הודו ליי כי טוב (गीत १०७) वाचितात, आणि त्यानंतर आरंभीं सांगितल्याप्रमाणें ती प्रार्थना पूर्ण करितात. इतर दिवस असल्यास הודו ליי כי טוב (गीत १०७ पासून आरंभ करितात. प्रार्थनामंदिराहून घरीं येण्याच्या अगोदर मेज व त्यावरील पदार्थांनें भरलेलें ताट यांची सिद्धता असावी. घरीं गेल्यावर जे १४ विधि करावे लागतात त्याच्या संज्ञा येणेंप्रमाणें—

קדש पवित्रीकरण. ורחץ हात धुणें. כרפס करपासची भाजी खाणें. יחץ मधील भाकरीचे दोन भाग करणें. מגיד हाग्गादा वाचणें. רחצה हात धुणें. מוציא מצה मस्सावरील המוציא चा धन्यवाद ह्मणणें. מרור मारोर ही कडवट भाजी खाणें. כורך मस्साचा तुकडा मारोरमध्यें गुंडाळणें. שלחן עורך मेजावर जेवणाची सिद्धता करणें. צפון लपविलेली भाकर खाणें. ברך जेवणानंतरचा धन्यवाद करणें. הלל स्तवन करणें. נרצה ईश्वरी प्रसन्नता संपादणें.

हा पेसाहाचा सण इस्राएलांच्या मिसरांतून झालेल्या मुक्ततेच्या स्मरणार्थ आहे. आणि ही मुक्तता दर्शविण्यास והוצאתי, והצלתי, וגאלתי, ולקחתי मीं काढिलें, मीं सोडविलें, मीं उद्धरिलें, मीं घेतलें या चार निरनिराळ्या शब्दांची योजना केली आहे, ह्मणून या रात्रीं प्रत्येकानें द्राक्षरसाचे चार प्याले प्यावे असा नियम आहे. असें करण्यास मेजासभोंवतें असणाऱ्या प्रत्येकापुढें एक एक प्याला असून एक प्याला आणखी भरून ठेवावा. यास एलीयाचा प्याला असें ह्मणतात, कारण मलआखी अ. ३ ओ. २३ एथें लिहिल्याप्रमाणें तो केव्हां येईल याचें प्रमाण नाहीं. परंतु अकस्मात् कोणी पाहुणा आल्यास, तो त्याच्या उपयोगीं पडावा हेंहि त्याचें कारण आहे.

קדש पवित्रीकरण.

हें पवित्रीकरण करण्याकरितां द्राक्षरसाचा पहिला प्याला भरून त्याजवर तें करावें, आणि सुक्कोथच्या संध्याकाळच्या प्रार्थनेच्या शेवटीं लिहिल्याप्रमाणें धन्यवाद करावा. हें पवित्रीकरण संध्याकाळ झाल्यावर अंधार पडेपर्यंत करूं नये.

ורחץ हात धुणें.

जर एकाद्या प्रवाही पदार्थांत कांहीं बुडवून खाणें असेल, तर पूर्वीं हात धुणें. या संबंधानें नेतीलाचा धन्यवाद करूं नये.

כרפס करपास.

करपास ही भाजी लिंबाच्या आंवट रसांत बुडवून खाण्याअगोदर हा पुढील धन्यवाद करावा.

בא״אמ״ה בורא פרי האדמה हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, पृथ्वीचें फल उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

आंवट रसांत करपास बुडवून खाणें हा जेवणामध्यें नेहेमींपेक्षां भिन्न प्रकार पाहून, लहान लेंकरांनीं असें करण्याचें कारण विचारावें ह्मणून असें करितात.

יחץ मधील भाकरीचे दोन भाग करणें.

या दोन भागांतून एक भाग दुःखाची भाकर समजून खाण्यास, जेथें ती भाकर होती तेथें ह्मणजे दोन भाकऱ्यांच्या मध्यें ठेवितात व एक भाग रुमालांत गुंडाळून मेजावरील एका मुलाजवळ लपवून ठेवण्याकरितां देतात. तो त्यानें सांभाळून ठेवावा. जर तो दुसऱ्याच्या हातीं लागला, तर त्यास कुटुंबाच्या मुख्यानें कांहीं बक्षीस देऊं केल्याविना तो देत नसतो, व जेवण सर्व आटोपल्यावर प्रत्येक त्यांतून लहान लहान तुकडा खात असतात; त्यास आफीकोमेन असें ह्मणतात.

מגיד हाग्गादा वाचणें.

हा पुढील भाग वाचितांना सर्वांनीं ताटास हात लावून उचलून
बेने होरीनपर्यंत तीन वेळ वाचावा.

הא לחמא עניא जी दुःखाची भाकर आमच्या पूर्वजांनीं मिसर देशांत खाल्ली ती हीच. जे सर्व भुकेले असतील त्या सर्वांनीं येऊन ती खावी; ज्यांस पेसाह करण्याचें अगत्य असेल, त्या सर्वांनीं येऊन तो करावा. या वर्षी आह्मी एथें आहों; परंतु पुढल्या वर्षी तो आह्मी इस्राएलांच्या देशीं पाळूं अशी आशा करितों. या वर्षी आह्मी दास आहों, परंतु पुढल्या वर्षी आह्मी मुक्ति पावलेले लोकें[१] होण्याची आशा करितों.

एथें प्रत्येकानें द्राक्षरसाचा दुसरा प्याला भरून घेऊन मेजावरील ताट उचलून एकीकडे ठेवावें; मग मेजावर बसलेल्यांतून सर्वांहून लहान मुलानें हें पुढील वाचून प्रश्न करावे.

מה נשתנה सर्व रात्रींपेक्षां आजची रात्र कशामुळें निराळी आहे? दुसऱ्या सर्व रात्रीं आपण एक वेळहि बुडवून खात नाहीं, परंतु

१ इ. मुक्ति पावलेलीं लेंकरें.

या रात्रीं दोन वेळ बुडवून खातों (हें कां)? दुसऱ्या सर्व रात्रीं आपण फुगलेली व न फुगलेली भाकर खात असतों, परंतु या रात्रीं न फुगलेली भाकरच मात्र खातों (हें कां)? दुसऱ्या सर्व रात्रीं आपण इतर सर्व भाज्या खात असतों, परंतु या रात्रीं मारोर (कडवट भाजी) मात्र खातों (हें कां)? दुसऱ्या सर्व रात्रीं आपण बसून अथवा टेंकून खात पीत असतों, परंतु या रात्रीं टेंकूनचें मात्र (खातों व पितों) (हें कां)?

मग ताट पुनः मेजावर आणून ठेवावें आणि पुढें लिहिल्याप्रमाणें वरील प्रश्नाचें उत्तर सर्वांनीं वाचावें.

עבדים היינו आपण मिसरांत फारोचे दास होतों, आणि आपला देव परमेश्वर यानें आपणास प्रतापी हातानें, लांबविलेल्या बाहूनें तेथून काढिलें. आणि पवित्र जो धन्य यानें जर आपल्या पूर्वजांस मिसरांतून काढिलें नसतें, तर आपण, आपलीं लेंकरें व आपल्या लेंकरांचीं लेंकरें अद्याप मिसरांत फारोच्या दास्यत्वांतच राहिलों असतों. आणि जरी आपण सर्व सुज्ञ, समजदार व शास्त्र जाणणारे असलों, तरी मिसरांतून निघण्याचें वर्णन आपण करावें ही आपणास आज्ञा आहे; आणि जे कोणी मिसरांतून निघण्याचें अधिक वर्णन करितात, ते सर्व स्तुतिपात्र होत.

מעשה ברבי אליעזר रिब्बी एलीएझेर, रिब्बी येहोशूवा, आजारयाचा पुत्र रिब्बी एलआजार, रिब्बी आकीबा व रिब्बी तरफोन यांची गोष्टः—एक वेळ बेराक गांवांतील[3] लोकांनीं यांचा पाहुणचार केला असतां ते अवघी रात्र मिसरांतून निघण्याचें वर्णन एथपर्यंत करीत बसले कीं, त्यांचे शिष्य येऊन त्यांस ह्मणाले कीं, अहो आमचे गुरुजन हो, पहांटेचा **शेमा इस्राएल** ह्मणण्याची वेळ झाली आहे.

אמר רבי אלעזר בן עזריה आजारयाचा पुत्र रिब्बी एलआजार ह्मणतो, मी सत्तर वर्षांच्या वयाच्या मनुष्यासारखा आहें. तरी, "यासाठीं कीं, तूं मिसरदेशांतून निघालास तो दिवस त्वां आपल्या आयुष्याचे सर्व दिवसपर्यंत आठवावा" या वाक्याचें बेनजोमा स्पष्टीकरण

१ करपास आंबट रसांत बुडवून खातों व मारोर शिऱ्यांत बुडवून खातों. २ टेंकून बसून खाणें व पिणें हें थोरपणाचें व मुक्तीचें चिन्ह आहे; जे थोर व निर्भय असतात तेच टेंकून बसून खातात व पितात. ३ बेराक या गांवीं इतर धर्मांतून इस्राएली धर्मात आलेले लोक राहात असत.

करीपर्यंत मिसरांतून निघण्याचें वर्णन रात्रीस करावें असें मी सिद्ध करून दाखवूं शकलों नाहीं. तो ह्मणतो "त्वां आपल्या आयुष्याचे दिवसपर्यंत" यावरून दिवसच समजावे. परंतु त्या वाक्यांत "त्वां आपल्या आयुष्याचे सर्व दिवसपर्यंत" असें ह्मटलें आहे. (यांत 'सर्व' हा शब्द अधिक आहे) त्या अर्थी त्यामध्यें रात्रीहि गणिल्या जाव्या. याविषयीं सुज्ञ जन ह्मणतात कीं, तुझ्या आयुष्याचे दिवस ह्मणजे, हें जग समजावें; आणि तुझ्या आयुष्याचे सर्व दिवस ह्मणजे, माशीयाह येण्याच्या काळपर्यंत समजावें.

ברוך המקום जो सर्व व्यापक देव तो धन्य! तो धन्यच आहे. ज्या सर्वव्यापकानें आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र दिलें तो धन्य. (तें शास्त्र) चार निरनिराळ्या स्वभावांच्या लोकांविषयीं[1] ह्मणतें. त्यांतून एक सुज्ञ, एक दुष्ट, एक भोळसर, व एक ज्यास कांहीं प्रश्न करतां येत नाहीं असा.

חכם सुज्ञ हा काय ह्मणतो? (तो ह्मणतो) जे नेम, जीं बंधारणें, व जी नीति आपला देव परमेश्वर यानें तुह्मांस आज्ञापिलीं हीं कशीं आहेत[2]? तेव्हां तूं त्यास पेसाहाचे विधि समजावून सांग; ह्मणजे पेसाहाचा कोंकरा जो शेवटीं खावा लागत असे, त्याच्या स्मरणार्थ सर्व जेवण आटोपल्यावर आफीकोमेन[3] खातों; त्यानंतर कोणताहि खाण्याचा पदार्थ मेजावर आणूं नये.

רשע दुष्ट हा काय ह्मणतो? (तो ह्मणतो) हा तुमचा विधि कार्य[4]? एथें तुमचा विधि अशा ह्मणण्यानें तो विधि त्याचा नव्हे असें तो दर्शवितो. आणि ज्या अर्थीं याप्रमाणें तो आपणास सर्व इस्राएल राष्ट्रांतून अपंक्त करून घेतो, आणि मूळ तत्वाविरुद्ध अपवाद करितो, त्या अर्थीं तूंहि त्यास कठोर[5] उत्तर दे, आणि त्यास ह्मण कीं, मी मिसरांतून निघालों तेव्हां परमेश्वरानें जें मजसाठीं केलें, त्याकरितां मी हा विधि

---

१ इ. लेंकरांविषयीं. २ अनुवाद ६. २०. ३ जेवणानंतर मुखशुद्धीकरितां जें खातात त्याकरितां एथें आफीकोमेन या शब्दाची योजना केली आहे. परंतु त्याच्या उत्पत्तीविषयीं अनेक मतें आहेत. कोणी ह्मणतात तो ग्रीकशब्द आहे; कोणी ह्मणतात तो काल्दी शब्द आहे. ४ निर्गम १२.२६. ५ इ. त्याचे दांत आंबीव; हा भाषणसंप्रदाय इर्मेया ३१.२९ वरून घेतला आहे.

करितों[१]. अशा ह्मणण्यानें परमेश्वरानें जें मजसाठीं केलें, तें मजसाठीं, त्यासाठीं नव्हे; आणि जरी त्या वेळीं तो तेथें असता, तरी त्याची सुटका झाली नसती, असें त्यास दर्शीव.

תם भोळसर हा काय ह्मणतो? (तो ह्मणतो) हें काय? तेव्हां त्यास सांग कीं, परमेश्वरानें हाताच्या बळानें आह्मांस मिसरांतून दासत्वाच्या घरांतून आह्मांस काढिलें (ह्मणून हें आहे)[२].

ושאינו יודע לשאל ज्यास प्रश्न करतां येत नाहीं, त्याशीं तूं पहिल्यानें भाषण काढ; कारण यांविषयीं असें ह्मटलें आहे कीं, त्या दिवशीं तूं आपल्या पुत्राला असें सांग कीं, मी मिसरांतून निघालों, तेव्हां परमेश्वरानें जें मजसाठीं केलें त्याकरितां मी हा विधि करितों.

יכול מראש חודש यावरून प्रतिपदेपासून याचें स्पष्टीकरण करावें असें कदाचित् वाटेल; (तर तसें नव्हे). कारण "त्या दिवशीं" असें ह्मटलें आहे; आणि त्या दिवशीं असें जर ह्मटलें आहे, तर तो दिवस आहे इतक्यांत (असें समजावें). परंतु मी मिसरदेशांतून निघालों, तेव्हां परमेश्वरानें जें मजसाठीं केलें त्याकरितां मी हा करितों, असें ह्मटलें आहे तर, "त्याकरितां मी हा करितों" असें जें ह्मटलें आहे यावरून न फुगलेली भाकर व मारोर जेव्हां तुजपुढें ठेविलेलीं असतात, त्या वेळेशिवाय दुसऱ्या वेळीं हें करावें, असें माझ्यानें ह्मणवत नाहीं.

מתחלה पहिल्यानें आपले पूर्वज मूर्तिपूजक होते, आणि आतां सर्वव्यापक देवानें आपली सेवा करण्याकरितां आह्मांस आपणाजवळ घेतलें आहे. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "तेव्हां येहोशूवानें सर्व लोकांस सांगितलें कीं, इस्राएलाचा देव परमेश्वर असें ह्मणतो कीं, पूर्वी तुमचे पूर्वज नदीच्या पलीकडे राहात होते, आब्राहामाचा बाप व नाहोराचा बाप तेराह तेथें होता, तेव्हां त्यांनीं अन्य देवांची सेवा केली[३].

ואקח मग म्यां तुमचा पूर्वज आब्राहाम यास नदीच्या पलीकडून आणलें, आणि त्यास संपूर्ण खनान देशांत फिरविलें, आणि म्या त्याचें संतान वाढवावें ह्मणून त्यास इसहाक दिला. मग म्यां इसहाकास याकोब

---

१ निर्गम १३.८. २ निर्गम १३.१४. ३ येहोशूवा २४. २.

व एसाव दिलें; आणि एसावास सेईर डोंगर वतन करून दिला; आणि याकोब व त्याचे पुत्र मिसरांत गेले.

ברוך שומר जो इस्राएलास दिलेलें वचन सांभाळतो, तो धन्य असो. तो धन्यच आहे. पवित्र जो धन्य परमेश्वर, यानें दुभागलेल्या प्राण्याच्या मध्यें आपला पूर्वज आब्राहाम यासीं जो[1] करार, तो पूर्ण करण्याकरितां त्यानें मिसरांतील दास्यत्वाच्या शेवटाकडे लक्ष पूरविलें. ह्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "आणि त्यानें (परमेश्वरानें) आब्राहामाला ह्मटलें, तूं निश्चयें जाण कीं, तुझें संतान जो देश त्याचा नाहीं, त्यांत प्रवासी होऊन तेथील लोकांची सेवा करील, आणि ते चारशें वर्षें त्यांस पीडतील. आणि ज्या राष्ट्राची सेवा ते करतील त्याचा न्याय मी करीन आणि त्यानंतर ते बहुत संपत्ति घेऊन तेथून निघतील.[2]

היא שעמדה לאבותינו हेंच वचन आपल्या पूर्वजांस व आपणास आश्रयभूत होत आलें; कारण एकच आपणावर उठला होता असें नाहीं; परंतु पिढीदरपिढीं लोक आपला नाश करण्याकरितां आपणावर उठतात; परंतु पवित्र जो धन्य परमेश्वर तोच आपणास त्यांच्या हातांतून सोडवितो.

पुढील वाक्य वाचतांना द्राक्षरसाचा प्याला उचलून हातीं घ्यावा व मस्सावरील झांकण काढावें.

צא ולמד ये आणि पाहा[3] आरम्मी जो लाबान हा आपला पूर्वज याकोब यास काय करूं पाहात होता? कारण फारोनें तर पुरुषजातीविषयीं ह्मणजे मुलांस मारण्याविषयीं मात्र हुकुमनामा केला होता; परंतु लाबान हा सर्वांचा समूळ नाश करूं पाहात होता. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, माझा पूर्वज नाश पावणारा आरम्मी होता. तेव्हां त्यानें थोडक्या मनुष्यांसहित जाऊन तेथें प्रवास केला, आणि तेथें मोठें व बलवान् व बहुसंख्य राष्ट्र असा झाला.[4]

וירד מצרימה तो मिसरांत गेला. ईश्वरी ह्मणण्याप्रमाणें असें करणें त्यास भाग पडलें. तेथें त्यानें प्रवास केला, यावरून तो तेथें का-

---

१ उत्पत्ति १५.९–१५ पाहा. २ उत्पत्ति १५,१४. ३ इ. बाहेर ये आणि शीक, ही राबी लोकांची ह्मणण्याची पद्धत आहे. ४ अनुवाद २६. ५.

यम राहाण्यास गेला नाहीं; त्यानें तेथें कांहीं दिवस प्रवास मात्र केला असें समजावें. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "आणि ते फारोला ह्मणाले, खनान देशांत दुष्काळ भारी असल्यामुळें तुझ्या दासांच्या कळपांस चारा मिळत नाहीं, ह्मणून आह्मी तुझ्या देशांत राहायास आलों आहों; तर आतां कृपा करून तुझ्या दासांस गोशेन प्रांतांत राहूं द्यावें.[१]"

במתי מעט थोडक्या मनुष्यांसहित मिसरांत गेले. जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, तुझे पूर्वज सत्तर मनुष्यांसहित मिसरांत गेले, पण आतां तुझा देव परमेश्वर यानें तुला आकाशांतल्या तान्यांइतकें पुष्कळ केलें आहे.[२]

ויהי שם לגוי גדול आणि तेथें तो मोठें राष्ट्र झाला, यावरून असें समजावें कीं, तेथें इस्राएल प्रख्यात असून मोठें व बलवान् राष्ट्र होतेः जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, आणि इस्राएलाचीं लेंकरें सफल होऊन पुष्कळ झालीं, आणि वाढून फार शक्तिमान् झालीं आणि त्यांनीं देश भरून गेला.[३]

ורב आणि बहुसंख्य झालाः जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "म्यां तुला शेतांतील कोंबाप्रमाणें बहुसंख्य वाढविली आहे, आणि तूं वाढून मोठी झाली आहेस व उत्कृष्ट अलंकारास आली आहेस. आणि तुझे केश वाढले आहेत, परंतु पूर्वीं तूं नागवी व उघडी होतीस.[४]

וירעו אתנו आणि मिसऱ्यांनीं तर आह्मांस दुःख देऊन त्यांनीं आह्मांस जाच केला, आणि आह्मांस कठीण दास्यांत घातलें. आणि मिसऱ्यांनीं आह्मांस दुःख दिलें: जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "या, त्यांनीं वाढूं नये ह्मणून आपण त्यांशीं चतुराईनें वागूं, नाहीं तर लढाई लागल्यास ते आमच्या शत्रूस मिळतील व आह्मांशीं लढतील, आणि देशांतून निघून जातील.[६]"

ויענונו त्यांनीं आह्मांस जाच केलाः जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "मग त्यास कठीण कामानें जाचावें ह्मणून त्यांनीं त्यांपासून बिगार घेण्यासाठीं त्यावर मुकद्दम ठेविले, आणि त्यांनीं फारोसाठीं पिथोम व रामसेस हीं सांठवणाचीं नगरें बांधलीं.[७]"

१उत्पत्ति ४७.४. २ अनुवाद १०, २२. ३ निर्गम १.७. ४ येहेजकेल १६.७. ५ अनुवाद २६.६. ६ निर्गम १.१०. ७ निर्गम १.११.

ויתנו आणि आह्मांस कठीण दास्यांत घातलें; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि मिसऱ्यांनीं इस्राएलाच्या लेंकरांपासून जबरीनें काम करविलें.[१]"

" ונצעק אל " मग आह्मी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याजवळ ओरडलों, आणि परमेश्वरानें आमचा शब्द ऐकून आमचें दुःख व आमचे क्लेश व आमचा कांच पाहिला.[२]"

ונצעק मग आह्मी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याजवळ ओरडलों; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि बहुत दिवसांनीं असें झालें कीं, मिसराचा राजा मेला तेव्हां इस्राएलाचीं लेंकरें बिगारीमुळें कण्हलीं व ओरडलीं, आणि बिगारीमुळें त्यांची आरोळी देवाकडे वर गेली.[३]"

וישמע आणि परमेश्वरानें आमचा शब्द ऐकला; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि देवानें त्याचा आकांत ऐकिला, आणि देवानें आब्राहामाशीं, इसहाकाशीं व याकोबाशीं केलेला करार आठविला.[४]"

וירא את ענינו आणि आमचें दुःख पाहिलें, हें जग रूढी वर्ज झाल्यामुळें दुःख, असें समजावें; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि देवानें इस्राएलाच्या लेंकरांस पाहिलें, आणि त्याकडे देवानें लक्ष दिलें.[५]"

ואת עמלנו आणि आमचे क्लेश (पाहिले), हे पुत्रांस नदींत टाकून जिवें मारल्यामुळें झालेले क्लेश; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "जो प्रत्येक पुत्र जन्मेल त्यास नदींत टाका आणि प्रत्येक कन्येला वांचवा.[६]"

ואת לחצנו आणि आमचा कांच (पाहिला). हा कांच ह्मणजे आह्मांवरील जुलूम; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि ज्या जाचानें मिसरी त्यांस जाचतात तोहि म्यां पाहिला आहे.[७]"

" ויוציאנו मग परमेश्वरानें आह्मांस प्रतापी हातानें, लांबविलेल्या

१ निर्गम १.१३. २ अनुवाद २६.७. ३ निर्गम २.२३. ४ निर्गम २.२४. ५ निर्गम २.२५. ६ निर्गम १.२२. ७ निर्गम ३.९.

बाहूनें व मोठ्या भयाच्या गोष्टीनें व खुणांनीं व चमत्कारांनीं मिसरांतून काढलें.

ויוציאנו मग परमेश्वरानें आह्मांस मिसरांतून काढलें: ह्मणजे दूताच्या हातून नव्हे, सेराफ दूताच्या हातून नव्हे व जासुदाच्या हातूनहि नव्हे. परंतु पवित्र जो धन्य परमेश्वर यानें आपल्या गौरवानें व स्वतां (आह्मांस काढिलें.) याजविषयीं असें ह्मटलें आहे कीं, (परमेश्वर ह्मणाला) या रात्रीं मी मिसर देशांत फिरेन, आणि मिसर देशांतील मनुष्यांचें व पशूंचेंहि प्रत्येक प्रथम जन्मलेलें मारीन, आणि मिसऱ्याच्या सर्व देवांचें शासन करीन: मी परमेश्वर आहें.[१]

ועברתי मी मिसर देशांत फिरेन ह्मणजे मी स्वतां फिरेन, दूत फिरणार नाहीं; मी प्रत्येक प्रथम जन्मलेलें मारीन ह्मणजे मी स्वतां मारीन, सेराफ दूताच्या हातून नव्हे; आणि मी मिसऱ्यांच्या सर्व देवांचें शासन करीन ह्मणजे मी स्वतां शासन करीन, जासुदाच्या हातून नव्हे: मी परमेश्वर आहें; तो मीच दुसरा कोणी नव्हे.

ביד חזקה बळकट हातानें ह्मणजे ही मरी असें समजावें: जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "पाहा तुझे जे पशु रानांत आहेत त्यांवर, घोड्यांवर, गाढवांवर, उंटांवर, गुरांवर व मेंढरांवर परमेश्वराचा हात पडणार आहे, फार भारी मरी होईल."[२]

ובזרוע נטויה आणि लांबविलेल्या बाहूनें ह्मणजे ही तरवार, ज्या तरवारीनें ज्येष्ठ पुत्र मारले गेले ती असें समजावें; जसें अशा एका गोष्टीविषयीं ह्मटलें आहे कीं, "त्याच्या हातांत त्याची तरवार उपसलेली यरूशलेमेवर काढलेली होती."[३]

ובמורא גדול आणि मोठ्या भयाच्या गोष्टीनें ह्मणजे ईश्वरी साक्षात्काराचें प्रगटणें असें समजावें; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "तुमच्या देखतां तुमचा देव परमेश्वर यानें तुह्मांसाठीं मिसरांत जें केलें त्या सर्वांप्रमाणें परीक्षा, खुणा व चमत्कार व लढाई व प्रतापी हात व उभारलेला बाहु व मोठ्या भयंकर गोष्टी इहींकरून आपणासाठीं राष्ट्रांमधून राष्ट्र घ्यावयास देवानें प्रयत्न केला."[४]

---

१ निर्गम १२.१२. २ निर्गम ९.३. ३. १ कालवृत्तांत २१.१६. ४ अनुवाद ४.३४.

ובאותות आणि खुणांनीं ह्मणजे ही मोशेची काठी असें समजावें; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "ही काठी जिच्या योगें तूं चमत्कार करशील, ती तूं आपल्या हातीं घे.[1]"

एथें मेजासभोंवतें बसणारांनीं आपले द्राक्षरसानें भरलेले प्याले हातानें झांकावे आणि मुख्यानें आपला प्याला घेऊन पुढील वाक्यांतील **दाम, वाएश, वेथिमरोथ आशान** हे शब्द बोलतांना तीन वेळां, तिसऱ्या वाक्यांतील दाहा माऱ्यांचीं नांवें घेतांना दाहा वेळां, आणि चौथ्या वाक्यांतील **देसाख आदाश बेआहाव** हे तीन शब्द बोलतांना तीन वेळां असा एकंदर सोळा वेळां आपल्या प्याल्यांतील द्राक्षरस एका पात्रांत ओतून दूर नेऊन टाकायास सांगावा.

ובמופתים आणि चमत्कारांनीं ह्मणजे हा रक्ताचा मारा असें समजावें; जसें याविषयीं ह्मटलें आहे कीं, "आणि मी आकाशांत व पृथ्वींत **रक्त, अग्नि व धुराचे खांब** असे चमत्कार दाखवीन."

דבר אחר दुसरा अर्थ (जे दहा मारे मिसऱ्यावर आले) त्यांतील दोन बळकट हाताचे, दोन लांबविलेल्या बाहूचे, दोन मोठ्या भयाच्या गोष्टीचे, दोन खुणांचे आणि दोन चमत्काराचे होते.

אלו עשר מכות पवित्र जो धन्य परमेश्वर यानें मिसरी लोकांवर मिसरामध्यें जे दहा मारे पाठविले ते हे. **रक्त, बेडूक, उवा, गांधील माशा, गुरांची मरी, फुटकळ्या, गारावृष्टि, टोळ, काळोख व ज्येष्ठ पुत्रांचा वध.**

רבי יהודה रिब्बी येहूदानें यांच्या संज्ञा दिल्या आहेत, त्या **देसाख आदाश बेआहाव**[2] अशा आहेत.

רבי יוסי הגלילי गालीलांत राहणारा रिब्बी योसे ह्मणतो मिसरी लोकांवर मिसरांत दहा मार बसले, आणि समुद्राजवळ पन्नास मार बसले असें तूं कशावरून ह्मणतोस? (याचें उत्तर असें कीं,) मिसरांत जे मार बसले त्यांविषयीं तो ह्मणतो मिसरांमध्यें गारुडी फारोस ह्मणाले, हें देवाचें बोट आहे.[3] आणि समुद्राजवळ जे मार बसले त्यांविषयीं

---

१ निर्गम ४.१७. २ इब्रीमध्यें जीं दहा मारांचीं नांवें आहेत, त्या नांवांतील पहिलीं अक्षरें जोडून हे तीन शब्द केलेले आहेत. या दहा मारांतील पहिले तीन देवानें आहारोनाच्या हातून दिले; दुसरे तीन मोशेच्या हातून दिले आणि शेवटले चार आपल्या स्वतांच्या हातून दिले. ३ निर्गम ८.१९.

तो काय ह्मणतो? तो ह्मणतो "आणि जो हाताचा मोठा पराक्रम परमेश्वरानें मिसऱ्यांवर केला तो इस्राएलांनीं पाहिला; आणि लोकांनीं परमेश्वराचें भय धरिलें आणि परमेश्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर विश्वास ठेविला.[१]"

כמה לקו बोटानें किती मार दिले? तर दहा; यावरून असें ह्मणावें कीं, जर मिसरांत दहा मार दिले, तर समुद्राजवळ पन्नास मार[२] दिले असें अनुमान होतें.

רבי אליעזר रिब्बी एलीयेझेर ह्मणतो कीं, पवित्र जो धन्य परमेश्वर यानें मिसऱ्यांस मिसरांमध्यें जे मार दिले, त्यांतील प्रत्येक चार प्रकारचे मार होते, हें तूं कशावरून ह्मणतोस? तर याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "त्यानें त्यांजमध्यें आपला संतप्त क्रोध, कोप व रोष व पीडा, दुष्ट दूत पाठवून त्यांस लागू केलीं;[३]" ह्मणजे कोप एक, रोष दोन, पीडा तीन, दुष्ट दूत पाठविणें चार. यावरून मिसरांत चाळीस मार व समुद्राजवळ दोनशें मार दिले असें अनुमान होतें.

רבי עקיבא रिब्बी आकीबा ह्मणतो कीं, पवित्र जो धन्य परमेश्वर यानें मिसऱ्यांस मिसरांमध्यें जे मार दिले त्यांतील प्रत्येक पांच प्रकारचे मार होते, हें तूं कशावरून ह्मणतोस? तर याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "त्यानें त्याजमध्यें आपला संतप्त क्रोध, कोप, रोष व पीडा दुष्ट दूत पाठवून त्यांस लागू केलीं" ह्मणजे संतप्त क्रोध एक, कोप दोन, रोष तीन, पीडा चार, दुष्ट दूत पाठविणें पांच. यावरून मिसरांत पन्नास मार व समुद्राजवळ दोनशें पन्नास मार दिले असें अनुमान होतें.

כמה מעלות सर्व व्यापकानें चढत्या क्रमानें आह्मांवर किती थोर उपकार केले आहेत बरें![४]

---

१ निर्गम १४.३१. २ या वाक्यावरून असें अनुमान होतें कीं, एका बोटानें जर दहा मार दिले, तर हातास पांच बोटें असतात ह्मणून हातानें पन्नास मार दिले असावे. ३ गीत ७८.४९. ४ जशीं गीताचे पुस्तकांत १२० पासून १३४ पर्यंत १५ चढण्याचीं गीतें आहेत, तसें देवानें इस्राएलांवर केलेले १५ थोर चढते उपकार एथें दाखविले आहेत.

אִלּוּ הוֹצִיאָנוּ जरी आह्मांस मिसरांतून काढिलें; आणि (मिसरी) लोकांस शासन लाविलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी त्यांस शासन लाविलें; आणि त्यांच्या देवांस शासन लावित नसतें, तरी तें आह्मांस पुरे होतें.

जरी त्यांच्या देवांस शासन लाविलें; आणि त्यांचे ज्येष्ठ पुत्र मारले नसते, तरी तें आह्मांस पुरे होतें.

जरी त्यांचे ज्येष्ठ पुत्र मारिले; आणि त्यांचें धन आह्मांस दिलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी त्यांचें धन आह्मांस दिलें; आणि आह्मांकरितां समुद्र दुभांगला नसता, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांकरितां समुद्र दुभागला; आणि त्यांतून कोरड्या भूमीवरून आह्मांस पार नेलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी त्यांतून कोरड्या भूमीवरून आह्मांस पार नेलें; आणि आमच्या शत्रूंस त्यांत बुडविलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आमच्या शत्रूंस त्यांत बुडविलें; आणि चाळीस वर्षे आह्मांस जें पाहिजे तें पुरविलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी चाळीस वर्षे आह्मांस जें पाहिजे तें पुरविलें; आणि आह्मांस खावयास **मान** दिलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांस खावयास **मान** दिलें; आणि आह्मांस शाब्बाथ लावून दिला नसता; तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांस शाब्बाथ लावून दिला; आणि आह्मांस सीनाय पर्वताजवळ नेलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांस सीनाय पर्वताजवळ नेलें; आणि आह्मांस शास्त्र दिलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांस शास्त्र दिलें; आणि आह्मांस इस्राएलाच्या देशांत नेलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

जरी आह्मांस इस्राएलाच्या देशांत नेलें; आणि आह्मांसाठीं पवित्र मंदिर बांधिलें नसतें, तरी तें आह्मांस पुरें होतें.

עַל אַחַת असे एकापेक्षां एक किती मोठे व उत्तम उपकार सर्व-

व्यापकानें आह्मांवर केले आहेत बरें! आह्मांस मिसरांतून काढलें; मिसऱ्यांस शासन लाविलें, त्यांच्या देवास शासन लाविलें, त्यांचे ज्येष्ठ पुत्र मारले, त्यांचें धन आह्मांस दिलें, आह्मांसाठीं समुद्र दुभागला, त्यांतून कोरड्या भूमीवरून आह्मांस पार नेलें, आमच्या शत्रूस त्यांत बुडविलें, चाळीस वर्षें आह्मांस जें पाहिजे तें पुरविलें, आह्मांस खावयास **मान** दिलें, आह्मांस शाब्बाथ लावून दिला, आह्मांस सीनाय पर्वताजवळ नेलें, आह्मांस शास्त्र दिलें, आह्मांस इस्राएलाच्या देशांत नेलें आणि आमच्या अपराधांच्या प्रायश्चित्तासाठीं निवडक मंदिर बांधिलें.

רבן גמליאל रब्बान गमलीएल ह्मणत असे कीं, जो कोणी पेसाहमध्यें पेसाह, मस्सा व मारोर या तीन गोष्टींचा उल्लेख करीत नाहीं, तो आपला धर्म पूर्ण करीत नाहीं[१].

פסח पेसाह (ह्मणजे वलांडण सण याचा यज्ञ,) पवित्र मंदिर उभें असतां आपले पूर्वज खात असत तें कशावरून? पवित्र जो धन्य परमेश्वर यानें मिसरांत आपल्या पूर्वजांचीं घरें वलांडलीं यावरून. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "हा परमेश्वरासाठीं वलांडण सण यज्ञ आहे, कां कीं त्यानें मिसऱ्यांस मारलें तेव्हां मिसरांत इस्राएलाच्या लेंकरांचीं घरें तो वलांडून गेला, आणि त्यानें आमचीं घरें रक्षिलीं; तेव्हां लोकांनीं लवून नमन केलें."[२]

एथें मस्सा उचलून सर्वांस दाखवावा व हें ह्मणावें.

מצה हा मस्सा (ह्मणजे ही न फुगलेली भाकर) आपण खातों ती कशावरून? जेव्हां राजांचा राजाधिराज, पवित्र जो धन्य परमेश्वर यानें त्यांपुढें प्रगट होऊन त्यांस लागलेंच सोडविलें, तेव्हां त्यांचा भाकरेचा उंडा फुगण्यास पुरा वेळ नव्हता यावरून. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "आणि जो उंडा त्यांनीं मिसरांतून नेला त्याच्या बेखमीर भाकरी त्यांनीं भाजल्या, कां कीं त्यांत खमीर घातलें नव्हतें; कारण ते मिसरांतून घालविलेले होते, आणि ते उशीर करूं शकले नाहींत, आणि त्यांनीं आपणासाठीं सिधा तयार केला नव्हता."[३]

एथें मारोर उचलून सर्वांस दाखवावा व हें ह्मणावें.

מרור हा मारोर (ह्मणजे ही कडू भाजी) आपण खातों ती कशावरून?

---

१. इ. ऋणमुक्त होत नाहीं. २ निर्गम १२.२७. ३ निर्गम १२.३९.

आपल्या पूर्वजांच्या जीवास मिसरांत मिसरी लोकांनीं दुःख दिलें याव-रून. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "आणि चुन्यामध्यें व विटांमध्यें व शेतांतील सर्व कामामध्यें अवघड कामानें त्यांच्या जीवास दुःख दिलें; त्याकडून जी बिगार करविली ती सर्व जबरीची होती."[१]

בכל דור ודור पिढीं दर पिढीं प्रत्येक इस्राएली मनुष्यानें आपण स्वतां मिसरांतून निघालों असें समजावें. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "आणि त्या दिवशीं तूं आपल्या पुत्रास असें सांग कीं, मीं मिसरांतून निघालों तेव्हां जें परमेश्वरानें मजसाठीं केलें, त्याकरितां मी हा करतों.[२] पवित्र जो धन्य परमेश्वर यानें आपल्या पूर्वजांसच मात्र सोडविलें असें नव्हे, परंतु त्याबरोबर आपणासहि सोडविलें. याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "मग जो देश त्यानें आमच्या पूर्वजांस शपथेनें देऊं केला होता, तो आह्मांस द्यायास त्यानें आह्मांस न्यावें ह्मणून आह्मांस तेथून काढलें."[३]

एथें द्राक्षरसाचा प्याला हातीं घेऊन हें पुढील सर्व ह्मणावें.

לפיכך यास्तव ज्यानें आपल्या पूर्वजांकरितां व आपणाकरितां हे सर्व चमत्कार केले, आपणास दास्यत्वांतून मुक्तींत, कठोर मजुरींतून सुटकेंत, कष्टांतून हर्षांत, शोकांतून आनंदाच्या दिवसांत, निबिड अंधा-रांतून मोठ्या प्रकाशांत काढून आणलें, त्याचे उपकार मानावे, त्याची स्तुति करावी, त्याचें सुवंदन करावें, त्याचें गौरव करावें, त्यास उंचवावें, त्याचा सन्मान करावा, व त्याची प्रशंसा करावी हा आपला धर्म आहे. तर त्यापुढें आपण नवें गीत गाऊन हालेलूया (ह्मणजे अनंताला स्तवा असें) ह्मणूं या.

הללויה गीत ११३ व בצאת ישראל गीत ११४.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्यानें आह्मांस व आमच्या पूर्वजांस मिसरांतून सोडविलें आणि आ-ह्मांस मस्सा व मारोर खाण्याकरितां या रात्रीपर्यंत आणून पोंचविलें तो तूं धन्य आहेस. याप्रमाणेंच हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मांकडे सुखानें येणारे दुसऱ्या सणांपर्यंत व दुसऱ्या

१ निर्गम १.१४. २ निर्गम १३.८. ३ अनुवाद ६.२३.

पर्वणींपर्यंत आह्मांस सुखानें नेऊन पोंचीव; ह्मणजे तुझें नगर बांधलें जाऊन आह्मी आनंद करूं, आणि तुझ्या सेवेमध्यें आह्मी हर्ष मानूं, आणि तुझी प्रसन्नता साधण्यास (ज्या होमाचें व पेसाहच्या अर्पणाचें) रक्त तुझ्या यज्ञवेदीच्या बाजूवर पिळलें जाईल, त्या होमांतून व पेसाहाच्या अर्पणांतून आह्मी खाऊं आणि आमच्या मुक्तीकरितां व आमच्या जिवाच्या खंडणीकरितां नव्या गीतानें तुझी उपकारस्तुति करूं. हे परमेश्वरा, इस्राएलांचा उद्धार करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथपर्यंत वाचन झाल्यावर द्राक्षरसाचा दुसरा प्याला प्यावा.

רחצה हात धुणें.

मग हात धुवून आल नेतीलाथ यादाईम हा धन्यवाद करावा.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र करणाऱ्या आणि आह्मांस हात धुण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מוציא מצה मस्सावरील हाम्मोसीचा धन्यवाद.

ताटांतील अडीच मस्सा हातांत घेऊन हा धन्यवाद करावा.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, भूमींतून भाकर उपजविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हा धन्यवाद केल्यावर वरील सगळ्या भाकरींतून एक व मधल्या अर्ध्या भाकरींतून एक लहानसा तुकडा सर्वांस वांटून द्यावा. त्यांनीं तो पुढील धन्यवाद झाल्यावर खावा.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र करणाऱ्या, आणि आह्मांस मस्सा खाण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מרור मारोर ही कडवट भाजी खाणें.

ही कडवट भाजी खाण्याअगोदर हा पुढील धन्यवाद करून ती भाजी शिऱ्यांत बुडवून खावी.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या आज्ञांकडून आह्मांस पवित्र करणाऱ्या, आणि आह्मांस मारोर खाण्याची आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मस्साचा तुकडा मारोरमध्यें गुंडाळणें.

मग तिसऱ्या मस्साचा लहानसा तुकडा घेऊन व मारोरमध्यें गुंडाळून कशांतहि न बुडवितां पुढील वाक्य ह्मणून खावा.

זכר למקדש पवित्र मंदिराच्या स्मरणार्थ वृद्ध हिल्लेल हा, याजविषयीं जें कांहीं ह्मटलें आहे ह्मणजे मस्साशीं व मारोरशीं तें (पेसाहचें अर्पण) खावें हें पूर्ण करण्याकरितां (हे दोन पदार्थ) गुंडाळून एकत्र खात असे (तसें आह्मी खातों).

दुसऱ्या रात्रीं सर्वांनीं जेरोवाचा व अंड्याचा तुकडा घेऊन खावा.

שלחן ערוך मेजावर जेवणाची सिद्धता करणें.

मग खाऊन पिऊन तृप्त व्हावें, आणि सर्व व्यापकानें केलेल्या दयेकरितां आनंद करून व गायन करून त्याची स्तुति करावी.

צפון लपविलेली भाकर.

जेवणानंतर लपवून ठेवलेल्या अर्ध्या मस्साचा थोडा थोडा तुकडा ह्मणजे आफीकोमेन खावा. यानंतर द्राक्षरसाचे राहिलेले दोन प्याल्यांशिवाय आणखी कांहीं खाऊं पिऊं नये.

זכר לקרבן खाऊन पिऊन तृप्त झाल्यावर जें पेसाहचें अर्पण खाल्लें जात असे, त्याच्या आठवणीकरितां (हें आह्मी खातों).

ברך जेवणानंतरचा धन्यवाद.

हा जेवणानंतरचा धन्यवाद ह्मणजे बिरकात हाम्माजोन करण्यापूर्वी प्रत्येकानें द्राक्षरसाचा तिसरा प्याला भरून घ्यावा आणि नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथांत पृष्ठ १८०–१८८ एथें सांगितल्याप्रमाणें जेवणानंतरचा व द्राक्षरसाच्या प्याल्यावरहि धन्यवाद करून तो तिसरा प्याला प्यावा.

הלל נרצה स्तवन करून ईश्वरी प्रसन्नता संपादावी.

हें स्तवन वाचण्याअगोदर प्रत्येकानें द्राक्षरसाचा चौथा प्याला भरून घ्यावा. या स्तवनांतील पहिलीं दोन गीतें हाग्गादाचे शेवटीं वाचलीं जातात, ह्मणून राहिलेला भाग वाचण्याअगोदर हीं पुढील वाक्यें वाचतात.

שפוך חמתך जे लोक तुला जाणत नाहींत, जीं राष्ट्रें तुझ्या नामानें हांक मारीत नाहींत, त्यांजवर तूं आपला संताप ओत. कां

तर त्यांनीं याकोबास खाऊन टाकला आहे; आणि त्याची वस्ती ओसाड केली आहे.[१]

यापुढें לא לנו पासून ברוך הבא या भागाच्या शेवटपर्यंत नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथांत पृष्ठ २९०–२९२ एथें लिहिल्याप्रमाणें वाचावें व त्यामागून הלל הגדול मोठें स्तवन गीत १३६ नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथांत पृष्ठ १९४ एथें लिहिल्या प्रमाणें, आणि शाब्बाथाच्या प्रार्थनेंतील נשמת כל חי पासून ובכן ישתבח या भागांतील אתה אל पर्यंत नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथांत पृष्ठ २०४–२०६ एथें लिहिल्याप्रमाणें आणि स्तवनाचा शेवटला भाग יהללוך पृष्ठ २९२ एथें लिहिल्याप्रमाणें वाचून व स्तवन समाप्त करण्याकरितां हा खालील धन्यवाद करून द्राक्षरसाचा चौथा प्याला प्यावा.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, स्तवनाकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस. आमेन.

द्राक्षरसाचा चौथा प्याला प्याल्यावर नित्याच्या प्रार्थनेच्या ग्रंथांतील पृष्ठ १८८ एथें लिहिल्याप्रमाणें धन्यवाद करून विधि समाप्त करावा.

पेसाहाची पहांटेची प्रार्थना.

ही प्रार्थना बहुतकरून सुक्कोथच्या प्रार्थनेसारखीच असते, परंतु מזמור שירו ליי याच्या अगोदर आरंभीं सांगितल्याप्रमाणें पेसाहाचें नेमिलेलें गीत (गीत १०७) वाचावें लागतें. पहिल्या दिवशीं शास्त्रांच्या दोन प्रति काढून एकींत निर्गम अ. १२ ओ. २१ पासून ५१ पर्यंत पांच मनुष्यें वाचितात; परंतु शाब्बाथ असल्यास ओ. १४ पासून आरंभ करून सात मनुष्यें वाचितात. दुसऱ्या प्रतींत मफतीर गणना अ. २८ ओ. १६ पासून २५ पर्यंत आणि हाफतारा येहोशूवा अ. ५ ओ २ पासून अ. ६ ओ. १ पर्यंत वाचून ओ. २७ हि वाचितात. आणि शास्त्र नेऊन ठेवितांना पृष्ठ २२ एथें सांगितल्याप्रमाणें दहिंवरासाठीं प्रार्थना करितात. दुसऱ्या दिवशीं शास्त्रांतून एका प्रतींत लेवी अ. २२ ओ. २६ पासून अ. २३ ओ. ४४ पर्यंत, दुसऱ्या प्रतींत मफतीर आदल्या दिवसासारखाच, आणि हाफतारा २. राजे अ. २३ ओ. १–९ व ओ. २१–२५ वाचतात.

तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही सुक्कोथच्या प्रार्थनेमध्यें लिहिल्यासारखी असते.

---

१ गीत ७९.६–७.

दुसऱ्या संध्याकाळची प्रार्थना.

ही सुक्कोथच्या प्रार्थनेंत लिहिल्यासारखी असते; परंतु קריש תתקבל ह्मटल्यावर लेवी अ. २३ ओ. ९–१४ एथें लिहिल्याप्रमाणें עומר ह्मणजे पेंढी ओंवळण्याचा धन्यवाद या दिवसापासून एकुणपन्नास दिवस करावा. तो येणेंप्रमाणें:—

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, आणि ओमेर मोजण्याची आज्ञा लावून देणाऱ्या, तूं धन्य आहेस. आज एक दिवस झाला.

הרחמן जो दयाळू तो पवित्र मंदिराचें पूजन पुनः त्याच्या ठिकाणीं लवकर आमच्या दिवसांत चालू करो.

यानंतर गीत ६७ व אנא בכח नि. प्रा. पृष्ठ ४२.

पेसाहाच्या मधल्या व्यावहारिक दिवसांची सकाळची प्रार्थना सुक्कोथच्या प्रार्थनेसारखीच असते, एवढेंच कीं הלל ह्मणजे स्तवन संक्षिप्त वाचतात, आणि शास्त्राच्या दोन प्रति काढून एका प्रतींत जे भाग तीन जण वाचतात ते येणेंप्रमाणें:–पहिल्या दिवशीं निर्गम अ. १३ ओ. १–१६. दुसऱ्या दिवशीं निर्गम अ. २२ ओ. २४ पासून अ. २३ ओ. १९ पर्यंत; तिसऱ्या दिवशीं निर्गम अ. ३४ ओ. १–२६. चौथ्या दिवशीं गणना अ. ९ ओ. १–१५; आणि चौथ्यानें दुसऱ्या प्रतींत मफतीर प्रति दिवशीं गणना अ. २८ ओ. १९–२५ वाचल्यावर קריש לעילא वाचावा. मधल्या दिवसांतील पहिला दिवस जर शनिवार असला तर सुक्कोथच्या प्रार्थनेंत पृष्ठ ४९ एथें सांगितल्याप्रमाणें एका प्रतींत निर्गम अ. ३३ ओ. १२ पासून अ. ३४ ओ. २६ पर्यंत सात जण वाचतात, आणि दुसऱ्या प्रतींत वरील मफतीर वाचल्यावर קריש वाचून मग हाफतारा वाचतात; आणि राहिलेल्या तीन दिवशीं तिसऱ्या दिवसाचा भाग सोडून वर लिहिल्याप्रमाणें पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या दिवसांचे भाग अनुक्रमानें वाचतात.

सुकोथ व पेसाह यांमधील व्यावहारिक दिवसांची तिसऱ्या प्रहरची व संध्याकाळची प्रार्थना या बहुत करून नित्यासारख्याच असतात त्यांमध्यें हळू व एक चित्तानें जी प्रार्थना करायाची तिजमध्यें सणाकारणें אלא יעלה ויבא हा भाग वाचावा लागतो; आणि संध्याकाळच्या प्रार्थनेस त्या सणाचें नेमिलेलें गीत वाचून आरंभ करावा लागतो.

पेसाहाच्या सातव्या व आठव्या दिवसाची प्रार्थना.

या दोन पाळायाच्या दिवसांची प्रार्थना बहुधा सुक्कोथच्या प्रार्थनेंत सांगितल्याप्रमाणें असते. त्यामध्यें भेद एवढाच कीं, संध्याकाळच्या प्रार्थनेंत הלל स्तवन वाचीत नाहींत आणि सकाळीं तें संक्षिप्त वाचतात. या दोन दिवशीं शास्त्रांतील जे भाग वाचायाचे ते येणेंप्रमाणें.

सातव्या दिवशीं निर्गम अ. १३ ओ. १७ पासून अ. १५ ओ. २६ पर्यंत; मफतीर मधल्या दिवसाप्रमाणें आणि हाफतारा २ शेमूएल अ. २२ ओ. १–५१. आठव्या दिवशीं अनुवाद अ. १५ ओ. १९ पासून, शनिवार असल्यास अनुवाद अ. १४ ओ. २२ पासून अ. १६ ओ. १७ पर्यंत; मफतीर मधल्या दिवसाप्रमाणें, आणि हाफतारा यशाया अ. १० ओ. ३२ पासून अ. १२ ओ. ६ पर्यंत. या दोन्ही दिवशीं पाराशानंतर व मफतीरनंतर असे दोन्ही वेळां קדיש वाचतात व मूसाफ करून प्रार्थना समाप्त करितात.

पेसाहाच्या शेवटल्या दोन पाळायाच्या दिवसांची तिसऱ्या प्रहरची व सण समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना.

ही प्रार्थना पृष्ठ ३५ एथें सांगितल्याप्रमाणेंच असते, परंतु शेवटल्या קדיש अगोदर एक दिवस शेलोमोच्या गीताचा अर्धा भाग ह्मणजे आरंभापासून अ. ४ ओ. १३ पर्यंत व दुसऱ्या दिवशीं राहिलेला अर्धा भाग अ. ४ ओ. १४ पासून शेवटपर्यंत वाचितात. आणि सण समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना पृष्ठ ३६ एथें सांगितल्याप्रमाणें असते.

शाबूओथची प्रार्थना.

शाबूओथचा सण दोन दिवस पाळला जातो, आणि या दोन दिवसांची सर्व प्रार्थना आरंभीं सुक्कोथच्या प्रार्थनेंत सांगितल्याप्रमाणें करितात; परंतु शास्त्रांतील जे भाग वाचायाचे ते पहिल्या दिवशीं निर्गम अ. १९ व २० शेवटपर्यंत वाचायास पांच मनुष्यें बोलाविलीं जातात, मफतीर गणना अ. २८ ओ. २६–३१ आणि हाफतारा येहेजकेल अ. १ ओ. १–२८ व अ. ३. ओ. १२. दुसऱ्या दिवशीं शाब्बाथ नसल्यास अनुवाद अ. १५ ओ. १९ पासून अ. १६ ओ. १७ चे शेवटपर्यंत वाचायास पांच मनुष्यें बोलावितात. परंतु शाब्बाथ असल्यास अनुवाद अ. १४ ओ. २२ पासून अ. १६ ओ. १७ चे शेवटपर्यंत वाचायास सात मनुष्यें बोलावितात. आणि मफतीर आदल्या दिवसाप्रमाणें ह्मणजे गणना अ. २८ ओ. २६– ३१ आणि हाफतारा हाबक्कूक अ. २ ओ. २० पासून अ. ३. ओ. १९ चे शेवटपर्यंत वाचितात. मूसाफामध्यें קדיש תתקבל वाचल्यावर पुढें लिहिलेलीं बोधवचनें वाचल्यावर אין כאלהינו इत्यादि वाचून प्रार्थना समाप्त करितात. या दिवसांची तिसऱ्या प्रहरची व सण समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना सुक्कोथच्या प्रार्थनेमध्यें पृष्ठ ३५ व ३६ एथें सांगितल्याप्रमाणेंच करितात, परंतु तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत शेवटला קדיש יהא שלמא वाचण्याअगोदर पहिल्या दिवशीं रूथेचें पुस्तक अर्धे ह्मणजे अ. १ ओ १ पासून अ. ३ ओ. ७ शेवटपर्यंत वाचतात व दुसऱ्या दिवशीं अ. ३ ओ. ८ पासून शेवटपर्यंत वाचितात.

बोधवचनें.[1]

उपोद्घातें.

אמון יום זה (ईश्वरानें) आपणांपाशीं राखून ठेविलेलें ज्ञानाचें[3] वतन आजच्याच दिवशीं या लोकांस देवाचा मनुष्य दृष्टांत पाहाणारों याच्या हातून मिळालें.

हें वरील आकाश विस्तारणाऱ्या व खालील पृथ्वीचा पाया घालणाऱ्या देवा! मुकाट्यानेंही तुझी स्तुति होते.

ज्या दिवशीं त्वां प्रगट होऊन नेमशास्त्र शिकविलें; त्या दिवशीं तूं सर्व देवांहून थोर झालास.

जेव्हां त्या तारण पावलेल्या लोकांनीं देवाचा शब्द ऐकिला, तेव्हां ते देवापुढें कांपले व थरथरले.

देव गहन विचाराचा आहे; त्यानें आपल्या दिसण्यांत कृपा पावलेल्या लोकांस मोठा बोध केला.

जें शास्त्र पूर्ण असून मोलवान् व सुंदर आहे, त्याचें वतन आपल्या लोकांस देण्याकरितां तो (सीनाय पर्वतावर) आला.

आपलें नेमशास्त्र त्यांस कळवितांना त्यानें आपली वाणीहि त्यांस ऐकविली; यावरून मोशे ह्मणाला, पहा देव अग्नीमधून बोलत असतां त्याची वाणी तुह्मीं ऐकिली; तशी दुसऱ्या कोणीं ऐकिली आहे काय?

मी परमेश्वर नव्हें काय! मजवांचून आणखी कोणी देव नाहीं, असें सीनाय पर्वतावर ह्मणतांना माझ्या समुदायानें स्वतां आपल्या कानीं ऐकलें.

परक्या देवास व त्याच्या मूर्तीस उडवून टाक; आणि "मजपासून निघून जा, मनुष्य आपणांकरितां देव करूं शकतो काय" असें त्यास ह्मण.

देवाच्या नामानें व्यर्थ शपथ वाहूं नको, कारण परमेश्वर सर्व देवांहून थोर आहे.

शाब्बाथाचा सन्मान करण्याकरितां आवडीनें त्वरा करें; कारण देवानें (सर्व काम) संपवून त्या दिवशीं विसांवा घेतला.

---

१ टीका ४३. २ टीका ४४. ३ नीति अ. ८ ओ. ३० वरून हें लिहिलें आहे. ४ मोशे. ५ इ. धांव.

आपल्या मातापितरांस मोठ्या प्रेमानें[1] संतुष्ट राख, ह्मणजे देवापुढें तुझ्या आयुष्याचीं वर्षें वाढतील.

रक्तपात करणारांस दूर राख, त्यांच्या मसलतींत असूं नको; कारण, मनुष्य हा देवाच्या प्रतिमेप्रमाणें उत्पन्न झाला आहे.

दुराचार, क्रोध आणि कपटाची तागडी यांपासून दूर राहा; नाहीं तर देवहि रागानें व क्रोधानें तुझी झडती घेईल.

टपणाऱ्याप्रमाणें आपल्या शेजाऱ्याविषयीं खोटी साक्ष देऊं नको; कारण ज्या सहा गोष्टींचा देवास वीट आहे[2], त्यांतील ही एक आहे.

आपल्या भावाच्या संपत्तीचा लोभ धरूं नको; आणि जें कांहीं देवानें त्यास दिल्हें आहे, तें तुलाच असावें अशी इच्छा मनीं धरूं नको.

देवाचीं अशीं कृत्यें जेव्हां त्यांनीं पाहिलीं व त्यापुढें प्रगट झालीं, तेव्हां ते लोक कांपले, व चकित व भयभीत झाले.

अहो, सरळ मार्गानें वागणारे अधिकारी लोक हो! तुह्मी निर्मळ भाषण करा, आणि देवानें जें आज्ञापिलें आहे, तें करा.

या लोकांचे समाज हो! देवाच्या नेमशास्त्रांत हर्ष व आनंद माना, आणि आपण देवाचीं कृत्यें पाहूं या, असें परस्परांस ह्मणा.

हे आमच्या जीवंत उद्धारका! आमचें सामर्थ्य वाढीव; हे देवा, तुझें तारण आह्मांस त्वरित दाखीव.

रिब्बी शेलोमो येहूदा गेबीरोल यानें शाबूओथच्या पहिल्या दिवसाकरितां रचिलेलीं बोधवचनें.[4]

שמור לבי מענה हे माझ्या हृदया! तुझे उद्गारें सांभाळ. अति नम्रहो, देवाचें भय धर आणि त्याचीं सरळ वचनें मोज.

---

१ इ. चांगल्या मिष्टान्नानें. २ नीति अ. ६. ओ. १६–१८. ३ इ. हात उभार. ४. हीं जीं पहिल्या दिवसाकरितां बोधवचनें आहेत, त्यांमध्यें २४८ करायाच्या आज्ञांचा सारांश आहे. या कवितेच्या पहिल्या वाक्यांतच कर्त्याचें नाम आहे; तें असें कीं, त्यांतील प्रत्येक शब्दाच्या आरंभीं त्याच्या नामांतील एक एक अक्षर आहे. ५. निर्गम अ. १९ ओ. ८ एथें लिहिल्याप्रमाणें "जें सर्व परमेश्वरानें ह्मटलें आहे तें आह्मी करूं," असे जे उद्गार आपल्या पूर्वजांनीं सीनाय पर्वताजवळ शास्त्र मिळतांना काढिले, ते केवळ आपणच काढिले आहेत असें प्रत्येक इस्राएलानें समजून ईश्वरी आज्ञांप्रमाणें वागण्यास प्रवृत्त व्हावें, असें अनुलक्षून लिहिलें आहे.

तो माझे अतिक्रम क्षमा करील, माझें सामर्थ्य वाढवील, आणि भोळ्यास चतुर करण्यास तोच ज्ञान देईल.

उल्लंघन करणारांस सरळ मार्गी लावण्याकरितां मुखास मधुर लागणाऱ्या ज्ञानाचें मी वर्णन करितों व तीं हत्यारांसारखीं रचितों.

जो माझें सामर्थ्य व माझा आश्रय याच्या नेमशास्त्रांतील करायाच्या आज्ञांचा मी आठव करितों; तो गुप्त गोष्टी उघड करणारा माझीं उल्लंघनें झांकील.

त्यांची संख्या (शरीरांतील हाडांच्या) सांध्यांच्या संख्येप्रमाणें दोनशें अठ्ठेचाळीस असून हीं जशीं खिळ्यांनींच बसविलीं आहे.

त्या आज्ञा सीनाय पर्वतावर कळविल्या गेल्या व आकाशांतून ऐकविल्या गेल्या; आणि त्या एकंदर दहा आज्ञा वर रचिलेल्या आहेत.

त्या (दहा आज्ञा) विलक्षण आकाराच्या अक्षरांनीं कोरलेल्या होत्या, आणि त्यांमध्येंहि या सर्व आज्ञांची संख्या दर्शविलेली आहे.

तुझ्या तारणारानें व बोधणारानें त्या मोठ्या चौकशीनें "तुझ्या शेजाऱ्याचें जें कांहीं असेल त्याजवर लोभ धरूं नको" या आज्ञेच्या शेवटपर्यंत दिल्या आहेत.

तेव्हां सर्वज्ञ देव चमत्कारिक व भयंकर गडगडाटाच्या वाणीनें जसा टेंकड्यांवरून उड्या मारीत व डोंगरांवरून कुदत आला.[1]

जेव्हां त्यानें त्यांसीं भाषण केलें, तेव्हां त्यांस कंप सुटला, आणि भयानें व घाबरण्यानें केवळ त्यांचा प्राण निघून गेला.

तेव्हां त्यानें आपल्या लोकांवर व दासांवर धुक्यांतील दहिंवराप्रमाणें दयेची वृष्टि केली, आणि त्यांच्या कुडीमध्यें आत्मा पुनः घातला.

(आणि त्यांस ह्मणाला) ज्यानें तुजला मिसरांतून काढिलें तो मीच; ज्यानें तुजला सुबोध केला तो मीच; आणि ज्यानें तुजला सरळ मार्गी चालविलें तो मीच.

भयंकर देवाचें एकत्व दिवसांत दोन वेळां मान्य करावें; आणि प्रत्येक दिवशीं संध्याकाळीं व सकाळीं त्याचीच प्रार्थना करावी.

---

१. हें शेलोमोचें गीत अ. २ ओ. ८ वरून लिहिलें आहे.

पूर्ण मनानें त्याची सेवा करावी, त्याजवर प्रीति करावी, त्यास लगटून रहावें, आणि त्याच्या मार्गानें आपलीं पावलें व आपली गति चालवावी.

मोठ्या धैर्यानें त्याचें नाम पवित्र मानावें, त्याच्या रागाचें भय धरावें, आणि त्याच्याच नामानें शपथ घ्यावी;[१] परंतु व्यर्थ व खोटी शपथ घेऊं नये.

त्याचा न्याय यथार्थ मानावा, त्याच्या यथार्थतेप्रमाणें वर्तावें, त्याचें नेमशास्त्र पाळावें, आणि त्याच्या ह्मणण्याप्रमाणें करावें.

त्याचीं आरोग्यतावर्धक वचनें आपल्या हृदयावर व मुखपाठ राखावीं, आणि तीं दरवाज्याच्या बाह्यांवर व कवाडावर लिहावीं.

तूं तीं आपल्या लेंकरांस व शिष्यांस नेहेमीं शिकवावीं, आणि प्रत्येक दिवशीं शंभर धन्यवाद पूर्ण करण्यास जपावें.

पुत्रांतील ज्येष्ठांस खंडून घ्यावें, तेफीलीनीनें शृंगारित व्हावें, केनाआनी मनुष्यावर आपला अधिकार बसवावा, आणि भ्रष्ट मासाची सुंता करावी.

गाढवाचें प्रथम फल खंडून घ्यावें, शाब्बाथ पाळावा, आणि नेमिलेल्या दिवशीं ईश्वरस्तवन पूर्ण करावें.

तूं आपल्या वस्त्राचे कांठास आपणासाठीं झालर करावी; दीन व दरिद्री यांस उसणें द्यावें, आणि दयेच्या भाषणानें त्यांचें समाधान करावें.

अवकाश असतां व घाई असतांहि जेवणानंतरचा धन्यवाद करण्याचा नियम राखावा; ह्मणजे प्रायश्चित्ताच्या दिवशीं उपास करितांना अशक्त वाटणार नाहीं.

गरीबाचें ठेवलेलें गहाण परत करावें, तें तुजपाशीं राहूं नये; आणि लुटून अथवा व्यापारांत फसवून घेतलेलेंहि लागलेंच परत करावें.

वृद्ध मनुष्याशीं त्याच्या वृद्धपणावरून व वयावरून नम्र व्हावें; त्यापुढें उठावें आणि त्याचा मान राखावा.

शास्त्र स्वतां शिकून इतरांसहि शिकवावें, आपल्या आईबापांचा सन्मान करावा, इतरांचा हरविलेला पदार्थ सांपडल्यास परत करावा, आणि प्रत्येक प्रथम फल पवित्र करावें.

---

१. अनुवाद अ. ६ ओ. १३ २. टीका ४५. ३. गीत ११३–११८ शेवटपर्यंत.

दरिद्र्यांची दया करावी, रोग्याचा समाचार घ्यावा, शोक करणारांचें समाधान करावें, आणि ज्यांवर मरणाचा निवाडा होतो, त्यांस पुरावें.

दरिद्रानें नाडलेल्यांस उदार हातानें द्यावें, परंतु शत्रूंमधील पहिला जो आमालेक यास मारून नाश करावा.

पेसाहापूर्वी फुगवण काढून तें अगदीं नाहींसें करावें, आणि अन्य देव, मूर्ति व त्यांचीं भजनवनें हीं जाळून टाकावीं.

विश्रांतीच्या दिवशीं सुखानें व निर्भयपणें आनंद करावा, सणांतही हर्ष करावा, आणि परक्यावर प्रीति करावी.

आपल्या शक्तीप्रमाणें व करवेल तसा दानधर्म करावा, आणि लादलेल्या पशूवरील भारी ओझें उतरण्यास व काढण्यास सहाय करावें.

शास्त्राभ्यासांत आनंद मानणाऱ्या विद्वानाचा आदरसत्कार करावा, कारण झाल्यास शेजाऱ्यास निषेधावें, आणि मित्रावर प्रीति करावी.

पूर्णता व नम्रता साधावी, हर्षानें शाब्बाथाचें व सणाचें पवित्रीकरण द्राक्षरसानें करावें, आणि पवित्र स्थानाचें, ज्ञान्याचें व आईबापांचें भय धरावें.

याप्रमाणें लेंकरांस विश्वासूपणानें व हर्षानें शिकवावें आणि तुजबरोबर पोरक्यानें, विधवेनें, लेव्यानें व विदेशानें हर्ष करावा.

गरीबाच्या दहाव्या भागाविषयीं व दुसऱ्या दहाव्या भागाविषयीं सांभाळावें, आणि मंडपाच्या सणाचा पहिला व आठवा दिवस हे पवित्र मानून त्यांचा सन्मान करावा.

दहाव्या भागाचा दहावा भाग लेव्यानें याजकाकरितां काढावा[२], दहावा भाग काढल्यावर त्याविषयीं कबूल व्हावें,[३] पशूंचाहि दहावा भाग काढावा आणि शेरडांची पहिली लेंकर याजकांस द्यावी.

(देव ह्मणतो) माझें पवित्र दान[४] आणि दुसरा दहावा भाग तुह्मीं[५] माझ्या मंदिरीं खावा, आणि पहिला उंडा काढावा.

---

१. आभाळ पाहाणाऱ्यावर व ठोकताळ्यावर भरंवसा ठेवूं नये, पूर्ण भरंवसा दयाळू ईश्वरावर ठेवून पूर्ण असावें, अनुवाद अ. १८ ओ. १३–१५ पाहा. २. गणना अ. १८ ओ. २६. ३. अनुवाद अ. २६ ओ. १२–१५ पर्यंत लिहिल्याप्रमाणें. ४. अर्पण. ५. याजकांनीं.

पडायाच्या लागास आलेल्या दरिद्र्यास धैर्य द्यावें, ह्मणजे तूं कधींच पडणार नाहींस; सातव्या वर्षी तुझ्या शेतांत आपोआप आलेलें पीक व खशी न केलेल्या वेलाचीं द्राक्षें घेऊं नये; तीं दरिद्र्याकरितां सोडावीं.

तुझें कर्ज व कापणी करितांना राहिलेला कोन आणि फलें, धान्य व द्राक्षें एकवटतांना जें राहील तें सर्व सोडावें.

कापणी करितांना जें धान्य पडेल तें आणि द्राक्षें गोळा करितांना जीं पडतील तीं कांहींच अडथळा न आणितां निराश्रित गरीबांसाठीं सोडावीं.

अशा गरीबाकडे लक्ष दे; तुझ्या चाकरास लादून दे, आणि तुझ्या दरिद्री भावास गरज पुरेल इतकें उसनें दे; आपलीं स्वइच्छेचीं अर्पणें व आपले नवस लवकर फेड; नाहीं तर कदाचित् तूं ठेंचळून पडशील.

भावास सहाय करण्यांत हर्ष व आनंद मानावा, आणि अर्पणांतून जें उरेल तें भट्टींत टाकून अग्नीनें जाळावें.

घाण सुटलेलें ओंगळ मांसहि अग्नीनें जाळावें; आणि पेसाहाचे अर्पणाचें मांस भाजून आणि त्यासंगें न फुगलेली भाकर व कडवट भाजी खावी.

मीं तुह्मांस तारिलें याच्या आठवणीसाठीं स्थापन झालेल्या पेसाह सणाचा पहिला व सातवा दिवस पवित्र मानावा, आणि कापणीच्या प्रथम पेंढीनें सप्तकांचा सण पाळावा.[1]

स्मरणाचा जो गजराचा दिवस तो पाळावा, प्रायश्चित्ताच्या दिवसाविषयीं कांहीं चूक होऊं नये, आणि मंडपाचा सण हा चार निवडक वनस्पतींनीं पाळावा.

त्या वनस्पति येणेंप्रमाणें—फुलझाडासारखें नाजुक वाळुंज, सुंदर पालवट झाडाच्या फांद्या,[2] शोभित झाडांचें फल,[3] आणि खजुरीच्या झावळ्या.

उंच पदाचा जो याजक यानें विधवेला अव्हेरावें, परंतु कुमारीशीं लग्न करावें, आणि हात उभारून इस्राएलास आशीर्वाद द्यावा.[4]

त्यास वस्त्र व घरें शुद्धाशुद्ध ठरविण्याच्या वेळेची, आणि तीं कशावरून व कशीं शुद्धाशुद्ध ठरवावीं याची, अन्नार्पणाचे तुकडे करण्याची आणि

१. वर्षप्रतिपदा. २. मटलीच्या. ३. महाळुंग. ४. गणना अ. ६. ओ. २३–२७.

त्या अन्नार्पणांतून स्मरणासाठीं कांहीं जाळून परमेश्वराला सुगंध असें करण्याची पूर्ण माहिती असावी.

त्यानें अर्पण करणारे व अर्पण खारविणारे[1] नेमावे, आणि प्रायश्चित्तकरून (इस्त्राएलाच्या सर्व अपराधांची) क्षमा मिळवावी.

(त्या मुख्य याजकास) तेल ओतण्याची, अन्नार्पण मिश्रित करण्याची, गोऱ्हा व कोंकरा अर्पिण्याची, पक्षाची मान नखानें कापण्याची, रक्तपात्रांत घेण्याची, आणि अन्नार्पणांतून स्मरणासाठीं कांहीं घेण्याची माहिती असावी.

याप्रमाणें त्यानें या लोकांस ओवाळणी करण्यास व रक्त शिंपडण्यास शिकवावें; आणि अर्पिलेल्या पशूचे खांदे व छाती हीं नेहेमींच्या नियमाप्रमाणें त्यानें घ्यावीं.

पूजनाच्या वेळीं आणि पडद्याच्या आंत जातांना पांघरण्याकरितां त्यानें आपणाकरितां पीळ घातलेल्या सणाचीं वस्त्रें करावीं.

आकाराप्रमाणें राहुटी करावी, योग्य रीतीप्रमाणें दर्शनीय भाकऱ्या कराव्या, आणि अभिषिक्त करण्याकरितां व दिवे उजळण्याकरितां तेल तयार करावें.

यज्ञवेदि स्थापन करावी, सांगितलेल्या मिश्रणाप्रमाणें सुगंध तयार करावा, दर्शनीय भाकऱ्यांचे सहा सहांचे दोन थर रचावे, आणि प्रथम उत्पन्नाच्या दोन भाकऱ्या आणाव्या.

शांत्यर्पणें करावीं, वांटे काढावे, आणि होम व दुसरीं अर्पणें करावीं आणि सांगितलेल्या (तीन) सणाचीं तीन दानें आणावीं.

ओमेराची पेंढी ओवाळावी, शाब्बाथाचा दिवा लावावा, शास्त्र ऐकावयास लोकांस एकवटावें, आणि न्यायाधीश व अधिकारी नेमावे.

जीवाच्या वादाविषयीं, मालमत्तेच्या वादाविषयीं आणि मुख्य चार प्रकारच्या नुकसानाच्या वादाविषयीं[3] फार बारकाईनें चौकशी करावी.

वर्षांतील महिन्यांचा काळ बरोबर नेमावा, आणि याजकपणाच्या चोवीस देणग्यां देण्याचे नियम नीट पाळावे.

---

१. लेवी अ. २ ओ. १३. २. लेवी अ. १ ओ. १५. ३. टीका. ४६. ४. टीका. ४७.

ऋतु पालटण्याच्या वेळाचें गणीत बरोबर करावें, हानुक्काचे सणाचे दिवे लावावे, आणि दोन दहावे भाग[1] घेऊन येरुशलेमेस जाऊन दर्शन घ्यावें.

शास्त्रांतील पांच पुस्तकांची प्रत प्रत्येकानें हर्षानें करून ठेवावी, प्रत्येकानें पवित्र व्हावें, आणि अशुद्धानें नेमलेल्या वेळीं अंघूळ करून शुद्ध व्हावें.

शाब्बाथ दिवशीं तुझ्या पशूनें, दासानें, दासीनेंहि विसावा घ्यावा; आपल्या भूमीचें प्रथम फल ईश्वरास वाहावें, आणि तें अर्पितांना ईश्वराची दया वर्णावी[3].

पेसाहाचें अर्पण कंबर बांधून खावें, खरी तराजू राखावी, आणि ज्येष्ठपुत्रास दुप्पट वांटा द्यावा.

दोन प्रकारचीं मापें व तोल न राखण्याचे, मुखांतून जें निघतें तें पूर्ण करण्याचे, आणि पाडावांस सोडविण्याचे नियम सांभाळावे.

इब्री दासीस नेमिलेल्या खुणेवरून[4] सोडावी, आणि तटबंदीच्या नगराचे व खेड्यांतील घराचे नियमहि[5] राखावे.

कोणामनुष्यानें आपल्या विकत घेतलेल्या इब्री दासासीं वादकरून हट्ट करूं नये; योबेल[6] आल्यास किंवा त्याचा धनी मेल्यास तो मोकळा व्हावा.

इब्री दासीनें सहाव्या वर्षाच्या शेवटीं किंवा योबेल आल्यास मोकळें व्हावें, जर एकाद्यानें एकादा पवित्र पदार्थ खाल्ला, तर त्यानें तो भरून देऊन आणखी त्याचा पांचवा भाग द्यावा; आणि न जाणून हत्या करणारास पळून जाण्याकरितां सहा नगरें नेमून ठेवावीं.

मागणी केलेल्या दासीचे नियम, मान उडविण्याच्या कालवडीचे नियम आणि शुद्ध नसल्याकारणें जे पेसाह सण पाळूं शकत नाहींत, त्यांनीं दुसऱ्या महिन्याच्या पौर्णमेस तो पाळावा, हे नियम चांगले राखावे.

स्त्रियांनीं टांकींत[7] अंघुळ करून आपल्या विटाळाची शुद्धता करावी,

१. टीका ४८. २. दुसरा दहावा भाग व पशूचा दहावा भाग. ३. प्रथम फल ईश्वरास वाहातांना अनुवाद अ. २६ ओ. ५—१० पर्यंत म्हणावें लागतें. ४. वयांत आल्यावर. ५. लेवी अ. २५ ओ. २९—३१. ६. पन्नासावे वर्षाचा सण. ७. टीका २९ पाहा.

समाजाकडून कांहीं चूक झाल्यास गोऱ्हा अर्पावा[1], आणि प्रायश्चित्ताच्या दिवशींहि गोऱ्हा अर्पावा.

अशुद्धास नेमिलेलें अर्पण करून शुद्ध करावें, दोषहारक अर्पण करावें आणि वीस अधिक अर्पणें[2] करावीं.

निःसंशयाचें चुकीचें व संशयाच्या चुकीचें शक्तीप्रमाणें चढतें किंवा उतरतें[3] अर्पण करावें, एकाद्या पवित्र कामासाठीं वाहिलेला पदार्थ दुसऱ्या कामास लावण्याविषयीं जपावें, आणि नवसांची योग्यता पाहावी.

बाहेर बसण्यासाठीं छावणी बाहेर जागा पाहून मळ झांकण्याकरितां माति खणायासाठीं कंबरेशीं एक मेख राखावी, ओमेरचे[4] एकुणपन्नास दिवस मोजावे, आणि पक्षाचा घरोटा सांपडल्यास पिलीं घेऊन आईस रानांत मोकळी सोडावी.

सर्व प्रकारच्या अशुद्धतेपासून, ह्मणजे सरपटणारे प्राणी, मेलेले प्राणी, अशुद्ध मनुष्य, आणि अशुद्ध खाणें व पिणें यांपासून दूर राहावें.

अशुद्ध पदार्थांचा स्पर्श झाल्यानें, स्त्रीसंगानें, आणि स्वप्नावस्थेंत धातुपातानें अशुद्ध असावें, निसंतान भावाची विधवा आपण घ्यावी, आणि पूरीमचें पत्र ह्मणजे एस्तेरचें पुस्तक वाचावें.

जो आपल्या भावाचें नाम उठवायास नाकारितो, त्याचें पायतण सोडून त्याच्या तोंडापुढें थुंकावें; आणि जी बाई पुरुषाचीं लज्जांगें धरिते, तिचे तळहात कापून टाकावे.

पाडाव करून आणिलेल्या स्त्रीचा कायदा, आणि सफल होऊन वाढा हे नियम सांभाळा, नागव्यास वस्त्र नेसवा, आणि पेय अर्पण थंड पाण्याचें करा[5].

लावलेले झाडाचें पहिल्या तीन वर्षांचें फल असुंति ह्मणजे अशुद्ध

---

१. लेवी. अ. ४. ओ. १३–१४. २. टीका ४९. ३. लेवी अ. ५ ओ. ५–१३. अ. १२ ओ. ८ इत्यादि. ४. पेसाहाचा पहिला दिवस व शावूओथ यांमधील एकुणपन्नासदिवस ते. ५. हें थंडपाण्याचें पेयअर्पण मंडपाच्या सणांत मात्र केलें जात असे.

मानिलें जावें, राजानें आपणाकरितां शास्त्राची एक प्रत करून ठेवावी, आणि मजूराची मजुरी त्याच दिवशीं फेडावी.

आशीर्वादाचा व श्रापाचा नियम, आणि कर देण्याचा व वतन पावण्याचा नियम हे राखावे, मोठ्या दगडास गिलावा करावा आणि योबेलांत सर्वांस मोकळीक द्यावी.

समाजांत कर्णा वाजवावा, उपकार मानण्याचे ओवाळलेले भाग याजकास द्यावे आणि बाळंत झालेल्या बाईनें आपल्या रक्तस्रावापासून शुद्ध होण्यास अंघुळ करावी.

तांबडी कालवड जाळावी, ओवाळलेला ऊर याजकास द्यावा, एफाचा दहावा भाग काढावा, आणि याजकास देण्याचा भाग काढावा.

कर देण्यास मान्य होणाऱ्या नगरास राखावें; परंतु खऱ्या देवाची सेवा करण्यास नाकारून मूर्तिपूजा करणाऱ्या लोकांचा नाश व विध्वंस करावा.

जें नगर लढाईत बंद राहील, तें दगड सुद्धां पाडून टाकावें, आणि मेलेल्या प्राण्याचें शव विदेशास द्यावें, किंवा परक्यास विकावें.

प्रत्येकानें आपल्या जीवाच्या खंडणीकरितां अर्धा शेकेल द्यावा, अन्य देवाच्या पूजेकडे वळविण्यास फुसलावण्याकरितां जो आपली वाणी उंचावतो, त्यास धोंडमार करावी.

स्वप्न पाहणारानें आपल्या स्वप्नावरून खोटें भविष्य कथण्यास उन्मत्त होऊं नये ह्मणून त्याचा, आणि बेत करून खोटी साक्ष देणारा याचा सारखा नाश करावा.

एकाद्याविषयीं वाईट बातमी काढून त्याची नालस्ती करणाराचा सूड घ्यावाच घ्यावा, आणि स्रावी व कोडी हे पाणीं शिंपडण्यानें शुद्ध व्हावे.

आपोआप मेलेल्याच्या किंवा वधलेल्याच्या शवास स्पर्श केल्यानें जो अशुद्ध होतो, तोहि असाच शुद्ध व्हावा; आणि इतरानें भ्यावें ह्मणून मूर्तिपूजेकडे भुलविणाराचा नाश करावा.

भांडणांत शेजाऱ्यावर घाव करणारानें त्याची लज्जा झांकण्याकरितां

१. अनुवाद अ. ११, ओ. २९. २. अनुवाद अ. २७, ओ. २. ३. निर्गम अ. ३०, ओ. १२. व १३.

पांच प्रकारें फेड करावी;[१] आणि पक्षी कापला असतां त्याचें रक्त सुक्या मातीनें झांकावें.

ज्या स्त्रीविषयीं व्यभिचाराचा संशय येतो, तिला ताडून पाहण्याकरितां तिला कडू पाणी पाजावें[२]; आणि अपघात होऊं नये ह्मणून आपल्या घराच्या धाब्याला वरंडी करावी.

वरानें एक वर्षपर्यंत आपले घरीं अलिप्त असावें, त्यानें एक वर्षपर्यंत लढाईंत जाऊं नये, आणि दुसरे नियम उल्लंघूं नयेत.

लढाईंत जाण्याकरितां जो याजक नेमिला जातो, त्यानें आपला हात उभारून व भाषण करून हत्यारबंद झालेले लोकांतून कोणी भिऊं नये ह्मणून धैर्य द्यावें.

(ईश्वर ह्मणतो) या माझ्या आज्ञा आहेत, हे माझे नियम आहेत, हे माझे विधि आहेत, आणि ते सर्व पूर्ण व सरळ आहेत.

याप्रमाणें आचरण करण्यास सिद्ध असणारास जीवन प्राप्त होतें; परंतु त्याजकडे दुर्लक्ष करणाराचा नाश होतो; आणि हे नियम सांभाळण्यास जो दुसऱ्यास बोध करितो, तो आकाशांतील ज्योतींसारिखा प्रकाशेल.

याप्रमाणें आचरण करण्यास जो सावधगिरी राखितो, त्यास मोठें वेतन मिळेल, आणि सरळपणें वर्तणारे सुंदर प्रकाशानें मुगुटमंडित होतील.

शाबूओथची तिसऱ्या प्रहरची प्रार्थना मागें सांगितल्याप्रमाणें करितात; परंतु तिजमध्यें पहिल्यादिवशीं रूथेचें अर्धे पुस्तक वाचतात, आणि दुसऱ्या दिवशीं अर्धे वाचून पूर्ण करतात.

बोधवचनें.

दुसऱ्या दिवसाकरितां मनाईच्या आज्ञा.

בצל שדי אחסה सर्वसमर्थाच्या आश्रयाखालीं मी निवारा घेतों, त्याचा यथार्थपणा मी झांकित नाहीं. आणि मनाईच्या आज्ञांमध्यें जो त्याचा सरळपणा आहे तो मी कळवितों.

---

१. टीका. ५०. २. गणना अ. ५ ओ. ११–३१.

त्या आज्ञांचा लेख सत्यानें व खऱ्या साक्षीनें झाला आहे, त्यांचा शोध केला असतां त्या एक वर्षांतील दिवसांच्या संख्येएवढ्या आहेत.

त्या मोत्यांपेक्षां मोलवान असून सामर्थ्यवान् पूर्वजांच्या[1] कन्येस देण्याकरितां त्या अलंकारानें शृंगारित करून राखून ठेविल्या होत्या.

अगे माझ्या बहिणी माझे प्रीये! मला भेटायास सामोरी ये, माझें शास्त्र ऐक आणि माझा बोध स्वीकार.

मी तुजवर आवड ठेविली व प्रीति केली, तुजला अग्नीच्या ज्वालेंतून सोडविलें, आणि शुद्ध गाळलेल्या सोन्याच्या हारानें तुजला शृंगारिलें.

(यास ती कन्या उत्तर करून ह्मणते कीं) डोंगरावरून उड्या मारीत येणाऱ्या माझ्या वल्लभाची वाणी ऐकावयास मी हजारांसीं व दहा हजारांसीं बाहेर आलें.

(ती वाणी येणेंप्रमाणें)—सीनाय पर्वतावर मी तुजला हाक मारून सांगीतलें कीं, मी परमेश्वर आहें, मजसमोर तुजला दुसरे देव नसोत.

तूं दुष्टाईनें किंवा मूर्खपणें मूर्त्ति करूं नको, आणि त्यास चेतविण्याकरितां मूर्त्ति राहूं देऊं नको.

ज्वालारूपी ईश्वरास तूं भिऊन रहा, आपले घरीं ओंगळ मूर्त्ति आणूं नको, स्तंभ उभारूं नको, आणि भजनवनें लावूं नको.

व्यर्थ गोष्टी ऐकण्यापासून व व्यर्थ गोष्टींवर विश्वास ठेवण्यापासून दूर रहा; आणि माझीं थोर नामें व्यर्थ घेऊं नको.

व्यभिचार करूं नको, चोरी करण्याकडे वळूं नको, आणि शेजाऱ्याचें जें असेल त्याजवर लोभ धरूं नको, या आज्ञा तूं सांभाळ; नाहीं तर देवाचा राग चेतेल.

मी जीवाच्या रक्ताची झडती घेतों ह्मणून त्याकरितां तूं फांस मांडूं नको; आणि आंधळ्यास पाडण्याकरितां त्यापुढें ठेंच ठेऊं नको.

तूं खोटी साक्ष देऊं नको, अनाथांस पीडूं नको, आणि भांडणारांचें भांडण चेतविण्यासारखें भाषण करूं नको.

तूं प्रवाशांस त्रास देऊं नको, कोरींव दगडाची वेदी बांधूं नको, आणि इतर राष्ट्रांच्या[2] देशांप्रमाणें तुझ्या देशांत व्यभिचार वाढूं देऊं नको.

---

१. आब्राहाम, इसहाक, व याकोब यांच्या. २. इस्राएल लोकांस.

तूं न्यायाधीशास श्रापूं नको, ईश्वरी नाम विटाळूं नको, आपला द्राक्षमळा सगळा खुडूं नको, आणि त्यांतील पड वेचूं नको.

तूं बहिऱ्यास श्रापूं नको, ईश्वराकडून या जुलमाची चौकशी होईल; आणि नागरतांना बैल व गाढव एकत्र जुंपूं नको.

तूं लोभानें आपल्या पिकलेल्या फलांतून व रसांतून अर्पायास उशीर करूं नको, आपल्या शेजाऱ्यास ठकवूं नको, आणि आपले नवस फेडायास उशीर लावूं नको.

तूं आपल्या मजुरावर जुलूम करूं नको, कापणी केल्यावर सर्व एकवटूं नको, आणि जेव्हां बैल मळणीकरितां पेंढ्या तुडवितो, तेव्हां त्याचें मुसकें बांधूं नको.

तूं आपलें जाईताचें झाड झोडतांना सर्व डाहाळ्या झोडूं नको, तुझ्या शेताची कापणी करितांना कोनासुद्धां कापूं नको; आणि व्यापारांत व भाषणांत आपल्या शेजाऱ्याशीं दगा करूं नको.

ज्याचें मन पापानें भरलें असेल त्यास तूं क्षमा करूं नको, त्यास निषेध कर; तरी त्याच्या वैरभावाप्रमाणें तूं आपल्या मनीं त्याचा हेवा करूं नको.

मी तुझा सूड घेऊं नये ह्मणून तूं आपल्या लोकांतील कोणाचा सूड घेऊं नको, आणि मजुराची मजुरी आपणापाशीं रात्रभर राखून ठेवूं नको.

तूं आपल्या भावाशीं वैर करूं नको, भूतसंचाऱ्याशीं प्रश्न विचारूं नको, आणि बापास पुत्राकरितां आणि पुत्रास बापाकरितां मारलें जावूं देवूं नको.

तूं खोट्या मार्गीं लावणाऱ्या भविष्यवाद्याचीं वचनें ऐकूं नको, आणि तुजला भुलविणाऱ्या पशुवत् मनुष्यांमागें तूं वळूं नको.

तूं दासास बंदांत पाडूं नको, कोणाची तोंडओळख धरूं नको आणि अन्य देवाचें नाम तूं आपल्या तोंडीं उच्चारूं नको.

तूं इतराच्या पैक्याचा लोभ धरूं नको, त्याचा रक्तपात होत असतां

तूं मुकाट्यानें उभा राहूं नको,[१] आणि खोट्या शपथा वाहायास शिकूं नको.

तूं माझे नियम मुखपाठ राखण्यास सांभाळ; गरीबाचीहि तोंडओळख धरूं नको, अधिक व्याज किंवा व्यापारांत अधिक किंमत घेऊं नको.

तूं न्याय उलट करूं नको ही आज्ञा सांभाळ, नाहीं तर तुझ्याकडून अन्याय होईल; अनाथ, विधवा व प्रवासी यांचा न्यायहि तूं उलट करूं नको.

तूं लांच घेऊं नको, एकट्याची साक्ष मान्य करूं नको, आणि रक्त[२] व मांस एकत्र खाऊं नको.

तूं अंधारांत कोणास लुटून त्याची मत्ता घेण्याचा लोभ धरूं नको; आणि आपोआप मेलेलें किंवा भुतास अर्पिलेलें खाऊं नको.

तूं फाडलेलें किंवा ओंगळ ह्मणून उडवून दिल्हेलें खाऊं नको; आणि खरें माप उणें करण्याकरितां तूं आपलें माप उणें करूं नको.

तूं भूमीच्या मोजणींत, पैक्याच्या वजनांत व (धान्याच्या) मापांत कांहीं वाईट करूं नको.

तूं तुझें अन्न अधिक व्याजानें देऊं नको, नाहीं तर तुझा नाश होईल; आणि गुप्तपणें कोणाची अपकीर्ति करायास त्वरा करूं नको.[३]

तूं आपला हात दुष्टांबरोबर व दुष्कर्म्यांबरोबर ठेऊं नको; आणि आपला मित्र किंवा भाऊ यापासून परक्याप्रमाणें जबरीनें कामगिरी घेऊं नको.

तूं एखादी पेंढी शेतांत विसरून राहिली, तर ती घेण्यास परत जावूं नको; ती विधवा, अनाथ व विदेशी यांस दिली जावी.

तूं सातवें व योबेलाचें वर्ष पाळून त्या वर्षी आपल्या शेतांत काम करण्यापासून बंद राहा; तुझ्या पिकांत जें आपोआप उगवतें तें कापून

---

१. शेजाऱ्याचा जीव धोक्यांत असतां मौज पाहात किंवा मुकाट्यानें उभे राहूं नये, आपणाकडून जेवढें सहाय होईल तेवढें केलें पाहिजे. २ या आज्ञेवरून कापलेल्या प्राण्याचेंच रक्त व मांस एकत्र खाण्याची मनाई आहे एवढेंच नाहीं, परंतु जीवंत प्राण्याचें मांस कापून घेऊन तें खाण्याचीहि मनाई आहे. इब्री मूळवाक्यांत रक्त या शब्दाकरितां जीव हा शब्द योजिला आहे, कारण रक्त हें केवळ जीवच आहे. ३. इ. तुझ्या पायानें धावूं नये.

वेऊं नको, आणि आपणाकरितां राखून ठेवलेल्या द्राक्षवेलाचीं द्राक्षेंहि तूं वेंचूं नको.[१]

तूं आपली भाकर उत्पन्न करण्याकरितां शेताच्या कांठींहि पेरूं नको, तूं आपला द्राक्षमळा खशी करूं नको; तरी त्यांत कांटेरीझाडें उगवूं देवूं नको.

तूं आपल्या कापणीची प्रथम पेंढी मजपुढें आणिल्यापूर्वी त्यांतून भाजून किंवा भाकर करून किंवा हिरवें सुद्धां खाऊं नको.

तूं आपल्या झाडाचें चौथ्या वर्षाचें फल स्तुतिपर वाहिल्यापूर्वी असुंती फल खाऊं नको; आणि धनवान किंवा नाडलेल्या दरिद्र्याचाहि अयोग्य रीतीनें सन्मान करूं नको.

तूं संकटांत पडलेल्या दारिद्र्यापासून वाढ घेणाऱ्यासारिखा होऊं नको, आणि अंधळें किंवा कोणत्याहि प्रकारचें खोडकर अर्पूं नको.

माझ्या अभिषिक्त याजकांनीं पायऱ्यांनीं माझ्या वेदीवर चढूं नये; आणि पेसाहाचें अर्पण तूं आपल्या दारांत अर्पूं नये.[२]

तूं पेसाहाकरितां आपलीं सर्व भांडीं शोधून फुगवण काढावें, आणि चौदाव्या तारखेस सहातास दिवस आल्यावर तें जाळून एकविसाव्या तारखेपर्यंत आपले घरांतून नाहींसें करावें.

तूं पेसाहाचें अर्पणाचें मांस मिसरामध्यें घाईनें खाल्लेलें पेसाहाचे अर्पणाचे मांसाप्रमाणें घराबाहेर काढूं नको; आणि तें परका, असुंती, विदेशी व मजूर यांस वर्ज्य आहे.

तूं अर्पणांत फुगवण असतां ते अर्पून माझें अर्पण विटाळूं नको, गरीबाची गरज पुरविण्याविषयीं आपलें मन कठीण करूं नको.

तूं अधिकाऱ्यास श्रापूं नको; पेसाहामध्यें आपल्या हद्दींत फुगवण कोठेंच दिसूं देवूं नको, आणि त्या पाळायाच्या रात्रीचें मांस उजाडेपर्यंत राहूं देवूं नको.

तुमच्या शांतिकारक अर्पणाचे यज्ञ, आणि तुमच्या यज्ञाचें मांदें आणि सणाच्या यज्ञाचें मांदें, हीं कुजूं नयेत ह्मणून तींहि उजाडेपर्यंत राहूं देऊं नको.

---

१. जरी राखून ठेविलीं तरी या वर्षी तीं वेंचायास सर्वांस मोकळीक आहे.
२. पेसाहाचें अर्पण येरूशलेमेस आणून पवित्र मंदिरीं अर्पायाचें असें; अनुवाद अ. १६ ओ. ५ व ६ पाहा.

ज्या मांसाचा अशुद्ध पदार्थाशीं स्पर्श झाला असेल त्या मांसाविषयीं मनाई आहे; त्याप्रमाणें तूं आपल्या धान्याचा दहावा भागहि तूं आपल्या दारांत खाऊं नये.[१]

तूं आपल्या द्राक्षांचा व तेलाचा दहावा भाग, तुझ्या गुरांतील प्रथम जन्मलेलें, तुझ्या हाताचें दान व तुझे निवडक नवसहि (तूं आपल्या दारांत खाऊं नको).

तूं माझ्या नित्याच्या अर्पणाचें रक्त खाऊं नको, (एवढेंच नव्हे, परंतु) सर्व मांदें व रक्त हे दोन पदार्थ मना केलेले आहेत.

तूं मासे व पशू हे दोन प्रकारचे प्राणी व जातिजातीचे पक्षी हे, ज्या खुणांवरून ओळखले जातत, त्या नसल्यास खाऊं नको.

ज्यामध्यें कांहीं खोड असेल, जसा कुबडा, क्षती, अंधळा किंवा लंगडा, यानें माझें मधुर अर्पण वाहण्यास येऊं नये.

तूं परक्याच्या हातून असें कांहीं अर्पण अर्पायास घेऊं नये, आणि शेतकऱ्यानें आपल्या प्रथम जन्मलेल्या बैलाकडून कांहीं काम घेऊं नये.

(पवित्र ठिकाण सोडून) बाहेर (इतर ठिकाणीं अर्पिलेलें अर्पण) मान्य होणार नाहीं. आणि तूं आपल्या शेरडांच्या कळपास पाणी पाजितांना धुतोस तेव्हां आपल्या शेरडांतील प्रथम जन्मलेल्याची लोंकर कातरूं नको.

तूं खूण करून अर्पणाकरितां पवित्र ठरविलेला पशु तूं बदलूं नये; आणि उचलून दान केलेले अर्पणांतून अशुद्धानें व परक्यानें खाऊं नये.

तूं ईश्वरास वाहण्याकरितां कुत्र्याचें मोल किंवा व्यभिचारीणीची भाड आणूं नको; आणि जवांच्या नैवेद्यांत कांहीं धूप घालूं नको.[२]

तूं अभिषिक्त करण्याचें पवित्र तेल आपल्या आंगास लावूं नको; आपल्या डोळ्यांमध्यें टक्कल करूं नको; आणि मेलेल्यांकरितां आपले शरीरावर कांहीं घाव करून घेऊं नको.

तूं दुसऱ्या कोणत्याहि कामाकरितां पवित्र सुगंधाचें मिश्रण करूं

---

१. अनुवाद अ. १२ ओ. ६ व ७ पाहा. २. शंकेचे अर्पणांत. गणना अ. ५ ओ. १५.

नको, याविषयीं तूं सावध राहा;[1] आणि जो गुप्तपणें खून करितो त्यास सोडण्याकरितां त्याच्या जिवाची खंडणी घेऊं नको.

तूं मांडींतल्या शिरेची गोष्ट कदाचित विसरशील ह्मणून सांभाळ;[2] आणि इब्रीदासास मोकळें सोडण्याची आज्ञा तुझ्या दिसण्यांत कठिण नसो.

तूं पशु व त्याचें पिलूं यांस एकाच दिवशीं कापूं नये ही आज्ञा आपल्या मनीं मोठ्या काळजीनें राख; आणि तूं आपला पुत्र क्रूर मोलेखास[3] अर्पायास देवूं नको.

तूं शाब्बाथ दिवस (ईश्वरीइच्छेप्रमाणें) पाळावा ह्मणून सर्व काम धिक्कार आणि न फुगलेल्या भाकऱ्यांचा (पवित्र) मेळा, आणि प्रथम फळांचा (पवित्र) मेळा,[4] सांभाळ.

तूं यथार्थ आहेस, आणि तुझीं कर्में शुद्ध आहेत, असें ठरण्याकरितां स्मरणाच्या दिवसाचा मेळा,[5] आनंदाचा मेळा,[6] आणि प्रायश्चित्ताचा मेळा तूं सांभाळ.

तूं ज्या रात्रीं बंदांतून निघालास त्या रात्रीच्या स्मरणाचा जो पेसाह त्याच्या अर्पणाच्या कोंकराचें हाड तूं मोडूं नको; आणि नाझीराच्या[7] डोक्यावरून वस्त्रा फिरवूं नको.

त्यानें (नाझीरानें) आपल्या बापाच्या, बहिणीच्या, भावाच्या व दुसऱ्या नातलगाच्या प्रेतानें आपणास विटाळून घेण्याविषयीं आपल्या मुखांतून कोणतीच अटि काढूं नये.

त्यानें द्राक्षरस पिऊन आपले डोळे लाल करून घेऊं नये; आणि त्यानें द्राक्षरसाचा सिरका अथवा दुसरे असे पदार्थ खाऊं पिऊं नये.

तूं आपल्या शरीरावर गोंदून खुणा करून घेऊं नको; आणि जो ईश्वरी नामास श्रापितो त्यास पहिल्यानें फाशीं देऊन मग पुरावें.

तुझ्या तळांत जर कोणास रात्रीं अशुद्धता प्राप्त होते, तर त्यास तळांतून बाहेर काढावा; तुझ्या खडकरूप आश्रयाच्या दिसण्यांत तुजमध्यें कांहींच लाजिरवाणें नसावें.

तूं दरिद्र्यापासून कोणत्याहि प्रकारें अधिक व्याज घेण्याच्या कामीं

---

१. निर्गम अ. ३० ओ. २२–२३. २. उत्पत्ति अ. ३२ ओ. ३२. ३. टीका ५१. ४. शाबूओथ. ५. रोश हाश्शाना. ६. सुक्कोथ. ७ गणना अ. ६ पाहा.

असूं नको; आणि ज्याप्रमाणें अन्य लोक आपल्या देवांची पूजा करितात त्याप्रमाणें तूं आपल्या परम समर्थ देवाशीं करूं नको,' हा नियम सांभाळ.

तूं आपल्या भावाच्या बहकलेल्या किंवा ओझ्यामुळें खालीं पडलेल्या गुरांस पाहून डोळेझांक करून घेऊं नको; आणि अन्य लोकांच्या व्यर्थतेप्रमाणें तूं आपणांकरितां मूर्ति करूं नको.

तूं तागाबरोबर विणलेली लोंकर पांघरूं नको, आणि मद्य अथवा फुगवण तूं वाहूं नको.

तुह्मी माझी भाकर² किंवा माझ्या नामाचें पेय अर्पण आंतील कोशा-पुढील³ वेदीवर वाहूं नका.

तुह्मी नोफ ह्मणजे मिसर देशाच्या छायेखालीं आश्रय घेऊं नका; आणि जशी बंडखोर लोकांनीं तशी तुह्मी देवाची परीक्षा करूं नका.

तुह्मी ईश्वरापुढें दर्शन घ्यावयास रिकामेहातीं येऊं नये हा नियम सांभाळा; त्याच्या वचनाचें भय धरा, ह्मणजे तुह्मी सुरळीत वाहणाऱ्या नदीसारखें दीर्घायुष्य पावाल.

तुह्मी आपला आत्मा विटाळूं नका, हें ईश्वरीवचन पाळा; धैर्य धरून बळकट व्हा; आणि विदेशास जाचूं नका, कारण तुह्मींहि विदेशीच होतां.

तुह्मी शकून पाहूं नका (ही आज्ञा), अवमानणाऱ्याची मोठ्या धैर्यानें चौकशी करा; तुह्मी खोट्या रीतीनें वागूं, नका हें वचन पाळा; आणि सर्व प्रकारचा मळ उडवून टाका.

तूं कोंकरूं त्याच्या आईच्या दुधांत शिजवूं नको, हें वचन सांभाळ; ही आज्ञा पाळायास तूं अशक्त आहेस असें समजूं नको; आणि पेसाहाच्या पाळायाच्या रात्रीचें अर्पण तूं शिजवून किंवा कच्चें खाऊं नको.

---

१. अनुवाद अ. १२ ओ. ३-४. २. दर्शनीय भाकरी; याकरितां निराळेंच मेज असे. ३. इ. हरणीचीं पिलीं: शेलोमोचें गीत अ. ४ ओ. ५ वर टीकाकरणारांनीं याची उपमा कोशाच्या दोन काठ्यांस दिली आहे. ४. पेसाहचें अर्पण भाजूनच मात्र खावें अशी स्पष्ट आज्ञा आहे.

तूं आभाळावरून शकून सांगूं नको, हें वचन अवमानणाऱ्यामागें जाण्यापासून आपलीं पावलें राख; आणि जेव्हां दास मोकळे होऊन जातात, तेव्हां त्यांजवर दया कर.

तूं त्याचें वेतन उणें करूं नको, त्यांस पुरेल एवढें त्यांस पुरीव, त्यांस रिकामें घालवून दुःखित व खेदित करूं नको.

तूं त्यांजकडून गुलामाप्रमाणें सेवा करून घेऊं नको, कारण कीं माझे ते विकत घेतलेले दास आहेत.[1]

तूं गरीबापुढें आपला हात बंद करूं नको, आपली मान ताठर करूं नको; आणि उन्मत्ताप्रमाणें आपला पैका अधिक व्याजानें देऊं नको.

तूं जेव्हां जवळ राहणाऱ्या गरीबास व विदेशास देतोस, तेव्हां तुझ्या मनाला वाईट वाटूं नये; आणि तुझ्यामध्यें शकून पाहणारे व चेटकी न सांपडावे.

तूं आपल्या पुत्रास मूर्त्तीपुढें अग्नींतून चालवूं नको, आपली दाढी मुंडूं नको, आणि दुष्टांचा नाश करितांना आपल्या मनीं दया आणूं नको.

तूं अन्य लोकांबरोबर किंवा त्यांच्या देवांबरोबर करार करूं नको; आणि त्याप्रमाणें तूं आपणाकरितां मोडकें कूपें खणूं नको.

तूं त्यांचे नियम पाळून त्यांची संगत करूं नको, देवाच्या अशा शत्रूंस जिवंत राखूं नको व त्यांजवर दया करूं नको.

तुमच्या देशांत त्यांनीं राहूं नये, तुह्मी त्यांशीं लग्नसंबंध राखूं नये, आणि ज्याप्रमाणें ते व्यर्थ व निरुपयोगी गोष्टी करितात, त्याप्रमाणें तुह्मी आपणासाठीं मूर्त्तीपुढें नमन करण्यास रंगीत दगडांची फरसबंदी करूं नको.

जें नगर मजपासून वळून मूर्त्तिपूजा करितें,[4] त्याचा कांहींच शेषें[5] तूं राहूं देऊं नको; तें पुनः बांधलें न जावें, त्याचा समूळ नाश व्हावा.

---

१. लेवी. २५. ४२. २. इ निर्दय होऊं नको. ३. ईश्वर जो जीवनाचा झरा त्यास सोडून अन्य देव जे मोडक्या कूपासारखे आहेत त्यांस भजूं नये. इर्मेया अ. २ ओ. १३. ४. इ. मजविरुद्ध व्यभिचार करतें. ५. इ. कोणी उत्तर देणारा.

तूं बुद्धिहीन लोकांचा कोणताहि श्रापित पदार्थ तुझ्या हातास डसून राहूं देऊं नको, परक्यानें उलथापालथ केल्याप्रमाणें त्याचा धुळीचा ढीग व्हावा.

तूं आम्मोन्यांची दाणादाण कर व मोआब्यांस विखर, आणि व्यभिचारिणीच्या पुत्रास माझ्या निवडक लोकांच्या समाजांत येऊं देऊं नको.

तूं त्या क्रूर व तुजवर उठणाऱ्या लोकांशीं समेट करायास इच्छूं नको, आणि फांस मांडून आपणावर रक्तपाताचा दोष आणूं नको.

तूं निर्दोषास, यथार्थास व गरीबांस मारूं नको; आणि लेव्यांस तूं विसरूं नको, तरी त्यांस देशाचा विभाग नसावा.

तूं मेलेल्याकडे जाऊन कांहीं शोधूं नको, कारण त्याजपाशीं कांहीं सत्यता नाहीं; आणि चेटकी हा ठकविद्या करितो ह्मणून त्यास छेदून टाक.

तूं आकाशीं वास करणाराच्या आज्ञेप्रमाणें आपल्या शेजाऱ्याची सीमा सारूं नको; आणि जेव्हां तूं मोरचा बांधितोस तेव्हां कोणतेंहि फळझाड तोडूं नको.

तूं आपल्या विचाराप्रमाणें आपल्या कन्येस व्यभिचारास लावून विटाळूं नको; आणि आपल्या बायकोस सोडल्यानंतर दुसऱ्यानें घेतल्यावर तूं तिला परत घेऊं नको.

तूं तिजशीं ती मासिक स्रावानें अशुद्ध असतां संग करूं नको; आणि तुझी बायको जिवंत असतां तिच्या बहिणीसहि बायको करून घेऊं नको.

तुझ्या निसंतान मेलेल्या भावाची बायको दुसऱ्यानें घेऊं नये; आणि पवित्र मानिलेले पदार्थ परक्यानें खाऊं नये.

इस्राएलाच्या पवित्र समाजांत कोणी वेश्या नसावी, आणि कोणा स्त्रीनें पुरुषाचीं वस्त्रें पांघरूं नये.

पुरुषांनीं स्त्रीयांचीं वस्त्रें पांघरूं नये, आणि माझ्या यथार्थ पुत्रांमध्यें कोणी पुरुष संग करणारा नसावा.

तूं आपल्या इत्री भावावर कठोरपणें अधिकार चालवूं नको; आणि तुजवरहि कोणा परक्यानें राज्य करूं नये, परंतु मुक्ति पावलेल्या इस्राएलानेंच मात्र तुजवर राज्य करावें.

त्या राजानें पुष्कळ बायका, घोडे व स्वार राखूं नये; आणि मिसरांतून मुक्त झालेल्या इस्राएलांस पुनः मिसरांत जाऊं देऊं नये.

त्याच्या रथाच्या घोड्यांमुळें, त्याच्या सोन्यारुप्यांमुळें व त्याच्या भांडारांतील मोलवान् वस्तूंमुळें त्याचें मन ईश्वरावरून वळूं नये.

तूं जसा परक्या गुलामास तसा आपल्या इब्री दासास विकूं नये; आणि कोणी मिसरी तुझा धर्म स्वीकारून तुजपाशीं राहावयास आला, तर त्यास धिक्कारूं नये.

जो आदोमी माझ्या पादासनाजवळ येतो[1], त्यास तूं धिक्कारूं नये; आणि क्षुण्णांड किंवा छिन्नेंद्रिय यानें माझ्या लोकांत येऊं नये.

जसी परकी दासी तिच्या शरीराच्या एखाद्या अवयवाची हानी झाल्यानें मुक्त होते, तशी करारांत आलेली इब्री दासी मुक्त होऊं नये.[2]

जर तिचा धनी तिजशीं दग्यानें वर्तेतो, तर तिनें आपल्या मोलानें मुक्त व्हावें, दुसऱ्यास विकला जाणाऱ्या पदार्थाप्रमाणें तिजला विकण्याची सत्ता त्यानें सांगूं नये.

जर कोणी आपणाकरितां दुसऱ्याची मुलगी घेतो, तर त्यानें तिचें अन्नवस्त्र व तिजशीं व्यवहार यांत अंतर करूं नये.

मुख्य याजकास चार प्रकारच्या बायकाँ[3] वर्ज्य आहेत; परंतु दुसऱ्या याजकास त्यांतून एक प्रकारची[4] घेण्यास मोकळीक आहे.

(त्या मुख्य याजकानें) मेलेल्यांकरितां आपले केंस वाढवूं नये, आपलीं वस्त्रें फाडूं नये, आपलें बीज व माझें बळकट कोटाचें मंदिर विटाळूं नये.

त्यानें आपल्या आईबापांच्या प्रेतास स्पर्श करून आपणास विटाळूं नये, परंतु जर त्याच्या लोकांतून एकाद्यास पुरायास कोणी नसला, तर तें काम त्यानें करावें.

---

१. इस्राएली धर्म स्वीकारितो. २. परक्या दासीचे मुक्ततेचे नियम इब्री दासीस लागू नाहींत, इब्री दासी सातव्या वर्षीं मुक्त झालीच पाहिजे. अनुवाद अ. १५ ओ. १२ पाहा. ३. विधवा, टाकलेली, भ्रष्ट व वेश्या लेवी. अ. २१. ओ. १४. ४. इतर याजकांस विधवा घेण्याची मनाई नाहीं. लेवी अ. २१ ओ. ७ पहा.

त्यानें आपणास विटाळून घेण्यास पवित्र ठिकाणांतून बाहेर जाऊं नये, हें वचन जर तो सांभाळील, तर जसा नवरा आपल्या खोलींतून गौरवानें, तसा पूजन संपल्यावर त्याचें पूजन ईश्वरास मान्य झालें ह्मणून तो आनंदानें बाहेर येईल.

वेदीवरील अग्नि विझूं नये, हें वचन जर तो सांभाळील, तर त्याचें गौरव वाढेल, त्याचा दिवा कधीं विझणार नाहीं, परंतु तेजस्वी ज्योतीसारखा प्रकाशेल.

जर परका त्याची कन्या घेतो, तर तिनें त्याच्या अन्नांतून खाऊं नये; परंतु कुंवारपणाप्रमाणें जर ती परत त्याकडे आली, तर तिजला तें खाण्यास मोकळीक आहे.

त्याच्या मजुरानें किंवा त्याच्या विदेशानें तें खाऊं नये; आणि शोक करणारांच्या घरीं प्रेताजवळ त्यानें जाऊं नये.

ज्याचें रक्त पवित्र ठिकाणीं आणिलें जातें, तें त्यानें हट्टानें किंवा दग्यानें खाऊं नये; आणि पारवा अर्पितांना त्यानें तो दुभागूं नये.

पूर्णपणें जाळला जाणारा नैवद्य त्यानें खाऊं नये, नाहीं तर कदाचित् तो चेंचरला जाईल; आणि एडका किंवा कोंकरा यासारखा कोणताहि प्राणी खोडकर असल्यास त्यानें अर्पूं नये.

· परक्यानें व अशुद्धानें पवित्र पदार्थ झांकले जातांना पाहावयास येऊं नये, नाहीं तर अघोर नाशानें ते भस्म होतील.

त्यानें याजकपणासाठीं भांडून त्रासदायक होण्याकरितां सरळ मार्ग वांकडा करूं नये, आणि कोराह व त्याचे बंडखोर मित्र यांसारखेंहि होऊं नये.

वृद्ध लेव्यानें पवित्र मंदिरांतील पूजन करूं नये;[1] आणि तूं पक्ष्यांच्या घरट्यांतून पिलांसुद्धां आईला धरूं नये.

(ईश्वर ह्मणतो) अधिक व्याजानें तूं कांहीं उसनें देऊं नको, ही आज्ञा जर तूं पाळशील, तर तुझे दिवस मी वाढवीन, आणि अस्ताव्यस्तपणाच्या देशांत[2] तुझा प्रकाश अंधारमय होणार नाहीं.

---

१. पन्नास वर्षांच्या वर वय झाल्यास. २. हा भाषणसंप्रदाय इयोब अ. १० ओ २२ वरून घेतला आहे.

तूं शाब्बाथ दिवसाची सीमा सारूं नये, ही आज्ञा जपून पाळावी; आणि भट्टींत भाजलेल्या व तव्यावर सिद्ध केलेल्या नैवेद्याचा नियमहि तूं सांभाळावा.

एफोदावरून उरपट न सरकावा, ही आज्ञा जर तूं (मुख्य याजक) सांभाळशील, तर तुझें घर नाशास जाणार नाहीं; आणि ज्या दोन गोष्टी[१] आठवायास सांगितल्या आहेत, त्या कदाचित् विसरशील ह्मणून तूं (इस्राएल) सावध राहा.

तूं शाब्बाथ दिवशीं अग्नि पेटवूं नये ही आज्ञा, कपट करूं नये ही आज्ञा, आणि भूमि, लेव्यांचीं राहण्याचीं नगरें, व त्यांभोंवतालचे शिवार, अगदीं विकूं नये या आज्ञाहि सांभाळ.

तूं आपल्या शेतांत निरनिराळें धान्य न पेरण्याची आज्ञा, जात्याची खालची किंवा वरची तळी गहाण न ठेवण्याची, आणि व्यापारांत आपल्या पिशवींत निरनिराळीं वजनें न ठेवण्याची आज्ञा सांभाळ.

यज्ञवेदी विटाळूं नये ह्मणून ती बांधितांना तिजला लोखंडाचें हत्यार अगदींच लावूं नको ही आज्ञा, आणि दोषी ठरलेल्यास कदाचित् तूं चाळिसांहून अधिक फटके मारशील ह्मणून ती आज्ञाहि सांभाळ.

तूं विधवेपासून गाहाण घेऊं नको, तिजला पूर्ण सहाय करें[२], ह्मणजे तुझी संपत्ति उणी होणार नाहीं, आणि तूं खजूरीच्या झाडासारखा पालवशील.

तूं शास्त्रांतून कांहींच उणें करूं नको, ही आज्ञा सांभाळ, ह्मणजे तूं कधींच उघडा पडणार नाहींस; आणि कोणास दुष्कर्माचा दोष लावून त्याची अपकीर्ति करूं नको हा नियमही सांभाळ.

तुह्मी शास्त्रांत कांहीं अधिकहि करूं नका हा नियम, देश विटाळूं नका हा नियम, आणि परक्या लोकांप्रमाणें आपल्या डोक्याचा कांठ मुंडूं नका हा नियमहि सांभाळा.

तुह्मी आपलें हृदय व आपली दृष्टि याच्या मागें जाऊं नका[३] हा नियम,

---

१. मिसरांतून निघणें व आमालेकानें जें केलें तें. २. इ. तिजला आपल्या खांद्यावर वाहा. ३. तुमच्या मनास व नजरेस जें बरें दिसेल त्याप्रमाणें वर्तून ईश्वरी आज्ञेचा भंग करूं नका.

न्यायांत कोणास भिऊं नका हा नियम, शास्त्रांतील आज्ञा सोडून दुसरीकडे वळूं नका हा नियम व शपथ करून बंधन पतकरण्याचा नियम हे सांभाळा.

तूं दहावा भाग काढून देतांना, "मी अडचणीच्या वेळीं त्यांतलें खाल्लें नाहीं, अशुद्धतेंत त्यांतून काढलें नाहीं, आणि मेलेल्यांकरितां त्यांतलें दिलें नाहीं," असें ह्मणण्याचा नियम सांभाळ.

गहाणाच्या प्रकरणांत योग्य रीतीनें न्याय कर; आणि लढायच्या प्रसंगीं याजक व अधिकारी धैर्य देण्याचें जें भाषण करतील त्याकडे लक्ष दे.

शास्त्रांतील ज्ञान देणारे सर्व भागांकडेहि लक्ष दे; कारण ते कोरड्या प्रदेशांतील नद्या व ओहोळ यांप्रमाणें आहेत.

सत्तर आणि एक आज्ञा भंग करणारा देहांत शिक्षेस पात्र होतो,[1] त्यांची संख्या खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

जो मोठ्या दुष्टाईनें आपलें संतान मोलेखास अर्पितो तो, आणि जो हट्टानें आपल्या तारक देवास धिक्कारितो तो.

जो दुसऱ्यास भुलवून मूर्त्तिपूजेकडे वळवितो तो, जो शाब्बाथ विटाळितो तो, जो खादाड व पिदाड पोर तो, जो आपल्या आईबापांस मारितो व शापितो तो, आणि जो नगरें मूर्त्तिपूजेकडे वळवितो तो.

जो मूर्त्तीच्या नामानें परमेश्वराविरुद्ध फितुरीचें भाषण करितो तो, कंटाळा देण्याकरितां भूत बाळगतो तो, आणि खोटी जादू करितो तो.

जो भयंकर रीतीनें किंवा खांच खणून एखाद्याचा प्राणघात करितो तो, आणि मूर्त्तीकडे वळलेल्या नगरांतील मनुष्यें, हीं तरवारीनें भोसकून मारिलीं जावीं.

जो खोटा भविष्यवादी आपल्या मताप्रमाणें भविष्य कथितो तो, त्यास किडे सुद्धां पडतील; आणि जी स्त्री पशुसंग करिते ती.

जो मागणी केलेल्या मुलीशीं; अथवा आपले घरीं नांदायास आलेल्या आपल्या सुनेशीं; अथवा आपल्या गोठ्यांतल्या पशूशीं अथवा पुरुषाशीं संग करितो तो.

---

१ टीका. ५२.

जो विवाहित स्त्रीशीं संग करितो, अथवा आपल्या चुलतीस लज्जित करितो, आणि असें कुत्सित कर्म करून अप्रतिष्ठा पावतो तो; कारण या दोन गोष्टींचीहि मनाई आहे.

जो आपल्या जननीशीं, अथवा आपल्या मुलाच्या कन्येशीं अथवा आपल्या मुलीच्या कन्येशीं; अथवा आपल्याच कन्येशीं; अथवा आपल्या बायकोच्या कन्येशीं, अथवा आपल्या आईच्या बहिणीशीं, अथवा आपल्या बापाच्या बहिणीशीं तोहि.

जो एखाद्या स्त्रीशीं व तिच्या कन्येशीं, तिच्या पुत्राच्या कन्येशीं, अथवा तिच्या कन्येच्या कन्येशीं, अथवा विटाळांत असतां आपले अशुद्धतेचे दिवस सांभाळीत असणाऱ्या स्त्रीशीं तोहि.

जो आपल्या बापाच्या बायकोशीं, अथवा आपल्या भावाच्या बायकोशीं, अथवा आपल्या सासऱ्याच्या किंवा सासूच्या आईशीं तोहि; कारण या सर्व मना केलेल्या आहेत.

जो आपल्या बहिणीशीं संग करितो, अथवा सासूशीं संग करितो, अथवा आपल्या बायकोच्या बहिणीशीं संग करितो तोहि; असें करणारे नरकांत विखरले जातील.

याजकाच्या व्यभिचार करणाऱ्या कन्यांची शिक्षा, यांजविषयीं खोटी साक्ष देण्याचा बेत करणारांची शिक्षा आणि त्याशीं व्यभिचार करणारांची शिक्षा, नाश पावणें व छेदला जाणें असी आहे.

जो मूर्त्तिपूजक आरम्भीं स्त्रीशीं व्यभिचार करितो तो आपल्या दुष्टाईमुळें छेदला जाईल, आणि जो धूर्तपणें पवित्र मंदिरांतील निवडक पात्रें[१] चोरून नेतो तोहि.

जो मनुष्यास चोरून नेतो, तो कबरेंत जातो; आणि जो रक्त व मांदें खातो, तो शेतांतील सुंदर कणसांप्रमाणें कापला जातो.

जो कोणी अमंगळ ठरलेलें खातो, तो शापित असो; कारण असें जें ते अग्नीनें भस्म व्हावें.

---

१. अथवा निवडक जीव ह्मणजे इस्राएल.

जो नजरबंदी करितो त्याची कंबर मोडेल, आणि अर्पणांतून उरलेलें जो खातो तो भुकें मरेल.[1]

जो मूर्त्तींची पूजा करितो, त्यास शिक्षा होऊन त्याचा नाश होईल; त्याप्रमाणें नेमलेले दिवसांत जो फुगवण खातो त्याचाहि.

पेसाहाचा सण जो पाळीत नाहीं, त्याचें नांव अंधारानें झांकलें जाईल; त्याप्रमाणें जो प्रायश्चित्ताच्या दिवशीं खातो व काम करितो त्याचेंहि.

जो पवित्र तेल आपल्या अंगास लावितो आणि पवित्र ठिकाणीं जाळला जाणारा सुगंध आपणासाठीं करितो, त्याचा न्याय मी क्रोधानें करीन; आणि न्यायाधीशांच्या न्यायाकडे लक्ष न देणाराचाहि.[2]

जो अर्पणाचे पशु पवित्र ठिकाणाबाहेर कापितो व जो ते पशु पवित्र मंदिराबाहेर अर्पितो, आणि जो याजक पूजनाअगोदर गंगाळांतील पाण्यानें आपणास धूत नाहीं तो.

जो कराराच्या रक्ताची[3] आज्ञा उल्लंघितो, त्याचा जीव छेदला जाईल; कारण ती आज्ञा सांभाळल्यानें शेवटीं बंदांतून मुक्त होण्याची आशा आहे.

जो अशुद्ध असतां पवित्र मंदिरीं येतो आणि अशुद्ध असतां पवित्र पदार्थ खातो, तो तुडविला जाईल.

जो अर्पिलेला पदार्थ खातो, त्याचा संहार होईल; आणि जो याजक अशुद्ध राहून आज्ञाभंग करितो त्याचाहि.

जो दहावा भाग न दिलेल्यांतून खातो, त्याजवर दुःखें येतील; त्याचे कष्ट व्यर्थ जातील, आणि त्याला वेदना लागतील.

जो याजक अशुद्धतेचा दिवस पूर्ण झाल्याअगोदर अंघुळ करून अथवा नेमिलेलीं वस्त्रें न पांघरतां पूजन करायास जातो, तो जगांतून नाहींसा होतो.

---

१. इ. त्याचे दांत कोरडे राहतील. २. इ. कान बंद करणाराचा. ३. सुंतेच्या कराराची.

(ईश्वर ह्मणतो) जो परका पूजन करावयास पवित्र ठिकाणीं जाईल. त्याच्या मरणानें माझें गौरव होईल; आणि जो योग्य प्रायश्चित्त न करतां जाईल, तोहि जगांतून नाहींसा होईल.

जो (याजक) बोडका असतां, प्यालेला असतां, अथवा अशुद्ध असतां पवित्र ठिकाणीं पूजन करावयास जाईल, तो मृत्युपात्र होईल.

आश्रयाचा खडक आणि सरळांचा जो रक्षक, याच्या सहायानें करायाच्या आज्ञांचा व मनाईच्या आज्ञांचा मीं एथें शेवट केला आहे.

हे शास्त्रांतील मुख्य नियम आहेत; आणि दुसरे नियम आहेत हे खजुरीच्या डाहाळ्यांप्रमाणें त्यांच्या डाहाळ्या आहेत.

परात्पर देव आपल्या गरीब लोकांस एकवटावयास, सीयोन डोंगर बांधायास, आणि खिंडींतील मेलेल्यांच्या शवांस पुनः सजीव करायास[१] त्वरा करो.

तो आपला मंडप उभारो, त्यांतील अंधार प्रकाशित करो, आपल्या राजास सबळ करो, आणि आमचें शिंग[२] उभारो.

मग लोक धुळींत निजलेल्यास उठतांना पाहतील; शोफार वाजतांना ऐकतील; आणि पर्वतावर झेंडा उभारतांना पाहतील.

आणि सिंहाच्या गुहांतून, आणि वाघांच्या डोंगरांवरून मोठा गजर व गायनाची वाणी ऐकूं येईल.

तेव्हां ज्या लोकांनीं वाईट चुका केल्या असतील, ते सण करणाऱ्या समुदायाच्या आनंदाच्या व गायनाच्या वाणीनें वितळून जातील.

आणि आह्मी गालील देशच्या डोंगरावर पोंवा वाजवीत फिरूं, आणि तूं सकळ होम मान्य करशील, तेव्हां तुझे लोक खोंड अर्पितील.

---

१. येहेजकेल अ ३७ पहा. २. ही थोर पदास चढण्याची उपमा आहे.

टीका.

टीका १. एरूव.

निर्गम अ १६ ओ. ५ एथें लिहिल्याप्रमाणें शाब्बाथ दिवसाच्या भोजनाची सिद्धता शुक्रवारीं झाली पाहिजे. परंतु सण हे शाब्बाथासारखेच पवित्र असून निर्गम अ. १२ ओ. १६ एथें लिहिल्याप्रमाणें त्या दिवशीं " प्रत्येक मनुष्यानें खावें तें मात्र करावें." दुसरें काहीं काम किंवा दुसऱ्या दिवसाच्या भोजनाचें काम करूं नये असा नियम आहे. यावरून शुक्रवारीं किंवा बृहस्पतवार व शुक्रवार या दिवशीं सण असला, तर त्या दिवशीं शाब्बाथाच्या भोजनाची सिद्धता करायास अडचण न पडावी; ह्मणून सुज्ञ जनांनीं असा नियम लावून दिला आहे कीं, अशा प्रसंगीं शाब्बाथाच्या भोजनाची सिद्धता त्या सणाच्या आदल्या दिवसापासून करायास लागावें. आणि आपण तसें करितों हें दर्शविण्याकरितां एरूव करावा. एरूव ह्मणजे मिश्रण. हें एरूव करतांना हा पेसाहाच्या सणांत कांहीं मस्सा व इतर सणांत गव्हाची भाकर घेऊन व त्याजवर शिजविलेलें मास किंवा मत्स्य ठेऊन सांगितल्याप्रमाणें धन्यवाद करून हें एका बाजूस ठेवावें. यास עירובי תבשילין ह्मणजे भोजन शिजविण्याचें एरूव असें ह्मणतात. याप्रमाणें केल्यास सणाच्या दिवशीं शाब्बाथाच्या भोजनाची सिद्धता करण्यास मोकळीक होते. याप्रमाणें घराच्या एका भागांतून दुसऱ्या भागीं कांहीं सामान नेण्याआणण्याची मोकळीक असावी ह्मणून जें एरूव करितात त्यास עירובי חצרות आणि एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जाण्यायेण्याची मोकळीक असावी ह्मणून जें एरूव करावें लागतें त्यास עירובי תחומין असें ह्मणतात.

टीका २. סברי מרנן

ही टीका नित्याची प्रार्थना या ग्रंथीं टीका ११ पाहा.

टीका ३. हाफताऱ्याचे धन्यवाद. पृष्ठ १६.

हाफतारा जो वाचायाचा त्यापूर्वीं जे दोन धन्यवाद करायाचे असतात, त्यांतील पहिले धन्यवादाशेवटीं אמן न ह्मणतां दुसऱ्या धन्यवादानंतर मात्र אמן ह्मणावें.

टीका ४. दोन दिवसांनंतर तो आह्मांस पुनः सजीव करीलच.

हें वाक्य होशेया अ. ६ ओ. २ एथें सांपडतें. हें ह्मणणें बाबेलच्या व हल्लींच्या अशा दोन प्रवासांविषयीं आहे, ह्मणजे या दोन प्रवासांनंतर ईश्वर आपल्या परम दयेनें इस्राएलांचें तारण करीलच.

टीका ५. बंडखोर.

एथें बंडखोर ह्मणजे मूर्त्तिपूजक. आब्राहाम व सारा यांनीं कित्येक मूर्तिपूजक पुरुष व स्त्रिया यांस ईश्वरी मार्गाकडे वळविलें व तीं त्यांबरोबर असत. उत्पत्ति अ. १२ ओ. ५ व अ. १४ ओ. १४ पाहा.

टीका ६. एक टोळी वांचावी असी आशा केली.

याकोब लाबानाच्या घराहून परत येत असतां, एसाव आपणाकडे येतो असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्यानें आपल्या संगतीं जितके लोक होते, त्यांस आणि कळप व गुरें व उंट हीं वेगळीं करून दोन टोळ्या केल्या; आणि ह्मणाला, एसावानें येऊन जर एक टोळी मारिली तर दुसरी टोळी तरी निभावेल. उत्पत्ति अ. ३२ ओ. ७ पाहा.

टीका ७. आपल्या पुत्रांनीं एकमतानें ईश्वराचा राज्याधिकार आपणावर मान्य करावा ह्मणून त्यांस एकत्र बोलावलें.

शास्त्रावर मिदराश ही जी टीका आहे तिजमध्यें असें आहे कीं, याकोबानें आपल्या अंतकाळीं आपल्या सर्व पुत्रांस एकत्र बोलावून ह्मटलें कीं, तुमच्या अंगीं कदाचित् ईश्वरभय नाहीं. तेव्हां ते ईश्वरी राज्याधिकार आपणावर मान्य करून ह्मणाले, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. यावरून याकोब ह्मणाला, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाल धन्य असो. मग त्यानें आपल्या पुत्रांस आशीर्वाद दिला.

टीका ८. दोन आज्ञा एकांतच ऐकविल्या.

निर्गम अ २० ओ. ८ एथें शाब्बाथ दिवस पाळण्याविषयीं आठवण कर असें आहे; आणि अनुवाद अ. ५ ओ १२ एथें शाब्बाथ दिवस पाळण्याविषयीं जप असें आहे; तर शाब्बाथ दिवस पाळण्याविषयीं आठवण करण्याची व जपण्याची अशा दोन्ही आज्ञा एकांतच दिल्या असें अनुमान होतें.

कांहीं टीकाकार असें अनुमान करितात कीं, दहा आज्ञांतील पहिली

व दुसरी या दोन्ही आज्ञा ईश्वराचें एकत्व दर्शवितात, ह्मणून त्या दोन्ही एकांतच दिल्या. आणि याच कारणास्तव या दोन आज्ञा लिहितांना जसें दुसऱ्या प्रत्येक आज्ञांनंतर कांहीं अंतर सोडितात, तसें पहिल्या आज्ञेनंतर सोडित नाहींत; या दोन्ही आज्ञा सरळ लिहितात. आणि वाचितांनाहि पहिल्या आज्ञेनंतर पूर्ण विराम चिन्हाप्रमाणें न थांबतां दुसऱ्या आज्ञेच्या शेवटीं थांबतात.

याशिवाय या दोन आज्ञांमध्यें ईश्वरसंबंधानें प्रथम पुरुषांत असून दुसऱ्या आज्ञांमध्यें तृतीय पुरुषांत आहे; यावरून या दोन आज्ञा ईश्वरानें स्वतां एकांतच ऐकविल्या असेंहि दिसून येतें.

टीका ९. अनाद्यंत देव.

ज्या शब्दाचें भाषांतर एथें हे अनाद्यंता असें केलें आहे, त्या शब्दाचा मूळार्थ मी व तो ह्मणजे मी जो आहें तोच सदासर्वकाळ आहें, असा होतो. हा लिहिण्याचा संप्रदाय अनुवाद अ. ३२ ओ ३९ एथील लिहिण्यावरून घेतला आहे.

टीका १०. ईश्वरी יה नांवांतील दोन अक्षरांकडून जगतांची उत्पत्ति.

ही टीका नित्याची प्रार्थना या ग्रंथीं टीका १२ पाहा.

टीका ११. बापाच्या दयेला द्रव आणणारीं इसहाकाचीं दोन भाषणें.

उत्पत्ति अ. २२ ओ ७ एथें लिहिल्याप्रमाणें इसहाकानें आपला बाप आब्राहाम यास ह्मटलें "माझ्या बापा" हें एक भाषण; आणि आब्राहामानें "मी एथें आहें" असें उत्तर दिल्यावर इसहाकानें ह्मटलें "पाहा विस्तव व लांकडें आहेत, परंतु होमाचें कोंकरूं कोठें आहे" हें दुसरें भाषण. आणि ज्या अर्थीं आब्राहाम इसहाकास अर्पायास नेतांना इसहाकानें असें विचारिलें, त्या अर्थीं या दोन्ही भाषणांवरून आब्राहामाच्या दयेला द्रव आलाच असावा.

टीका १२. "तूं आपले भावाचा धनी हो" असा इसहाकानें याकोबास दोन वेळ दिलेला आशीर्वाद.

उत्पत्ति अ २७ ओ २९ एथें लिहिल्याप्रमाणें "तूं आपल्या भावाचा

धनी हो" असा इसहाकानें याकोबास स्पष्ट ह्मणून आशीर्वाद दिला; आणि ओ ३७ एथें लिहिल्याप्रमाणें एसावास आशीर्वाद देतांना "म्यां त्याला (ह्मणजे याकोबाला) तुझा धनी करून ठेविला आहे" असें ह्मटलें.

टीका १३. याकोबास मिळाले दुप्पट विभाग.

याकोबास रीतीप्रमाणें आपल्या बापाच्या संपत्तीचा एक विभाग मिळायाचा होताच; परंतु एसावापासून त्याचें ज्येष्ठपण विकत घेतलें, यावरून ज्येष्ठपणाचा विभागहि त्यास मिळाला.

टीका १४. प्रतिदिवशीं उत्पन्न केलेले तीन पदार्थ.

पहिल्या दिवशीं आकाश, पृथ्वी व उजेड; दुसऱ्या दिवशीं अंतराळ, दूत व नरक; तिसऱ्या दिवशीं हिरवळ, समुद्र व नद्या. कोणी ह्मणतात कीं एदेन बागहि; चौथ्या दिवशीं सूर्य चन्द्र तारे; पांचव्या दिवशीं मासे, पक्षी व लिवयाथान मगर मासा.

टीका १५. सहाव्या व सातव्या दिवशीं उत्पन्न केलेले तीन तीन पदार्थ.

रशी हा टीकाकार ह्मणतो कीं, ज्याप्रमाणें ईश्वरानें पांच दिवस जगांतील तीन तीन पदार्थ उत्पन्न केले, त्याप्रमाणें सहाव्या व सातव्या दिवशींहि करायाचे होते; परंतु सातव्या दिवशीं त्यानें विसावा घेऊन त्या दिवसास पवित्र केलें व आशीर्वाद दिला ह्मणून सातव्या दिवसाचें काम त्यानें सहाव्या दिवशींच आटोपलें; आणि सहाव्या दिवसाचे तीन व सातव्या दिवसाचे तीन असे सहा प्रकारचे पदार्थ त्यानें सहाव्या दिवशींच उत्पन्न केले. ते येणेंप्रमाणें:— श्वासवान्, जीव, ग्रामपशु सरपटणारे वनपशु व मनुष्य.

टीका १६. तीन मुगुट.

सद्गुरुवचनें ह्मणजे पिरके आबोथ. अ ४ एथें या तीन मुगुटांचीं नांवें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—शास्त्राचा मुगुट, याजकपणाचा मुगुट आणि राजकीय मुगुट.

टीका १७. तीन वेळ याकोबानें आपल्या पुत्रांस मिसरास पाठविलें.

पहिल्या वेळीं अन्न विकत आणावयास, दुसऱ्या वेळीं पुनः अन्न विकत आणायास, आणि तिसऱ्या वेळीं योसेफाच्या बोलावण्यावरून सर्व कुटुंबासुद्धां.

टीका १८. चौघांचें नगर.

ज्या इब्री शब्दांचें भाषांतर चौघांचें नगर असें केलें आहे, ते קרית ארבע असे आहेत. कांहीं टीकाकार या शब्दांचा अर्थ चौघांचें नगर असा करितात. गणना अ. १३ ओ. २२ एथें लिहिल्याप्रमाणें आहीमान, शेशाय, तलमाय व त्यांचा बाप आनाक असे चौघे राक्षस तेथें राहत होते ह्मणून त्या नगरास चौघांचें नगर असें नांव पडलें. कांहींकांचें मत असें आहे कीं, ארבע हें एका राक्षसाचें नांव होतें, व तो तेथें राहत होता. कोणी ह्मणतात कीं, हेब्रोनांत आब्राहाम व सारा, इसहाक व रिबका, याकोब व लेआ आणि आदाम व हाव्वा या चार जोडप्यांच्या कबरा आहेत, ह्मणून त्यास असें नांव पडलें.

टीका १९. ईश्वरगौरवाचीं पांच नांवें.

יהוה, אהיה, שדי, אדני, אלהים हीं ईश्वराच्या गौरवाचीं मुख्य पांच नांवें आहेत; याशिवाय יה हेंहि ईश्वरी नामच आहे; परंतु तें पूर्ण नाम नाहीं. तें יהוה या नामांचें अर्धें आहे. आणि חנון רחום इत्यादि जीं नामें आहेत, तीं त्याच्या गुणाचीं नामें आहेत.

टीका २०. ईश्वरानें आपलें वतन मानिलेल्या पांच वस्तु.

सद्गुरुवचनें अ. ६. एथें असें आहे कीं, शास्त्र, जग (आकाश व पृथ्वी), आब्राहाम, इस्राएल व पवित्र मंदिर या पांच गोष्टी ईश्वरानें आपलें वतन असें मानिल्या आहेत.

टीका २१. सर्वांहून बलवान् असे पांच प्राणी.

मनुष्य, सिंह, बैल, गरुड हे येहेजकेल अ. १ एथें लिहिल्याप्रमाणें ईश्वराचें आसन वाहणारे चार प्राणी व लिवयाथान हा मासा हे सर्व प्राण्यांमध्यें बलवान् असे मानिले आहेत.

टीका २२. इसहाकास बापाकडून मिळालेले पांच आशीर्वाद.

गेमारा एद्योथ पृष्ठ ५ ब. एथें असें आहे कीं, सद्गुणी बाप आपल्या सद्गुणी मुलास सौंदर्य, सामर्थ्य, द्रव्य, ज्ञान व दीर्घायुष्य या पांच गोष्टी मिळण्याचा आशीर्वाद देतो; त्याप्रमाणें या पांच गोष्टी इसहाकास प्राप्त व्हाव्या ह्मणून आब्राहामानें त्यास आशीर्वाद दिला होता.

टीका २३. जीवाचीं पांच नांवें.

इब्री भाषेंत जीवास पांच नांवें आहेत तीं येणेंप्रमाणें:—נפש, נשמה
חיה, רוח, יחידה

टीका २४. याकोबाकरितां झालेले पांच चमत्कार.

१ याकोबानें एसावाचा आशीर्वाद घेतला ह्मणून एसाव त्यास जिवें मारण्याच्या बेतांत असतां तो सुटला. २ याकोब हारानास गेला तेव्हां एसावाचा पुत्र एलीफाज त्यास मारण्याकरितां त्याच्या मागें लागला परंतु त्याच्या हातांतूनहि सुटला, असें मिदरासमध्यें सांगितलें आहे. ३ लाबानाच्या हातांतून सुटला. ४ हारानाहून परत येतांना पुनः एसावाच्या हातांतून सुटला. ५ शेखेमांतील सर्व पुरुष मारले, तरी भोंवतालच्या गांवांतील लोक याकोबाच्या किंवा त्याच्या पुत्रांच्या पाठीस लागूं शकले नाहीं; कारण देवाचें भय त्यांस लागलें होतें.

टीका २५. दाहा आज्ञा पांच वाणीनें ऐकविणें.

गेमारा बेराखोथ अध्याय १. एथें असें लिहिलें आहे कीं, देवानें दाहा आज्ञा पांच वाणीनें दिल्या. याच्या प्रमाणाकरितां निर्गम अ. १९ मध्यें वाणी, गर्जना किंवा शब्द या अर्थाचा इब्री शब्द קול तीन वेळ सांपडतो. परंतु ओ. १६ एथें एक वेळ हा शब्द קלת असा बहुवचनांत आहे; आणि बहुवचनांतील नामाचा अर्थ उण्यांत उणा धरिला तर दोन असा धरितात, त्याप्रमाणें धरून एकंदर पांच होतात.

टीका २६. सहा वर्षांच्या शेवटीं आब्राहामास प्राप्त झालेला आशीर्वाद.

जरी आब्राहामाच्या वेळीं ईश्वरानें शास्त्र दिलेलें नव्हतें, तरी उत्पत्ति अ. २६ ओं० ५ वरून त्यानें शास्त्रांतील सर्व आज्ञा पाळिल्या असाव्या, असें अनुमान होतें. अशा अनुमानावरून आब्राहामानें लेवी अ. २५ एथें लिहिल्याप्रमाणें आपल्या भूमीस विसावा दिला, आणि ओ० २१ प्रमाणें ईश्वरानें त्यास सहाव्या वर्षी आशीर्वाद दिला.

टीका २७. सहा थरांची वेदी.

मोरिया डोंगरावरील पवित्र मंदिरीं जी यज्ञवेदी होती, ती सहा थरांची

होती, असें गेमारा मिद्दोथ अ. ३ मध्यें सांगितलें आहे. आणि त्याच ठिकाणीं इसहाकास अर्पण्याकरितां वेदी बांधिली होती, ह्मणून इसहाक हा केवळ त्याच सहा थरांच्या वेदीवर अर्पला जाण्यास बांधला गेला असें ह्मटलें आहे.

टीका २८. ज्या सहा संकटांतून इसहाक रक्षिला व सोडविला गेला तीं.

जे देवाला शरण जातात, त्यांस तो अनेक संकटांतून सोडवितो. त्यांतील मुख्य सहा महा संकटें ईयोब अ. ५ ओ १९–२३ एथें जाणविलीं आहेत. इसहाक हा पूर्णपणें देवाला शरण जाऊन त्याच्या आज्ञेवरून आपला प्राणहि देण्यास सिद्ध होता, ह्मणून त्यानें त्याजवर हीं संकटें येऊं दिलीं नाहींत.

टीका २९. कुंडें.

स्त्रियांच्या शुद्धतेकरितां जीं कुंडें असतात, त्यां संबंधानें हें लिहिलें आहे. याविषयीं लेवी अ. १५ एथें मोहगमांत लिहिलें आहे; परंतु मिशनामध्यें कुंडांसंबंधी जो भाग आहे, त्यामध्यें या विषयाचें बरेंच स्पष्टीकरण करून नियमहि सांगितले आहेत. त्याप्रमाणें स्त्रियांच्या शुद्धतेसाठीं जीं कुंडें असतात, त्यांमध्यें ४० सेआ ह्मणजे सुमारें २४० ग्यालन पाणी असलेंच पाहिजे. यापेक्षां उणें असल्यास चालत नाहीं; आणि पात्रांत सांठविलेलें पाणी त्याच्या भरीस घालतां येत नाहीं. तें ४० सेआ पाणी वाहात्या झऱ्याचें किंवा पावसाचें असलें पाहिजे. तरी त्याच्या भरीस आकाशांतून पडलेलें बर्फ, किंवा भूमीवरील पाणी जमून झालेलें बर्फ, किंवा गारा, किंवा थिजलेलें दहिंवर, किंवा मीठ, किंवा पातळ चिखलहि घातल्यास चालेल. यासंबंधी जे नियम आहेत ते इस्राएली बायांस फारच अगत्याचे व लाभकारक आहेत, ह्मणून त्यांनीं त्यांची पूर्ण माहिती करून घेऊन ते नियम मोठ्या काळजीनें सांभाळावे.

टीका ३०. जे सहाजण प्रत्येक सहा आशीर्वाद पावले ते.

याकोबानें आपला पुत्र येहुदा यास त्याच्या भावांवर राजपद दिलें; आणि त्याच्या वंशांत दावीद, हिजकीया, दानीएल, हानानया, मीशाएल व आजारया हे सहा देवभक्त जन्मून त्या प्रत्येकास अनेक व मोठे आशीर्वाद प्राप्त झाले.

टीका ३१. एफोदाच्या खांद्यावरील सहा नांवें.

एफोद हा सोनें, निळें, जांबळें व किरमिज रंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा सुंदर बुटीदार केलेला असे. त्याचे दोन निराळे तुकडे, एक समोर व एक मागें असे असून तो खांद्यावर खांदपट्यानें जडलेला असे; आणि दोन खांदपट्यांवर दोन गोमेद रत्नें जडलेलीं असून त्या प्रत्येकावर इस्राएलाच्या पुत्रांचीं सहा सहा नांवें त्यांच्या जन्मांच्या अनुक्रमानें कोरलेलीं असत. प्रत्येक रत्नावर पंचवीस अक्षरें असावीं ह्मणून योसेफाच्या नांवास ה हें अक्षर अधिक जोडलेलें असे. याप्रमाणें मुख्य याजकाचा एफोद केलेला असे; दुसऱ्या याजकांचा एफोद एवढा सुंदर नसे.

टीका ३२. आश्रयाचीं सहा नगरें.

जीं सहा आश्रयाचीं नगरें नेमिलीं होतीं त्यांतील तीन यार्देनेच्या अलिकडे दक्षिणेस रेऊबेनाच्या प्रदेशांत बेसेर, मधोमध गादाच्या प्रदेशांत रामोथ आणि उत्तरेस मेनश्शेच्या अर्ध्या वंशाच्या प्रदेशांत गोलान. गणना अ. ३५ ओ. १०–३४. यार्देनेच्या पलिकडे उत्तरेस नफतालीच्या प्रदेशांत केदेश, मधोमध एफ्राईच्या प्रदेशांत शेखेम, आणि दक्षिणेस येहुदाच्या प्रदेशांत किरयाथ आरबा तेच हेब्रोन. येहोशवा अ. २० ओ. ७–८.

टीका ३३. सहा प्रकारचें ज्ञान.

शास्त्रावरील मिशना नामाच्या टीकेचे मुख्य सहा भाग आहेत; ते येणेंप्रमाणें:—१ वनस्पतीच्या बीजासंबंधीं, २ नेमलेले कालांसंबंधीं, ३ स्त्रियांसंबंधीं, ४ नुकसानासंबंधीं, ५ पवित्र अर्पणें इत्यादि यांसंबंधीं, आणि ६ शुद्धतेसंबंधीं.

टीका ३४. शाब्बाथाचीं तीन जेवणें.

प्रत्येक इस्राएलानें शाब्बाथदिवशीं तीन जेवणें ह्मणजे एक शुक्रवार संध्याकाळीं, दुसरें शनवार सकाळीं व तिसरें तिसऱ्या प्रहरीं त्या वेळच्या प्रार्थनेनंतर अशीं तीन जेवणें जेवावीं. आणि जे याप्रमाणें करण्याचा नेम राखितात, ते तीन महा संकटें ह्मणजे माशीयाहाच्या येण्यापूर्वीं जीं दुःखें होणार त्यांपासून, नरकदंडापासून व गोग व मागोग यांच्या लढाईपासून मुक्त होतात, असें सुज्ञ जनांचें ह्मणणें आहे.

टीका ३५. शाब्बाथ दिवसाचे सात धन्यवाद.

नित्याच्या प्रार्थनांमध्यें हळू व एकचित्तानें वाचावयाचा जो भाग आहे त्यांत एकंदर एकुणीस धन्यवाद आहेत; परंतु शाब्बाथदिवशीं जे भाग हळू व एकचित्तानें वाचावे लागतात त्या प्रत्येकांत सात धन्यवाद मात्र आहेत.

टीका ३६. शाब्बाथ दिवशीं आपली स्वतःची इच्छा पूर्ण न करणें.

शाब्बाथ दिवस ईश्वरानें आपणास आपल्या सुखाकरितां आणि ईश्वर-भजनाकरितां व ईश्वरस्तुतीकरितांच मात्र लावून दिला आहे. त्या दिवशीं जें करायाचें तें सर्व ईश्वरइच्छेप्रमाणें व ईश्वरस्तवनाकरितां मात्र असावें. आपल्या इच्छेप्रमाणें कांहींच नसावें असें यशाया अ. ५८ ओ. १३–१४ एथें सांगितलेलें आहे.

टीका ३७. जगापूर्वीं झालेल्या सात गोष्टी.

शास्त्र, पश्चात्ताप, स्वर्ग, नरक, ईश्वरी गौरवाचें आसन, पवित्र मंदिर, व माशीयाहचें नाम या सात गोष्टी ईश्वरानें जगापूर्वीं केल्या ह्मणजे योजिल्या. गेमारा नेदारीम पृष्ठ ३९ अ.

टीका ३८. ज्ञानाच्या घराचे सात खांब.

हा भाषणसंप्रदाय नीति अ. ९ ओ १ एथून घेतला आहे. तेथें " सात " हा शब्द " अनेक " या अर्थानें योजिला आहे, ह्मणून सात खांब आकारिले ह्मणजे अनेक गुण दर्शविले असें समजावें. याचप्रमाणें नीति अ. २४ ओ. १६ एथेंहि सात या शब्दाचा उपयोग अनेक या अर्थानें केला आहे.

टीका ३९. सात डोंगरांमधील श्रेष्ठ डोंगर.

इस्राएलांच्या इतिहाससंबंधीं सात डोंगर विख्यात आहेत, ह्मणजे मोरीया डोंगर, जाईताचा डोंगर, कर्मेल डोंगर, गेरीझीम डोंगर, नेबो डोंगर, होर डोंगर व सीनाय डोंगर. यांतून मोरीया डोंगर ईश्वरानें आपलें पवित्र मंदिर बांधण्याकरितां निवडिला ह्मणून तो सर्वांत श्रेष्ठ मानिला आहे.

टीका ४०. तिरसा.

तिरसा या इब्री शब्दाचा अर्थ रमणीय किंवा सुंदर असा होतो. हें शेखेमाजवळच्या एका नगराचें नांव होतें. तें शेलोमोच्या वेळीं फारच

सुंदर व रमणीय असल्याकारणें त्यानें शेलोमोचें गीत अ. ६ ओ. ४ एथें " तिरसासारखी सुंदर " अशा ह्मणीचा उपयोग केला आहे; आणि इस्राएलांचा राजा यारबआम याच्या दिवसांपासून ओमरी राजाच्या दिवसांपर्यंत इस्राएलांचे राजे मुख्यत्वेंकरून याच नगरींत रहात असत.

टीका ४१. खरी धनीण व दासी.

हें सर्व वाक्य लाक्षणिक भाषेंत लिहिलें आहे. एथें खऱ्या धनिणीस ह्मणजे इस्राएल लोकांस, दासी ह्मणजे मूर्तिपूजक लोक ह्मणतात कीं, तुह्मी आपल्या धर्मीविषयीं जें ह्मणतां तें खरोखर नव्हे. तुझा पुत्र मेलेला आहे ह्मणजे तुमचा धर्म खोटा व माझा पुत्र जीवंत आहे ह्मणजे आमचा धर्म खरा आहे.

टीका ४२. जीवंत बोकडावर आपला राग ओत.

जसा वरील वाक्यांतील जीवंत मुलगा याचा अर्थ मूर्तिपूजकांकडे लागतो, तसाच या वाक्यांतील जीवंत बोकड ह्याचा अर्थहि मूर्तिपूजकांकडेसच लागतो; ह्मणून जसा मुख्य याजक लेवी अ. १६ ओवी २१ एथें लिहिल्याप्रमाणें प्रायश्चित्ताच्या दिवशीं इस्राएलांचे सर्व अपराध व सर्व उल्लंघनें जीवंत बोकडाच्या डोक्यावर लादीत असे, तसा या वाक्यांत ह्मटलेल्या जीवंत बोकडाच्या डोक्यावर ह्मणजे मूर्तिपूजकांवर तूं आपला राग ओत, असा या वाक्याचा अर्थ समजावा.

टीका ४३. बोधवचनें.

हीं बोधवचनें रिब्बी शेलोमो बेन येहुदा गेबीरोल यानें कवितेच्या रूपानें लिहिलीं आहेत. या कवितेंत हारमबामानें ज्या ६१३ ह्मणजे २४८ करायाच्या व ३६५ मनाईच्या आज्ञा पवित्र शास्त्रावरून काढिल्या आहेत, त्यांचा सारांश आहे.

टीका ४४. बोधवचनांवरील उपोद्घात.

या बोधवचनावर रिब्बी दावीद बेन एलआझार बेकुदा यानें कवितेमध्यें उपोद्घात रचिला आहे. ही कविता रचितांना चौथ्या वाक्यापासून सोळाव्या वाक्यापर्यंत प्रत्येक वाक्याच्या आरंभीं त्यानें आपल्या नांवाचें प्रत्येक अक्षर घेतलें आहे. या उपोद्घातामध्यें विशेषेंकरून दहा आज्ञांचा सारांश आहे.

टीका ४५. प्रत्येक दिवशीं शंभर धन्यवाद.

ही आज्ञा शास्त्रांत स्पष्ट लिहिलेली नाहीं. परंतु गेमारा मेनाहोथ पृष्ठ

४३ व एथें ही आज्ञा अनुवाद अ. १० ओ. १२ वरून घेतली आहे. या ओवींतील מה या शब्दावर रशीनें अशी टीका केली आहे कीं, את בש גר דק याप्रमाणें एका अक्षराबद्दल दुसरें अक्षर योजून अर्थ करण्याची जी रीति आहे त्या रीतीप्रमाणें מה या अक्षरांबद्दल צי हीं अक्षरें येतात व त्यांची संख्या शंभर होते; यावरून ईश्वर प्रत्येक इस्राएलाकडून प्रतिदिवशीं शंभर धन्यवाद मागतो असें सिद्ध केलें आहे.

टीका ४६. मुख्य चार प्रकारचें नुकसान.

हें मुख्य चार प्रकारचें नुकसान तें येणेंप्रमाणें:—गुरुं हुडकून मारतो त्यामुळें, खांच खणून ठेविल्यामुळें, शेरडें दुसऱ्याच्या शेतांत चारल्यामुळें व विस्तवामुळें. याविषयीं निर्गम अ. २१ ओ. २८–३२, ओ. ३३–३६ अ. २२ ओ. ४–६ इत्यादि एथें लिहिलें आहे; व त्याचें स्पष्टीकरण गेमारा बाबा कम्मा अ. १ एथें केलें आहे.

टीका ४७. याजकपणाच्या चोवीस देणग्या.

शास्त्रामध्यें याजकपणाच्या एकंदर चोवीस देणग्या आहेत. यांतून दहा पवित्र मंदिरीं द्यावयाच्या, चार येरुशालेमेंत द्यावयाच्या आणि दहा पवित्र देशांत द्याव्या लागत असत. तरी यांतून कित्येक परदेशींहि द्याव्या लागतात. याचें वर्णन गेमारा हुल्लीन पृष्ठ १३३ ब एथें स्पष्ट केलें आहे.

टीका ४८. ऋतु पालटण्याच्या वेळाचें गणीत.

इस्राएली पंचांग चंद्रमानाच्या गणितानें व सूर्यमानाच्या गणितानेंहि काढावें लागतें. चंद्रमानानें इस्राएली महिन्यांचे गणित होतें आणि सूर्यमानानें ऋतूंचें गणित होतें. चांद्रमास सुमारें २९ दिवस १२¾ तास असल्या-कारणानें चंद्रमानाचें वर्ष सूर्यमानाच्या वर्षापेक्षां सुमारें ११ दिवस व कांहीं तास व मिनिटें उणें आहे. अशा अंतरामुळें पेसाहाचा सण जो कणशा येण्याच्या वेळीं पाळायाचा, शाबूओथचा सण जो कापणीच्या वेळीं पाळा-याचा, आणि सुक्कोथचा सण जो सांठवण्याच्या वेळीं पाळायाचा, हे सण भलत्याच वेळीं पाळायास लागते. परंतु तसें होऊं नये आणि हे सण वेळच्यावेळीं पाळले जावे ह्मणून सूर्यमानाच्या गणितानें ऋतु ठरवून कधीं दोन वर्षांनंतर कधीं एक वर्षानंतर अधिक मासाचें वर्ष नेमिलें जातें.

टीका. ४९ वीस अधिक अर्पणें.

नित्याच्या अर्पणाशिवाय शाब्बाथ, प्रतिपदा, वर्षप्रतिपदा, प्रायश्चित्ताचा

दिवस, सुक्कोथचे आठ दिवस, पेसाहाचे सात दिवस व शावूओथचा एक दिवस असे एकंदर वीस दिवस अधिक अर्पणें करावीं लागत असत. या अधिक अर्पणांबद्दल आतां या वीस दिवशीं मूसाफ या अधिक प्रार्थना कराव्या लागतात.

टीका. ५० घाव झालेल्याची फेड.

भांडणांत एखाद्या मनुष्यास घाव झाल्यास घाव करणारानें घाव झालेल्यास पांच प्रकारें फेड करावीः—१ त्याच्या शरीरीं झालेल्या घावाची, २ धंदाव्यापार करण्याच्या वेळेची हानि झाली त्याची, ३ औषधोपचार करण्याकरितां झालेल्या पैक्याच्या हानीची, ४ लज्जा प्राप्त झाली त्याची, ५ वेदना सोसाव्या लागल्या त्यांची.

टीका. ५१ मोलेख.

ही आम्मोनी लोकांची पितळेची मूर्ति होती. तिचें डोकें बैलाचें असून शरीर मनुष्यासारखें असे. इजला विशेषेंकरून लेंकरें अर्पिलीं जात. ती पोकळ असून तिला आंतून तापवून आर्पिलीं जाणारीं बालकें पुढें पसरलेल्या तिच्या हातांवर ठेवीत.

टीका. ५२ देहांत शिक्षा.

न्याय सभेकडून चार प्रकारच्या देहांत शिक्षा होत्या; ह्मणजे धोंडमार, जाळणें, तरवारीनें छेदणें आणि फांशी देणें. याशिवाय ईश्वराकडून अकाळिक मृत्यूची शिक्षा ती.

נשלמו העתקות כל סדרי התפלות
שבח לאל עושה נפלאות גדולות
וכמו שעזרני עד הלום לעבוד עבודתו
כן יחזקני ויאמצני לעד לספר תהלתו

सर्व प्रार्थनांच्या पद्धतींचें भाषांतर समाप्त झालें;
महान् चमत्कार करणाऱ्या देवाची स्तुति असो;
जसें त्यानें मला त्याची सेवा करायास एथपर्यंत साह्य केलें,
तसें त्याचे गुण वर्णायास तो सदा मला शक्ति व सामर्थ्य देवो.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.					प्रती.
अ. दावीद एलीया शापुरकर मेस्त्री.	...	...	...	...	१
,, शालोम योसेफ पेणकर हाज्जान.	...	...	...	...	१
,, दावीद शेलोमो बोरघरकर चौगले.	...	...	...	...	१
,, याकोब शेमोएलजी वासकर दाक्तर.	...	...	...	...	१
,, शालोम हाईम राजपुरकर काजी.	...	...	...	...	१
,, आहारोन आब्राहामजी शिरगावकर.	...	...	...	...	१
,, इसहाक एलीया भोरपकर चौगले.	...	...	...	...	१
,, योसेफ शेमोएलजी ढोकरकर मेस्त्री.	...	...	...	...	१
,, शेलोमो आब्राहामजी पेझारकर.	...	...	...	...	१
,, बारूख हाइमजी चरीकर गार्ड.	...	...	...	...	१
,, रेऊबेन शालोमजी गडकर मेस्त्री.	...	...	...	...	१
,, शिमशोन येहेजकेलजी मजगांवकर मेस्त्री.	...	...	...		१
,, बिनयामीन आब्राहामजी पेणकर.	...	...	...	...	१
,, दावीद बंदुजी पेझारकर. ...	...	...	...	...	१
,, योसेफ आहारोनजी तळकर.	...	...	...	...	१
,, मोशे बिनयामीनजी कांदलेकर स्टेशन मास्तर.	...	...	...		१
,, शालोम बनाजी आवासकर मेस्त्री.	...	...	...	...	१
,, येहेजकेल दानीएलजी रोहेकर मेस्त्री. ...	...	...	...		१
,, बिनयामीन दानीएलजी रोहेकर मेस्त्री.	...	...	...		१
,, एलीयाहु रेऊबेनजी भिंजेकर.	...	...	...	...	१
,, योसेफ रेऊबेनजी कोर्लेकर फोरमन. ...	...	...	...		१
,, दावीद रेऊबेनजी कोर्लेकर.	...	...	...	...	१
,, आब्राहाम शेमूएलजी राजपुरकर.	...	...	...	...	१
दाक्तर. एलायज्या मोझस एल्. एम्. ॲन्ड एस्.	...	...	...		१
मिसेस रेचल एलायज्या मोझस.	...	...	...	...	१
अ. शेलोमो दानीएलजी कोर्लेकर सु. मे. बा. पे.	...	...	...		१
,, आब्राहाम बिनयामीन शिरगांवकर सु. पे.	...	...	...		१
,, राहामीम रेऊबेनजी पेणकर.	...	...	...	...	१
,, शेमूएल याकोबजी खरीलकर सु. पे. ...	...	...	...		१

नांवें.	प्रती.
अ. शिमशोन शिमओनजी कोलेटकर.	१
,, लेवी येहेजकेलजी तलकर.	१
,, इसहाक आहोरानजी नौगांवकर टेलेग्राफ सिग्नलर.	१
,, योसेफ येहुदा आष्टमकर टेलेग्राफ सिग्नलर.	१
,, पिनहास आहारोनजी सानकर टेलेग्राफ सिग्नलर....	१
,, इसहाक मोशे काजी झीराटकर.	१
,, बिनयामीन शालोमजी गडकर.	१
,, याकोब आहारोनजी आवासकर.	१
,, याकोब आब्राहामजी शापुरकर.	१
,, इसहाक दानिएलजी बामनोलकर.	१
,, मोशे दानीएलजी तलकर आकाउन्टंट इ. डि. सासुन मिल्स. ...	१
,, दानीएल मोशेजी तलकर सरव्हेर ग्रीव्हस कॉटन मिल्स.	१
,, हाईम आबाजी चरीकर मेस्त्री.	१
,, मोझस जेकब रामराजकर क्लार्क म्युनिसिपालिटी....	१
,, दावीद बिनयामीनजी आष्टमकर एन्जीन ड्रायव्हर.	१
,, इसहाक एलीया शापुरकर....	१
,, मोजस डेवीड आगरवारकर सेकंड गार्ड.	१
,, मेनश्शे योसेफजी पुगांवकर.	१
,, योसेफ इसहाकजी आवासकर.	१
,, योसेफ एलीयेझेरजी तलकर.	१
,, दानीएल याकोबजी नौघरकर.	१
,, मेनश्शे शेमूएलजी पेझारकर सर्व्हेर म्युनिसिपालिटी.	१
,, राहामीम मोझस खंडालकर ड्रायव्हर बा. म्युनिसीपालिटी.	१
खानसाहेब दावीद सिलेमानजी पेझारकर....	१
अ. शिमओन इसहाकजी इवलेकर.	१
,, शेमोएल शालोमजी बोरघरकर व बंधु.	१
,, राहामीम हाइमजी दिवेकर ड्राफ्समन.	१
,, आब्राहाम रेऊबेनजी पेणकर.	१
,, मोशे शेलोमोजी दिघोरकर मेस्त्री.	१
,, शेमूएल रेऊबेनजी पेझारकर मेस्त्री.	१
,, याकोब मोशे सिलेमान.	१
,, नाहाशोन सिमशोनजी सानकर.	१
,, शेमूएल सत्केलजी वरोलकर दाक्तर.	१

नांवें.	प्रती.
अ. मेनश्शे जखार्या पेणकर व बंधु.	१
,, आहोरान आब्राहामजी पेणकर.	१
,, राहामीम शेमूएलजी तलकर.	१
,, सॉलोमन आब्राहामजी केहिमकर पे....	१
,, दावीद सिमशोनजी दिवेकर.	१
,, सिलेमानजी एलीयाहु दांडेकर. (सींव)...	१
,, सिलेमानजी मोझस तळेगांवकर एन्जीनियर.	१
,, बिनयामीन आब्राहामजी शापुरकर.	१
,, हाईम बिनयामीनजी भास्तेकर.	१
,, शेमूएल हाईमजी पेझारकर.	१
,, शिमशोन मोशे झिराटकर काजी.	१
,, योएल शेमूएलजी शिरकोलकर दाक्तर.	१
,, दानिएल राहामीमजी पेणकर.	१

जामनेर.

अ. राहामीम शिमशोनजी वासकर एन्जीनियर.	१

झ्रौ.

अ. एफ्राईम स्यामसन.	१
,, आब्राहाम स्यामसन शापुरकर हेडस्कुल मास्तर २२ रेजिमेंट. ...	१

दिल्ली.

अ. येहुदा शालोमजी पेझारकर एन्जिनियर.	१

नागपूर.

अ. आब्राहाम एलोजी चेऊलकर असी. क्यारेज एन्ड व्यागन फोरमन. ...	२
,, हाईम आब्राहामजी मळेकर.	२
,, शिमशोन दानीएलजी पेणकर मेस्त्री.	१
,, राहामीम याकोबजी बंदरकर असी. क्यारेज एक्झामिनर.	१
,, शेमोएल शिमशोनजी भोरपकर.	१
,, आब्राहाम शिमशोनजी रामराजकर.	१
,, बिनयामीन येहेजकेलजी आष्टीवकर.	१
,, आब्राहाम बिनयामीनजी वालवटकर....	१

आदन.

अ. बिनयामीन येहेजकेलजी जावळीकर सी. एम्. एस्. मिलिटरी नेटिव्ह जनरल हॉस्पीटल.	१

नांवें.	प्रती.
रंगून.	
अ. मोशे येहेजकेल जावलीकर इन्स्पेक्टर पोलिस हानथावडी डिस्ट्रीक्ट बर्मा.	१
पनवेल.	
अ. इसहाक शेमूएलजी नौगांवकर चौगले.	१
,, मोशे शेमूएलजी नौगांवकर.	१
,, येहुदा येहेजकेलजी चीचोलकर.	१
,, शेमूएल मुसाजी नागांवकर हाज्जान.	१
,, आब्राहाम दावीदजी भास्तेकर.	१
हुबळी.	
अ. येहेजकेल एलीया चरीकर चीफ गार्ड....	१
अहमदाबाद.	
अ. इसहाक आब्राहामजी तळेगांवकर एल्. एस्. एम्.	१
,, शेमूएल शेलोमो काजी झिराटकर सु. पे.	१
,, हाईम शेमूएल काजी झिराटकर हाज्जान.	१
रेवदंडा.	
अ. इसहाक आब्राहामजी मळेकर.	१
,, शालोम एलीया शापुरकर गव्बाय.	१
,, इसहाक शेलोमो आष्टमकर.	१
,, शालोम आहारोनजी ढोकरकर.	१
,, आहारोन दावीदजी ढोकरकर.	१
पुणें.	
अ. दानीएल रहामीमजी तलकर सु. मे. बा. पे.	१
,, आहारोन दानीएलजी तलकर रैटर.	१
,, एलीएझेर दानीएलजी कोलेटकर ड्राफ्समन.	१
धी असोसिएशन फॉर धी स्टडी आफ ज्यूइश रिलीजन.	१
मि. मोझस स्यामसन.	१
अ. शालोम शेमूएलजी चरीकर जमादार. पे.	१
,, राहामीम आब्राहामजी मजगांवकर.	१
,, इसहाक शालोमजी भोणकर एस्. एम्. रेलवे गार्ड. ...	१
,, बिनयामीन शालोमजी नागांवकर सु. मे. पे.	१
,, दावीद शेलोमो झीराटकर....	१

नांवें.	प्रती.
कराची.	
अ. शालोम दावीदजी उमर्डेकर सरवेर पे.	२
,, गेरशोन शालोमजी उमर्डेकर सुपरवाइझर.	१
,, दानीएल सालोमन सुपरिन्टेंडेन्ट आफ जेल.	१
,, येहेजकेल शेमोएलजी तलकर रैटर.	१
,, आब्राहाम रेऊबेनजी कामरलेकर सरवेर.	१
,, मोशे शेलोमो म्हेडेकर स्टेशन मास्तर.	१
,, याकोब शालोमजी चीचोलकर यार्ड फोरमन.	१
,, शाऊल शालोमजी खरविलकर यार्ड फोरमन.	१
,, दावीद विनयामीनजी दिवेकर.	१
,, शेमूएल योयेलजी झशीलकर ओवरसीयर..	१
,, योसेफ आहारोनजी खुलाबकर हाज्जान.	१
,, येलीयेझेर याकोबजी भोरपकर दाक्तर.	१
,, मोर्देखाय रेऊबेनजी किल्लेकर रैटर.	१
,, मेखाएल दानीएलजी दिघोरकर ड्राफ्समन.	१
,, येहुदा याकोबजी भोणकर कम्पाझीटर...	१
,, आर्. स्यामुएल स्टे. मास्तर.	१
पेण.	
अ. राहामीम आब्राहामजी पेणकर.	१
,, आहारोन विनयामीनजी कांदलेकर हाज्जान.	१
हाव्हेरी (धारवाड).	
अ. एज्रा रेऊबेन सब जज्ज.	१
हासन (मायसोर).	
अ. आब्राहाम शेमूएल नागांवकर एक्झिक्यूटिव एन्जिनियर	१
भगव्हाडर.	
अ. सादीक दावीदजी चोर्डेकर मे. आफिसर इनचार्ज डिस्पेन्सरी. ...	१
डीन्डोरी.	
अ. खानसाहेब येलीयाहु याकोबजी वासकर बी. ए. तहसीलदार. ...	१
ठाणें.	
अ. शेमूएल इसाजी जावलीकर सु. मे. स. वा. पे.	१
,, दानीएल दावीदजी उमर्डेकर आर्. एम्. एस्. पोस्ट मास्तर. ...	१

नांवें. प्रती.

चीनहिल्स फालम.

अ. एस्. एस्. जेकब सेकंड क्लार्क मिलिटरी पोलीस बटालियन.... ... १

इगतपुरी.

अ. शेमूएल शेलोमोजी पात्रेकर हेड क्यारेज एक्झामिनर. १

भुसावळ.

अ. सिमशोन आब्राहामजी तलकर सुपरवाइझर. १
,, दावीद रेऊबेन आवासकर गार्ड. १

नवसारी.

अ. आब्राहाम आहारोनजी केहिमकर बी. ए. एल्. एल्. बी. जज्ज. ... १

कानपूर.

अ. याकोब येहेजकेलजी पिंगळे गार्ड. १

भोपाल.

अ. दानीएल येलीयाहु नागांवकर एन्जीन ड्रायव्हर. १

अलीबाग.

अ. सिलेमान सत्केलजी कोगबानकर सु. पे. १
,, जखार्या सिलेमानजी कांदलेकर सु. मे. पे. १

काऊलुन. हाँगकाँग. चीन.

अ. हाईम बेनजामीन मजगांवकर सु. मे.... ... ... १
,, मोजस स्यामूएल सु. १
,, शालोम येहेजकेल सायगांवकर फ. ग्रे. हा. अशिस्टंन्ट. १
,, याकोब एलीस नौगांवकर क्वा. मा. हवालदार. १
,, डब्ल्यू. आर्. एलीएझेर फिल्ड कंट्रोलर्स आफीस चैना एक्सपिडीशनरी फोर्स. १
,, सालोमन स्यामूएल रोहेकर सी. हा. आ. रे. २२ वें. १
,, एलायज्या एब्राहाम भोनकर हा. आ. १
,, मोशे रेऊबेनजी उमर्डेकर प्रा. सिग्नलर. १

या कर्त्यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें.

		रु.	आ.	पै.
१	प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें	०	१	३
२	पापांच्या क्षमेसाठीं प्रार्थना....	०	६	०
३	इस्राएलांचा लग्नविधि.	०	२	०
४	वर्षप्रतिपदेची प्रार्थना.	०	१२	०
५	नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना.	०	३	०
६	आन्तिओखोस राजाचा इतिहास, अथवा हानुकाचे सणाची स्थापना.	०	२	०
७	इब्री पहिलें पुस्तक.	०	४	०
८	प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग १	१	०	०
९	,, ,, ,, ,, २			
१०	सद्गुरुवचनें.	०	४	०
११	इस्राएलांच्या धर्ममताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें.	०	०	९
१२	इस्राएली धर्माचें खरें स्वरूप.	०	१२	०
१३	इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम.	०	६	०
१४	नित्याची प्रार्थना (अ. येहेजकेल बिनयामीन पेणकर मेस्त्री यांनीं छापिली.)			
१५	इब्री लघुव्याकरण.	०	८	०
१६	लेंकरांची इब्री पहिली पोथी.	०	१	६
१७	כתנת יוסף Hand-book of Hebrew Abbreviations.	२	०	०
१८	इस्राएलांचीं पंचोपोषणें.	१	१०	०
१९	इस्राएलांचे त्रिपर्वोत्साह (सुक्कोथ, पेसाह व शावूओथ.)	१	१२	०